**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**कामकाजपत्रिकेवरील अर्धातास चर्चेसंबंधी**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आज माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला असल्यामुळे आजच्या कामकाजपत्रिकेवरील नवव्या क्रमांकाची अर्धातास चर्चा प्रथम चर्चेला घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. माननीय सदस्यांच्या विनंतीप्रमाणे सर्वप्रथम अनुक्रमांक-9 वरील अर्धातास चर्चा घेण्यात येईल.

----

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सार्वजनिक महत्वाच्या विषयाच्या संदर्भात.</u>**

**पृ. शी.** : रायगड किल्ल्यावरील शिवप्रभूंच्या अश्वारुढ पुतळयावर छत्र बसविणे

**मु. शी.** : रायगड किल्ल्यावरील शिवप्रभूंच्या अश्वारुढ पुतळयावर छत्र बसविणे यासंबंधी समितीच्या सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"रायगड किल्ल्यावरील 25 वर्षापूर्वी शासनाने बसविलेल्या अश्वारुढ पुतळयावर छत्र नसल्याने सदर पुतळा ऊन, पाऊस व वाऱ्याने खराब होणे, सदर पुतळयावर छत्र बसवावे अशी सर्व शिवप्रेमी जनतेने शासनाकडे मागणी करुनही शासनाचे त्याकडे दुर्लक्ष होणे, शिवप्रभूंच्या पुतळयावर किमान छत्र तरी उभारावे या ध्येयाने प्रेरित होऊन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री.संभाजीराव भिडे यांनी पंचधातूचे शिवपुतळयावर बसवलेले छत्र शासनाच्या पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी काढून टाकल्याने शिवप्रेमी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, केवळ महाराष्ट्रामध्ये नव्हे तर संपूर्ण भारतामध्ये छत्रपती शिवरायांना आदराचे स्थान आहे. 25 वर्षापूर्वी रायगड किल्ल्यावर शासनाने बसविलेल्या शिवरायांच्या अश्वारुढ पुतळयावर छत्र नाही ही बाब शिवप्रेमींना कित्येक वर्षापासून जाचत होती. पुरातत्व विभागाच्या वेगवेगळया नियमामुळे आपल्या भावनांना, अस्मितांना, निष्ठांना बसणारा फटका हा फार मोठा विषय केवळ या एका पुतळयाच्या निमित्ताने नव्हे तर संपूर्ण पुरातत्व विभागाशी संबंधित विषय आहे. 25 वर्षापासून हा पुतळा ज्या पध्दतीने ऊन्हातान्हात आहे, त्यामुळे अनेक वर्षापासून रायगड ते सांगलीपर्यंत अनेक व्यक्ती सातत्याने मागणी करीत होत्या, प्रयत्न करीत होत्या. शिवप्रभूंच्या पुतळयावर छत्र बसविण्यासाठी यावर्षी पहिल्यांदा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री.संभाजीराव भिडे यांनी शिव प्रतिष्ठानतर्फे धारातीर्थ यात्रा सुरु केली. माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते छत्र बसविण्यात येणार होते. पंचधातूच्या छत्राची पूजा केल्यानंतर ते छत्र बसविण्यात आले. छत्र बसविताना पुतळयाला काहीही हानी पोहोचणार नाही, पुतळयाचे सौंदर्य, आकारमान,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ 10:00

डॉ.नीलम गोऱ्हे...........

छत्राचे आकारमान यामध्ये काहीही विशोभीत होणार नाही अशी दक्षता घेऊन या लोकांनी खूप तयारी करुन शांतपणे कार्यक्रम केला होता.

सभापती महोदय, पुन्हा पुन्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयाबाबत अर्धातास चर्चा उपस्थित करावी लागते. सहार येथील छत्रपती शिवप्रभूंच्या पुतळयाचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी सगळ्यांनी एकमताने सांगितले की, व्यवस्थितपणे पुतळयाचे पावित्र्य जनत करावयास पाहिजे. परंतु या सूचनेत उल्लेखिल्याप्रमाणे छत्रचामर काढून टाकण्यात आले. पुरातत्व विभागाचे केंद्रातील मंत्री, संबंधित अधिकारी, महाराष्ट्रातील पुरातत्व विभागाचे संबंधित अधिकारी यांच्याशी संबंधित हा विषय आहे. एकवीरा देवीच्या मंदिराकडे जाणाऱ्या पायऱ्यांची डागडुजी करण्यास पुरातत्व विभाग मंजुरी देत नाही. आज तेथील पायऱ्यांची अवस्था पाहिली तर एक पायरी मोठी, एक पायरी लहान अशी अवस्था आहे. मंदिराकडे जात असताना पायऱ्या चढताना डोक्यावर छप्पर असण्याची आवश्यकता आहे. भीमाशंकर येथील देखील असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ......

महोदय, मुख्य मुद्दा असा आहे की, पुरातत्व विभागाचे संबंधित मंत्री, अधिकारी आणि वेगवेगळ्या गड आणि किल्ल्यांची काळजी घेणारे संबंधित स्थानिक अधिकारी यांची एक राऊंड टेबल चर्चा ती केवळ भाषणापुरती मर्यादित नसावी, अशी सविस्तर चर्चा ठेवावी व यातून मार्ग काढावा. उदा. जुन्नर येथे शिवनेरी किल्ल्याला संरक्षक भिंत बांधण्यात आली परंतु नंतर त्याला भगदाड पडले आणि मध्यंतरी तेथील देवीचे दागिनेही चोरीला गेले होते, शिवाजी महाराजांच्या सिंहगडावर देखील सातत्याने चोऱ्या होत असतात. या सगळया बाबींचा विचार करावा. रायगडावर पुन्हा छत्र बसविले जावे आणि त्यासंबंधी काही अडचणी वा समस्या असतील तर त्याबाबत ताबडतोब तोडगा काढण्याबाबत देखील माननीय मंत्री महोदयांनी आजच्याच उत्तरामध्ये सांगावे, अशी आमची अपेक्षा आहे. तसेच मी वर म्हटल्याप्रमाणे सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी एकत्र बसून यावर तोडगा काढण्याबाबतची तारीख आम्हाला कळावी. हा कार्यक्रम घेताना स्थानिक नागरिकांनाही सहभागी करुन घ्यावे. तसेच रायगड येथील श्री. गोगावले आणि संभाजीराव भिडे यांनाही निमंत्रित करावे. अन्यथा मोहम्म्द तुघलकाच्या काळात जशी परिस्थिती होत होती तसे करु नये, इतरांना पायदळी चिरडणार असा प्रकार न होता याची ताबडतोब अंमलबजावणी करावी. तसेच या सर्व बाबतीत पुरातत्व विभाग नक्की कोणते निकष लावते, कशामुळे सौंदर्य बिघडते आणि हे करीत असतांना कशा पध्दतीने काम केले तर पुरातत्व विभागाचा आक्षेप राहणार नाही हे सर्व समजले पाहिजे. आम्ही सुचविल्याप्रमाणे जर शासनाने प्रयत्न केला तर अनेक सन्माननीय सदस्यांच्या निधीची देखील या कामासाठी मदत होऊ शकेल. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

--------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजीतसिंह पाटील (सांस्कृतीक कार्य मंत्री) : सभापती महोदय, रायगड किल्ला गॅझेट नोटिफिकेशन क्र. 1234, 11 मार्च अन्वये हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले होते. रायगडावरील "कलेची माळ" म्हणून टोकाला जाणाऱ्या मोकळ्या जागेवरती एक उंच मेघडंबरी आहे तेथे छत्रपती शिवाजीचा पुतळा ठेवलेला आहे. तो पुतळा शिवराज्याभिषेकाच्या त्रिशताब्दीच्या निमित्ताने सन 1974 साली बसविण्यात आला होता. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुद्दा उपस्थित केला आहे त्यानुसार मला सांगावयाचे आहे की, दि. 6 फेब्रुवारी, 2008 रोजी या माळावर मोठा जनसमुदाय जमला होता. सन्माननीय सदस्या डॉ. गोऱ्हे यांनी श्री. संभाजीराव भिडे यांचाही उल्लेख केला ते सुध्दा तेथे हजर होते. त्या लोकांची इच्छा होती की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर एक छत्र बसविण्यात यावे. वास्तविक हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक असल्यामुळे अशा प्रकारे काही बदल अथवा फिजिकल चेंजेस करण्यासाठी एएसआयची प्रॉयर परमिशन घ्यायला हवी. तसेच अेएसआयचे नियम व अटी ज्या आहेत त्यांचा विचार करुनच ही पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते. एवढा जनसमुदाय तेथे जमल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांबरोबर या लोकांनी चर्चा केली आणि जनसमुदायाच्या भावनांचा आदर राखण्यासाठी थोड्या वेळापुरते म्हणजेच अर्धा-पाऊण तास ते छत्र तेथे ठेवण्याची परवानगी दिली. त्यानंतर ते छत्र बाजूला करण्यात आले. महत्वाचा मुद्दा असा आहे की, स्मारक व पुराणवस्तू शास्त्रीय विषयक सल्ला व अवस्था अधिनियम (एएनएएसआर) या कायद्यातील तरतुदींचा भंग होत असेल तर न्यायालय त्याची गंभीर दखल घेते. सन 2004 साली यासंदर्भात एक जनहित याचिका दाखल झाली होती व त्या अनुषंगाने न्यायालयाने दि. 3.10.2007 ला निर्णय दिला. ही जनहित याचिका मुंबईतील लेण्यांच्या बाबतीत होती. परंतु हे सांगत असताना महाराष्ट्रामध्ये इतर जी राष्ट्रीय संरक्षित स्मारके आहेत ती भारतीय पुरातत्व संरक्षणाच्या अधिसूचनेने अधिसुचित झालेली आहेत. राष्ट्रीय संरक्षित स्मारके म्हणून अशा सर्व ठिकाणी व्यवस्थित परवानगी दिल्यानंतरच तेथे पाणीपुरवठा व वीज पुरवठा करणे व इतर अनेक उल्लेखही या आदेशात करण्यात आले आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ...

त्यामुळे एएसआयची परवानगी न घेता आपण उल्लेख केल्याप्रमाणे त्या ठिकाणी एखादी वास्तू किंवा छत्र उभे करावयाचे असेल तर तसे आपल्याला करता येणार नाही. यासंदर्भातील जे काही विनंती अर्ज आहेत ते एएसआयच्या महासंचालकांकडे पाठविण्यात आलेले आहेत. त्यांना विनंती करुन त्यांची मुंबई किंवा दिल्लीमध्ये वेळ घेऊन बैठक घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल तसेच शासनाच्या वतीने त्यांची वेळ घेऊन बैठक आयोजित करण्यात येईल. वेगवेगळया खाजगी लोकांनी केलेल्या विनंत्या आतापर्यंत आपण महासंचालकांकडे पाठविलेल्या आहेत. हा महत्वाचा विषय असल्यामुळे या विषयाची गांभीर्याने दखल घेतली जाईल.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, जनहितार्थ याचिकेत वीज पुरवठा करु नये, पाणी पुरवठा करु नये त्यामुळे यासंदर्भात आपण अपिलात जाऊ शकतो. माझी आपल्याला विनंती आहे की, आचारसंहितेबद्दला प्रश्न उपस्थित झाला होता त्यावेळेस नागपूर कार्टाने विकासकामे थांबविण्याचे कारण नाही अशा प्रकारचे जजमेंट दिले होते. त्यामुळे यासंदर्भात आपण कोर्टाला विनंती करा की, वीज,पाणी आणि लोकांना जाण्यायेण्यासाठी रस्ता नसेल तर कशा प्रकारे यामध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत यासंदर्भात कोर्टाने आम्हाला गाईड करावयास पाहिजे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, कोर्टाचे म्हणणे अनाधिकृत बांकामाच्या संदर्भात आहे. आपल्याला पुरातत्वविभागाने छत्र बसवण्याची परवानगी दिली व आपण उल्लेख केल्या प्रमाणे पाय-यांच्या संदर्भात परवानगी दिली किंवा अशा ठिकाणी पाणी पुरवठ्याची एखादी योजना करावयाची परवानगी दिली तर काही अडचण येणार नाही. त्यामुळे एएसआयच्या महासंचालकांबरोबर यासंदर्भात लवकरात लवकर बैठक आयोजित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या वास्तूचे स्मारक करण्यात येत असलेल्या अडचणी

**मु. शी.** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या वास्तूचे स्मारक करण्यात येत असलेल्या अडचणी यासंबंधी वि.प.स.श्रीमती उषा दराडे यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्रीमती उषा दराडे( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर बालपणी सन १८९६ ते १९०४ या कालावधीमध्ये सातारा येथील सदर बाजार येथील इमारतीमध्ये वास्तव्यास होते तेथे त्यांचे स्मारक व्हावे अशी होत असलेली मागणी , आंबेडकरी विचारांच्या अनुयायांनी मागणी करूनही जमीन संपादनाच्या कामात होत असलेला विलंब, स्मारक म्हणून राज्य संरक्षित स्मारक करण्याची अधिसूचना शासनाने राजपत्रात प्रसिध्द करणे , परंतु निधीची उपलब्धता न करणे त्यामुळे सामान्य जनतेत निमार्ण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, इ.स.1896 ते इ.स.1904 या कालावधीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या कुटुंबासमवेत सातारा येथील सदर बाजारात ब्रिटिश कालीन इमारतीमध्ये राहत होते. ही बाब बाबासाहेबांच्या अनुयायाच्या लक्षात आल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती स्थापन करुन मागील चार वर्षापासून त्यांनी आंदोलने केलेली आहेत. या इमारतीला अनन्यसाधारण महत्व आहे. आंदोलने झाल्यानंतर शासनाने निर्णय घेतला आणि एक नोटीफिकेशन काढले की, सातारा येथील सदर बाजारातील ब्रिटिश कालीन इमारतीमध्ये वास्तव्य असल्यामुळे सदर स्मारक राज्य संरक्षित करण्यात येत आहे. अशा प्रकारे नोटीफिकेशन काढण्यात आले होते. याबाबत शासन स्तरावर विहित कार्यपध्दती प्रक्रिया पूर्ण असल्याने व्यवस्थापक शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-04 यांना या शासन निर्णयाद्वारे निर्देश देण्यात येत आहे की, सोबतची अंतिम मराठी आदी सूचना व तिचे इंग्रजी भाषांतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र 4 मध्ये प्रसिध्द करावी.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

राजपत्र चार मध्ये नोटीफिकेशन दिले आहे यामध्ये मूळ मालक लक्ष्मण मारुती आमने दाखवले आहेत. मेजरमेंटची बाब शासनाला मान्य असल्यामुळे या विषयाच्या संदर्भात मी बोलणार नाही. परंतु भूमापन क्रमांक -1, सदर बाजार येथील जी इमारत आहे ती लक्ष्मण काळू आमने यांच्याकडे ओनरशिप मध्ये आली. बाबासाहेब ज्या कुटुंबियासमवेत तेथे राहत होते त्यांचे आजोबा रामविर नाईक सुभेदार यांच्याकडून 1075 रुपयांमध्ये श्री. धनसिंग कपूर यांनी ही इमारत घेतली. ही इमारत नंतर त्यांची नाथ होमाई नरीमन कपूर यांच्याकडे वारसाने गेली. नंतर त्यांच्याकडून ही इमारत मनीभाई राजकुमार नावाच्या मुलीकडे वारसाने गेली. नंतर या मनीभाईने लक्ष्मण काळू आमने यांना ही इमारत विकली. अशा प्रकारे लक्ष्मण काळू आमने हे या जमिनीचा ओनर आणि पर्चेसर झाले. आपण ही जागा स्मारकासाठी घेत आहोत परंतु श्री. लक्ष्मण आमने यांच्याकडेही उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्यामुळे श्री. आमने यांनी रिटयाचिका सादर केलेली आहे. हे रिट पिटीशन नंबर 5827 हे पेंडींग आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे

श्रीमती उषा दराडे ....

या रिटमध्ये ॲड इंटेरिम इंजक्शन मागण्यात आलेले नव्हते त्यामुळे त्याचा आधार आपल्याला घेता येणार नाही परंतु ॲड इंटेरिम इंजंक्शनच्या बाबतीत माननीय उच्च न्यायालयाने कोणताही निर्णय न देता केवळ हिअरींग अँडमिट करुन घेतलेले आहे तेव्हा पेन्डन्सी ऑफ रीटमध्ये ॲड इंटेरिम इंजक्शन जाणीवपूर्वक मागितलेले असतांना सुध्दा कोर्टाने दिलेले नाही.तेव्हा शासनाला याचा आधार घेऊन हे प्रकरण प्रलंबित करता येणार नाही. यामध्ये एकच बाब शिल्लक राहिलेली आहे.राज्य शासनाकडे या सबंधीचा प्रस्ताव देखील प्रलंबित आहे. ही जागा ताब्यात घेण्याकरिता श्री.लक्ष्मण आमने याला पैसे देण्यासंबंधीचा प्रस्ताव पुरातत्व विभागाच्या मार्फत सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे.पैसे देऊन ही जागा ताब्यात घेतली पाहिजे आणि पैसे देऊन ही जागा ताब्यात घेण्याचे काम अडलेले आहे स्मारक समिती आणि महाराष्ट्रातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील सर्व दलित बांधव यामुळे नाराज झालेला आहे. शासनाला माझी अशी विनंती आहे की, या सर्व मालमत्तेचे 70 लाख रुपये मिळावेत अशी त्यांनी मागणी केलेली आहे. तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे काम केवळ पैशामुळे आपण अडकवून ठेवणार आहात काय, या स्मारकाची पैशाशी किंमत होऊ शकते काय ? तेव्हा या बाबतीत माझी शासनाला अशी विनंती आहे की, शासनाने जिल्हाधिका-या मार्फत श्री लक्ष्मण आमने यांना चर्चा करण्यासाठी बोलाविण्यात यावे व त्यांच्याशी वन टाईम सेटलमेन्ट करावे.तसेच ते म्हणतील तेवढी रक्कम त्यांना देण्यात यावी व स्मारक ताब्यात घ्यावे अशी मी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करते.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील (सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री ): सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी जी अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे त्या अनुषंगाने मी त्यांना सांगू इच्छितो की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर बालपणी म्हणजे 1896 ते 1904 या काळात सातारा येथील सदर बाजार येथील इमारतीमध्ये राहत होते. दिनांक 13.2.2007 अन्वये या इमारतीबाबत अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यात आली असून राज्य संरक्षित स्मारक म्हणून ती इमारत घोषित करण्यात आलेली आहे. या संदर्भात इमारतीचे मालक श्री.लक्ष्मण काळू आमने यानी कोर्टात रिट पिटीशन दाखल केले असून हे मॅटर आता न्यायप्रविष्ट आहे.राज्य संरक्षित स्मारक म्हणून ही इमारत घोषित करण्यात आली होती त्या संदर्भातील बाब न्यायप्रविष्ट आहे हे मी पुन्हा एकदा स्पष्ट करु इच्छितो. अशा परिस्थितीत ही जागा ॲक्वायर करण्याची ॲक्टीव्हीटी आपल्याला स्वतंत्रपणे करता येऊ शकते व त्याबाबतीत पावले उचलण्याचे शासनाने ठरविले आहे परंतु या संदर्भात विधि व न्याय विभागाचा सल्ला घेण्याचे ठरविले आहे. ही इमारत राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आली असून त्यासबंधीची बाब न्याय प्रविष्ट आहे तेव्हा ही जागा ॲक्वायर करु शकतो काय आणि ही जागा ॲक्वायर करणे कितपत योग्य आहे याबाबतीत विधी व न्याय विभागाचे मत घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, ॲड इंटेरिम इंजक्शन मिळालेले नाही हे शासनाला माहीत आहे तरीसुध्दा शासन विलंब लावत आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या स्मारकाची जागा शासनाला ताब्यात घ्यावयाची आहे त्याबाबतीत शासनाचे वेगळे मत नाही परंतु त्या सबंधी विधी व न्याय विभागाचे मत घेऊन पुढील पावले लवकरात लवकर उचलली जातील. त्याचप्रमाणे या इमारतीचे मालक श्री.लक्ष्मण काळू आमणे् यांना बैठकीसाठी आवर्जून बोलाविण्यात येईल आणि त्यांच्या बरोबर निगोशिएशन करुन यातून मार्ग निघत असेल तर त्याही बाबतीत विचार करण्यात येईल.

----



VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे

पृ.शी : सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हयातील आंबा, काजू व कोकम इत्यादीचा पीक विमा योजनेत समावेश करणे

मु.शी : सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हयातील आंबा, काजू व कोकम इत्यादीचा पीक विमा योजनेत समावेश करण्यासंबंधी श्री. राजन तेली,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा् तास चर्चा

श्री.राजन तेली (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो :-

" राज्यात विशेषत: सिंधुदूर्ग व रत्नागिरी या जिल्हयात मोठया प्रमाणात आंबा, काजू व कोकम यांचे उत्पादन घेतले जाणे, शासनानेक लागू केलेल्या पीक विमा योजनेत ऊस, कापूस या सारख्या व्यापारी पिकांचा समावेश असणे, तथापि नाशवंत असणा-या आंबा,काजू व कोकम याना जाणुनबुजून या योजनेतून वगळण्यात आले असणे, त्यामुळे शेतकरी वर्गात मोठया प्रमाणात नाराजी पसरणे, सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हयातून मुंबई, ठाणे या मोठया शहरात आंबा, काजू व कोकम यांचा पुरवठा होत असणे, या जिल्हयातील शेतक-यांचे जीवन सर्वस्वी या बागायतीवर अवंलबून असणे तसेच या बागायतीवर रोग, खार व किडीचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर होत असून त्यामुळे पीक शेतक-यांच्या हातून निघून जाणे, शेतक-यांना त्यासाठी केलेला खर्चही परत मिळत नसणे, त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडणे, आंबा, काजू व कोकम यांचा पीक विमा योजनेत समावेश करण्याची आवश्यकता, या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

सभापती महोदय, सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये आंबा, काजू व कोकमाचे उत्पादन घेतले जाते या पिकांवर सातत्याने रोग आल्यामुळे व अवेळी पाऊस पडल्यामुळे गेल्या पाच वर्षापासून या पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे. या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की ऊस आणि कापूस या पिकांचा समावेश पीक विमा योजनेमध्ये करण्यात आलेला आहे त्याचप्रमाणे आंबा, काजू, कोकम या कोकणातील पिकांचासुध्दा समावेश पीक विमा योजनेमध्ये करण्याचा शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर माझा दुसरा मुद्दा असा आहे की, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्ये कोकणात मोठया प्रमाणावर वणवा लागल्यामुळे अनेक शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्या बाबतीत महसूल विभागाने किंवा कृषी विभागाने पंचनामे केलेले असले तरी मदत

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिळण्याच्या दृष्टीने शेतक-यांना काहीही उपयोग होत नाही. दिनांक 14 मार्च 2008 रोजी सावंतवाडी तालुक्यातील मळगाव येथील 140 शेतक-यांनी सात आठ मैलावरुन पाणी आणून बागायत केली होती परंतु या बागायतीला अचानक आग लागल्यामुळे संपूर्ण बागायत भस्मसात झालेले आहे 200 एकरामध्ये 140 शेतक-यांनी बागायत केली होती.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MMP/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 10:20

श्री. राजन तेली .....

ते त्या ठिकाणी अक्षरश: रस्त्यावरआले, शासनाकडून त्यांना कोणतीही मदत मिळाली नाही. सभापती महोदय, केवळ याच जिल्ह्यामध्ये हे होत आहे असे नाही तर सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे, रायगड या जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारची लँड आहे तेथे चुकून वणवा लागून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते म्हणून याचा विचार करून या शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी पीक विमा योजना लागू केली तर त्याद्वारा त्यांना दिलासा मिळू शकेल. सभापती महोदय, याबाबतीत अशी परिस्थिती आहे की, हल्ली गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने अवेळी पाऊस पडला आहे आणि त्यामुळे देखील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. शासनाची आकडेवारी पाहिली तर तेथील कृषी अधिकाऱ्यांचे म्हणणे 70 टक्के आंबा आणि काजू तसेच फणस इत्यादी फळपिकांचे ज्याला कोकणचा मेवा म्हटले जाते त्याचे अवेळी पडलेल्या पावसामुळे नुकसान झालेले आहे. म्हणून गेली तीन वर्षे शासन थोड्या फार प्रमाणात मदत करते आहे, नाही असे नाही, परंतु हा प्रकार आता सातत्याने सुरू झालेला आहे, त्यात वाढ झालेली आहे. म्हणूनच ज्याप्रमाणे ऊस, कापूस यासाठी आपण पीक विमा योजना लागू केलेली आहे तशीच योजना कोकणातील या फळ पिकांना लागू केली तर कोकणातील सर्वसामान्य शेतकऱ्याला चांगल्या प्रकारे दिलासा मिळू शकेल. सभापती मोदय, वणव्याच्या बाबतीत तर मी सातत्याने गेली तीन अधिवेशनात प्रश्न मांडला आहे. एक तर कोकणामध्ये लॅण्ड होल्डिंग कमी प्रमाणात आहे त्यामुळे तेथे अशा प्रकारे पीक विमा योजना लागू करण्याचा विचार आपण केला पाहिजे. रायगड जिल्ह्यातील चिकू, नारळ, भोपळी मिरची या पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होते, माडावर देखील वेगवेगळे रोग येणे सुरू झालेले आहे. शिवाय माकडांचाही त्रास मोठ्या प्रमाणात सुरू झोला आहे त्यांचाही बंदोबस्त केला गेला पाहिजे. इतकेच नाही तर गेल्या 5 वर्षामध्ये हत्तींचा देखील त्रास सुरू झालेला आहे आणि हे हत्ती संपूर्ण बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत आहेत, त्या संदर्भात वन विभागाकडून आखण्यात आलेल्या योजना यशस्वी झालेल्या नाहीत, त्यांचे प्रयोग यशस्वी झालेले नाहीत. त्यामुळे कोकणातील शेतकऱ्यांच्या बागायती उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्या यशेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक विमा योजना लागू करणे अत्यावश्यक झाले आहे. तरी ती आपण लागू करावी यासाठी मी ही अर्धा तास चर्चा येथे उपस्थित केली आहे, त्याबाबत आपण तातडीने योग्य तो सकारात्मक निर्णय घ्यावा ही विनंती.

**

..... इ 2 ...

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, कोकणातील जी प्रमुख फळझाडे आहेत, उदा. आंबा, काजू, कोकम, नारळ इ. त्यांचा समावेश पीक विमा योजनेत करावा अशी विनंती करण्यासाठी ही अर्धा तास चर्चा प्रामुख्याने येथे उपस्थित केलेली आहे आणि त्या अनुषंगानेच मी येथे उत्तर देणार आहे. सभापती महोदय, ही फळपिके बहुवर्षीय असल्यामुळे त्यांच्या वयानुसार त्यांचे उत्पन्न येत असते आणि कोठल्या वर्षाचे पीक आहे त्यावर सारे उत्पन्नाचे हिशोब वा गणित अवलंबून राहते. या फळांच्या काढणीचा जो हंगाम आहे तो आपल्याला ज्ञात आहेच. सभापती महोदय, या फळ बागायतदारांनी त्यात आर्थिक गुंतवणूक केलेली असते तीही वेगवेगळी असते आणि त्याच्या व्यवस्थापनावर देखील अनेक गोष्टी अवलंबून असतात. त्यामुळे प्रसंगी त्यातून नेमके किती नुकसान झाले हे काढणे अवघड असते. एखाद्या हंगामामध्ये किती फळे काढली आहेत, किती फळे येणे आवश्यक होते आणि किती नुकसान झाले आहे वा फायदा झाला आहे हे काढणे कठीण आहे. त्याचे उत्पन्न निश्चित करण्यासाठी सुयोग्य व तांत्रिकदृष्ट्या योग्य अशी कार्य पद्धती आज आपल्याकडे उपलब्ध नाही. यापूर्वीदेखील या अधिवेशनाच्या काळात या संबंधात चर्चा झाली होती त्यावेळी आंबा, संत्रा, नारळ यावर हवामान पीक विमा योजना लागू करण्याचा प्रयत्न केला होता. ...

( यानंतर सौ. रणदिवे .... एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 10:25

श्री.राणा जगजितसिंह पाटील . . . .

द्राक्षांच्या बाबतीत उदाहरण द्यावयाचे तर नाशिक मधील दोन तालुक्यांमध्ये ही योजना राबविण्याचा प्रयत्न केला. परंतु एकाही शेतकऱ्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. कारण प्रिमिअमची रक्कम जास्त वाटली. म्हणून माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, पीक विमा योजना नेमकी कशी असावी यासंबंधात सन्माननीय सदस्यांच्या जर काही स्पेसिफिक सूचना असतील तर . . . .

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : अनेक वेळा या सूचना दिलेल्या आहेत.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, याबाबतीत स्पेसिफिक सूचना दिल्या तर ते सोयीचे होईल. आतापर्यंत या विषयाच्या संदर्भात विचार करण्यासाठी तज्ञ मंडळी एकत्र बसली होती. परंतु अजूनपर्यंत योग्य तो मार्ग निघालेला नाही. म्हणून माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, यासंदर्भात विचार-विनिमय करण्यासाठी बैठक आयोजित करण्याचे ठरविले असल्याने सन्माननीय सदस्यांनी लेखी स्वरुपामध्ये सूचना द्याव्यात. आज देखील द्राक्षाच्या संदर्भात विचार-विनिमय करण्यासाठी तज्ज्ञ लोकांना बोलविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आंबा, काजू, कोकम इ. पिकांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या सूचना असतील तर त्या लेखी स्वरुपामध्ये द्याव्यात.

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : याठिकाणी असे सांगण्यात आले की, आपल्याकडे पिकांच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी किंवा पीक किती प्रमाणात आलेले आहे याची माहिती घेण्यासाठी यंत्रणा कमी आहे. त्यामुळे फार तांत्रिक बाबींमध्ये न जाता या पिकांचा आढावा कसा घेता येईल यादृष्टीने आपण प्रयत्न केला पाहिजे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, 2000 मध्ये राज्य शासनाने अशा सूचना दिल्या की, पीक विमा योजना लागू करावी. यासाठी चार वर्षाच्या कालावधीतील पीक काय आहे ? याचा सर्व्हे करुन ही योजना लागू करावी असे धोरण शासनाने वर्तमानपत्रातून जाहीर केलेले आहे. यासाठी कोकणातील सर्व आमदारांची तेथील जिल्हयामध्ये एक बैठक बोलाविण्यात यावी आणि त्यावेळी तेथील प्रमुख शेतकऱ्यांना देखील बोलाविण्यात यावे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे द्राक्षाचे पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी विरोध केला म्हणून आंब्याचे पीक घेणारे शेतकरी याला विरोध करतील असे नाही. माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे बरोबर आहे की, प्रत्येक पिकाचा वेगवेगळा विषय आहे. तरीपण आपण या विषयाच्या बाबतीत बैठक बोलवावी आणि त्यावेळी तेथील शेतकऱ्यांना देखील बोलाविण्यात यावे.असे केले तर यातून निश्चितपणे मार्ग निघू शकेल. अशी

. . . .एफ-2

श्री.राजन तेली . . . .

बैठक घेणे आवश्यक आहे. यावर्षी तेथील बागायतदार मोठया अडचणीमध्ये सापडलेले आहेत.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, आंब्याच्या बाबतीत पीक विमा योजना घोषित करण्यात आली होती. 2005-2006 आणि 2006-2007 मध्ये आंबा पिकासाठी अलिबाग, हर्णे, भिरा, रत्नागिरी व देवगड येथे केंद्र शासनाच्या ज्या वेधशाळा आहेत, त्या परिसरामध्ये हवामान पीक विमा योजना जाहीर केली होती. पण त्याला विशेष प्रतिसाद मिळाला नाही. 2005-2006 मध्ये फक्त 100 झाडांच्या बाबतीत विमा संरक्षण करण्यात आले आणि 2006-2007 मध्ये 5000 झ ाडांच्या बाबतीत विमा संरक्षण करण्यात आले. विम्याचा जो हप्ता भरण्यात आला, त्याच्या तुलनेमध्ये फार काही नुकसान भरपाई मिळाली नाही. विमा संरक्षित रक्कम होती, त्याच्या तुलनेमध्ये ही रक्कम जास्त मिळाली नाही. त्यामुळे याला लोकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. माझी सन्माननीय सदस्यांना परत विनंती आहे की, त्यांच्या ज्या सूचना असतील, त्यांनी त्या लेखी स्वरुपामध्ये दिल्या तर याबाबती संयुक्त बैठक घेण्यासाठी शासनाची तयारी आहे.

----

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ SBT/ MMP/ 10:25

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मला विधानसभेमध्ये जावयाचे असल्याने आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेली 14 क्रमांकावरील अर्धा तास चर्चा अगोदर घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे. कारण जे वैधानिक काम आहे, ते तर करावेच लागेल.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी 14 क्रमांवरील अर्धा तास सूचना मांडावी.

. . . .एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियंत्रक कार्यालय, कोल्हापूर यांनी केलेला भ्रष्टाचार

मु.शी. : श्री.प्र.द.कुडाळकर, तत्कालीन मापक निरीक्षक,वैधमापन नियंत्रक कार्यालय, कोल्हापूर यांनी केलेला भ्रष्टाचार या विषयावरील तारां□त प्रश्न क्रमांक 37594 ला दिनांक 12 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.जयंत प्र.पाटील वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,"श्री.प्र.द.कुडाळकर, तत्कालीन मापक निरीक्षक, वैधमापन नियंत्रक कार्यालय, कोल्हापूर यांनी केलेला भ्रष्टाचार" या विषयावरील तारां□त प्रश□□मां□ 37594 ला दि□□ 12 मार्च 2008 रोजी शास□□ दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अ□मती□ □यम 92 अ□ये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित □रीत आहे.

सभापती महोदय, याठिकाणी मी जेव्हा श्री.कुडाळकर यांची बदली करण्याच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता, तेव्हा त्यांची बदली करण्याच्या बाबतीत आश्वासन देण्यात आले. परंतु संबंधितांची चौकशी करण्यासाठी अधिकारी नेमला होता. परंतु ज्यांनी तक्रार केली होती, त्यांना या बैठकीचे आमंत्रण कसे मिळणार नाही हे संबंधित चौकशी अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक पाहिले. म्हणून यानिमित्ताने माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, पुन्हा या सर्व प्रकरणाची चौकशी करावी. तसेच ज्यांनी तक्रार केली आहे, त्या तक्रारदारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी अन्न व नागरी पुरवठा विभाग देणार आहे काय ? श्री.कुडाळकर यांनी कोल्हापूर येथे थैमान घातलेले आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील..

कोल्हापूर जिल्हयामध्ये वजनमाप करणारे अधिकाऱ्यांनी करोडो रुपये जमा केलेले आहेत. त्यांच्यावर अनेक तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात मी मागे प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी याबाबत कबुली दिली व त्या अधिकाऱ्याची बदली देखील करण्यात आली होती. परंतु त्या अधिकाऱ्याची चौकशी झालेली नाही. त्या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न शासन करीत आहे असे माझे मत आहे. चौकशी करण्याकरिता जे अधिकारी पूर्वी नेमलेले होते त्यांच्या ऐवजी दुसऱ्या नवीन अधिकाऱ्यांकडून ज्यांनी तक्रार केलेली आहे त्यांना बाजू मांडण्याची संधी शासन देईल काय ? तसेच श्री. कुडाळकर यांना योग्य रीतीने शासन करण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी श्री. कुडाळकर, तत्कालीन मापक निरीक्षक यांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. श्री. कुडाळकर यांची चौकशी करण्याकरिता श्री. पराते यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यावेळी मूळ तक्रारदार उपस्थित राहू शकले नव्हते. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, पुन्हा दुसऱ्यांदा चौकशी करण्यात आली होती. श्री. जाधव, उपनियंत्रक, पुणे यांची चौकशी करण्याकरिता नेमणूक करण्यात आली. दिनांक 10/3/08 रोजी कोल्हापूर येथे जाऊन श्री. आहेर यांचा या संदर्भात जबाब घेण्यात आला. संबंधित प्रकरणामध्ये नवीन नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पनवेल (जि.रायगड ) नगरपरिषदेमध्ये अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : पनवेल (जि.रायगड ) नगरपरिषदेमध्ये अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने झालेला भ्रष्टाचार यासंबंधी सन्मानीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"पनवेल (जि.रायगड) नगर परिषदेत परिषदेचे अधिकारी व ठेकेदार यांच्या संगनमताने सुमारे ६० लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे पनवेल नगरपरिषदेच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २००८ रोजी झालेल्या स्थायी समितीमध्ये पुराव्यानिशी सभागृहाच्या निदर्शनास आणणे, संबंधित ठेकेदारालाच कामाचा ठेका मिळण्यासाठी कामांच्या निविदा दिनांक १९ डिसेंबर, २००७ च्या दैनिक वादळवारा व दैनिक रायगड टाईम्सच्या फक्त एकाच अंकात प्रसिध्द करणे,त्यामुळे शासनाचे झ ाालेले नुकसान तसेच दैनिक वादळवारा व दैनिक रायगड टाईम्स या वृत्तपत्राने जाहीरातीचे संबंधी फक्त एकच अंक प्रसिध्द करणे, याप्रकरणी चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, पनवेल नगरपालिकेमध्ये दलित वस्ती व इतर कामे करीत असताना मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. या ठिकाणी नगरपालिकेमधील विरोधी पक्षनेते यांनी तक्रारी केल्या . नगरपालिकेच्या कामाचे टेंडर बाबत वर्तमानपत्रामध्ये जाहीरात देण्यात आली होती. मात्र एका ठेकेदाराला कामाचा ठेका मिळण्याकरिता कामांच्या निविदा दिनांक 19 डिसेंबर, 2007 च्या दैनिक वादळवारा व दैनिक रायगड टाईम्सच्या फक्त एकाच अंकामध्ये जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली. या वर्तमानपत्राच्या दुस:या प्रतीमध्ये केवळ जाहीरातीकरता पेपर छापण्यात आला. एकाच दिवशी दोन पेपर छापले. तसेच ही जाहीरात अन्य कोणाला कळू नये अशी व्यवस्था केली. असे का करण्यात आले होते ? नगरपालिकेमधील माजी जिल्हा काँग्रेसचे नगरअध्यक्ष यांचे पुतणे,

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. जयंत प्र. पाटील..

श्री. संदेश म्हात्रे, तालुका काँग्रेसचे अध्यक्षांचा मुलगा अविनाश पाटील, विभागीय काँग्रेसचे अध्यक्ष श्री. विजय पाटील, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष श्री. नारायण ठाकूर याच्या कंपनीला हे काम कसे काय मिळेल याचा प्रयत्न करण्यात आला. हे प्रकरण फार गंभीर आहे. हे प्रकरण नगराध्यक्षांनी काढले नसते तर करोडे रुपयांचा भ्रष्टाचार झाला असता. येथे झालेल्या करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाराची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांनी केली त्यावेळी असे कबूल करण्यात आले की, दैनिक रायगड टाईम्स व दैनिक वादळवारा ही वर्तमानपत्रे अशीच कामे करीत असतात. गैरव्यवहार करीत असतात. म्हणून या दोन्ही वर्तमानपत्रांना आपण ब्लॅकलीस्टमध्ये टाकून प्रेस काउन्सिलकडे या वर्तमानपत्रांची तक्रार करुन त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यात येईल काय ? नगरपालिकेमध्ये ज्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार करण्याचा प्रयत्न केला, तसेच ज्या वर्तमानत्राने एकाच अंकामध्ये जाहीरात दिली होती त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई शासनाकडून करण्यात येईल काय ?

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, वर्तमानपत्रामध्ये, ज्या जाहिराती दिलेल्या होत्या. त्या संदर्भातील चौकशी ही जिल्हा माहिती अधिकारी, रायगड यांच्या मार्फत करण्यात येईल. एकाच वर्तमानपत्रामध्ये जाहीरात छापली होती असे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी येथे सांगितले आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

यासंदर्भात जिल्हा माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन राज्याच्या माहिती संचालकांच्यावतीने या रिपोर्टच्या अनुषंगाने संबंधित पेपरवर निश्चितपणे योग्य ती कारवाई करण्याच्या संदर्भात शासनाकडून सूचना दिल्या जातील आणि ज्या अधिकाऱ्यांनी या एकाच पेपरला जाहिरात देऊन अशा पध्दतीने जाणीवपूर्वक ज्या काही गोष्टी केलेल्या असतील त्यासंदर्भात त्यांची खातेनिहाय चौकशी सुध्दा तातडीने सुरु केली जाईल आणि त्या चौकशीच्या माध्यमातून जो रिपोर्ट येईल त्यानुसार उचित कारवाई केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, ही अर्धा-तास चर्चा दोन महिन्यापूर्वी दिलेली आहे. त्या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांकडे तेथील विरोधी पक्ष नेत्यांनी तक्रार केल्यानंतर ॲड. कडव नावाच्या वकिलामार्फत चौकशी केली. जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशीमध्ये असे निष्पन्न झाले की, एकाच पेपरमध्ये छापलेले आहे. याची चौकशी झालेली आहे. तेथील नगराध्यक्ष तसेच बॉडी आणि अधिकारी याच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी जी चौकशी केलेली आहे त्यामध्ये ते दोषी ठरलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशीप्रमाणे जे दोषी असतील त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, जिल्हाधिकाऱ्यांचा चौकशी रिपोर्ट तयार असेल तर माहिती संचालकांकडून जिल्हाधिकाऱ्यांचा चौकशी रिपोर्ट मागविण्यात येईल आणि त्या संबंधित पेपरवर आणि अधिकाऱ्यांवर रीतसर कायदेशीर कारवाई निश्चितपणे करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी याबाबत नाराजी व्यक्त केली. माझी विनंती आहे. दोन महिन्यांपूर्वी अर्धा-तास चर्चा दिलेली आहे. चटावरील श्राध्द उरकावे त्याप्रमाणे अर्धा-तास चर्चेचे उत्तर उरकावयाचे काय ? त्या ठिकाणी चौकशी झालेली आहे. पुन्हा चौकशी मध्ये वेळ घालविणार काय ? ज्यावेळी सभागृहात चर्चा होते त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय चांगली उत्तरे देतात आणि चांगली उत्तरे देणारे मंत्री असल्याबद्दल मी नेहमी सभागृहात आपले कौतुक केलेले आहे. माझी आपल्याकडून अपेक्षा आहे. याची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांनी केलेली आहे त्याबद्दल

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. जयंत प्र. पाटील .....

अधिकाऱ्यांनी सभागृहामध्ये येण्याच्या आधी आपल्याला ब्रिफींग करावयास पाहिजे की नाही ? माननीय मंत्रिमहोदय नेहमी ब्रिफींग घेऊन चांगली उत्तरे देतात. अनेकवेळा मी हे रेकॉर्डवर आणलेले आहे की, डॉ. राजेंद्र शिंगणे आणि श्री. राजेश टोपे नेहमी चांगली उत्तरे देतात. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावता कामा नये. यादृष्टीने माझी विनंती आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदया, सन्माननीय सदसय श्री. जयंत प्र. पाटील साहेबांना सांगू इच्छितो की, जिल्हाधिकाऱ्यांनी जी चौकशी केली असेल त्या चौकशीचा जो रिपोर्ट आहे तो राज्याच्या माहिती संचालकांकडे ताबडतोब मागविण्यात येईल. कारवाई करण्याचा अधिकार माहिती संचालकांना आहे. त्यांना या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने सूचना देण्यात येतील आणि त्या पेपरवर निश्चितपणे तातडीने कारवाई करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : मी आपला आभारी आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्र सार्वजनिक विकास निधीतून जिल्ह्यात निधीचे वितरण करण्यासंबंधी नेमलेल्या जिल्हास्तरीय समितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींना प्रतिनिधित्व देण्यात न येणे

**मु. शी.** : महाराष्ट्र सार्वजनिक विकास निधीतून जिल्ह्यात निधीचे वितरण करण्यासंबंधी नेमलेल्या जिल्हास्तरीय समितीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींना प्रतिनिधित्व देण्यात न येणे श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"महाराष्ट्र सार्वजनिक विकास निधीतून संबंधित जिल्ह्यात सुयोग्यरितीने निधीचे वितरण होण्यासंबंधी जिल्हा स्तरावर शासनाने दिनांक 26 ऑगस्ट, 2002 रोजी समिती गठीत करणे, खनिज महसूलाच्या 10 टक्के रक्कम खनिज विकास निधीमध्ये जमा करणे, जमा रकमेतून जिल्ह्यामध्ये खनिकर्मामुळे जवळपासच्या बाधीत क्षेत्रामध्ये विविध पायाभूत सुविधा पुरविणे असा निर्णय घेण्यात आला असणे, या निर्णयानुसार काही अडचणी उपस्थित झाल्यामुळे शासनाने शासन निर्णय दिनांक 3 फेब्रुवारी, 2005 पूर्वी गठीत करण्यात आलेली जिल्हा स्तरीय समिती रद्द करण्यात येणे व जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नव्याने समिती गठीत करणे, या समितीवर लोकप्रतिनिधी म्हणून पालकमंत्री सोडल्यास अन्य लोकप्रतिनिधींना प्रतिनिधित्व न देणे, त्यामुळे खनिज विकास निधीतून होणाऱ्या खर्चाचे प्रस्ताव योग्य रितीने न येणे, मार्गदर्शक तत्त्वाचा भंग होऊन विकास करण्याचे प्रस्ताव मंजूर करणे, निधीचे वाटप योग्य प्रमाणात न होणे, त्यामुळे या निर्णयामध्ये सत्तेचे केंद्रीकरण झाल्याचे दिसून येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या खनिज विकास निधीतून 10 टक्के अनुदान विकास निधी म्हणून द्यावयाचा असतो. त्यासाठी जी समिती आहे त्या समितीमध्ये फक्त पालकमंत्री आहेत आणि

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

श्री. जयंत प्र.`पाटील .....

बाकीचे सगळे अधिकारी आहेत. त्यामध्ये माननीय राज्यमंत्री सुध्दा नाहीत तसेच आमदार आणि खासदार सुध्दा नाहीत. सुर्दैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा आज जागतिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणामध्ये डेव्हलपमेंट चालू आहे. आमच्या जिल्ह्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये डेव्हलपमेंट चालू आहे. हा 10 टक्के निधी वाटप करीत असताना त्यामध्ये लोकप्रतिनिधींना समाविष्ट करणार की नाही ? काल या सभागृहामध्ये विधिमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते यासबंधीच्या विधेयकावर बोलत असताना आमदार मोठे की, अधिकारी मोठे यावर चर्चा केली होती. त्या ठिकाणी किमान जिल्ह्यातील जे आमदार आहेत त्यांची समिती करुन त्याचे वाटप योग्य प्रमाणात झाले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदया, 4 कोटी 47 लाख रुपयांच्या निधीचे वाटप जेथे खनिजाचे उत्पादन होत नाही अशा रोहे तालुक्यामध्ये करुन टाकले आहे. माझ्या मताशी सन्माननीय राज्यमंत्री श्री.रविशेठ पाटील हे देखील सहमत होतील. निधीचे वाटप करण्यासाठी शासनाचे सूत्र आहे की नाही ? वाटप करीत असताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणार की नाही ? सभापती महोदया, दिनांक 3.2.2005 रोजी गठित झालेल्या जिल्हा समितीमध्ये कोण सदस्य आहेत ते सांगू इच्छितो. या समितीमध्ये अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर, संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर सदस्य आहेत. एकही लोकप्रतिनिधी या समितीमध्ये नाही. याबाबतची सर्व माहिती माझ्याजवळ आहे. माहितीच्या अधिकारानुसार जिल्हयामध्ये किती निधीचे वाटप झाले त्याचे माझ्याकडे रेकॉर्ड आहे. एका तालुक्यामध्ये 90 टक्के निधीचे वाटप झाले आहे. निधीचे वाटप करण्याचे अधिकार कोणाला आहेत ? काय चालले आहे ? हे सर्व कोण ठरविणार ? लोकप्रतिनिधींचा या समितीमध्ये समावेश झालाच पाहिजे आणि निधीचे वाटप समपातळीवर कसे होईल हे पाहिले पाहिजे. निधीच्या वाटपात भ्रष्टाचार झाला आहे. निधीचे वाटप करीत असताना जे काम जिल्हा परिषदेने केले आहे त्याच कामावर सा.बां.विभाग सुध्दा खर्च केल्याचे दाखवित आहे. याबाबतची माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. हा भ्रष्टाचार थांबविला पाहिजे. मी अनेक वेळा पत्र देऊन निधीचे योग्य प्रमाणात वाटप करण्याची मागणी केली होती. परंतु माझ्या पत्राला साधे उत्तर सुध्दा आले नाही. म्हणजे आमदारांना अधिकारी उत्तर देत नाहीत ही गंभीर बाब आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारानुसार 10 रुपयांचा स्टॅम्प लावून मी अर्ज केल्यावर मला माहिती उपलब्ध झाली. म्हणजे अधिकारी श्रेष्ठ की आमदार श्रेष्ठ याचे प्रथम माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले पाहिजे. आतापर्यंत निधीचे वाटप केले आहे

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

त्यासाठी जिल्हाधिका-यांनी विश्वासात घेतलेले नाही. त्यासंदर्भात शासनाने त्यांच्यावर कडक ताशेरे ओढले पाहिजे. लोकप्रतिनिधींना विश्वास घेतले पाहिजे. डी.पी.डी.सी.च्या बैठका 2-2 महिने होत नाहीत. या जिल्हा समितीवर जिल्हयातील सर्व आमदारांना व खासदारांना घेण्याचे धोरण शासन स्वीकारणार काय अशी विचारणा मी या अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून करीत आहे.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( खनिकर्म राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांच्या जिल्हयात जवळजवळ 152 कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यासाठी 10 कोटी 60 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी 6 कोटींचा निधीही उपलब्ध करुन दिलेला आहे. या जिल्हा समितीमध्ये पालकमंत्री असतात. परंतु राज्याची समिती सुध्दा आहे. त्या समितीमध्ये त्या विभागाचे सदस्य श्री.ठाकूर आहेत. त्यांना सुध्दा त्या समितीमध्ये निमंत्रित केले जाते. पूर्वी अधिका-यांची समिती होती. अधिकारीच निधीचे वाटप करीत होते. निधीच्या वाटपासाठी ते शासनाकडे अहवाल पाठवित होते. त्यांच्याकडून माननीय मुख्यमंत्र्यांकडे मुंबईला प्रस्ताव येत होता. परंतु जिल्हा पातळीवर कामे झाली पाहिजेत. यासाठी ती समिती बरखास्त करण्यात आली. त्याऐवजी आता जिल्हा पातळीवर ही समिती गठित केलेली आहे. त्या समितीच्या माध्यमातून कामे झाली पाहिजेत या मताचा मी आहे. नियमानुसार 25 कि.मी.च्या बाहेर जाता येत नाही. खनिजाचा निधी येत आहे त्यावर हे बंधन आहे. पण माननीय सदस्य यांच्या म्हणण्यानुसार कार्यक्षेत्राच्या बाहेर काम झाले असले तर जिल्हाधिका-यांना निर्देश दिले जातील की, अशाप्रकारे काम करता येणार नाही. जिल्हा परिषदेने केलेल्या कामावर खनिज निधीतूनही खर्च केल्याचे दाखविले जात आहे असे त्यांचे म्हणणे आहे. अशाप्रकारे एका रस्त्याच्या कामावर दोन विभागामार्फत खर्च केल्याचे दाखविले जात असेल तर त्याची चौकशी करण्यासाठी शासन मागेपुढे पाहणार नाही. कारण लोकांच्या योजनांसाठी पैसा खर्च झाला पाहिजे हाच शासनाचा उद्देश आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.धर्मरावबाबा आत्राम...)

आता ही समिती तयार झालेली आहे. या समितीमध्ये आमदारांना, लोकप्रतिनिधींना घ्यावे अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे. परंतु तसे आपल्याला करता येणार नाही. कारण ही समिती तयार झालेली आहे. सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही सूचना असतील किंवा जी कामे असतील ती त्यांनी मला सांगावीत. त्यानुसार जिल्हाधिका-यांना निर्देश देण्यात येतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, अधिका-यांनाच संपूर्ण निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात येणार आहेत काय ? त्या कमिटीमध्ये अधिकारी आणि फक्त पालकमंत्री आहेत. पालकमंत्री हा जिल्ह्याचा राजा आहे काय ? आम्ही त्या जिल्ह्याचे आमदार कोणीच नाही काय ? तसे करता येणार नाही असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले. करता येणार नाही म्हणजे काय ? कोणत्या कायद्यान्वये तुम्हाला हे करता येणार नाही. 25 कि.मी.च्या बाहेर कामे करता येत नाहीत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु मी येथे ठामपणे सांगतो की 100 कि.मी.च्या बाहेर निधीचे वाटप केलेले आहे. त्याची चौकशी मंत्री महोदय करतील काय ? पालकमंत्र्यांवर कारवाई करण्यात येईल काय ? मी या ठिकाणी एका गंभीर विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेला चटावरचे श्राद्ध उरकल्यासारखे उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित नाही. सभापती महोदया, या सभागृहामध्ये नियमानुसार काम चालावे यासाठी आम्ही सतत सहकार्य करीत असतो. असे असताना अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी कृपा करुन देऊ नये. आम्हाला देखील या सभागृहाचे कामकाज कळते. या निधीच्या वाटपाच्या संदर्भात राज्यमंत्र्यांना देखील सांगितले जात नाही. महाड कुठे आणि अलिबाग कुठे ? महाडमध्ये निधीचे वाटप केलेले आहे. पनवेलमध्ये 20 कामांसाठी निधीचे वाटप केलेले आहे. हे काय चालले आहे ? आमदार या कमिटीमध्ये नसावेत असे माननीय मंत्री महोदयांना का वाटते ? केवळ अधिका-यांवरच निर्णय घेण्याची जबाबदारी सोपवल्यामुळे ते तुमच्या डोक्यावर बसायला लागले आहेत. माननीय मंत्री महोदय हे देखील उद्या रिशफलिंग झाल्यानंतर आमदार होतील आणि आमच्या बाजूला येऊन बसतील ? ज्या जिल्हाधिका-यांनी 25 कि.मी.च्या बाहेर कामे मंजूर केली त्यांच्यावर शासनान कोणती कारवाई करणार आहे ?

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्रम : मी उत्तर दिलेले आहे. 25 कि.मी.च्या आत कामे करावयाची अशा प्रकारचा कायदा आहे. त्या पलीकडे जाता येत नाही. सन्माननीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे काही झाले असेल तर आपण कारवाई करणार आहोत.

श्री. जयंत प्र. पाटील : त्या कमिटीवर आमदारांना घेण्यास शासनाला कोणती अडचण आहे ?

श्री. श्रीकांत जोशी : तालिका सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांचे म्हणणे अगदी बरोबर आहे. आपण लोकशाही स्वीकारलेली आहे. सचिवालयाचे नाव मंत्रालय करण्यात आले. माननीय मंत्री महोदयांकडून अशा उत्तराची अपेक्षा नाही. त्यांच्या उत्तराप्रमाणे नोकरशाहीच्या हातामध्ये सर्व सुत्रे देणे हे लोकशाहीला घातक आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या मुद्याचे समर्थन करीत असताना तालिका सभापती महोदया, मी आपणास विनंती करतो की, या बाबतीत आपण माननीय मंत्री महोदयांना निर्देश द्यावेत. जिल्हास्तरावर कोणती कमिटी असावी हे ठरविण्याचा अधिकार मंत्र्यांचा आहे. त्या कमिटीमध्ये जिल्हयातील कोणते अधिकारी असावेत हे सरकार ठरविते. हे करीत असताना लोकप्रतिनिधींचा अंकुश नोकरशाहीवर असता पाहिजे अशा प्रकारचे स्पष्ट निर्देश आपण माननीय मंत्री महोदयांना द्यावेत अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : मी उत्तर दिलेले आहे. तसे करता येणार नाही. समिती तयार केलेली आहे आणि पालकमंत्री त्या समितीचे अध्यक्ष आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांचा भावना लक्षात घेऊन आणि ज्या सन्माननीय सदस्यांनी हा विषय मांडलेला आहे त्यांच्या बरोबर बैठक घेऊन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा.

श्री. धर्मरावबाबा आत्रम : माननीय मुख्यमंत्र्यांशी बोलून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्री महोदयांनी असेच उत्तर दिले तर मला हायकोर्टामध्ये जाऊन निर्देश घ्यावे लागतील.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे ) : माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छिते की, आपण संबंधित आमदारांना आपल्या दालनात बोलावून बैठक घ्यावी.

श्री. धर्मारावबाबा आत्राम : सन्माननीय सदस्यांची मागणी समिती गठीत करण्यासंबंधीची आहे...

**तालिका सभापती** : या समितीचे फॉर्मेशन कसे करावयाचे, तसेच संबंधित आमदारांच्या काय अडचणी आहेत त्यासंबंधी चर्चा करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी आपल्या दालनात बैठक बोलवावी आणि त्या बैठकीत यातून काही तरी मार्ग काढावा.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : ठीक आहे.

--------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य करणे

**मु. शी.** : राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य करणेयासंबंधी प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" राज्यात सन 1978 पासून " सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य" देण्याबाबतची राबविण्यात येत असलेली योजना, मात्र राज्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना बेकार भत्ता देण्याची कोणतीही योजना शासन राबवित नसल्यामुळे बेरोजगार युवकांना मोठया प्रमाणात अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागत असल्यामुळे, शासनाने बेरोजगारांविषयी सहकारी संस्था स्थापन करुन अनुदान देण्याची सुधारित योजना दिनांक 11 फेब्रुवारी, 2004 पासून सुरु केलेली असल्यामुळे अनेक बेरोजगार सहकारी सोसायटयांना अर्थसहाय्य न मिळाल्यामुळे अनेक बेरोजगार सोसायटया स्थापन करुनही बेरोजगार युवकांची सतत वाढत असलेली संख्या, शासनाने बेरोजगारांच्या बाबतीत ठोस उपाययोजना आखण्याची गरज असल्यामुळे त्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखण्याची आवश्यकता यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची उपाययोजना. "

सभापती महोदय, महाराष्ट्रात गेल्या काही वर्षापासून बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जागतिकीकरणाच्या आणि खाजगीकरणाच्या वातावरणामुळे सुशिक्षित बेरोजगारांना शासकीय आणि निम- शासकीय सेवेमध्ये फारशी संधी मिळत नाही. जे तरुण पदवी, पदविका, उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीण झाले आहेत त्या तरुणांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी अर्थसहाय्य मिळावे, नोकरी मिळेपर्यंत त्यांचा घरातील खर्च चालावा यासाठी महाराष्ट्र शासनाने पूर्वी या सुशिक्षित बेरोजगारांना बेराजगार भत्ता देण्याची योजना सुरु केली होती. काही काळ ती योजना चालली. नंतर या योजनेचे थोडेसे रुपांतर करुन सुशिक्षित बेरोजगारांना शासकीय आणि नियमशासकीय सेवेमध्ये घेतले गेले आणि या सुशिक्षित बरोजगारांच्या अर्हतेचा आणि त्यांच्या ज्ञानाचा उपयोग केला गेला. राज्यात अंशकालीन कर्मचारी मोठया प्रमाणात आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

3...

प्रा.शरद पाटील...

त्यांना देखील शासकीय आणि निम शासकीय कार्यालयामध्ये समावून घेण्यात यावे अशा प्रकारची मागणी मागणी त्यांच्या संघटनेकडून शासनाकडे वारंवार करण्यात येत आहे. परंतु त्यांच्या मागणीचा शासनाने गांभीर्याने विचार केला नाही. आज हजारो अंशकालीन कर्मचारी बरोजगार म्हणून फिरत आहेत. अनेक वेळा अंशकालीन कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्य शासनाकडे मागणी केली आहे की, अंशकालीन कर्मचा-यांना शासकीय अथवा निम शासकीय कार्यालयांमध्ये सामावून घ्यावे. पंरतु अजूनही शासन त्यांची मागणी मान्य करीत नाही. राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांची संख्या कमी व्हावी म्हणून राज्य शासनाने अनेक महामंडळाची स्थापना केली आहे. काही महामंडळाच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसाय आणि उद्योगासाठी कर्ज देण्याची योजना सुरु केली होती. जिल्हा उद्योग केंद्र, पंतप्रधान बीज भांडवल योजना बरोजगारी दूर व्हावी म्हणून सुरु करण्यात आले. परंतु उद्योग केंद्राचा तसेच बीज भांडवल योजनेचा लाभ ख-या अर्थाने गरजू सुशिक्षित बेरोजगारांना मिळत नाही अशी आजची वस्तुस्थिती आहे. सुशिक्षित बेरोजगारांसाठी उद्योग केंद्र तसेच निरनिराळे महामंडळ निर्माण करण्यात आले आहे आणि त्या महामंडळाच्या मार्फत वेगवेगळया योजना राबविल्या जातात, परंतु त्या योजनेचा लाभ सुशिक्षित बेरोजगारांना अधिका-यांकडून दिला जात नाही. ही एक मोठी अडचण सुशिक्षित बेरोजगारांपुढे निर्माण झाली आहे. राज्य शासनाने सुशिक्षित बरोजगारासाठी अभियांत्रिकी पदवी आणि पदविका झालेल्या प्रत्येक युवकांस जिल्हा परिषदेतील 5 लाखापर्यंतची कामे देण्यात यावीत अशा प्रकारची देखील योजना आणली होती. त्या योजनेचा लाभ काही युवकांना देण्यात आला. ज्या युवकांना जिल्हा परिषदेकडून 5 लाखापर्यंतची कामे दिली गेली होती, ती कामे त्यांनी बँकेतून कर्ज घेऊन पूर्ण करुन दिली आहेत. परंतु त्या युवकांनी केलेल्या कामाची देयके जिल्हा परिषदेकडून अद्याप दिली गेलेली नाहीत. त्या तरुणांना विनाकारण व्याजाचा भूर्दंड बसतो आहे. त्यांना त्यांच्या कामाची देयके मिळत नसल्यामुळे सदरहू कामे केली नसती तर झाले असते अशी त्यांची भावना झाली आहे. शासनाने सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळावा म्हणून ही योजना आणली होती, परंतु या योजनेचा लाभ ख-या अर्थाने या तरुणांना झालेला नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, ज्या तरुणांनी कामे पूर्ण केली आहेत, त्या कामांची देयके त्यांना तात्काळ देण्यात यावीत.

4...



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 10:50

प्रा. शरद पाटील..

सभापती महोदय, त्याचप्रमाणे शासनाने 2004 साली सुशिक्षित बेरोजगारांनी सहकारी संस्था स्थापन कराव्यात अशा सूचना दिल्या. स्शासकीय आणि निम शासकीय कार्यालयांत सेवेत संधी मिळावी यामुळे सहकारी संस्था स्थापन करण्याची योजना पुढे आणली. परंतु या योजनेचा फायदा सहकारी संस्थांना आणि सुशिक्षित बेरोजगारांना झाला नाही. सुशिक्षित बेरोजगारांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने तसेच ते स्वत:च्या पायावर उभे रहावेत  म्हणून वेगवेगळया प्रकारच्या उपाययोजना केल्या गेल्या आहेत. परंतु जागतिकीकरण आणि खाजगीकरणाच्या वातावरणामुळे सुशिक्षित बेरोजगारांना काहीही लाभ होऊ शकलेला नाही. अर्हताधारण केलेले अनेक सुशिक्षित बेरोजगार प्रत्येक समाजात आहेत. परंतु या सुशिक्षित बेरोजगारांना शासकीय आणि निम शासकीय कार्यालयात सेवेची संधी मिळत नाही. तसेच त्यांना स्वत:चा व्यवसाय करण्याची देखील संधी मिळत नाही....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 10:55

प्रा. शरद पाटील...

आज मोठया प्रमाणात भांडवल घेतल्याशिवाय कोणताही उद्योग, व्यवसाय करता येत नाही. म्हणून या तरुणांना त्यांच्या अर्हतेनुसार त्यांना स्वत:चा रोजगार निर्माण करता यावा यासाठी शासनाने ठोस अशा प्रकारच्या मदतीची आर्थिक सहाय्याची योजना हाती घ्यावी अशी मी विनंती करतो. ज्याप्रमाणे समाजातील निरनिराळया घटकांना मदत करण्यासाठी महामंडळे निर्माण करण्यात आली आहेत त्याचप्रमाणे सुशिक्षित बेरोजगारांना मदत करण्यासाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करुन अल्प व्याजदराने म्हणजे 2 टक्के व्याजाने कर्जपुरवठा करावा आणि त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरु करण्यासाठी सहाय्य करावे अशी माझी सूचना आहे. या कर्जाची वसूली मात्र इतर बँका ज्याप्रमाणे कर्ज वसूली करतात तशा प्रकारे न करता त्यांचा व्यवसाय सुरु झाल्यानंतर कर्जाचे हप्ते व्याजासकट परतफेड करण्यासंबंधीची अट घालण्यात यावी. समाजामध्ये बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याला आळा घालण्यासाठी आणि तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने नेहमीच्या योजना न राबविता बेरोजगारांना मदत करण्यासाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करुन त्या महामंडळाच्या माध्यमातून तरुणांना त्यांचा व्यवसाय सुरु करण्यासाठी भरीव स्वरुपाची आर्थिक मदत अल्प व्याजदराने करावी अशी मागणी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदया, अतिशय महत्वाच्या अशा विषयावर सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. बेरोजगार युवकांसाठी शासनाने आतापर्यंत काय केले आहे हे थोडक्यात सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सेवा सोसायटयांची संकल्पना 2000 साली मांडण्यात आली. त्याची अंमलबजावणी 2000 साली सुरु करण्यात आली. या मागील हेतू असा होता की, साधारणत: 11 पेक्षा जास्त बेरोजगार युवकांनी एकत्र येऊन सोसायटी स्थापन करावी. सोसायटीमार्फत 100 रु. प्रतिमाहप्रमाणे व्यवस्थापन भत्ता मिळेल त्या माध्यमातून एखादे कार्यालय सुरु करावे आणि सेवा सर्व्हीस सेंटरच्या माध्यमातून युवकांना काम मिळावे तसेच शासकीय आणि निमशासकीय विभागात ज्यांचे काम आहे आणि खास करुन 5 लाखापर्यंतची कामे प्राधान्याने या सोसायटयांना देण्याचा निर्णय घेण्यात आला. 2000 सालापासून हा निर्णय अंमलात आणला गेला. जानेवारी 2008 पर्यंत मिळालेल्या आकडेवारीनुसार असे दिसते की जवळजवळ 30 कोटी रुपयांची कामे या बेरोजगार सोसायटयांना मिळालेली आहेत काही सोसायटया अशा आहेत की वर्षाला 1 कोटीपर्यंतची कामे त्यांना मिळालेली आहेत. त्यामुळे बेरोजगार युवकांना काहीच फायदा मिळत नाही असे म्हणणे योग्य होणार नाही असे मला वाटते. सध्या 3000 सोसायटया कार्यरत आहेत. या सोसायटयांमधून जवळजवळ 50 हजार सभासद आहेत आणि त्यांना यातून काम मिळते आहे याबाबत कोणाचे दुमत नाही. यामध्ये काही उणिवा आहेत हे मान्य केल्यानंतर 3 वर्षानंतर पूर्ण योजनेचा आढावा घेण्याचे ठरले होते. आढावा घेण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी या चर्चेद्वारे काही सूचना मांडलेल्याआहेत. त्याचप्रमाणे अनेक विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांनी वेगवेगळया चर्चेच्या माध्यमातून काही मुद्दे उपस्थित केले. खरे तर आजच सकाळी 10.00 वाजता यासंबंधात एक बैठक आयोजित केली आहे. विधानपरिषदेचे 9 आणि विधानसभेच्या 15 सन्माननीय सदस्यांना बैठकीसाठी आमंत्रित केले आहे. त्यांच्या सूचना एकत्रित करुन शासनाची बेरोजगारी दूर करण्यासाठी जी काही योजना आहे त्यामध्ये या सूचनांचा अंतर्भाव कसा करता येईल याबाबत विचार-विनिमय करण्याचे ठरविलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत त्याचा देखील सकारात्मक विचार केला जाईल. बेरोजगार मेळावे सुरु केलेले आहेत. प्रत्येक जिल्हयात आणि तालुक्यात मेळावे घेण्याचे ठरविलेले आहे. नवी मुंबई येथे उद्योजकता विकास केंद्र उभे करण्याचे ठरविले आहे. युवकांना व्यवस्थित ट्रेनिंग देण्यात येईल आणि ट्रेनिंग दिल्यानंतर त्यांना 2 टक्के व्याजाने कर्ज देण्याच्या बाबतीत निश्चित विचार केला जाईल. (नंतर श्री. भोगले)

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ 11:00

श्री.राणा जगजितसिंह पाटील........

त्याचबरोबर आणखी एक महत्वाकांक्षी योजना हाती घेण्याचे ठरविले आहे. सन्माननीय सदस्यांना आठवत असेल की, अर्थसंकल्पीय भाषणामध्ये सन्माननीय वित्तमंत्र्यांनी 275 कोटी रुपये यावर्षी आंत्रप्युनर किंवा जॉब ओरिएंटेड ट्रेनिंगसाठी उपलब्ध करुन दिले आहेत. विभागाचा असा विचार आहे की, 10 हजार युवकांना जॉब ओरिएंटेड ट्रेनिंग देऊन त्यांचे 100 टक्के प्लेसमेंट करण्याचा प्रयत्न राहील. मार्च, 2009 पर्यंत जवळजवळ 10 हजार युवकांना इंडस्ट्रीची जी रिक्वायरमेंट आहे त्याप्रमाणे ट्रेनिंग देऊन प्लेसमेंट करुन देण्याचा विचार केला आहे. शेवटचा मुद्दा म्हणजे मजूर सोसायटया, बेरोजगार अभियंते आणि ओपन टेंडरिंग या तीनही बाबींना 33 टक्के प्रत्येकी असे पार्टिसिपेशन करुन काम देण्याची भूमिका स्वीकारली होती. परंतु बेरोजगार सेवा सोसायटयांना देखील यामध्ये फिक्स टक्केवारी देण्याचा विचार चालू आहे. पुढील दोन-तीन महिन्यामध्ये याबाबत निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, कामे केली परंतु पेमेंट झाले नाही. अशी स्पेसिफिक तक्रार असेल तर लेखी स्वरुपात तक्रार द्यावी, म्हणजे त्याबाबत लवकरात लवकर पेमेंट अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-17 वर वारंवार होणारे अपघात

**मु. शी.** : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-17 वर वारंवार होणारे अपघात यासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबई-गोवा या सतरा क्रमांकाच्या राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात असलेल्या अवघड वळणांवर वारंवार अपघात होणे, नियोजित महामार्गाच्या रुंदीकरण प्रकल्पात राष्ट्रीय महामार्ग खात्याने ही वळणे काढून रस्ता सरळ करण्याची नितांत गरज निर्माण होणे, मुंबई-गोवा महामार्गावर सुकेळी खिंडीपासून वाकण, आयपीसीएल फाटा, पेण फाटा, निडी, कर्णाली, गांधे फाटा या व इतर ठिकाणी असलेल्या वळणावर अनेक अपघात घडणे, नागोठणे पोलिस ठाण्यांच्या हद्दीत घडलेल्या अपघातांची ताजी आकडेवारी पाहता या वर्षी आजपर्यंत महामार्गावर घडलेल्या १०७ अपघातात ३५ जण मृत्यूमुखी तर अनेक जण जखमी झाल्याची नोंद होणे, यातील बहुतेक अपघात वळणांवर घडणे, पाच वर्षांपूर्वी रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती श्रीमती शेवंतीबाई मालोरे यांच्या गाडीला सुकेळी खिंडीत झालेला अपघात व या वर्षी मुरावाडीच्या ताडकर कुटुंबाला येथील जवळच्या वळणावर झालेल्या अपघातातील बळींच्या आकड्याने संपूर्ण जिल्हा भयग्रस्त होणे, मुंबई-गोवा महामार्गावर वाढलेली अवजड व मोठी प्रवासी वाहतूक पाहता या मार्गावर सायंकाळी विशेषत: सुट्टीच्या दिवसांत होणारी वाहनांची सरसकट वाहतूक यामुळे अपघातामध्ये भर पडत असणे, तरी या संपूर्ण घटनेची चौकशी होऊन त्यावर शासनाने करावयाची उपाययोजना"

सभापती महोदय, मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक-17 वर गेल्या वर्षभरात पेण ते वडखळ या मार्गावर 37 अपघात झाले व 35 जणांचा मृत्यू झाला. या सभागृहात अनेकवेळा मी वेगवेगळया माध्यमातून पळस्पे ते महाड हा रस्ता चौपदरी करण्याची मागणी केली. शासनातर्फे आश्वासन देण्यात आले की, हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला असून केंद्र सरकारच्या निधीतून हा रस्ता

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात येईल. परंतु केंद्र सरकारकडून मंजुरी मिळेपर्यंत किती लोकांना मृत्यूच्या सापळ्यामध्ये टाकणार आहात? या मार्गावर भयंकर रहदारी वाढलेली आहे. प्रामुख्याने या देशातील जल वाहतुकीपैकी 60 टक्के जल वाहतूक जेएनपीटीमार्फत होते असे मी वृत्तपत्रात वाचले. त्याप्रमाणे एवढा मोठा प्रकल्प रायगड जिल्हयात कार्यरत असताना आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे धोरण शासन निश्चित करीत नाही. त्या दृष्टीकोनातून केंद्र सरकारकडून मंजुरी येईपर्यंत वडखळ ते पेण हा मार्ग माननीय मंत्रीमहोदयांच्या मतदारसंघातील आहे, हे वडखळ ते पेण अंतर कापण्यासाठी 30 मिनिटांचा कालावधी लागतो, जे अंतर पूर्वी 3 मिनिटात आम्ही पार करीत होतो. मंत्रीमहोदय देखील याच्याशी सहमत होतील. पळस्पे ते पेण या मार्गावर मोठमोठी वळणे तसेच हमरापूर हा चढण रस्ता आहे. खारपाडापर्यंत या रस्त्याची रुंदी वाढविली पाहिजे. गणपती आणि होळी सणाच्या निमित्ताने या मार्गावरील रहदारीत प्रचंड प्रमाणात वाढ होते. अशा वेळी तीन-तीन दिवस ट्रॅफिक अडकून पडते. पळस्पे ते महाड हे अंतर कापण्यासाठी 5 ते 6 तासाचा अवधी लागतो. त्यामुळे केंद्र सरकारकडून मंजुरी मिळेपर्यंत, केंद्र सरकारकडून निधी प्राप्त होईपर्यंत राज्य शासनाने स्वतःच्या निधीतून जलद गतीने वाहतूक होण्यासाठी तातडीने हा रस्ता चौपदरी करण्याचे धोरण स्वीकारावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, पळस्पे ते इंदापूर या 84 कि.मी.चा रस्ता आहे. हा रस्ता केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. केंद्र शासनाने एनएच-17 या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा सविस्तर प्रकल्प तयार केला आहे. या रस्त्यासाठी 550 कोटी रुपये खर्च येणार आहे. मे, 2009 पर्यंत या रस्त्याच्या कामाला मान्यता प्राप्त होईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे हा वळणांचा रस्ता आहे. आतापर्यंत या वळणांसाठी जवळजवळ 1.70 कोटी रुपये खर्च केले असून पुढील वर्षी चौपदरीकरण झाल्यानंतर ही सर्व वळणे काढली जातील................

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेट पाटील..........

आणि ही वळणे टाळण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासंबंधी मी स्वत: देखील या रस्त्यावरील वळणांचा संपूर्ण सर्व्हे केला. परंतु आज जर या वळणावर आपण खर्च केला तर पुन्हा चौपदरीकरण करतांना त्यावर खर्च करता येणार नाही. म्हणून आम्ही असे ठरविले आहे की, या रस्त्याचे चौपदरीकरण करतानाच ही सर्व वळणे काढली जातील आणि या कामाला पुढील वर्षाच्या मे महिन्यापर्यंत मंजुरी मिळेल असे वाटते.

---------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकणाचा पर्यटन विकास करणे

**मु.शी.**: कोकणाचा पर्यटन विकास करणे यासंबंधी
श्री. राजन तेली वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्याअनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :--

"महाराष्ट्राला जवळपास 720 कि.मी. लांबीचासागरी किनारा लाभलाअसून कोकणातील विशेषत: सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड जिल्ह्यात प्राचीन व दूर्गम किल्ले, अभयारण्ये, पौराणिक व ऐतिहासिक महत्वाची स्थळे असताना सदर भाग पर्यटनाच्याविकासात दुर्लक्षित राहणे, गोवा व आंबोली रस्ता जोडण्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता असणे, तसेच आंबोली येथील पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या विविध सोयी, सुविधा उपलब्ध करुन देणे, अर्थसंकल्पात कोकणातील पर्यटन विकासाच्या दृष्टीने भरघोस तरतूद करण्याची आवश्यकता, त्याअनुषंगाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

महोदय, महाराष्ट्राला जवळपास 720 किलोमीटरचा भव्य समुद्रकिनारा लाभलेला आहे. विशेषत: सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमध्ये प्राचीन काळापासूनचे बरेचसे दुर्गम किल्ले आहेत. अनेक पौराणिक व ऐतिहासिक महत्वाची स्थळे आहेत. ती विकसित करण्याच्या दृष्टीने शासनाने ज्या प्रमाणात लक्ष द्यावयास पाहिजे होते दुर्दैवाने तसे लक्ष दिले गेले नाही. पर्यटन हा एकमेव व्यवसाय असा आहे की, गेल्या दोन दशकात जगात या व्यवसायाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. पर्यटनाच्या माध्यमातून वेगवेगळे देश विकसित झाले आहेत, त्यात भारताचा नंबर कोठे आहे हा संशोधनाचा विषय आहे. महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात पण हे पर्यटक अन्य भागात व कोकणाकडे कसे वळविता येतील याचा विचार कधी झालेला नाही. 30 मार्च, 1997 रोजी सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाला परंतु ज्या प्रमाणात या जिल्ह्याकडे लक्ष द्यावयास पाहिजे होते तेवढ्या प्रमाणात दिलेले नाही. केरळ, राजस्थान आणि गोवा या राज्यांचा विचार केला तर केरळ आणि गोव्यामध्ये पर्यटक डायरेक्टली त्यांच्या देशातून विमानाने येतात, अशी सुविधा तेथे करण्यात आली आहे. आपल्या कोकणात निसर्गरम्य व अनुकूल

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

अशी परिस्थिती अधिक चांगली असून गड, किल्ले तसेच स्वच्छ समुद्र किनारा, आंबोलीसारखे हिल स्टेशन, दाजीपूरसारखे अभयारण्य अशा सर्व गोष्टींची रेलचेल असून देखील त्याचा विचार शासनाने मात्र कधीच केला नाही. तसेच पर्यटन व्यवसाय हा शेतीसारखा बे-भरवशाचा नाही तर यामध्ये एकदा इन्व्हेस्टमेंट केल्यानंतर त्याचे चांगल्या प्रकारे रिटर्न्स मिळू शकतात असा हा व्यवसाय आहे. म्हणून गोवा आणि केरळ या राज्यांनी पर्यटनाच्या विकासासाठी पुढाकार घेतला तसा विचार कोकणासाठी होणे आवश्यक आहे. केरळसारखे राज्य, ज्याचे बजेट आपल्या बीईएसटीच्या बजेटइतकेच आहे अशा छोट्या राज्याने पर्यटनाच्या बाबतीत फार मोठी प्रगती केली आहे. म्हणून आपल्या राज्यातील विशेषत: कोकणातील पर्यटन विकासासाठी एखादी समिती, एखादा अभ्यास गट बसविण्याची गरज आहे. टाटा कन्सल्टन्सीने सन 1997-98 मध्ये जो रिपोर्ट दिला होता तो रिपोर्ट खरे तर आता बदलत्या परिस्थितीचा विचार करुन अपडेट करण्याची गरज आहे. कारण टाटा कन्सल्टन्सीने दिलेल्या जुन्या रिपोर्टप्रमाणे कोकणचा विकास होणे शक्य नाही म्हणून बदलत्या परिस्थितीप्रमाणे त्यात वाढ करण्याबाबतही विचार होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे गोव्यापासून सिंधुदुर्ग जिल्हा हा केवळ एक तासाच्याच अंतरावर आहे. गोव्यातील विदेशी पर्यटकांना जर कोकणात यावयाचे झाले तर राज्यशासनाच्या आरटीओतर्फे त्यांना हद्दीत आल्यानंतर 2800 रुपये भरावे लागतात. परंतु याउलट कर्नाटक सरकारचा विचार केला तर कर्नाटकच्या हद्दीत गाडी गेल्यानंतर आठवडयाचे गाडीचे पैसे एकदम भरुन घेतले जातात अथवा चार दिवसासाठी चारशे रुपये आणि सात दिवसांसाठी सातशे रुपये एवढाच चार्ज आहे. या अनुषंगाने विचार होणे आवश्यक आहे. तसेच टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसकडून गेल्या आठ वर्षापूर्वी जी परिस्थिती होती त्याचा विचार करुन अहवाल दिलेला आहे परंतु आता परिस्थितीत बदल झालेला असल्यामुळे बदलत्या परिस्थितीचा विचार करुन हा विकास करणे आवश्यक आहे.

महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा देशातील एकमेव पर्यटन जिल्हा आहे त्याचा विचार करता या जिल्ह्यात विजेचे भारनियमन करणे बरोबर नाही. कारण आजही सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांमध्ये कुठल्याही प्रकारची विजेची चोरी होत नाही, म्हणून हे विजेचे भार नियमन रद्द करावे. राज्यशासनाने नुकतेच 5900 कोटीचे सरप्लस बजेट सादर केले त्याबद्दल माननीय अर्थमंत्र्यांचे

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.........

स्वागत सर्वांनी केले. या निमित्ताने माझी विनंती आहे की, पर्यटन विकासासाठी किमान 500 कोटी रुपये तरी देऊन या जिल्ह्याचा विकास करावा. कारण दुसरीकडे आपण ऊस जास्त झाला तरी पैसे देतो, आंब्याचे नुकसान झाले तरी पैसे देतो परंतु पर्यटन विकास करुन केवळ एक पर्यटक जरी आला तरी जवळपास 11 लोकांना रोजगार मिळू शकतो, यादृष्टीने शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ....

माझी शासनाला विनंती आहे की,शासनाला कृषी पर्यटन, हॉटेल व्यवसाय, टूरिस्ट गाईड, वाहन व्यवस्था, साहसी पर्यटन असे असंख्य व्यवसाय कोकणात सुरु करणे शक्य आहे. काही कोर्सेस आयटीआयच्या माध्यमातून सुरु झाले होते परंतु शिक्षक नसल्यामुळे ते बंद झाले आहेत. असे व्यवसाय उभे राहिले तर स्थानिक लोकांना चांगल्या प्रकारे रोजगार उपलब्ध होऊ शकतील. या वर्षी सिंधुदुर्ग जिल्हयाला 25 वर्षे पूर्ण झाल्यामुळे रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे होणार आहे. त्यामुळे राज्यशासनाने यावर्षात तशा प्रकारची घोषणा केली तर चांगले होईल. शासनाने कोकणासाठी काही केले नाही असे मी म्हणणार नाही. शासनाने कोकणासाठी पहिल्यांदाच 5 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. जर अशा प्रकारे शासनाने कोकणासाठी पैसे मोठया प्रमाणात उपलब्ध करुन दिले तर कोकण्ाचा चांगल्या प्रकारे विकास होऊ शकेल व पर्यायाने कोकण शासनाच्या तिजोरीमध्ये पैशांची भर टाकू शकेल एवढी ताकद कोकणामध्ये आहे. त्यामुळे कोकणाचा सुध्दा अशा प्रकारे विचार करावा नाही तर ज्याप्रमाणे वेगळया विदर्भाची मागणी आलेली आहे तशाच प्रकारची कोकणाने सागरी राज्याची मागणी केली तर त्याला दोष देण्याचे कारण राहणार नाही. येत्या निवडणुकीमध्ये मुंबईपासून कोकणा पर्यंत मतदारसंघाची संख्या 75 होणार आहे त्यामुळे यादृष्टीने कोकणाकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कोकणातील पर्यटन व्यवसायाला ख-या अर्थाने चालना द्यावयाची असेल तर राज्यशासनाने कोकणासाठी अधिक जादा निधी देण्याची आवश्यकता आहे. सिंधुदुर्ग जिल्हयाला 25 वर्षे पूर्ण झाल्यामुळे रौप्यमहोत्सवी वर्ष 29 एप्रिलपासून साजरे होत आहे त्यामुळे या कार्यक्रमाला सन्माननीय सदस्यांनी तसेच मंत्रीमहोदयांनी उपस्थित राहून कोकण कसा आहे हे जवळून पहावे. त्यामुळे कोकणातील पर्यटनाला चालनादेण्यासाठी अधिक निधी देऊन कोकणातील जनतेला रोजगार उपलब्ध होईल व राज्याच्या तिजोरीमध्ये भर पडेल त्यामुळे तशा प्रकारचा विचार शासन करेल अशी आशा आहे. शेवटी एक कविता सांगतो.

"फिटावे डोळयाचे पारणे, बांधावे पर्यटनाची तोरणे,
जो अनुभव विदेशी, तो येतो स्वदेशी,
घडावे महाराष्ट्र देशी, चला जाऊ कोकणाशी ."

-----------

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ( पर्यटन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कोकण पर्यटनाच्या विषयाच्या संदर्भात या ठिकाणी अर्धातास चर्चा उपस्थित केलेली आहे. कोकणासंबंधी यासभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. सर्व राज्याचा विचार केला तर कोकणाला सर्वात अधिक पैसे शासनातर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. सन 2002-2003 या वर्षी कोकणामध्ये कोकण रिव्हीएरा सर्कीट-1 कार्यक्रम राबवण्यात आला होता व या कार्यक्रमामध्ये विजय दुर्ग, सिंधुदुर्ग आणि जयगड याभागाचा विकास करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला होता. तसेच सन 2004-2005 मध्ये कोकण रिव्हीएरा सर्कीट-2 कार्यक्रम हाती घेतला होता. यामध्ये एरंगल, धामापूर, आक्षीनागाव, दिवेआगार, अंबोली येथे पर्यटन विकासाची कामे हाती घेण्यात आली होती. सन 2005-2006 मध्ये कोकण रिव्हीएरा सर्कीट-3 मध्ये रत्नागिरी, गणपतीपुळे, वेळणेश्वर, सिंधुदुर्ग आणि तारकर्ली आणि कुणकेश्वर या ठिकाणच्या विकासाचे काम हाती घेतले गेले होते. तारकर्ली मध्ये स्कूबा डायव्हींग सुरु करण्यात आलेले आहे. सन 2006-2007 मध्ये 250 कोटी रुपये केंद्रसरकारने कोस्टल डेव्हलपमेंटसाठी सँक्शन केले होते त्यापैकी 62 कोटी रुपये सन 2006-2007 मध्ये कोकणासाठी खर्च झालेले आहेत. मल्टीपरपज फ्लोटींग जेट्टीसाठी रायगड फोर्टमध्ये पैसे खर्च केलेले आहेत. तसेच चिपळूण, गणपतीपुळे, कुणकेश्वर, वेंगुर्ला, दाजीपूर , बोर्डी आणि सवई या ठिकाणी आपण आतापर्यात 62.05 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन 2007-08 मध्ये 60 कोटी रुपये कोकणामध्ये खर्च करणार आहोत. पर्यटनाच्या संदर्भात कोकण आणि गोवा यांच्यामध्ये कम्पेरिजन करतो. पर्यटक गोव्यात जातात परंतु कोकणामध्ये येत नाही असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी आंबोलीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या ठिकाणी मी स्वत: जाऊन आलेलो आहे. आंबोलीत पर्यटक गेल्यावर तो राहील कोठे अशी परिस्थिती आहे. त्या ठिकाणी कर्नल सावंत यांचे मिलीट्री स्कूल सोडून दुसरी राहण्याची कोणतीही सोय नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 11.15

श्री.सुरेश शेट्टी.........

. कोकणामध्ये पर्यटक जातात तेव्हा एम.टी.डी.डी.सी. च्या ठिकाणी राहतात . सर्वच ठिकाणी पैसे खर्च करुन रिसॉर्ट, थ्री स्टार व फाईव्ह स्टार हॉटेल्स शासन बांधू शकत नाही. गोव्यात जर आपण गेलो तर प्रत्येक गावात रिसॉर्टस आहेत आणि प्रत्येक गल्लीत हॉटेल्स आहेत.त्याचबरोबर समुद्रकिनारी मोठया प्रमाणावर टू स्टार, थ्री स्टार व फाईव्ह स्टार हॉटेल्स आहेत. त्याचबरोबर ब्रेक फास्टची स्कीम तेथे राबविण्यात येते परंतु कोकणात बरेच प्रयत्न करुन देखील गेल्या 15 वर्षात एकही फाईव्ह स्टार हॉटेल सुरु करण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी आपण एकूण तीन प्लॉटस मंजूर केले होते त्यातील एक प्लॉट ताज हॉटेलला दिला, दुसरा प्लॉट ऑबेरॉय हॉटेलला दिला आणि तिसरा प्लॉट सिध्दार्थ हॉटेल, गोवा यांना दिला. दहा पंधरा वर्षे होऊनही बांधकाम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे ऑबेरॉय हॉटेलला दिलेला भूखंड आपण परत घेतला असून त्या जागेच्या संदर्भात आता पुन्हा टेन्डर काढले आहे.सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, एकाच कंपनीने हे टेन्डर भरलेले आहे. त्याचबरोबर टेन्डर भरण्याची मुदत सुध्दा दहा दिवसांनी वाढवून देण्यात आलेली आहे. जेवढे डेव्हलपर्स , प्रमोटर्स , फाईव्ह स्टार हॉटेलवाले आहेत त्या सर्वांशी संपर्क साधून त्यांना आम्ही असे सांगितले आहे की, अमुक ठिकाणी शासनाची जमीन असून ती जमीन फाईव्ह स्टार हॉटेलसाठी तुम्हाला अलौट करण्यास आम्ही तयार आहोत तेव्हा तुम्ही येथे यावे आणि हॉटेलच्या बांधकामामध्ये गुंतवणूक करावी. परंतु कोणीही येथे येण्यास तयार नाहीत . या ठिकाणी फाईव्ह स्टार हॉटेल बांधण्यासाठी कोणी का येत नाहीत व गुंतवणूक करण्यास का तयार होत नाहीत या बाबतीत कोकणातील सर्व आमदार, खासदार तसेच अन्य लोकप्रतिनिधींनी या संदर्भात बसून चर्चा करावयास पाहिजे. गोव्यामध्ये एक एकर जमिनीसाठी कितीही पैसे द्यावयाला तयार आहेत. परंतु कोकणामध्ये मात्र एकही रिसॉर्ट, एकही फाईव्ह स्टार हॉटेल , एकही थ्री स्टार हॉटेल नव्याने सुरु झालेले नाही. टाटा कन्सलटन्सीच्या रिपोर्टबाबात व नवीन अभ्यासगटाची नेमणूक करण्याबाबत सन्माननीय सदस्यांनी येथे उल्लेख केलेला आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की,राज्य शासनाने क्रिसल या कंपनीची नेमणूक केलेली आहे. राज्यातील कोस्टलच्या डेव्हलपमेन्टसाठी 250 कोटी रुपये खर्च करावयाचे आहेत तेव्हा हे पैसे कसे खर्च करता येतील याचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर प्रोजेक्ट रिपोर्ट देण्यासाठी

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.........

क्रिसलची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी रिपोर्ट सादर केला असून त्यात असे म्हटलेले आहे की, "Konkan Region in particular is treasure unexplored especially, in terms of realising economic and financial benefit in long run." परंतु ही बाब कोकणातील स्थानिक लोकांनी समजावून घेतली पाहिजे जोपर्यत स्थानिक लोक पुढाकार घेणार नाहीत तोपर्यंत या क्षेत्रात सुधारणा करता येणार नाही. या संदर्भात मी थोडक्यात आपल्याला काही बाबी सांगतो. कोकणामध्ये कोण कोणत्या गोष्टी करावयास पाहिजेत या संदर्भात त्यांनी समरी दिलेली आहे.क्रिसलने असे सांगितले आहे की, रायगड जिल्हयातील न्हावा शेवा येथे 50 एकर क्षेत्रात डेस्टीनेशन-फॅमिली इंटरटेनमेन्टचा झोन करावा. त्याचबरोबर ठाणे जिल्हयातील बोर्डी येथे तीन एकर जमिनीमध्ये चिल्ड्रन इंटरटेनमेन्ट ॲन्ड एज्युकेशन सेन्टर करावे, ठाणे जिल्हयातील बसिन फोर्ट येथे अडीच एकर जमिनीमध्ये हेल्थ केअर ॲन्ड रिकव्हरी सेन्टर करावे, रायगड जिल्हयातील किहीम येथे दोन एकर जमिनीत नेचर गेट-वे रिसॉर्ट तयार करावे, कोंडिवली, आरवी, श्रीवर्धन, हरीहरेश्वर येथे एम.टी.डी.सी.चे सध्याचे जे रिसॉर्टस आहेत त्याला अपग्रेड करुन कॉर्पोरेट हेवन ऑफ महाराष्ट्र तयार करावे, रत्नागिरी जिल्हयातील बाणकोट येथे 7.2 एकर जमिनीमध्ये बाणकोट फोर्ट हॉटेल डेव्हलप करण्यात यावे, जयगड, गणपतीपुळे येथे एम.टी.डी.सी.ची प्रॉपर्टी आहे. तेव्हा गणपतीपुळे येथे एक्झॉसटीक सर्कीट तयार करण्यात यावे व रत्नागिरी पॅलेसला डेव्हलप करुन पॅलेस हॉटेल तयार करण्यात यावे, विजयदूर्ग फोर्टला डेस्टीनेशन विजयदूर्ग आणि कुणकेश्वरला गॅस्ट्रॉनॉमिकल डिलाईट असे टायटल देण्यात यावा अशा प्रकारे या दहा ठिकाणचा प्रोजेक्ट रिपोर्ट त्या कंपनीकडून शासनाने तयार करुन घेतला आहे. या कामासाठी केन्द्र सरकारकडून जे पैसे येणार आहेत ते सर्व पैसे या ठिकाणचे सेन्टर्स डेव्हलप करण्यासाठी खर्च करण्यात येणार आहेत. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, प्रायव्हेट इनव्हेस्टर्स, प्रायव्हेट प्लेअर्स, प्रायव्हेट डेव्लपर्स आणि स्थानिक लोकांनी कोकणाचा विकास करण्यासाठी पुढे आले पाहिजे आणि शासनाला मदत केली पाहिजे. अशा प्रकारे कोकणाचा विकास करण्याकरिता त्यांनी पुढे येण्याची आवश्यकता आहे .

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या चर्चेत भाग घेताना मी काही मुद्दे आपल्यासमोर मांडू इच्छिते. मी पर्यटनासंबंधात, विशेषत: कोकणातील पर्यटनाच्या संदर्भातच सांगणार आहे. या ठिकाणी या संदर्भात रस्त्यांचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.पाटील यांनी मांडला आहे. आपण कोकणामध्ये रस्त्याने जातो त्यावेळेस साधारणत: 3-4 अपघात वाकड्या, धोकादायक वळणांमुळे झालेले पहावयास मिळतात. मला हे यासाठी सांगावे लागत आहे की, शेवटी पर्यटन केव्हा वाढेल तर जेव्हा तुमचे रस्ते नीट होतील, लोकांना पर्यटनस्थळी जाणे सुकर आणि सहजसुलभ होईल, लोकांना तेथे जाण्यास सुरक्षितता वाटेल. त्या दृष्टीने कोकणातील अगदी रायगड पासून सावंतवाडीपर्यंत रस्त्यांचा विकास करणे गरजेचे आहे. या रस्त्यांच्या बाबतीत एक समिती नेमू असे सांगितले गेले. आता येथे माननीय पर्यटन राज्यमंत्र्यांनी काही गोष्टी सांगितल्या आहेत. पण आपणास कदाचित माहिती नसेल म्हणून मी आपल्याला अगदी गावांच्या नावासह माहिती देईन. आता गणपतीपुळे हे पर्यटनाच्या दृष्टीन अतिशय उत्कृष्ट असे ठिकाण आहे तेथे मोठ्या प्रमाणात पर्यटक जात असतात. तेथे पंचतारांकित, त्रितारांकित हॉटेल्समध्ये राहणारे पर्यटक जात असतीलही पण जो सामान्य पर्यटक आहे ज्याला या पंचतारांकित, त्रितारांकित हॉटेलांची गरज नाही, त्याला त्याच्या राहणीमानास लायक असे तेथे मिळाले तर ते पाहिजे असते. त्यादृष्टीने तुम्ही सोय करणार नसाल तर मग तेथे पर्यटन वाढणार नाही. हा आमचा सामान्य माणूस पर्यटनासाठी न्यूझिलंड, अमेरिका सारख्या ठिकाणी जात येत नाही, तर तो आजूबाजुच्या प्रांतातून आलेला असतो, त्यासाठी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यासारख्या निसर्गरम्य ठिकाणी जात असतो तेथे त्याला पर्यटनाच्या दृष्टीने समुद्र सफारीची हौस भागविता आली पाहिजे, त्यादृष्टीनेही तो प्रयत्न करीत असतो. पण त्यासाठी आपल्या सरकारकडून, पर्यटन विकास महामंडळाकडून किती प्रतिसाद मिळतो तेही महत्त्वाचे आहे. त्या भागांमध्ये घराघरातून लोकांनी छोटी हॉटेल्स सुरू केली आहेत तेथे त्याला घरगुती जेवणाची सोय होत असते. रायगड जिल्ह्यातील समुद्र किनारी असलेल्या किहीम, नागाव असेल, रत्नागिरी जिल्ह्यातील गणपतीपुळे असेल वा थिबा पॅलेस आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर असेल, तोंडवळी, आचरे ही गावे असतील शंकराचे देऊळ असलेला सगळा किनारी एरिया आहे, तो कोठून सुरू होतो आणि कोठे संपतो ते मला चांगल्या प्रकारे माहिती आहे. सर्जेकोट आणि तारकर्ली येथे बॅकवॉटर एरिया आहे. ज्याप्रमाणे

...... क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती देसाई ....

केरळ राज्यामध्ये बॅक वॉटरमध्ये होडीतून प्रवास करण्याचा आनंद मिळविता येतो तशी काही योजना महाराष्ट्र सरकारने थोड्या फार फरकाने सुरू केलेली आहे परंतु त्यामध्ये पुरेशी वाढ झालेली आहे असे म्हणता येणार नाही. तीच अवस्था सर्जेकोट येथील आहे. या परिसरात खाडी तोडून समुद्रापर्यंत जो भाग गेलेला आहे तेथे आपल्याला लक्ष देता येऊ शकेल. तेथे नदी म्हणता येणार नाही परंतु खडकाचा एक मोठा भाग आहे आणि तेथे खनिज संपत्ती असलेला समुद्र किनारा आहे तेथे संशोधनाचा पर्यायही आपल्याला करता येईल. पण तेथे आज वीज नाही. जेथे आहे ती अजून मधून जात असते. त्यामुळे रत्नागिरी जिल्हा असेल, रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्हा असेल तेथे आपण मोठ्या प्रमाणात असे प्रयोग करण्याची गरज आहे. तसे आपण करणार आहात का ?

श्री. राजन तेली : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी विस्ताराने उत्तर दिलेले आहे. माझी विनंती आहे की, टाटा कंपनीचा अहवाल सिंधुदुर्ग जिल्ह्यापुरता आहे आणि आपण कोकणाबद्दल सगळी माहिती सांगितले. त्यात क्रिसिलच्या अहवालाबाबत देखील आपण सांगितले. परंतु सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून सरकारने घोषित केलेला आहे. तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पंचतारांकित हॉटेल्स काढण्यावरच नाही तर कृषी पर्यटन आणि ग्रामीण पर्यटन यावर देखील आपण भर दिला पाहिजे. त्यासाठी राज्य सरकारतर्फे काही कार्यशाळा व्हायला पाहिजेत. तसे आपण करणार आहात काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी सांगितले की, सामान्य पर्यटकांसाठी पंचतारांकित हॉटेल्स नको तर त्यांना परवडतील अशा सोयी सुविधा तेथे विकसित केल्या गेल्या पाहिजेत. एमटीडीसीने तीन वर्षापूर्वीच ब्रेड ॲण्ड ब्रेकफास्ट योजना तेथे घेतलेली असून त्याची 395 युनिटस् काढलेली आहेत. ....

( यानंतर सौ.रणदिवे ..... आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ KGS/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 11:25

श्री.सुरेश शेट्टी . . . .

सन्माननीय सदस्य सांगत होते की, तेथे छोटी-छोटी हॉटेल्स् आहेत. ही हॉटेल्स् सुध्दा बेड ॲण्ड ब्रेकफास्ट स्किममध्ये आलेली आहेत. यावर्षी 2008-2009 मध्ये 2 कोटी 70 लाख रुपयांची बेड ॲण्ड ब्रेकफास्ट स्किमसाठी प्रोव्हीजन केलेली आहे. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी बॅक वॉटरच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला होता. बॅक वॉटर एक्सप्लोअर करण्यासाठी तेथे एम.टी.डी.सी.ने दोन लक्झरी हाऊस बोट सुरु केल्या आहेत. एका हाऊस बोटमध्ये 2 बेडरुम्स् आहेत आणि दुसऱ्या हाऊस बोटमध्ये 4 बेडरुम्स् आहेत. याशिवाय आणखी चार बोटी नव्याने खरेदी करीत आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी सिंधुदूर्ग मध्ये ग्रामीण पर्यटन आणि कृषी पर्यटनाबाबत सांगितले. आपण यासंबंधात एक प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करुन द्यावा. तो रिपोर्ट तपासून जर चांगला असेल तर एम.टी.डी.सी.मार्फत राबविण्यात येईल.

-----

. . . .आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कायम विनाअनुदानित शाळांचे कायम विनाअनुदानित तत्व रद्द करण्याबाबत

मु.शी. : कायम विनाअनुदानित शाळांचे कायम विनाअनुदानित तत्व रद्द करण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 37332 ला दिनांक 12 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.कपिल पाटील वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, कायम विनाअनुदानित शाळांचे कायम विनाअनुदानित तत्व रद्द करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 37332 ला दिनांक 12 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, या राज्यातील शिक्षणाचा दर्जा घसरण्याचे जे मुख्य कारण आहे, त्यामागे विना अनुदान आणि कायम विना अनुदान हे शासनाचे जे धोरण आहे, ते आहे. विना अनुदानाच्या धोरणामुळे केवळ शिक्षणाचा दर्जाच घसरला असे नाही तर शिक्षकांच्या शोषणाची शासनमान्य व्यवस्था आपण निर्माण केली आहे. ती संपुष्टात आणण्यासाठी सदनामध्ये अनेक वेळा चर्चा झाली आहे. तसेच सभागृहाच्या बाहेर देखील आंदोलने झाली आहेत. शासन याबाबतीत असे उत्तर देते की, सध्या शासनाची आर्थिक स्थिती बरोबर नाही. जेव्हा निधी उपलब्ध होईल, माननीय हाय कोर्टामध्ये शासनाने वेळोवेळी अशाच प्रकारचे ॲफीडेव्हीट केलेले आहे. मला एवढेच विचारावयाचे आहे की, आजही महाराष्ट्र राज्याचे शासन बिहार राज्याच्या मागे आहे काय? बिहार सारख्या मागासलेल्या राज्याने शिक्षणाच्या बाबतीत असलेला अनुशेष दूर करण्यासाठी ज्या वेगाने पावले उचलली आहेत, त्या गतीने महाराष्ट्र राज्याचे शासन जात नाही. किमान टप्प्याटप्प्याने तरी विना अनुदानची पध्दत संपविता येईल. यासाठी फार निधीची गरज आहे अशी स्थिती नाही. 1997 ते 2001 या दरम्यानच्या काळात शासनाने एकाच वेळी काही शाळांना अनुदानासाठी परवानगी दिली आणि दुसऱ्या बाजूला काही शाळांना विना अनुदानासाठी परवानगी दिली, कायम विना अनुदानासाठी परवानगी दिली. ही जी विसंगती निर्माण केली, हा जो सापत्नभाव दाखविला, पंक्तीभेद केला त्याबद्दल माझा आक्षेप आहे आणि त्यासंबंधात येथे चर्चा उपस्थित केलेली आहे. ....

. . . .आर-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने नोव्हेंबर 2002 नंतर कायम विना अनुदानाचे धोरण अवलंबिले आहे. पण त्यापूर्वीच्या ज्या शाळा आहेत, त्यामध्ये जी विसंगती ठेवलेली आहे, त्यामध्ये जो पंक्तीभेद केलेला आहे तो संपुष्टात आणण्याची शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे नोव्हेंबर 2002 पूर्वीच्या ज्या शाळा आहेत, त्यातील काही शाळांना कायम विना अनुदान आणि काही शाळांना विना अनुदान अशी जी विसंगती आहे, ती तातडीने दूर करण्याची गरज आहे. आपण ती दूर केली नाही तर एका बाजूला काही ठिकाणी शिक्षक नाममात्र पगार घेतो आणि वर्षानुवर्षे पगाराची वाट पहातो. ज्या शाळा कायम विना अनुदानित होत्या, त्या नंतर विना अनुदानित केल्या. हे कशासाठी केले ? कोणत्या वशिल्यासाठी केले ? त्यामागे कोणते कारण होते ? हे स्पष्ट झाले पाहिजे. तुमच्या चुका आहेत आणि त्या तुम्ही दुरुस्त केल्या पाहिजेत. त्या दुरुस्त करावयाच्या असतील तर शासनाने असा निर्णय घ्यावा की, कायम विना अनुदानाचे धोरण राबविले जात आहे, त्यापूर्वीच्या म्हणजे नोव्हेंबर 2002 पूर्वीच्या सर्व शाळांना देखील तात्काळ अनुदान द्यावे. कारण तुम्ही या शाळांना 1997 पासून मान्यता दिलेली आहे, 2001 मध्ये मान्यता दिलेली आहे आणि आता आठ वर्षे पूर्ण झाली आहेत, म्हणजे एव्हाना त्यांना अनुदान मिळाले असते. या काळातील ज्या शाळा आहेत, त्या जरी अनुदानाच्या टप्प्यावर आणल्यात तरी यामधील विषमता दूर होईल.

सभापती महोदय, मुंबईच्या बाबतीत एकच उदाहरण देतो. या दरम्यानच्या काळामध्ये गरज वाढली म्हणून अनुदानित शाळांमध्ये विना अनुदानित तुकडया दिलेल्या आहेत. काहींना कायम विना अनुदानित दिल्या, तर काहींना विना अनुदानित दिल्या. मुंबईमध्ये दक्षिण मुंबई आणि गिरणगाव मधील बहुतेक लोक उपनगरामध्ये स्थलांतरीत झाले. म्हणून तेथील शाळांमधील तुकडया कमी झाल्या, त्या तुम्ही उपनगरातील शाळांमध्ये द्यावयास हव्या होत्या. परंतु तसे केले नाही. आपण उपनगरामध्ये विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित तुकडया दिलेल्या आहेत. किमान ज्या कायम विना अनुदानित तुकडया दिलेल्या आहेत. अशा वेळी उपनगरामध्ये मागणी असेल तर या तुकडया तेथे दिल्या पाहिजेत. अशा पध्दतीने कोणताही नवा बोजा न धेता सुध्दा आपल्याला ही विसंगती दूर करता येईल. या बाबतीत दोन-तीन वेळा चर्चा झाली आहे आणि त्यावेळी माननीय राज्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिले आहे. याबाबतीत जी.आर.काढण्यात येईल असे सांगितले. पण काही झालेले नाही. माझे दोन वेगवेगळे प्रश्न आहेत.एक प्रश्न मुंबईच्या संबंधातील आहे आणि

. . . .आर-4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

1997 ते 2001 या दरम्यान ज्या तुकडया दिलेल्या आहेत, त्यासंबंधात वारंवार चर्चा झाली आहेत, त्यामुळे मी विस्ताराने बोलत नाही. माननीय मंत्री महोदयांनी या विषयावर पडदा टाकावा की नोव्हेंबर 2002 पूर्वीच्या सर्व शाळा अनुदानावर आणल्या जातील. मुंबईतून उपनगरामध्ये लोकांनी जे स्थलांतर केल्यामुळे तुकडयांच्या बाबतीत जो प्रश्न निर्माण झाला आहे, त्यासंदर्भात मुंबईतील तुकडया तेथे हस्तांतरित करण्याबाबतचा निर्णय त्वरित घ्यावा अशी माझी विनंती आहे.

----

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती : श्री. उल्हास पवार )**

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, राज्यामधील शाळांना अनुदान कसे देण्यात यावे याबाबत शासनाने सन 1989 पासून धोरण बदलले आहे. सन 1989 पासून दुसऱ्याच वर्षी शाळांना अनुदान मंजूर केले जात होते. सन 1989 नंतर 4 टप्प्यांमध्ये अनुदान देण्यात येत होते. सन 2000 पासून 5 टप्प्यांमध्ये अनुदान देण्याचे ठरविण्यात आले होते. सन 2001 मध्ये शासनाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे, शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर सुरु होणाऱ्या शेकडो शाळांना कायम विना अनुदानित तत्वावर सुरु करण्यात आल्या. तसेच त्यावेळी या शाळांकडून शपथपत्रावर असे लिहून धेण्यात आले होते की, कोणत्याही प्रकारचे अनुदान यानंतर मागितले जाणार नाही. असे शाळांकडून शपथपत्रावर लिहून घेतल्यानंतर त्यांना मंजुरी देण्यात आली.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शाळांकडून शपथपत्रावर लिहून घेण्यात आले होते. चोरी करायला आपण शिकविता, दरोडा आपण घातला आहे तरी देखील हे सर्व त्यांनी केले आहे असे आपण सांगत आहात. कृपा आपण असे करु नका. जी सक्ती करण्यात आली होती. ती सक्ती काढून घ्या. हे सर्वोच्च सभागृह आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, याबाबत मी स्पष्टीकरण करणारच होतो. ते सांगण्यापूर्वीच सन्माननीय सदस्या बोलत आहेत. अनुदान देण्याबाबत कायम हा शब्द काढून टाकावा असा निर्णय हायकोर्टाने परवाच दिलेला आहे. त्यांच्या निर्देशाप्रमाणे, हा शब्द काढून टाकण्यात येणार आहे. हा निर्णय एक महिन्याच्या आत घेण्यात येईल. तसेच मंत्रीमंडळामध्ये हा विषय मांडून हा शब्द काढून टाकण्याच्या बाबत निश्चितपणे विचार केला जाईल. सन 1997 ते 2001 मध्ये काही शाळा सुरु करण्यात आल्या होत्या. त्यानंतर काही शाळांना अनुदान दिले होते. शाळांना अनुदान कसे द्यावे याकरिता सचिवांनी उच्च न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल केले आहे. यासंबंधी शासनाकडे दोन प्रस्ताव आहेत. हे धोरण अंमलात येण्यापूर्वी ज्या शाळा सुरु करण्यात आल्या होत्या त्यांना अनुदान देण्याची सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच आदिवासी, अल्पसंख्यांक, मागास भाग, तसेच भौगोलिकदृष्टया आडवळणाचा जो भाग आहे तेथे असलेल्या शाळांना अनुदान देण्याकरिता साधारण 200 ते 250 कोटी रुपये शासनास खर्च

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ..

करावा लागणार आहे. या शाळांना अनुदान द्यावे लागेल असे शासनाचे मत झालेले आहे. या दोन्ही प्रस्तावांवर शासन विचार करीत आहे. तसेच कायम विना अनुदान तत्वामधील कायम हा शब्द लवकरात लवकर काढून टाकून, टप्याटप्याने अनुदान देण्याचा शासनाचा विचार आहे. ही कार्यवाही एक महिन्याच्या आत करण्यात येईल. मुंबई व मुंबई उपनगरामध्ये ज्या तुकडया आहेत त्याबाबत शासनाची एक योजना आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या काही तक्रारी केलेल्या आहेत त्यांच्या संदर्भात बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

==3==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील एमसीव्हीसी अभ्यासक्रम घेणाऱ्या संस्थांना अनुदान देण्याबाबत

**मु. शी.** : राज्यातील एमसीव्हीसी अभ्यासक्रम घेणाऱ्या संस्थांना अनुदान देण्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 39551ला दिनांक 14 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा वि.प.स.

श्री. श्रीकांत जोशी ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, "राज्यातील एमसीव्हीसी अभ्यासक्रम घेणाऱ्या संस्थांना अनुदान देण्याबाबत " या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 39551 ला दिनांक 14 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, एमसीव्हीसी अभ्यासक्रमाच्या बाबत मी एक प्रश्न विचारला होता. त्याच्या उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदयांनी मंत्रालयामध्ये बैठक घेतली होती. त्यामुळे याबाबत काही तरी मार्ग निघेल अशी आमची अपेक्षा होती. याबाबत जी प्रगती होणे अपेक्षित होते तसे काहीही झालेले नाही. या संदर्भात मी या ठिकाणी 3 मुद्दे मांडू इच्छितो. 11वी व 12वी मधील ग्रामीण भागातील व शहरी भागातील मुलांमधील जी मुले प्रोफेशनल अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळवू शकणार नाही अशा मुलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्याकरिता व स्वत:चे अर्थार्जन करण्याकरिता व्यावसायिक शिक्षण देऊन काही तरी उपाययोजना करणे आवश्यक आहे. परदेशामध्ये एखादा मुलगा 18 वर्षानंतर आई वडीलांवर अवलंबून राहत असल्यास तो मुलगा मेंटली रिटायर्ड आहे असे समजले जाते. तेथे त्यांनी स्वत:च्या पायावर उभे राहून पैसा कमाविला पाहिजे असे शिकविले जाते. आपल्या राज्यातील जी मुले इंजिनियरींग किंवा मेडीकलला जाऊ शकणार नाही किंवा प्रोफेशनल कोर्सेसला जाऊ शकणार नाहीत त्यांना छोटे, मोठे कोर्सेस आपण मिळवून ते स्वत:च्या पायावर उभे राहू शकतील यासाठी राज्यात एमसीव्हीसीची स्थापना करण्यात आली होती. यामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता होती. परंतु बराच कालावधी उलटल्यानंतर देखील यामध्ये काही बदल करण्यात आलेले नाहीत. म्हणून आज ही दुदैवी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ..

एआयसीटीई ने चांगले काऊन्सिल तयार केले आहे. इंजिनियरींग एज्युकेशनच्या संदर्भात एक वेगळे काउन्सिल तयार करुन, तांत्रिक शिक्षणास परवानगी देण्याबाबत अभ्यासक्रमामध्ये बदल मान्य करण्यासाठी तज्ज्ञ मंडळींचे काऊन्सिल केले. तशाच प्रकारे, महाराष्ट्र राज्यामध्ये 20 ते 25 लाख विद्यार्थी वेगवेगळया स्तरामध्ये शिकत आहेत या विद्यार्थ्यांपैकी काही जणांना फिटर व्हावयाचे असेल,

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

मोबाईल रिपेअर करणारा व्हावयाचे असेल, टी.व्ही. मेकॅनिक व्हावयाचे असेल, संकणक हार्डवेअर शिकावयाचे असेल किंवा बदलत्या काळानुसार हॉर्टिकल्चरमधील लेटेस्ट टेक्नॉलॉजी असतील, डेअरीमधील वेगळे प्रोजेक्ट असतील या सर्व बाबतीत येणाऱ्या काळातील उच्च शिक्षण टेक्नॉलॉजीतील आव्हाने लक्षात घेऊन आपल्याला मोठ्या प्रमाणावर मॅनपॉवरची निर्मिती करावी लागणार आहे. ते तयार करण्याचे वय म्हणजे 16 व्या वर्षानंतर 17, 18, 19 वर्षे या वयामध्ये तयार होऊ शकते. त्यामुळे एम.सी.व्ही.सी. चा जो मूळ उद्देश होता तो डोळ्यासमोर ठेऊन आपण अशी कौन्सिल तयार करणार काय ? कारण ज्या डायरेक्टर ऑफीसशी चर्चा झाली त्या ठिकाणी मंत्रिमहोदयांनी प्रश्न विचारत असताना डायरेक्टर ज्या पध्दतीने उत्तर देत होते त्यावेळी खरे म्हणजे मला माननीय मंत्रिमहोदयांची दया आली की, अशा डायरेक्टर लोकांबरोबर माननीय मंत्रिमहोदय कसे काम करत असतील ? त्यांना काही देणे-घेणे नव्हते. त्यांना महाराष्ट्राच्या भवितव्याशी काही देणे-घेणे नव्हते. शेवटी माननीय मंत्रिमहोदयांना राग अनावर झाल्यानंतर त्यांनी 3 महिन्यात रिपोर्ट देण्यास सांगितले. दोन महिने मी मागे लागल्यानंतरही पाहिजे तसा रिपोर्ट तयार होत नव्हता. म्हणून नोकरशाहीवर पूर्णपणे अवलंबून न राहता इंडस्ट्रीजमधील तसेच शिक्षण क्षेत्रातील जे महत्वाचे आहे, तंत्रशिक्षण क्षेत्रातील जे महत्वाचे आहे त्यादृष्टीने येणाऱ्या काळातील पावले ओळखून एम.सी.व्ही.सी. एज्युकेशनचा नवीन पॅटर्न आणण्याचा प्रयत्न शासन करणार काय ? हा पॅटर्न जर आपण करणार असाल तर त्यामधील एकूण ॲकॅडमिक चेंजेस असतील त्यादृष्टीने सिलॅबस चेंज करावे लागतील. सिलॅबस आऊटडेटेड झालेले आहेत. आता फॉंड्री नाही तरी सुध्दा त्याचा कोर्स वर्षानुवर्षे चालू आहे. लाकडे उपलब्ध नाहीत परंतु कारपेंटरीचा कोर्स चालू आहे. जे आवश्यक आहे ते कोर्सेस दुर्देवाने नाहीत. त्यामुळे ते बदल करणार काय ? त्यासाठी वेगळे कौन्सिल आणि बदल करण्याची यंत्रणा शासन कार्यान्वित करणार काय हा माझा दुसरा महत्वाचा प्रश्न आहे. ज्यामुळे ही बाब लक्षात आली ते म्हणजे मराठवाड्यातील जी 76 कायम विनाअनुदानित एम.सी.व्ही.सी.ची कॉलेजेस आहेत त्या ठिकाणी 1996-97 पासून आतापर्यंत म्हणजे 12 वर्षे जवळपास 500 रुपये ते एक हजार रुपये पगारावर हजार प्राध्यापक रात्रंदिवस काम करत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. श्रीकांत जोशी .....

आहेत. उदगीरमध्ये, नांदेडमध्ये, देगलूरमध्ये खेड्यापाड्यामध्ये त्यांनी ही व्होकेशन कोर्सेस चालू ठेवलेली आहेत. त्यातील आष्टी वगैरे ठिकाणची बरीचशी मुले स्वतःच्या पायावर उभी राहिली आहेत. त्यांना कोठे तरी फिटरची, गंवड्याची, सिव्हिल सुपरवायझरची नोकरी मिळाली. आता ती सर्व कॉलेजेस विना अनुदानामुळे बंद पडत चाललेली आहेत. यातील एकच महत्वाचा प्रश्न आहे की, केंद्र शासन त्यांना पाच वर्षासाठी अनुदान देण्यास तयार आहे. परंतु महाराष्ट्र सरकार पुढची लायबिलिटी आपल्या अंगावर येईल म्हणून तो प्रस्ताव पुढे पाठवित नाही. माझ्या दृष्टीकोनातून आपण कायद्याचे गुलाम होऊ शकत नाही. आपण नियमांचे गुलाम होऊन काम करायला तयार नाही. यातून काही ना काही तरी मार्ग काढला पाहिजे. पुढच्या काळात काही ना काही ॲडहॉक अनुदान द्यावयाचे असेल तर ते देता येऊ शकेल. पाच वर्षानंतर एज्युकेशनचे जे रिव्हॉल्यूशन होईल त्याची कल्पना कदचित आपणा सगळ्यांना नसेल. पाच वर्षापूर्वी इंजिनिअरींग कॉलेजचे प्राध्यापक 3 हजार रुपयांना मिळावयाचे परंतु आता लाख रुपये दिले तरी इंजिनिअरींग कॉलेजचे प्राध्यापक मिळत नाहीत. म्हणून शिक्षणाने जी गती घेतलेली आहे अशा काळामध्ये केंद्र सरकार आपल्याला पाच वर्षे अनुदान देण्यास तयार आहे. पूर्वी ते दहा वर्षे अनुदान देत होते. ते अनुदान किमान पाच वर्षे घ्यावे. पर कॅपिटा इन्कम कमी असलेल्या, बॅकवर्ड झोनमधल्या आणि ज्यांनी बाकी सगळ्यांना मिळते आपल्यालाही मिळेल या आशेने 12 वर्षे मेहनतीने या संस्था जगविलेल्या आहेत त्यांच्या सातत्याने बऱ्याच बैठका झाल्या. त्या 76 संस्थापैकी 26 संस्था आता नाहीत परंतु उरलेल्या 50 संस्थांचा तरी प्रस्ताव आपण केंद्र सरकारकडे पाठवावा. त्यांच्याकडून जसे बॉण्ड लिहून घ्यावयाचे ते बॉंड लिहून घेण्यापेक्षाही सरकारने पुढचे दायित्व घेण्याचा विषयही उद्‌भवत नाही. सरकारने त्यांना स्वावलंबी होण्याचा काही तरी मार्ग दाखवावा. त्यातील एकच बाब महत्वाची आहे की, 20 विद्यार्थ्यांची जी संख्या आहे ती जर 50 केली तर मी निश्चितपणे सांगतो की, ती कॉलेजेस स्वावलंबी होऊ शकतात. त्या ठिकाणी शिफ्टमध्ये प्रॅक्टीकल्स करावे लागतील पण थिअरी 50 विद्यार्थ्यांना शिकवता येते. ज्युनिअर कॉलेजेसमध्ये फार दुर्दैवी परिस्थिती आहे. बी.ए.च्या वर्गासाठी 160 विद्यार्थ्यांचा निकष आहे. म्हणजे एक तुकडी 160 विद्यार्थ्यांची असते. आणि 160

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. श्रीकांत जोशी .....

विद्यार्थ्यांना एकच प्राध्यापक शिकवू शकतो. पण एम.सी.व्ही.सी.ला प्रॅक्टीकल असल्यामुळे 20 विद्यार्थ्यांच्या तुकडीचा निकष आहे. प्रॅक्टीकल हे शिफ्टमध्ये दर तीन तासाने घ्यावे पण 160 विद्यार्थ्यांच्या तुकडीचा निकष करु नका. ती शिक्षणाची क्रूर चेष्टा आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांना जी चेष्टा करावयाची आहे ती करु द्या आपण तंत्रशिक्षणाची चेष्टा करु नका. पण 50 विद्यार्थीसंख्या हा योग्य आकडा होऊ शकेल. म्हणून 50 विद्यार्थ्यांची जर आपण तुकडी केली तर निश्चितपणे फी च्या रुपाने, त्या विद्यार्थ्यांमध्ये काही पेईंग क्लास येण्यासाठी एम.सी.व्ही.सी.चा उपयोग होऊ शकेल. आता एम.सी.व्ही.सी.ला ॲडमिशन घेणारे विद्यार्थी बारावीला आपल्याला कमी अभ्यास करावा लागावा आणि मेरिटमध्ये येता यावे म्हणून एम.सी.व्ही.सी.ला जातात. यामध्ये उद्देश असा होता की, एम.सी.व्ही.सी.चा अभ्यासक्रम शिकल्यानंतर बारावीनंतर त्या मुलांनी स्वत:च्या पायावर उभे राहावे. म्हणून मेरिटमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एम.सी.व्ही.सी. न करता स्वत:च्या पायावर उभे राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एम.सी.व्ही.सी. केली पाहिजे. आणि त्यासाठी आपण 50 विद्यार्थीसंख्येचा निकष करणार काय ? हे तीन प्रश्न मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहेत. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम ही केंद्र सरकार पुरस्कृत योजना या राज्यामध्ये 1988-98 मध्ये सुरु करण्यात आली. ही योजना सुरु करीत असताना प्रयत्न असा होता की, 70 टक्के व्यावसायिक शिक्षणाची व्याप्ती असलेले विषयाचे दिले जावे. ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनीही केला आहे. सगळयाच विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी जाता येत नाही किंवा त्यांनी जाण्यासाठी आग्रह धरु नये. अकरावी व बारावीनंतरच या प्रवाहातून काही विद्यार्थी बाजूला होऊन ते डायरेक्ट व्यवसायाकडे गेले पाहिजेत अशी भूमिका घेऊन एम.सी.व्ही.सी.चा विषय केंद्र सरकारने सुरु केला होता. त्यानुसार आपण आपल्या राज्यामध्ये 51 शासकीय संस्थांना मान्यता दिली आणि 958 अशासकीय अनुदानित संस्था आहेत. आतापर्यंत या संस्थांना अनुदान दिले जात होते. साधारणपणे 1987-92 पर्यंत 29 कोटी दिले आहेत आणि त्यानंतर 120 कोटीचे अनुदान असे 150 कोटींचे या कामासाठी दिलेले आहे. 1997-98 पासून केंद्र सरकारकडून ही योजना राज्य सरकारकडे हस्तांतरित केली गेली आणि 100 टक्के जबाबदारी राज्य सरकारने स्वीकारावी अशी त्यांची भूमिका होती. राज्यापुरता एक निर्णय घेण्यात आला, ज्याचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. या योजनेचा आढावा घेतला त्यावेळी अकरावी व बारावीच्या लेव्हलला या सगळया प्रवाहातून बाजूला जाऊन व्यवसाय करण्याऐवजी एम.सी.व्ही.सी.चे कोर्सेस घेतल्यामुळे अकरावी व बारावीला काही विषयात बेनिफिट होतो, त्यामुळे स्कोरिंगला फायदा होतो. बारावीची टक्केवारी सुधारता येते अशी भूमिका घेतली होती. पण त्याच्यातून योजनेतील मूळ उद्देश सफल होत नाही असे निदर्शनास आले. म्हणून 1998-99 पासून राज्यात अनुदानित तत्वावर या संस्थांना मान्यता द्यावयाची नाही ही भूमिका घेतली. ही भूमिका एम.सी.व्ही.सी.साठी असली तरी बायफोकलच्या अभ्यासक्रमांना मोठया प्रमाणामध्ये मान्यता देण्यासंबंधी कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता दिली. सन्माननीय सदस्य म्हणाले की, त्या कर्मचा-यांचे शोषण होत आहे. ज्यावेळी संस्था सुरु करावयाच्या होत्या त्यावेळी संस्था चालकांना अट घातली होती. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील म्हणाल्याप्रमाणे सरकारची अट होती आणि चॉईस संस्था चालकांना होता की, शासन तुम्हाला अनुदान देणार नाही आणि तुम्हीही अनुदान

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

मागावयाचे नाही. तुम्ही शासनाला ॲफिडेव्हिटमध्ये लिहून अनुदान मागण्याचा आम्हाला हक्क राहणार नाही. त्याप्रमाणे त्यांनी अनुदान मागणार नाही असे लिहून दिले. त्यानंतर त्यांनी संस्थेसाठी परवानगी घेतली. त्याप्रमाणे काही संस्थांनी लिहून दिले, काहींनी दिले नाही. ज्यांनी लिहून दिले त्यांना शासनाने परवानगी दिली. ज्यांनी लिहून दिले नाही त्यांना शासनाने परवानगी दिली नाही. कर्मचा-यांचे वेतन व इतर सर्व सेवाविषयक बाबींची जबाबदारी शासन घेणार नाही, ती संस्थेने घ्यावी अशी तरतूद करण्यात आली. परंतु एम.सी.व्ही.सी.च्या माध्यमातून काही संस्था अगदी पुण्यामध्ये प्रतिथयश संस्थांकडून अकरावी व बारावीच्या प्रवेशासाठी मोठया प्रमाणावर डोनेशन घेतले जात आहे अशाप्रकारच्या तक्रारी विद्यार्थ्यांकडून प्राप्त झाल्या आहेत. सद्य:स्थितीमध्ये अशासकीय अनुदानित संस्था आहेत. त्यासाठी दरवर्षासाठी 40 कोटींची तरतूद केली जाते. पुढे काय करावयाचे हा प्रश्न आहे. ज्या विना अनुदानित 156 संस्था आहेत त्यांची सातत्याने अशी मागणी आहे की, केंद्र सरकारकडून आलेले अनुदान आहे ते तुम्ही आम्हाला वन टाईम का होईना ते देऊन टाकावे. राज्य सरकारने केंद्र सरकारकडे प्रस्ताव मागितला होता, पण सरकारने पाठविला नाही असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. तशी परिस्थिती नाही. केंद्र सरकारने दिनांक 9.6.2005 रोजी केंद्रीय सहाय्यासाठी प्रस्ताव पाठविण्यासाठी कळविले होते. त्यानुसार दिनांक 2 सप्टेंबर रोजी या संस्थांना 96 कोटीचे सहाय्य करण्यासाठी प्रस्ताव सादर केला. दिनांक 19 ऑक्टोबर रोजी 38 संस्थांना यंत्रसामग्री आणि इमारत बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करण्याची बाब वगळून बाकी मागण्यांसाठी तरतूद नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे पुन्हा राज्य सरकारने या 45 संस्थांच्या यंत्रसामुग्री व इमारती बांधकामासाठी 138 कोटी रुपयांचे अनुदान देण्याची विनंती केंद्र सरकारला केली आणि त्याचबरोबर एमसीव्हीसीच्या योजनेंतर्गत ज्या विना अनुदानावरील 156 संस्था आहेत त्यांची वस्तुस्थिती केंद्राला कळविली.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:45

(श्री. दिलीप वळसे-पाटील....)

त्याबाबतीत केन्द्र सरकारने अशी भूमिका घेतलेली आहे की, ही आमची योजना नव्हती. कामयस्वरुपी विनाअनुदानित संस्थांना मान्यता देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला असल्यामुळे त्याचे बर्डन आमच्यावर टाकू नये ते बर्डन राज्य सरकारनेच सांभाळण्याचे काम करावे. या बाबतीत आम्ही केन्द्र सरकारशी बराच पत्रव्यवहार केलेला आहे. त्यांनी जी जी माहिती मागितलेली आहे ती आम्ही त्यांना दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी या वर्षीचा केन्द्रीय अर्थसंकल्प वाचला असेल. यावर्षीच्या केन्द्रीय अर्थसंकल्पामध्ये शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करण्यात आलेली आहे. देशपातळीवर व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण यासंबंधी नवा आकृतिबंध तयार करण्यात येत असून त्यावर केन्द्र शासनाकडून 15700 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. स्ट्रेंथनिंग असेल, रिकरिंग ग्रॅण्ट असेल, व्होकेशनल कोर्सेस सुरु करण्याचा कार्यक्रम असेल, नॅशनल एज्युकेशनल ट्रेनिंग इन्स्टिटयूट सुरु करण्याचा कार्यक्रम असेल, एसआयव्ही सुरु करण्याचा कार्यक्रम असेल, या बाबतीत केन्द्र सरकार धोरण बनवित आहे. त्याबाबतीत राज्य सरकारला सुध्दा निर्णय घ्यावा लागेल. सन्माननीय सदस्यांनी एज्युकेशनल पॅटर्नचा उल्लेख केला. हे खरे आहे की, अभ्यासक्रमाचे नेहमी अपग्रेडेशन झाले पाहिजे. आऊटडेटेड अभ्यासक्रम बंद झाले पाहिजेत आणि त्यादृष्टीने राज्य सरकार जरुर विचार करीत आहे. त्यासाठी आवश्यकता असेल तर कमिटीसुध्दा नेमण्यात येईल. व्होकेशनल एज्युकेशनसाठी मशिनरी आणि इक्विपमेंटस् लागतात. एखाद्या संस्थेने घेतलेली मशिनरी आऊटडेटेड झालेली आहे म्हणून त्या संस्थेने नवीन मशिनरी घ्यावी असा आग्रह आपल्याला करता येणार नाही. कारण खर्च हा ती संस्था करणार असते. सन्माननीय सदस्यांनी शिफ्टचा उल्लेख केला. राज्यातील काही आयटीआय तीन शिफ्टमध्ये चालविले जातात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर इन्व्हेस्टमेंट केल्यानंतर ती मशिनरी आयडल रहाण्यापेक्षा त्याठिकाणी शिफ्ट चालणार असतील तर त्यादृष्टीकोनातूनही तंत्रशिक्षण आणि व्यवसाय शिक्षणाच्या बाबतीत भूमिका घेतलेली आहे. ज्या ज्यासंस्थांनी दुस-या आणि तिस-या शिफ्टमध्ये संस्था चालविण्याची परवानगी मागितली असेल त्यांना ती परवानगी देण्याच्या बाबतीत जरुर विचार करण्यात येईल. नंबर ऑफ स्टुडण्टस् वाढविण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडला. विद्यार्थी संख्या 20 वरुन 50





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

करावी असे सांगण्यात आले. ही बाब तपासून पाहिली जाईल. अभ्यासक्रम अपग्रेड करण्याच्यादृष्टीने, कौन्सिल स्थापन करण्याच्या दृष्टीने आम्ही संस्थाचालकांना तीन महिन्याच्या कालावधीत अहवाल देण्यास सांगितले आहे. 156 विनाअनुदानित संस्थांना अनुदान देण्याच्या संदर्भात मर्यादा आहेत. याबाबतीत आम्ही मंत्रिमंडळासमोर देखील जाऊन आलो. जोपर्यन्त याबाबतीत मंत्रिमंडळ भूमिका बदलत नाही किंवा जोपर्यन्त केन्द्र सरकार आर्थिक बर्डन स्वीकारायला तयार होत नाही तोपर्यन्त याबाबतीत मर्यादा आहेत ही वस्तुस्थिती सन्माननीय सदस्य समजू शकतील असे मला वाटते.

श्री. श्रीकांत जोशी : विद्यार्थी संख्येबाबत जून पर्यन्त निर्णय होईल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : विचार करण्यात येईल.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वेतनेतर अनुदान रोखून ठेवल्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन

**मु. शी.** : वेतनेतर अनुदान रोखून ठेवल्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 38068ला दिनांक 12 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, "वेतनेतर अनुदान रोखून ठेवल्याच्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 38068 ला दिनांक 12 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील अनुदानित शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासंबंधीचा हा विषय आहे. महाराष्ट्र माध्यमिक शाळा अधिनियम 1960 नुसार खाजगी संस्था मार्फत चालविल्या जाणा-या माध्यमिक शाळांना आणि उच्च माध्यमिक शाळांना 100 टक्के वेतनाचे अनुदान तसेच 12 टक्के वेतनेतर अनुदान देण्याचे धोरण शासनाने अवलंबिलेले होते.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील...

गेली अनेक वर्षे 12 टक्के अनुदान खाजगी माध्यमिक शाळांना मिळत होते. महाराष्ट्र शासनातील कर्मचा-यांच्या वेतनावर होणारा खर्च वेळोवेळी वाढत असल्यामुळे 12 टक्के वेतनेतर अनुदान देण्याची भूमिकेसंदर्भातील निर्णयात शासनाने बदल केला. माध्यमिक शाळा संहितेतील नियम 88 आणि 89 मध्ये दुरुस्ती केली व त्याप्रमाणे वेतनेतर अनुदान देण्याच्या पॅटर्नमध्ये बदल केला. शाळांचे वय, शाळेतील खर्च या गोष्टींचा विचार करुन "अ","ब","क" अशी वेतनेतर देण्यासंबंधीची वर्गवारी करण्यात आली. 6-9-12 टक्के याप्रमाणे वेतनेतर अनुदान मंजूर करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले. शासनाने अलिकडच्या काळापर्यंत वेतनेतर अनुदान दिले होते. मध्यंतरीच्या काळात वेतनेतर अनुदान देण्याचे शासनाने बंद केले. शासनाने 2006 व मार्च 07 या वर्षाच्या मार्च महिन्यामध्ये 2003-04 या वर्षापर्यंत थकीत अनुदान द्यावयाचे असा निर्णय घेतला. त्यानंतरच्या कालावधीत मात्र शासनाने वेतनेतर अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने अधिका-यांना सूचना दिल्या आहेत की, कोणत्याही जिल्हयातील, कोणत्याही संस्थांना वेतनेतर अनुदान देण्यात येवू नये. जे अधिकारी संस्थांना वेतनेतर अनुदान देतील त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, 2003-04 या वर्षाची माध्यमिक शाळांची वेतनेतर अनुदानाची थकबाकीची रक्कम 14 कोटी रुपये एवढी आहे, ती रक्कम अद्याप खाजगी माध्यमिक शाळांना दिली गेलेली नाही. 2004-05 या वर्षाची 115 कोटी, 2005-06 या वर्षात 120 कोटी आणि 2006-07 या वर्षी 120 कोटी एवढी वेतनेतर अनुदानाची थकबाकीची रक्कम देणे बाकी आहे. महाराष्ट्र शासनाने कर्मचा-यांच्या वेतनात वेळोवेळी वाढ केलेली आहे. शासकीय कर्मचा-यांना सध्या पाचव्या वेतन आयोगानुसार पगार सुरु आहेत. आता सहावा वेतन आयोग होऊ घातला आहे आणि तो आयोग देखील या कर्मचा-यांना लवकरच लागू होण्याची शक्यता आहे. परंतु खाजगी संस्था चालक शाळा चालवितात. त्या संस्था चालकांना शाळा चालवित असताना विद्यार्थ्यांच्या सुविधांवर खर्च करावा लागतो. मात्र शासनाकडून या संस्थांना कोणत्याही प्रकारचे अनुदान देत नाही ही गोष्ट बरोबर नाही. शासनाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रासाठी कोटयावधी रुपये खर्च होतो आहे. त्या मानाने 6,9 आणि 12 टक्के वेतनेतर अनुदान हे खूपच अल्प आहे. ही रक्कम अल्प प्रमाणात असल्यामुळे वास्तविक पाहता शासनाने ही रक्कम तात्काळ दिली पाहिजे. संस्था चालक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुविधांवर खर्च करतात आणि ती रक्कम त्यांना उपलब्ध करुन न देणे ही बाब बरोबर

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील...

नाही. खाजगी माध्यमिक शाळांचे थकीत वेतनेतर अनुदान शासनाने तात्काळ मंजूर करावे व या पुढे देखील खाजगी माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान पूर्वीप्रमाणे नियमित देण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत वेतनेतर अनुदान बंद होता कामा नये. खाजगी माध्यमिक शैक्षणिक संस्थांना वेतनेतर अनुदान देण्यासंबंधी शासनाने जे धोरण ठरविले आहे, त्या धोरणाच्या विरोधात संस्था चालकांनी आंदोलन करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे या गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार करावा. त्याचप्रमाणे शासनाने खाजगी माध्यमिक शाळांचे वेतनेतर अनुदान बंद केल्यामुळे संस्था चालकांनी परीक्षेवर बहिष्कार टाकण्याचा देखील विचार केला होता. म्हणून या शाळांचे थकीत वेतनेतर अनुदान देण्यात यावे तसेच पूर्वी प्रमाणाचे या संस्थांना वेतनेतर अनुदान देण्यात यावे अशी माझी या निमित्ताने शासनाकडे मागणी आहे. माझ्या मागणीच्या बाबतीत माननीय शिक्षण मंत्र्यांनी खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

----------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, खाजगी माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान पूर्वीप्रमाणे देण्यात यावे तसेच वेतनेतर अनुदानाची थकबाकी संस्थाना देण्यात यावी अशा प्रकारची मागणी या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने केली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पूर्वी खाजगी माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जात होते. सुरुवातीला शासनाकडून वेतनाच्या 12 टक्के वेतनेतर अनुदान देण्यात येत होते. त्यानंतर वेतनेतर अनुदानासंदर्भात सुत्र बदलले गेले. खाजगी माध्यमिक शाळांना 6 टक्के, नंतर 9 टक्के आणि नंतर 12 टक्के वेतनेतर अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला. शाळेचे वय बघून तसेच शाळेचा परिसर बघून, शाळेच्या आजुबाजूच्या परिरात झोपडपट्टी आहे या गोष्टीचा विचार करुन तसेच ग्रामीण भाग आणि शहरी भाग या सर्व बाबी पाहून सदरहू अनुदान दिले जात होते. परंतु मागील काळात राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे दिनांक 31 मार्च 2004 रोजी सर्व शाळांचे वेतनेतर अनुदान बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतला. या निर्णयाच्या विरुध्द संस्था चालकांनी आंदोलने केली, तसेच वेतनेतर अनुदान पुन्हा सुरु करावे अशी अनेक वेळा संस्था चालकांनी मागणी केली. खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण महामंडळाचे अध्यक्ष श्री.शेखावत आहेत. त्याच्या अध्यक्षतेखाली एक शिष्टमंडळ राज्य शासनास भेटले. त्या भेटीनंतर शासनाने वेतनेतर अनुदान देण्याचा तांत्रिक निर्णय घेतला.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ....

हा निर्णय घेत असताना व्यक्तीशी संलग्न होता काय यावरच चर्चा झाली. म्हणून शालेय शिक्षण मंत्री, सहकार मंत्री, वित्त मंत्री, उच्चशिक्षण मंत्री,शालेय शिक्षण राज्यमंत्री, वित्त राज्यमंत्री या सहा मंत्र्यांची एक उपसमिती नेमण्यात आलेली आहे. या समितीची एक बैठक झालेली आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर एक महिन्याच्या आत वेतनेतर अनुदान देण्याच्या बाबतीत निर्णय होईल अशी अपेक्षा आहे. जवळपास 1432 शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासाठी तरतूद करावी लागणार आहे. 31 मार्च 2004 नंतर हे अनुदान द्यावयाचे झाले तर मोठी तरतूद करावी लागणार आहे. वेतनेतर अनुदान वेगळे करावे काय किंवा विद्यार्थीनिहाय द्यावे काय अशा प्रकारचे अनेक प्रश्न मंत्रिमंडळाच्या उपसमितीसमोर आहेत. आमची अपेक्षा अशी आहे की हा प्रश्न लवकरात लवकर निकाली निघेल आणि नियमित वेतनेतर अनुदान सुरु होईल. तथापि 31 मार्च 2004 पर्यंत अजून 14 कोटींची वेतनेतर अनुदानापोटी देणी द्यावयाची आहेत असे सांगण्यात आले. याबाबत मी माहिती घेतली असता अशी देणी शिल्लक राहिलेली नाहीत असे सांगण्यात आले. तथापि ही माहिती निश्चितच तपासून घेतली जाईल आणि राहिलेली थकीत देणी म्हणजे वेतनेतर अनुदान देण्याच्या बाबतीत तातडीने संबंधितांना आदेश देण्यात येतील. वेतनेतर अनुदानाबाबतचा निर्णय महिनाभरात लागेल एवढेच मी यानिमित्ताने माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

श्री. दिलीपराव सोनावणे : सभापती महोदय, वेतनेतर अनुदान देण्याच्या संदर्भात निर्णय होत असताना काही संस्थांचे अनुदान किरकोळ तांत्रिक अडचणींमुळे देण्यात आलेले नाही. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला असता मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की यासंदर्भात चौकशी करुन निर्णय घेऊ. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, जळगांव जिल्हयातील मराठा विद्या प्रसारक संस्थेला 1995 पासून वेतनेतर अनुदान देण्याचे बंद करण्यात आलेले आहे.....

**तालिका सभापती** : अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आलेला विषय जनरल स्वरुपाचा आहे. माननीय सदस्य एका विशिष्ट संस्थेबद्दलची माहिती विचारीत आहेत.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मला भेटावे. याबाबतची माहिती तपासून घेऊन निर्णय घेतला जाईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सिंधुदूर्ग जिल्हयातील मच्छिमार बांधवांसाठी उपाययोजना

**मु. शी.** : सिंधुदूर्ग जिल्हयातील मच्छिमार बांधवांसाठी उपाययोजना या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 3748 ला दिनांक 11 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. राजन तेली, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. राजन तेली ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील मच्छिमार बांधवांसाठी उपाययोजना या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 37482 ला दिनांक 11 मार्च 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील मच्छिमार बांधव सातत्याने मत्स्यदुष्काळ जाहीर करावा अशी मागणी करीत आहेत. महाराष्ट्राला एकंदर 720 कि.मी.लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. अरबी समुद्रात 5 सागरी जिल्हयांच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर मासेमारी चालते. संपूर्ण भारतात या व्यवसायाच्या माध्यमातून 8000 कोटी रुपयांची निर्यात होते त्यापैकी 1200 कोटी रुपयांची निर्यात महाराष्ट्रातून होते. मत्स्यदुष्काळ नाही असे शासन वारंवार सांगते. तरीसुध्दा रँडम सॅम्पलींग सिस्टीम आहे त्यामध्ये मत्स्यउत्पादनाचे पुरेसे मोजमाप करण्यासाठी आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे ढोबळमानाने मत्स्यउत्पादनाचे मोजमाप केले जाते.सिंधुदूर्ग जिल्हयात 650 ट्रॉलरपैकी 444 चालू आहेत आणि 226 आजारी आहेत. ट्रॉलरसाठी महिन्याचा खर्च येतो 2 लाख 8000 रुपये आणि उत्पन्न मिळते 1 लाख 4 हजार रुपये म्हणजे जवळपास प्रत्येक ट्रॉलरमागे 1 लाखांचे महिन्यातला नुकसान होत आहे. दोन सिलेंडरधारक ट्रॉलर 115 आणि एक सिलेंडरधारक 80 आहेत त्यातील आजारी 68 आहेत एकूण 343 आहेत. कोकणातील पाच जिल्हयांमध्ये अशा प्रकारचे बंद असलेले ट्रॉलरचे देखील मोजमाप करुन एक सॅम्पल काढतात आणि गुणिले करुन 5 जिल्हयातील जेवढे ट्रॉलर आहेत, बल्लाव आहेत, आऊटबोट मरीन इंजिन या सगळयाचे मोजमाप काढले जाते आणि दरवेळी सांगितले जाते की, मत्स्यदुष्काळ होत नाही असे सांगितले जाते. आजची शेती आणि मत्स्यव्यवसाय हे निसर्गावर अवलंबून आहे. शेतीला वेगळे निकष लावून न्याय देतो आणि मत्स्यशेतीला वेगळे निकष लावले जातात.

नंतर श्री. भोगले

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : सभागृहाची वेळ दुपारी 12.05 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझी राज्य सरकारला विनंती आहे की, पॅकेज जाहीर करणार अशी सातत्याने चर्चा सुरु आहे, परंतु पॅकेज जाहीर करण्यापूर्वी मत्स्य व्यवसायाचे पुनर्निरीक्षण करण्यासाठी या क्षेत्रातील शास्त्रज्ञ, तज्ञ, उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची समिती नियुक्त करण्यात येऊन या व्यवसायाचा अभ्यास करण्यात यावा. मासेमारी यंत्रणेसाठी लागणारे डिझेल हे रस्त्यावरील वाहतुकीच्या तुलनेत दुप्पट लागते, त्यामुळे इंधनावरील खर्च कमी करण्यासाठी डिझेलवरील अबकारी कर, रस्त्यावरील वाहतूक कर, वॅट कमी करता येणे शक्य असेल तर जरुर त्याचा विचार करण्यात यावा. बंदर कराची रक्कम मच्छिमारांना माफ करणे आवश्यक आहे. ट्रॉलर खरेदी केले, त्याचे हप्ते भरणे मच्छिमारांना शक्य होत नसल्यामुळे त्यांना सूट देता येणे शक्य असेल तर जरुर त्याचा विचार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी जी कर्जे दिली जातात त्या कर्जाची मुदत दीर्घ स्वरुपाची असून कमी व्याजाची कर्जे असतात. मच्छिमारांना देखील दीर्घ मुदतीची व कमी व्याज दराची कर्जे उपलब्ध करुन देण्याचा विचार करावा. शासकीय विम्यावर 3.5 टक्के दर आहे, त्यामुळे ट्रॉलरमागे 87,500 रुपये विम्याची रक्कम भरावी लागते. हा विम्याचा दर 1.5 टक्का करता येणे शक्य असेल तर जरुर विचार व्हावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, शेतकरी बांधवांसाठी लागणाऱ्या 79 वस्तूंना राज्य सरकारने वॅटमधून सूट दिली आहे. मच्छिमारांना लागणाऱ्या किमान 10 वस्तूंना वॅटमधून सूट दिली जावी. फायबर बोट, मरिन इंजिन, वायर रोप आदी वस्तूंवरील वॅट रद्द करण्याचा विचार व्हावा. अनुदानावर केरोसीनचा पुरवठा व्हावा अशी मी मागणी करतो. मागील वेळी मी मागणी केली होती की, गुजराथ राज्यामध्ये छोट्या मच्छिमारांना गॅस किट पुरविण्यात आले, तशा प्रकारचे गॅस किट महाराष्ट्रातील छोट्या मच्छिमारांना उपलब्ध करुन दिले तर त्यांना खूप मोठया प्रमाणात दिलासा मिळू शकेल. सर्वात महत्वाचा विषय म्हणजे जे मच्छिमार पर्शियन नेटद्वारे मासेमारी करतात. ते त्यांना आवश्यक असलेले मोठे मासे काढून घेतात आणि उर्वरित छोटी मासळी समुद्रात फेकून देतात. त्यामुळे मासळीचा दुष्काळ होण्याचे हे एक प्रमुख कारण आहे, याचा देखील राज्य सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे. 'मच्छिमार बचाव' ही कल्याणकारी योजना राबविता आली तर सगळ्यांना बरोबर घेऊन मच्छिमारांना न्याय देण्याबाबत राज्य सरकारने विचार करणे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली........

आवश्यक आहे. सायन येथील आंतरराष्ट्रीय नियतकालिकाने जो अहवाल तयार केला, त्यानुसार 2002 पासून मासेमारी का होत नाही यामागची कारणे नमूद केली आहेत. ग्लोबल वॉर्मिंग, सुनामी लाटा, समुद्रामध्ये सोडण्यात येणारी विविध प्रकारची विषारी द्रव्ये या सगळ्यांचा परिपाक म्हणून अनेक मत्स्य जाती नष्ट होण्यास सुरुवात झाली आहे. याचा राज्य सरकारने वेळीच विचार करणे गरजेचे आहे असे मला वाटते. राज्य सरकारने पॅकेज जाहीर करण्यापूर्वी मागील 3-4 वर्षाचा किनारपट्टीचा अभ्यास करुन मच्छिमारांना खऱ्या अर्थाने न्याय देण्याचा विचार करावा आणि मच्छिमारांना स्वस्त दरात केरोसीन, गॅस किट, कमी व्याज दराचे कर्ज उपलब्ध करुन देऊन मच्छिमारांना दिलासा द्यावा अशा प्रकारची विनंती करुन माझे भाषण संपवितो.

--------

..3..

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (मत्स्यव्यवसाय विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, राज्यातील 720 कि.मी. लांबीच्या समुद्र किनारपट्टीत पाच सागरी जिल्हयांचा समावेश आहे. गेली दोन-तीन वर्षे सातत्याने मासेमारी करणाऱ्या लोकांकडून मत्स्य दुष्काळ जाहीर करावा आणि शासनाने आर्थिक मदत करावी अशी मागणी केली जात आहे. राज्यात 184 ठिकाणी मासळी विक्री करणारी केंद्रे आहेत. रँडम सँपल सर्व्हे करण्याची पध्दत भारत सरकारच्या सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ मरिन रिसर्च, कोचीन या संस्थेने विकसित केली आहे. या पध्दतीचे मुल्यमापन करण्यासाठी राज्य सरकारने तत्कालीन मत्स्यव्यवसाय विकास मंत्री कै.भाई सावंत यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय समिती नेमली होती. या समितीने ही शासकीय पध्दत आहे यामध्ये बदल करु नये असा धोरणात्मक निर्णय 7 जुलै, 1984 रोजी घेतला होता. सध्या या विभागाकडे मनुष्यबळ कमी आहे, त्यामुळे 24 तास पाहणी करणे, नमुने तपासणे, सगळ्या बोटींची तपासणी करणे अशक्य आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .......

आणि म्हणून ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला की, मासेमारी कमी प्रमाणात होते, मासे मिळत नाहीत, मोठमोठे ट्रॉलर्स येऊन मासे पकडतात, ही वस्तुस्थिती खरी आहे. अशा वेळी काय करावयाचे यासंबंधी अनेक वेळा खालच्या सभागृहात व या सभागृहात देखील चर्चा झालेली आहे. मत्स्य दुष्काळ सन 1981 मध्ये कै. भाई सावंत हे मंत्री असतांना जाहीर झाला होता त्यावेळी मच्छिमारांनी जे कर्ज घेतले होते त्यांचे केवळ व्याज माफ करण्यात आले होते. परंतु आता हा विषय फक्त एवढयापुरताच मर्यादित राही तर मच्छिमारांना रॉकेलचा कोटा, कर्ज माफ करणे अशा अनेक बाबींसंबंधी निर्णय घ्यावयाचा आहे. या अनुषंगाने शासनाने माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली आहे. या समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाला असून हे अधिवेशन संपण्यापूर्वी मच्छिमारांसाठी एक मोठे पॅकेज, जे यापूर्वी कधीही दिले गेले नाही असे पॅकेज जाहीर होण्याची शक्यता आहे व त्यामुळे मच्छिमारांना मोठया प्रमाणात दिलासा मिळेल असे वाटते. तसेच अशा प्रकारचे प्रश्न यापुढे ज्या ज्या वेळी निर्माण होतील त्यादृष्टीने शासन विचार करील, एवढेच या निमित्ताने सांगतो आणि माझे भाषण संपवितो.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय मंत्री महोदय आताच म्हणाले की, "ही वस्तुस्थिती खरी आहे" परंतु वस्तुस्थिती ही खरीच असते. अशा प्रकारे भाषेतील चूक मला या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून द्यावयाची आहे.

श्री. संजय केळकर : महोदय, या विषयासंबंधीची चर्चा सभागृहात झाली होती त्यावेळेस माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांनी अधिवेशन संपण्यापूर्वी मच्छिमारांसाठी पॅकेज जाहीर करतो असे सांगितले आहे. त्याप्रमाणे हे पॅकेज या अधिवेशनातच जाहीर करणार काय ?

श्री. अनिस अहमद :सभापति महोदय, यह अधिवेशन समाप्त होने से पहले कोंकण के मछलीमारों के लिए स्पेशल पॅकेज की घोषणा की जाएगी.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : अर्धा-तास चर्चा संपली आहे.

आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होईल आणि दुपारी 12.15 वाजता नियमित बैठक पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.07 ते 12.15 पर्यंत स्थगित झाली.)

-------------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>नियम 289 च्या प्रस्तावाबाबत</u>**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, श्री. मधुकर सरपोतदार तसेच सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांचा प्रस्ताव आलेला आहे त्यांनी तो थोडक्यात मांडावा.

श्री. दिवाकर रावते : आदरणीय सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतक-यांच्या संदर्भात कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रातील शेतक-यांमध्ये आनंदाचे वातावरण असण्याची आवश्यकता होती तसेच अशा प्रकारची अपेक्षा सर्व पक्षाच्या प्रमुखांनी सुध्दा व्यक्त केली होती त्यांनी अशा प्रकारे अपेक्षा केली ती गैर होती असे मी म्हणणार नाही. अशा प्रकारची घोषणा झ ाल्यानंतर सुध्दा शेतक-यांना काही लाभ मिळेल असे न वाटल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी सतत आत्महत्या करीतच आहेत. कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर कालची शेतक-यांची 103 वी आत्महत्या आहे. याचा अर्थ शेतक-यांची या कर्जमाफीतून सुटका होत नाही अशी भावना झाल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. 5 एकराच्या पुढील शेतक-यांमध्ये आपले काही भवितव्य नाही अशी भावना झाल्यामुळे ते सुध्दा आत्महत्या करीत आहेत. 5 एकराच्या आतील शेतक-यांना शासनाने कर्जमाफी दिली होती त्या पुढील म्हणजे जास्त जमीन असणा-या शेतक-यांना कर्जमाफी मिळेल असे शेतक-यांना वाटले होते परंतु तसे काही झाले नाही. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी महाराष्ट्राच्या सभेत सांगितले होते की, अजून काही शेतक-यांच्या लाभाच्या संदर्भात विचार करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सुध्दा असे सांगितले होते की, केंद्राच्या केंद्राचे पॅकेज आल्यानंतर जे अपूर्ण राहील ते आम्ही करु आणि त्यांनी 50 हजार रुपयांपर्यंतची अशी घोषणा केली होती. त्यामुळे शेतकरी आशेवर होता . काल बुलढाणा जिल्हयातील एका शेतक-याने आत्महत्या केली म्हणून मी त्या ठिकाणी स्त: भेट देऊन आलो आहे व या शेतक-याच्या कुटुंबाने माझ्याकडे भावना देखील व्यक्त केलेल्या आहेत. असे असतांना लोकसभेमध्ये केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी घोषणा केली की, यापुढे कोणत्याही प्रकारची कर्ज माफी करणे केंद्रशासनाला शक्य होणार नाही. महाराष्ट्र विधानमंडळाचे

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

अधिवेशन चालू असतांना ग्रामीण भागातील शेतकरी आपल्याकडे अपेक्षेने पाहत आहेत. असे असतांना आज शेतक-यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले असून शेतक-यांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष महाराष्ट्राच्या अधिवेशनाकडे लागले असतांना याच दरम्यान अशी घोषणा होणे, राज्याकरिता वेळ पडल्यास तिजोरी खाली करु असे सांगणा-यांकडे शेतकरी आतुरतेने वाट पाहत होते. त्यामुळे आता नक्की कोणता संदेश शेतक-यांना द्यावयाचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. हा विषय अत्यंत तातडीचा आहे.

श्री. हसन मुश्रीफ : माझा पॉईंट ऑफ ऑर्डरचा मुद्दा आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी केलेल्या घोषणेच्या संदर्भात "आता अजिबात कर्जमाफी होणार नाही" अशा प्रकारची चुकीची माहिती सभागृहाला देत आहेत. केंद्रीय कृषीमंत्र्यांनी 60 हजार कोटी रुपयांचे कर्जाची अंमलबजावणी झाल्यानंतर विचार करु असे सांगितले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अल्पभूधारकाला जी कर्जमाफी दिली होती त्याबद्दल साशंकता निर्माण झाल्यामुळे आत्महत्या होत आहेत. त्यामुळे यासंदर्भातील शासनाची भूमिका जनतेपर्यंत जाणे आवश्यक आहे. आणि शेतक-यांच्या आत्महत्या थांबण्याकरिता मदत होणे या करिता ही चर्चा होणे आवश्यक आहे तर टीका टीपणीसाठी नाही. काल माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी सभागृहात जे सांगितले होते मी स्त: ऐकलेले आहे. त्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी या सभागृहात चर्चा होण्याची नितांत आवश्यकता आहे. आम्ही या ठिकाणी नियम 289 अन्वयेचा जो प्रस्ताव दिलेला आहे तो शेतक-यांच्या दृष्टीने जीवन मरणाचा असून हा विषय तातडीचा आहे त्यामुळे सभागृहापुढील सर्वकामकाज बाजूला सारुन ग्रामीण भागातील शेतक-यांना दिलासा मिळण्यासाठी या ठिकाणी चर्चा होण्याची आवश्यकता आहे असे मला आवर्जून सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्रश्नोत्तराचा तास व इतर कामकाज बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करावी यासाठी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला असून त्यांनी प्रास्ताविक करीत असतांना काही माहिती सुध्दा दिलेली आहे. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, महाराष्ट्रात शेतक-यांच्या संदर्भात सहानुभूतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. माननीय मुख्यमंत्री, सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील, केन्द्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार, माननीय श्रीमती सोनिया गांधी यांनी महाराष्ट्रातील शेतक-यांना दिलासा देण्याचा किंवा त्यांना आशा दाखविणारा निर्णय घेतला आहे व शेतक-यांबद्दल सहानुभूतीचे वातावरण निर्माण केलेले आहे. या सहानुभूतीच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर काल लोकसभेमध्ये माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी जो उल्लेख केलेला आहे तो थोडीशी काळजी निर्माण करणारा आहे. हे नाकारता येणार नाही. त्यांनी असे सांगितले की, प्रथम 60 हजार कोटी रुपयें कर्ज माफ करण्याची व्यवस्था करावयाची असून प्रथम आम्हाला या निर्णयातून मोकळे होऊ द्यावे त्याशिवाय पाच एकारा पेक्षा जास्त शेती असलेल्या शेतक-यांच्या कर्जाची माफी देण्याच्या बाबतीतील प्रस्ताव विचारात घेता येणार नाही .त्यांनी काल लोकसभेमध्ये जो उल्लेख केला होता तो मी स्वत: दूर दर्शनवर ऐकला होता . अशा प्रकारे लोकसभेमध्ये माननीय केन्द्रीय कृषी मंत्र्यांनी उल्लेख केल्यामुळे राज्यातील शेतक-याकडे त्याचा वेगळा संदेश जाईल आणि त्यातून आत्महत्याचे प्रमाण आणखी वाढण्याची शक्यता आहे असे मला वाटते. तेव्हा शेतक-यांना कर्ज माफी करण्याच्या संदर्भात जो पर्यत राज्य सरकार भूमिका घेणार नाही तोपर्यंत त्यांच्या पर्यत दिलासा पोहोचणार नाही तेव्हा या प्रश्नासबंधी चर्चा करण्यासाठी आम्ही 289 अन्वयेचा प्रस्ताव दिलेला असून शेतक-यांच्या प्रश्नावर चर्चा करण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे .या पूर्वी जेव्हा शेतक-यांच्या आत्महत्या राज्यामध्ये होत असावयाच्या तेव्हा देखील सातत्याने आम्ही असे सागत होतो की, 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे परंतु या निर्णयापासून जे शेतकरी वंचित राहणार आहेत त्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने एक तरी वक्तव्य शासनाने केले पाहिजे. सध्या अधिवेशन सुरु असल्यामुळे शेतक-यांना दिलासा मिळेल अशा प्रकारचे वक्तव्य जर करण्यात आले तर ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वक्तव्य शेतक-यापर्यंत पोहोचेल . या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना विचारण्यात आले असतांना त्यांनी असे सांगितले की, केन्द्र सरकारकडून जी काही मदत देण्यात येईल ती आल्यानंतर आपण यासबंधीचा निर्णय जाहीर करु. केन्द्र सरकारने 60 हजार कोटी रुपयांचे शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंदर्भात माननीय सहकार मंत्री डॉ.पंतगराव कदम यांनी असे सागितले की, अजून केन्द्र सरकारकडून पत्र आलेले नाही, या योजनेची अंमलबजावणी कशी करावयाची हे त्यांनी कळविलेले नाही, त्याचप्रमाणे पैसे देखील आलेले नाहीत. या दु:खावर डागण्या देण्याचा प्रकार काल लोकसभेमध्ये घडला असून केन्द्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी लोकसभेमध्ये असे सांगितले की, आणखी शेतक-यांची कर्ज माफी करता येणार नाही. जळगाव जिल्हयातील कासोदा येथील एका शेतक-यांने आत्महत्या केलेली आहे . कर्जामुळे अनेक शेतकरी हवालदिल झालेले आहेत. तेव्हा आजचे कामकाज बाजूला ठेवण्यात यावे आणि शेतक-यांच्या महत्वाच्या, जीवनमरणाच्या आणि जिव्हाळयाच्या प्रश्नावर चर्चा करण्यात यावी अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 289 अन्वये सूचना दिली आहे. त्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, मी परवा परभणीला गेलो होतो तेव्हा सत्ताधारी पक्षाचे आमदार आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केचे अध्यक्ष यांनी वर्तमानपत्रात असे सांगितले होते की, या वर्षी शेतक-यांना पीक कर्ज मिळणार नाही या संदर्भात शासनाकडून कोणताही आदेश मिळालेला नाही.....................

**सभापती** : नियम 289 चा प्रस्ताव कसा होऊ शकतो एवढया मर्यादेतच सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, राज्यातील अनेक शेतकरी हवालदिल झालेले आहेत. दिल्लीत बसलेले नेतृत्व आणि जिल्हयात बसलेले नेतृत्व अशा प्रकारचे जर वक्तव्य करीत असतील तर शेतक-यांनी कोणाकडे पहावे. अधिवेशन सुरु असल्यामुळे सभागृहात शेतक-यांच्या प्रश्नासंबंधी चर्चा होणे आवश्यक आहे. तेव्हा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन बळीराजाच्या प्रश्नासंबंधी सविस्तर चर्चा सभागृहात करण्यात यावी अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे.

.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वये या ठिकाणी सूचना दिली असून शेतक-यांच्या प्रश्नासंबंधी चर्चा घेण्यात यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. काल माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी लोकसभेमध्ये जो उल्लेख केला होता त्याचे उदाहरण सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दिलेले आहे. सभापती महोदय, केन्द्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी एका प्रश्नाला उत्तर देत असतांना असे सांगितले होते की , 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय केन्द्र सरकारने घेतलेला आहे हा निर्णय घेत असतांना अडीच हेक्टर पर्यंत ज्या शेतक-यांची जमीन आहे अशा शेतक-यांवरील कर्ज माफ करण्यासाठी 50 हजार कोटी रुपये लागणार आहेत आणि बाकीच्या शेतक-यांनी 25 टक्के रक्कम भरल्यानंतर त्यांच्यावरील जे कर्ज माफ करण्यात येणार आहे त्यासाठी दहा हजार कोटी रुपये लागणार आहेत. या विषयाच्या संदर्भात चर्चा करण्यास आमची काही हरकत नाही.

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 12:25

श्री.गुरूनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, हा प्रश्न इतका महत्त्वाचा असला तरी नियम 289 खाली प्रस्ताव आणून सभागृहाचा प्रश्नोत्तराचा तास रोखून ठेवून ही चर्चा घ्यावी हे मला प्रशस्त वाटत नाही. आपल्याला या विषयी चर्चा घ्यावयाची असल्यास जरूर ती घेण्यात यावी. मात्र आजचा प्रश्नोत्तराचा तास बाजूला सारून आजच्या आज चर्चा घ्यावी असे मला वाटत नाही. .... अडथळा ... सभापती महोदय, मी आमच्या समोरच्या मित्रांना सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या दृष्टीने असलेल्या या प्रश्नाचे महत्त्व ओळखूनच केंद्रातील आघाडी सरकारने 60 हजार कोटी रूपये शेतकऱ्यांसाठी दिलेले आहेत. मात्र केंद्रामध्ये त्यांच्या पक्षांचे सरकार असताना शेतकऱ्यांना एका दमडीदेखील त्यांनी दिलेली नाही. निदान आमच्या आघाडीच्या केंद्र सरकारने शेतकऱ्यांना काही तरी दिले आहे. तेव्हा आम्ही या विषयावर केव्हाही चर्चा करण्यास तयार आहोत, मात्र आजचा प्रश्नोत्तराचा तास रद्द करून, बाजूला सारून ही चर्चा तातडीने घ्यावी हे मला बरोबर वाटत नाही.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आज येथे महत्त्वाच्या प्रश्नाला वाचा फोडलेली आहे आणि शेतकऱ्यांना केंद्र सरकारने दिलेल्या कर्जमाफीच्या संदर्भात प्रश्नोत्तराचा तास बाजूला सारून चर्चा घ्यावी असा मुद्दा उपस्थित केला आहे. काल देशाच्या कृषी मंत्र्यांनी, माननीय श्री.शरद पवार यांनी लोकसभेमध्ये या संदर्भात जे स्टेटमेंट केले आहे ते वर्तमानपत्रातून देखील आलेले आहे. अशा प्रकारे विधी मंडळाचे, संसदेचे अधिवेशन चालू असताना राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेल्या, जिव्हाळ्याच्या अशा प्रशनावर सभागृहामध्ये चर्चा ही झाली पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत नाही आणि या गोष्टीचा आपण नेहमीच आदर केलेला आहे. परंतु आजचा प्रश्नोत्तराचा तास आणि अन्य कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करावी... अजून आठवडाभर हे अधिवेशन चालणार आहे आणि आपल्या सभागृहाचे कामकाज काय घ्यावे हे कामकाज सल्लागार समिती ठरविणार आहे. या आठवड्यामध्ये या बाबत चर्चा घेताना दोन्ही बाजूच्या नेत्यांना, गटनेत्यांना वगैरे विश्वासात घेऊन उद्या किंवा परवा यावर चर्चा ठेवावी, वेळ ठरवून चर्चा केली तर अजूनही या संदर्भात आपल्याला माहिती घेता येईल. काल लोकसभेमध्ये माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी जे स्टेटमेंट केले आहे त्याबाबतही अधिकची माहिती आपल्याला घ्यावी लागेल की, नेमकी याबाबत केंद्र सरकारची भूमिका काय आहे ? आजच ही चर्चा सुरू झाली तर यातून जे काही आपल्याला खरोखरी साध्य करावयाचे

..... सीसी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

आहे ते आपल्याला साध्य करता येईल असे वाटत नाही. या चर्चेमध्येदेखील ही मागणी येणार आहे आणि मध्यंतरी सर्वच राजकीय पक्षांनी ही मागणी केली आहे की, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी झ ााली पाहिजे. 10 हजार कोटी रूपये केंद्र सरकारने यासाठी वेगळे काढलेले आहेत. हे खरे असले तरी त्याला खऱ्या अर्थाने न्याय मिळविण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले तेही खरे आहे. म्हणजे केंद्र सरकार या बाबत नेमके कोणते धोरण स्वीकारते आहे हे आपण पाहू आणि मग राज्य सरकार देखील या बाबतीतील आपली भूमिका बजावेल. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी हे येथे आणि राज्याला सांगितले आहे. तेव्हा आज लगेच चर्चा घेण्याऐवजी उद्या, परवा ही चर्चा घेण्याचे आपण सर्वांनीच ठरविले तर आणखी अधिकची माहिती आपल्याला या विषयी घेता येईल, वेळ पडली तर मंत्रिमंडळाची एक तातडीची बैठक घेऊन देखील सरकारला ठरविता येईल की, यातून आणखी काही मार्ग कसा काढता येईल. तेव्हा अशा पद्धतीने झाले तर ते जास्त योग्य होईल असे मला वाटते. तरीही आपण याबद्दलचा निर्णय घ्यावा एवढीच माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि जीवन मरणाच्या प्रश्नासंबंधात नियम 289 खाली सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्रस्ताव दिलेला आहे. केंद्र सरकारने देखील या अनुषंगाने दोन हेक्टरपर्यात जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाबतीत 60 हजार कोटी रूपये देऊ कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी ज्या पद्धतीने सांगितले की, काल लोकसभेमध्ये केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी याबाबतीतील केंद्र सरकारचे धोरण सांगितले आहे, ते मी आणि आपण सगळ्यांनीच ऐकले आहे. तांत्रिकदृष्ट्या याबाबत कोणता निर्णय घ्यायचा हे आता मला ठरवावे लागत आहे. आता येत्या दोन तीन दिवसात असणारा जो वेळ आहे त्यामध्ये सभागृहाचे नेते, विरोधी पक्षनेता, गटनेते यांच्याबरोबर चर्चा करून याबाबतीतील चर्चा घेणे कसे शक्य आहे, आताच येथे माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सांगितल्याप्रमाणे ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण याबाबत निर्णय देण्यापूर्वी मला आपल्याला काही सांगावयाचे आहे. मी माननीय नामदार श्री.अजितदादांना धन्यवाद देतो. त्यांनी एक पाऊल पुढे जाऊन सांगितले की, या संदर्भात वेळ पडल्यास मंत्रिमंडळाची बैठक घेऊनही प्रयत्न करू. ही विधायक अशी भूमिका घेतल्यानंतर ....

( यानंतर सौ. रणदिवे ....डीडी 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे. . . . 12:30

श्री.दिवाकर रावते . . . .

उद्याचा दिवस चर्चेसाठी आहे. मी आजच चर्चा करावी असे म्हणणार नाही. आपण अशी भूमिका घेतली की, याबाबतीत माहिती घ्यावी लागेल वगैरे. खरे म्हणजे आज दुपारी 3.00 वाजता ही चर्चा घेण्यात यावी असा आमचा आग्रह होता. पण आपण उद्या या चर्चेसाठी खास वेळ ठरवून द्यावा. म्हणजे शासनालाही याबाबतीत माहिती घेण्यासाठी वेळ मिळतो. माननीय पाटबंधारे मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी याबाबतीत विधायक भूमिका घेतलेली आहे, त्याचे स्वागत करीत असताना या प्रश्नाची जाण ठेऊन शासन देखील याबाबतीत माहिती घेण्याच्या दृष्टीने आणि निर्णय घेण्याच्या दृष्टीने पावले उचलेल याविषयी मला माननीय मंत्री महोदयांच्या निवेदनामुळे खात्री वाटते. म्हणून आपण उद्या या विषयासंबंधात चर्चा घेतली तर चांगले होईल. शिवाय अंतिम आठवडा प्रस्ताव देखील चर्चेसाठी आहे. आणखी देखील दोन प्रस्ताव चर्चेसाठी आहे. त्यामुळे नंतर चर्चा घेतली तर सर्व विस्कळीत होईल. हा विषय अत्यंत तातडीचा आणि महत्वाचा आहे हे सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांनी मान्य करावयास पाहिजे. हा विषय एकमेकांवर टीका करण्यासारखा नाही हे मी प्रामाणिकपणे सांगू इच्छितो. हे सभागृह शेतकऱ्यांना काय देणार आहे ? याकडे शेतकरी चातकासारखी वाट पहात आहे. अशा वेळी त्याच्यापर्यंत एक मॅसेज जाणे आवश्यक आहे. मी माननीय पाटबंधारे मंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या भूमिकेचे स्वागत करतो. पण आणखी दोन-चार दिवसांनी चर्चा झाली तर या प्रश्नाची तातडी निघून जाईल आणि आम्ही फुसरतीने यावर चर्चा करु अशी भावना सदनाच्या माध्यमातून बाहेर जाणे बरोबर नाही. परंतु शासनाला आज जर माहिती घ्यावयाची असेल तर उद्या या प्रश्नाबाबत चर्चा करु आणि मग बाकीचे कामकाज करु अशी मी विनंती करतो.

**सभापती** : याबाबतीत मी एवढेच सांगतो की, आज प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्याची आवश्यकता नाही. पण या विषयाच्या संबंधातील चर्चा उद्या घ्यावयाची की परवा घ्यावयाची याबाबतीत मी मघाशी सांगितल्याप्रमाणे सभागृहाचे नेते, माननीय विरोधी पक्षनेते, गट नेते यांच्या बरोबर एकत्र बसून ही चर्चा कधी घ्यावयाची ते ठरवू या. उद्या किंवा परवा ही चर्चा कशी करता येईल याचा मी जरुर निर्णय घेईन. आता प्रश्नोत्तराचा तास सुरु होईल.

-----

. . . .2डी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

**मच्छिमारांना समुद्रात मृत्यू आल्यास त्यांच्या पश्चात वारसांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत**

**(1) * 41530** **श्री. जयंत पाटील** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मच्छिमारांना समुद्रात मृत्यू आल्यास त्यांच्या पश्चात वारसांना देण्यात येणारी 50 हजाराची रक्कम रुपये दोन लाख पर्यंत सन 2008-2009 पासून वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता व त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याची घोषणा मा.उपमुख्यमंत्री यांनी पालघर तालुक्यातील (जिल्हा ठाणे) एडवण मच्छिमार सह. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात दिनांक 13 जानेवारी, 2008 रोजी वा त्या सुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,व अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिस अहमद** : (1) मासेमारी करताना मच्छिमारांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना मासेमारी संकट निवारण निधीतून द्यावयाच्या अर्थसहाय्यात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता, हे खरे आहे.

(2) शासन निर्णय दिनांक 1 एप्रिल, 2008 नुसार मासेमारी करताना मच्छिमारांचा मृत्यू अथवा मच्छिमार बेपत्ता झाल्यास त्यांच्या वारसांना रु. 01 लाख अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत आदेश निर्गमित केलेले असून त्याची अंमलबजावणी दिनांक 1 जून, 2008 पासून होणार आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी शासनाला आणि माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. कारण मच्छिमारांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना एक लाख रुपये सहाय्य करण्याचे कबूल केलेले आहे. पण 720 कि.मी.च्या समुद्र किनाऱ्यावर जल वाहतूक वाढलेली आहे. त्यामुळे तेथील जल वाहतुकीवर जी बंधने घालावयास पाहिजेत. जेणेकरुन तेथे अपघात होणार नाहीत यादृष्टीने शासन काळजी घेणार आहे काय ? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, जे नियमबाह्य जल वाहतूक करीत आहेत. त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, प्रामुख्याने रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यामध्ये रेतीच्या संबंधात बारगेजची वाहतूक सुरु आहे. ते बारगेज नियमाप्रमाणे नसतात आणि ते छोटया मच्छिमारांना त्रास देतात, त्यामुळे त्यांचे नुकसान होते. म्हणून यासंबंधात कडक निर्बंध घालून त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

. . . .2 डी-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, मछली पकड़ने वालों का एक्सीडेंट होने पर उन्हें 50 हजार रुपए कंपेनसेसन दिया जाता था, अब वह कंपेनसेसन 1 लाख रुपए करने का कदम शासन ने उठाया है. माननीय सदस्य ने दूसरा प्रश्न पूछा है कि रेती के बोट्स की वजह से एक्सीडेंट हो रहे हैं और फिशरमॅन को मारे जाने का काम हो रहा है. मैं उनको बताना चाहता हूँ कि रेती का बिजनिस मेरीटाईम बोर्ड के अन्तर्गत आता है. वहां की रेती मुंबई में बेची जा रही है. फिशरमॅन का एक्सीडेंट न हो इसलिए इस ट्रॅफिक को किस तरह से कंट्रोल किया जा सकता है, इस बारे में मेरीटाईम बोर्ड के साथ चर्चा करके रास्ता निकाला जाएगा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी शासनाने मच्छिमारांना दिलासा देणारा असा अत्यंत चांगला निर्णय घेतलेला आहे. मी मनापासून शासनाचे अभिनंदन करतो. याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "मासेमारी करताना मच्छिमारांचा मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना मासेमारी संकट निवारण निधीतून द्यावयाच्या रकमेची मर्यादा एक लाख रुपयापर्यंत ठरविण्यात आलेली आहे. या संदर्भातील धोरणात्मक निर्णय शासनाने दि.1 एप्रिल 2008 नुसार निर्गमित झ ालेला आहे. पण पुढे उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, हा निर्णय दि. 1 जून 2008 पासून लागू होणार आहे. माझी विनंती आहे की, दरम्यान काळामध्ये काही दुर्घटना घडली तर अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय होऊन देखील मच्छिमारांच्या वारसांना याचा लाभ मिळू शकणार नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, आपण दि.1 एप्रिल 2008 रोजी जो धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे, त्याची अंमलबजावणी त्याच दिवसापासून म्हणजे दि.1 एप्रिल 2008 पासून करणार आहात काय ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 12:35

ता.प्र.क्र. 41530..

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, 1 अप्रैल को निर्णय लिया गया है कि 1 जून 2008 तक जो भी एक्सीडेंट होंगे, उनको 50 हजार रुपए कंपेनसेसन दिया जाएगा और उसके बाद में होने वाले एक्सीडेंट के लिए इस राशि को दुगुना करके 1 लाख रुपए दिए जाएंगे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, बेपत्ता झालेल्या मच्छिमारांचा हा विषय आहे. डहाणू, तलासरी या तालुक्यांमधील आदिवासी आहेत ते गुजरात राज्यामधील बोट मालकांबरोबर खलाशी म्हणून जातात व त्यानंतर बोट उलटल्यामुळे काही वेळा बेपत्ता होतात. या प्रश्नासंदर्भात मागील एक वर्षापासून आम्ही पाठपुरावा करीत आहोत. या बाबत केंद्र शासनाने मच्छीमारांना 3 लाख रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. परंतु या मच्छिमारांची कोणतीही नोंद होत नाही. 1999 सालापासूनची यादी माझ्याकडे आहे. या मच्छिमारांची नोंद नसल्यामुळे, त्यांना कोणत्याही प्रकारची मदत दिली जात नाही. यामुळे ही आदिवासी कुटुंबे उद्ध्वस्त झालेली आहेत, बेघर झालेली आहेत. या मच्छीमारांना शासनाकडून 50 हजार रुपयांची मदत दिली जाईल काय ? तसेच जून महिन्यानंतर 1 लाख रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत शासनाने काही धोरण ठरविले आहे काय ? आज शेकडो मच्छिमार बेपत्ता झालेले आहेत व मृत्युमुखी पडलेले आहेत.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, सरकार ने निर्णय लिया है कि जितने भी मछली पकड़ने वाले लोग हैं, उनका रजिस्ट्रेशन किया जाएगा और 45 दिन के अन्दर उनको किसी भी हालत में जबाब मिलेगा. 720 किलोमीटर लम्बी समुद्री सीमा में जितने भी मच्छीमार हैं, उन सब का रजिस्ट्रेशन 45 दिन में हो जाएगा.

................

.........EE 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विदर्भ मिल्स बेरार, अचलपूर(जि.अमरावती) येथील गिरणीमधील कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत

**(२) * ३९२२३ श्री. नितीन गडकरी, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. जगदीश गुप्ता , श्री.सागर मेघे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ मिल्स बेरार, अचलपूर, जि.अमरावती येथील गिरणीमधील कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी व अन्य देय रक्कम व अन्य मागण्या मान्य होत नसल्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांनी दिनांक १ जानेवारी, २००८ पासून आमरण उपोषणास बसण्याची लेखी नोटीस जिल्हाधिकारी, अमरावती व सहाय्यक कामगार आयुक्त, अमरावती यांना दिलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार या प्रकरणी शासनाने पुढे कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री.गणेश नाईक** : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, निवेदन मिळाले आहे काय या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे देण्यात आले आहे. माझ्या हातामध्ये त्या निवेदनाची कॉपी आहे. सन 2003 पासून विदर्भ मिल्स बेरार ही गिरणी बंद आहे. त्या गिरणीमधील काही कामगारांकडून डिपॉझिट घेऊन घरात राहण्यासाठी,नळाचे कनेक्शनसाठी एनओसी देण्यात येणार होती. परंतु कामगारांकडून पैसे घेऊन देखील त्यांना एनओसी मिळाली नाही. त्यांना घरात राहण्याची देखील एनओसी देण्यात आली नाही. हे निवेदन मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांकडे पाठवितो. या निवेदनाच्या आधारे मी स्पेसिफिक प्रश्न विचारु इच्छितो. कामगारांच्या 3 पिढया तेथे राहत असल्यामुळे, शासनाच्या नियमानुसार पैसे जमा केल्यानंतर सुध्दा त्यांना एनओसी देण्यात आले नाही. याबाबत लवकरात लवकर एक महिन्याच्या आत कार्यवाही करण्यात येईल काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी त्यांच्या मूळ प्रश्नामध्ये, विदर्भ मिल्स बेरार, अचलपूर, अमरावती येथील कामगारांना ग्रॅच्युईटी व त्यांच्या अन्य हक्कयांची देय रक्कम मिळाली नसल्याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. आपल्या मार्फत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, विदर्भ मिल्स बेरार या मिलचे सन 1974 पासून राष्ट्रीयीकरण झाले. ही मिल आर्थिकदृष्टया डबघाईला आल्यानंतर दिनांक 22/11/03 रोजी तेथील व्यवस्थापनाने

..3..

श्री. गणेश नाईक..                                   ता.प्र.क्र.   39223..

व्हीआरएस जाहीर केली. त्यानुसार तेथील 524 कामगार व 8 कर्मचारी अशा एकूण 532 आस्थापनेमध्ये काम करणाऱ्यांना 70 दिवसाचे वेतन वार्षिक मदत म्हणून देण्यात आले. तसेच उर्वरित कर्मचाऱ्यांना 50 दिवसांच्या वेतनाइतकी मदत देण्यात आली. यासाठी 12 कोटी 59 लाख 1हजार 48 रुपयांचे वाटप केलेले आहे.

यानंतर श्री. बरवड..

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 39223 ...... श्री. गणेश नाईक .....

पगाराचे 14,42,274 रुपये आणि उपदानाचे 2,14,62,784 रुपये अशा प्रकारची रक्कम वाटप करण्यात आली आहे. व्ही.आर.एस. योजनेमध्ये 8 कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली नव्हती. त्यानंतर 29.5.2004 ला 4 कर्मचाऱ्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली. राहिलेल्या चार कर्मचाऱ्यांची अन्यत्र बदली करण्यात आली. आजच्या क्षणाला या कंपनीच्या मस्टर रोलवर एकही कामगार नाही. सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी सांगितले की, या कंपनीच्या परिसरामध्ये कामगार राहतात आणि तीन पिढ्यांपासून ते त्या ठिकाणी राहात आहेत. म्हणजे त्या ठिकाणी एकप्रकारे टेनंट ॲक्ट लागू झ ाला आहे. ही बाब या प्रश्नाच्या बाहेरची आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी ते निवेदन माझ्याकडे द्यावे. त्याबाबतीत बैठक लावून त्याबाबतीत कसा निपटारा करता येईल ते बघू.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. एक महिन्याच्या आत ही बैठक लावून तो प्रश्न शासन मार्गी लावणार काय ? निवेदनाची प्रत मी आपल्याकडे पाठवली आहे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आता मे महिन्यामध्ये ठाणे जिल्ह्यात पोटनिवडणूक आहे त्यामुळे लगेच बैठक घेण्याबाबत मी सांगणार नाही परंतु येत्या अधिवेशनाच्या अगोदर या कामगारांच्या अनुषंगाने बैठक घेण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**शाहूवाडी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील हरीयाली योजना, सामाजिक वनीकरण विभाग, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या कामात झालेला भ्रष्टाचार**

**(३) * ३८७५३ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. सुधाकर गणगणे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहूवाडी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) मध्ये सन २००५-०६ या कालावधीत हरीयाली योजना, सामाजिक वनीकरण विभाग, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या कामात झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) या कार्यक्रमांतर्गत मजूरांऐवजी यंत्राचा वापर करून कामे करण्यात आली. तसेच, मशीनच्या वापरासह मजूरी अदा करण्यात आली `अशी तक्रार प्राप्त झाली होती. या तक्रारीची छाननी केली असता, यंत्राद्वारे कामे करीत असताना मजूरी अदा केल्याचे निष्पन्न झाले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, 2005 मध्ये या हरियाली योजनेच्या भ्रष्टाचाराचे प्रकरण समोर आले. त्यासंदर्भात वर्तमापत्रातून तसेच शासनाकडे अनेकवेळा तक्रारी झाल्या. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, या अनुषंगाने चौकशीची कारवाई सुरु आहे. आता या गोष्टीला जवळजवळ 4 वर्षे पूर्ण होत आहेत. आता किती दिवसाच्या आत ही चौकशी पूर्ण होणार आहे ? या चौकशीमध्ये आतापर्यंत काय आढळून आले याचा खुलासा माननीय मंत्रिमहोदय करतील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, उत्तरामध्ये चौकशी झाली आहे अशा पध्दतीचे उत्तर दिलेले आहे. यामध्ये त्या विभागाचे विधानसभा सदस्य श्री. सतेज पाटील यांनी एक तक्रार दिली होती. त्या पध्दतीने त्या पाणलोटाची चौकशी करण्यात आली. स्वत: त्यांना तो अहवाल देण्यात आला आणि यामध्ये त्यांचेही समाधान झालेले आहे. त्यामुळे आता यामध्ये पुन्हा चौकशीची आवश्यकता राहिलेली नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझ्याकडे सुधारित उत्तर आलेले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, या अनुषंगाने कारवाई सुरु आहे, चौकशी सुरु आहे. म्हणजे त्यामध्ये काय राहिलेले आहे ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता.प्र.क्र. 38753......

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या ठिकाणी छापील उत्तर दिलेले आहे.

**सभापती** : विभागाने जे उत्तर दिलेले आहे ते अधिकृत आहे. सन्माननीय सदस्यांकडे जो कागद आहे तो त्यांनी मंत्रिमहोदयांकडे दिला तर त्याबाबत ते सांगू शकतील.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमच्याकडे सुधारित उत्तर आलेले नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आम्ही सुधारित उत्तर दिलेले नाही.

**सभापती** : माननीय कृषी मंत्र्यांचे असे म्हणणे आहे की त्यांनी सुधारित उत्तर दिलेले नाही. याचा अर्थ या प्रश्नाला सुधारित उत्तर दिलेले नाही असे आपण गृहीत धरुया. याबाबत मी जरुर चौकशी करीन. माननीय कृषी मंत्र्यांनी या ठिकाणी अधिकृतपणे सांगितले की, या प्रश्नाच्या अनुषंगाने जे मूळ उत्तर दिलेले आहे तेच अधिकृत उत्तर आहे. सुधारित उत्तर दिलेले नाही. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो कागद माझ्याकडे दिलेला आहे त्याबाबत मी जरुर चौकशी करीन.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला या प्रश्नाच्या अनुषंगाने एक उपप्रश्न विचारावयाचा आहे. ज्या भागामध्ये प्रत्यक्षात स्थानिक मजूर मिळत नाहीत त्या ठिकाणी जे.सी.बी. लावून काम करुन घेतले जाते आणि त्या मजुरांना पैसे दिले जातात. ही वस्तुस्थिती आहे काय ? अशा प्रकारचा अहवाल कोकण आणि अन्य विभागातून शासनाकडे प्राप्त झालेला आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न हा विस्तृत आणि संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. त्यासाठी वेगळा प्रश्न विचारावा लागेल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38753.... श्री.बाळासाहेब थोरात....

जेसीबी मशीन लावली आणि मजुरांचे पेमेंट दिले नाही असे काही ठिकाणी घडल्याचे उदाहरण दाखवून दिले तर त्याबाबत कारवाई करुन संबंधितास शिक्षा केली जाईल.

श्री.परशुराम उपरकर : या कामासाठी मशिनरीचा वापर करु नये असे सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : हरियाली आणि पाणलोट क्षेत्राच्या कामासंबंधी जी.आर.आहे त्यामध्ये शक्यतो मशिनरीने काम करु नये असे म्हटलेले आहे. परंतु मशिनरीचा वापर केल्यानंतर मशिनरीचे पेमेंट केले पाहिजे, त्यासाठी जिल्हाधिका-यांची कमिटी असते. त्या कमिटीद्वारे पेमेंट केले जाते. जेथे मशिनरीचा वापर करुन काम लवकर होत असेल तर मशिनरीचा वापर करण्यास प्राधान्य दिले जाते आणि मजुरांना काम पाहिजे असेल तर एमआरइजीएसच्या माध्यमातून काम द्यावे असे स्पष्ट नवीन धोरण घेत आहोत.

------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**वडगाव मावळ पुणे-मुंबई महामार्गावरील नंदलाल फूड प्रोसेसर कंपनीत बॉयरलच्या स्फोटात ६ कामगार गंभीर जखमी झाल्याबाबत**

**(४) * ३८२१६ श्री. संजय दत्त , श्री. शरद रणपिसे , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई महामार्गावरील वडगाव मावळ (पुणे) येथील ब्राम्हणवाडी गावच्या हद्दीतील नंदलाल फूड प्रोसेसर प्रा.लि.या कंपनीत दिनांक २७ डिसेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान झालेल्या बॉयरलच्या स्फोटात ६ कामगार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत व या घटनेस जबाबदार असणाऱ्या विरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक** : (१) होय. नंदलाल फूड प्रोसेसर प्रा.लि., वडगांव मावळ (पुणे) येथे बॉयलरचा स्फोट झाला हे खरे आहे मात्र त्यामध्ये ६ कामगार किरकोळ जखमी झाले आहेत.

(२) होय. बाष्पकाला पाणीपुरवठा कमी झाल्यामुळे जास्त दाबाची वाफ तयार झाल्यामुळे स्फोट झाला. बाष्पक अधिनियम, १९२३ चे कलम ६ व ७ नुसार विहित बाष्पक प्रमाणपत्र न घेतल्यामुळे मालकाविरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच या स्फोटात ६ कामगार किरकोळ जखमी झाले असून त्यांचा वैद्यकीय खर्च व्यवस्थापनाने केला आहे व रजेच्या काळातील पगार ही कामगारास दिला आहे. सदर कामगार उपचारानंतर कामावर पुन्हा रुजू झाले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.गोविंदराव आदिक : सभापती महोदय, बॉयलरला लागणा-या पाण्याचा पुरवठा कमी झाल्यामुळे जास्त दाबाची वाफ तयार झाल्यामुळे स्फोट झाला असे उत्तरात नमूद केले आहे. व्यवस्थापनाने त्या कामगारांची काळजी घेतली, त्यांना दवाखान्यामध्ये पाठविले हे ठीक आहे. परंतु त्यांनी निष्काळजीपणा दाखविला आहे हे सिध्द झालेले आहे. बाष्पक अधिनियम, 1923 च्या कलम 6 व 7 नुसार विहित बाष्पक प्रमाणपत्र घेतले नाही असेही उत्तर दिलेले आहे. हा प्रकार डिसेंबर महिन्यात घडला आहे, त्यानंतरच्या 5-6 महिन्याच्या कालावधीतही मालकाविरुध्द खटला दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे असे म्हटले आहे. ही प्रक्रिया केव्हा पूर्ण होणार आहे ? राज्यामध्ये





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38216.... श्री.गोविंदराव आदिक....

असे अनेक छोटे छोटे कारखाने आहेत त्याठिकाणी बॉयलरचा स्फोट होऊन अपघात झाल्यामुळे अनेक कामगार मृत्यूमुखी पडलेले आहेत. हे कारखानदार बाष्पक प्रमाणपत्र घेत नाहीत म्हणून हे अपघात घडत आहेत. या सर्व कारखानदारांनी प्रमाणपत्र घेतले आहे की नाही हे तपासण्याची कार्यवाही विभागामार्फत केली जाईल काय ?

श्री.गणेश नाईक : अशा स्वरुपाचा अपघात घडल्यानंतर त्याची चौकशी करुन संबंधिताविरुध्द जास्तीत जास्त 2 वर्षामध्ये खटला भरला पाहिजे तरतूद आहे. या प्रकरणी बाष्पक तपासणी करणा-या यंत्रणेकडून या घटकांवर कारवाई करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यांच्यावर लवकरच खटला भरण्यात येईल. बाष्पक चालविण्यासाठी प्रमाणपत्र घेतले जात नाही अशांवर अधिनियमातील कलम 23 नुसार 500 रुपयांच्या दंडाची कारवाई केली जाते. परंतु 500 रुपये दंड हा नगण्य वाटत असल्यामुळे ही रक्कम वाढवून या घटकांना निश्चितपणे कायद्याची भीती वाटावी अशाप्रकारची कार्यवाही करण्याबाबत शासन विचार करील.

प्रा.सुरेश नवले : बाष्पक प्रमाणपत्र म्हणजे काय आणि ते कोणकोणत्या कंपन्यांनी घेणे आवश्यक आहे ?

श्री.गणेश नाईक : बॉयलरमध्ये उष्णता निर्माण करणे किंवा एखाद्या मशिनरीची प्रक्रिया चालू होण्यासाठी त्यातून ऊर्जा तयार केली जाते. हे बॉयलर व्हर्टिकल आणि होरिझोन्टल अशा स्वरुपात असतात. ते स्टॅण्डर्ड कंपनीने तयार केले पाहिजेत. त्याचा स्फोट होऊ नये यासाठी प्रमाणपत्र तज्ज्ञांकडून घेतले जाते. अशाप्रकारचे प्रमाणपत्र न घेणा-यांविरुध्द कठोर कारवाई केली जाणार आहे.

डॉ.दीपक सावंत : या कंपनीने इंडस्ट्री सेफ्टी नॉर्मस्चे पालन केले होते काय ? फॅक्टरी इन्सपेक्टर तपासणीसाठी जातात त्यावेळी त्यांना निकषांचे पालन केल्याचे आढळले होते का ?

श्री.गणेश नाईक : हा लोणचे तयार करणारा कारखाना आहे, म्हणजे गृह उद्योग आहे. त्यांनी बॉयलरच बसविला नव्हता म्हणून कलम 121 अन्वये सुध्दा त्या मालकाविरुध्द कारवाई केलेली आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 38216

श्री. राम पंडागळे : बॉयलरचा स्फोट होऊ नये यासाठी बॉयलरला प्रिव्हेन्टीव्ह उपकरणे बसवायची असतात तशी ती बसविण्यात आली होती काय ? तसेच ही प्रिव्हेन्टीव्ह उपकरणे बसविली आहेत किंवा कसे याची तपासणी परवानगी देताना केली होती काय ?

श्री. गणेश नाईक : हा लोणचे बनविणारा लघु उद्योग आहे. या घटकाला बायलर बसविल्याची नोंद करावी लागते हे माहीत नव्हते. त्याबाबतीत त्यांचे अज्ञान होते. हा लहान कुटिरोद्योग आहे. त्या घटकाला तशा प्रकारची समज देण्यात आली आहे. ज्या घटकांना समज देऊन त्यांनी नोंद केलेली नाही त्यांच्यावर कारवाई केलेली आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात तुती लागवडीस शासनाने ठिबक सिंचनाचा लाभ अनुदानासह देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(५) * ३९११८ श्रीमती उषाताई दराडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तुती लागवडीस शासनाने ठिबक सिंचनाचा लाभ अनुदानासह देण्यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ फेब्रुवारी, २००८ रोजी मा. कृषी राज्यमंत्री यांच्याकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) होय.

(२) केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राज्यामध्ये सन २००५-२००६ पासून राबविण्यात येत असून सदर योजनेंतर्गत तुती लागवडीस ठिबक सिंचन संच बसविण्यासाठी ५०% दराने अनुदान अनुज्ञेय आहे.

श्रीमती उषा दराडे : केन्द्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राज्यामध्ये सन 2005-2006 पासून राबविण्यात येत असून सदर योजनेंतर्गत तुती लागवडीस ठिबक सिंचन संच बसविण्यासाठी 50 टक्के दराने अनुदान अनुज्ञेय आहे, अशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले आहे. याबाबतीत लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे. तेव्हा राज्य शासनाने केन्द्र शासनाकडे पाठपुरावा करुन किंवा राज्याचा काही वाटा उचलून ठिबक सिंचन योजनेमध्ये अनुदान वाढविण्याचा प्रयत्न मंत्री महोदय करणार आहेत काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अवश्य प्रयत्न केला जाईल.

----

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 12:50

**मुंबईत हॉस्पिटलमध्ये जमा होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत**

**(६) * ३९०६१ डॉ. दीपक सावंत :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शासकीय महापालिकेची व खाजगी हॉस्पिटलमध्ये दररोज होणारा शेकडो टन बायोमेडिकल जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची काहीही व्यवस्था नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जैविक कचरा विल्हेवाट लावण्याचे नियम असून त्यानुसार विल्हेवाट न लावणाऱ्या हॉस्पिटलवर शासनाने काही कारवाई केली अथवा करण्यात येत आहे काय,

(३) असल्यास, कांही हॉस्पिटलमधील जैविक कचरा विल्हेवाट लावण्याची व्यवस्था समाधानकारक नसल्याचे शासनाला आढळून आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जैविक कचऱ्याची योग्य प्रकारे जी हॉस्पिटले विल्हेवाट लावत नाहीत त्यांना शासनाने कारणे दाखवा नोटीस दिल्या आहेत काय ?

**श्री.गणेश नाईक** : (१) नाही.

मुंबईतील शासकीय, महानगरपालिका व खाजगी हॉस्पिटलमध्ये दररोज जमा होणारा जैव वैद्यकीय कचरा हा मुंबई महानगर पालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी नियुक्त केलेल्या ५ जैव वैद्यकीय कचरा वाहतुकदारांद्वारे वर्गीकरणाप्रमाणे गोळा करून मे.मुंबई वेस्ट मॅनेजमेंट, तळोजा, नवी मुंबई येथे भस्मीकरणासाठी तसेच मे.इ.ए. इन्फ्रास्ट्रक्चर, शिवडी, मुंबई येथे Autoclave व Shredding साठी पाठविण्यात येतो.

(२) होय.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रूग्णालयांवर जैव वैद्यकीय घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९९८ च्या अन्वये कारवाई करण्यात येते.

(३) व (४)

मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.३२/२००६ व ४१/२००६ मध्ये नेमलेल्या न्यायालयीन आयुक्तांसोबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी मुंबईतील ४० रुग्णालयांना भेटी दिल्या. त्यातील १६ रूग्णालयांमध्ये जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट अशास्त्रीय पध्दतीने होत असल्याचे निदर्शनास आले, सदर रूग्णालयांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नोटीस बजावल्या असून नियमांची पूर्तता करण्याचे आदेश दिले आहेत.

डॉ. दीपक सावंत : मुंबईतील हॉस्पिटल्सची संख्या 1351 आहे, हे बरोबर आहे काय ? यापैकी किती हॉस्पिटल्सनी अर्ज केलेले आहेत ? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सुप्रीम कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट करुन अहवाल सादर केलेला आहे काय ?

श्री. गणेश नाईक : मुंबईतील मोठमोठया रुग्णालयांमध्ये जैविक कच-याची विल्हेवाट लावण्याची यंत्रणा नसल्याचे जेव्हा निदर्शनास आणण्यात आले त्यावेळी प्रदूषण नियमंत्रण मंडळ आणि काही एन.जी.ओ. यांच्या संयुक्त विद्यमाने 40 रुग्णालयांना भेटी देण्यात आल्या. त्यापैकी 16

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुग्णालयांमध्ये जैविक कच-याची योग्यरीत्या विल्हेवाट लावली जात नसल्याचे दिसून आले. अशा कोणत्याही घटकाने अनियमितता केली असेल तर त्या घटकाला तत्संबंधी नोटीस देऊन त्या नोटीसीचे पालन करावे अशी समज देण्यात येते. त्यानंतर विहीत कालखंडामध्ये त्या घटकाने आपले कर्तव्य पार पाडले नाही तर त्याच्यावर कारवाई केली जाते. मे. मुंबई वेस्ट मॅनेजमेंट, तळोजा, नवी मुंबई ही भस्मीकरणाची कंपनी आहे. मुंबईतील रुग्णालयामध्ये अशा त-हेची यंत्रणा बसविलेली नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांना नोटीस देऊन त्यांनी ठराविक कालावधीमध्ये अशी यंत्रणा बसविण्याचे अंडरटेकिंग त्यांच्याकडून लिहून घेतलेले आहे. ज्या घटकांनी ही यंत्रणा बसविण्याच्या बाबतीत कुचराई केली आहे त्यांच्यावर वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा अहवाल माझ्याकडे आहे. त्यामध्ये एकूण 1351 हॉस्पिटल्स असल्याची माहिती दिलेली आहे. तेव्हा 1351 हॉस्पिटल्स पैकी किती हॉस्पिटल्सनी आपणाकडे अर्ज केलेले आहेत. शिवडी येथील विद्युतदाहिनी यंत्रणा बंद आहे. कारण आपण त्याबाबतीत नियम केलेले नाहीत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 12:55

ता.प्र.क्र.39061....

डॉ.दीपक सावंत....

याबाबतीत कडक कारवाई होण्यासाठी या नियमावलीमध्ये बदल करुन शिवडी येथील इन्सीनरेटर चालू करण्यात येईल काय ?

श्री. गणेश नाईक : राज्यात दिवसेंदिवस रुग्णालयांची संख्या वाढते आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे मुंबईत 1300 रुग्णालये आहेत ही वस्तुस्थिती आहे. नवीन रुग्णालयाची निर्मिती केल्यानंतर यासंबंधीच्या सूचना देण्याचे काम महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळातर्फे देण्यात येतात. शिवडीच्या येथील इन्सीनरेटरचा उल्लेख केला आहे. परंतु तेथील काही लोकांच्या तक्रारी आहेत की, त्या परिसरात अशा प्रकारचे प्रक्रिया करणारी यंत्रणा नको आहे. सदरची बाब तपासून टेक्नीकल काही अडचणी असतील तर त्या अडचणी निश्चितपणे दूर केल्या जातील.

श्री. मधुकर सरपोतदार : मुंबईत जेवढे रोग आहेत तेवढी रुग्णालये निर्माण केले जात आहेत. प्रत्येक रोगासाठी स्वतंत्र रुग्णालय अशी परिस्थिती मुंबई शहराची झाली आहे. जैविक कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी यंत्रणा रुग्णालयांकडे नसल्यामुळे त्याचा दुष्परिणाम जनतेच्या आरोग्यावर होतो आहे. मुंबईत 1300 रुग्णालये आहेत. या रुग्णालयांना या यंत्रणेसंबंधीची नोटीस देऊन, त्या रुग्णालयांचे इन्स्पेक्शन करुन तसेच त्या रुग्णालयांकडून योग्य तो अहवाल मागवून ज्या ठिकाणी अशा सयंत्रणा अस्तित्वात नाही, त्या ठिकाणी ठराविक कालावधीत ही यंत्रणा बसवून लोकांच्या आरोग्याला धोका होणार नाही यासंबंधीची काळजी महाराष्ट्र शासनाने घेतली आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मानवी शरिराचे जे टाकावू अवयव असतात ते जाळण्याचे काम तळोजा येथे केले जाते. रुग्णांसाठी वापरण्यात येणा-या सिरींज असतात, त्याचे तुकडे करुन, मोल्डींग करण्याचे काम शिवडी येथे होते. प्लॅस्टिकचे लहान तुकडे करुन त्याचे पुन्हा मोल्डींग करण्याचे काम शिवडीमध्ये होते. ज्या रुग्णालयात ऑपरेशन्स होतात, तसेच इंजेक्शनच्या सिरींज वापरल्या जातात , त्या गोष्टींची विल्हेवाट लावण्याचे काम त्या रुग्णालयांना सक्तीचे करण्यात आले आहे. ज्या रुग्णालयांकडून कच-याची विल्हेवाट लावण्याचे काम व्यवस्थितपणे केले जात नाही, जे या कामी कुचराई करतात, त्या रुग्णालयांना महाराष्ट्र प्रदुषण

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक... ता.प्र.क्र. 39061....

नियंत्रण मंडळातर्फे नोटीस दिल्या जातात. जनतेच्या आरोग्याच्या काळजी राज्य शासनाने घेतली आहे काय अशा प्रकारचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांनी उपस्थित केला आहे. त्याबाबतीत त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, राज्यातील जनतेच्या आरोग्य चांगले रहावे, तसेच रोगराई पसरु नये यासाठी शासन सतर्क आहे.

----------------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MMP/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 12:55

## राज्यात हवामान, पावसाचा अचूक अंदाज देण्यासाठी
## ॲपिडामार्फत स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्याबाबत

**(७) * ४११०७ श्री. प्रकाश शेंडगे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. रामनाथ मोते , श्री. मधुकर चव्हाण** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवामान, पावसाचा अचूक अंदाज देण्यासाठी मार्चअखेर राज्यात ॲपेडामार्फत ६० स्वयंचलित हवामान केंद्र उभारली जाणार असल्याचे, माहे जानेवारी, २००८ वा त्या सुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हवामान केंद्राकरिता शासनाने किती निधी मंजूर केला आहे,

(३) राज्यात कोणकोणत्या ठिकाणी या केंद्राचा उपयोग केला जाणार आहे,

(४) सदर केंद्रामुळे वेधशाळा अधिक परिपूर्ण होणार आहेत काय, असल्यास, याबाबतचा तपशील व सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.अजित पवार** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, हा हवामान खात्याशी संबंधित प्रश्न आहे. हवामानाचे चुकीचे अंदाज दिले गेल्याने या राज्यात शेकडो व्यक्ती बळी गेल्या आहेत. कोटयावधी रुपयाच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे. २६ जुलै रोजीचा प्रलय मुंबईकरांनी चांगलाच अनुभवला आहे. राज्यामध्ये कृषि विद्यापीठामार्फत मॅन्यूअल पध्दतीने वेदशाळेचे अंदाज वर्तविले जातात. सकाळी आणि सायंकाळी अशा दोन वेळा वेदशाळेचे अंदाज वर्तविले जातात. सांगली जिल्हयातील द्राक्ष बागायतदारांशी संबंधित हा प्रश्न आहे. सांगलीच्या द्राक्ष बागायतदारांनी द्राक्ष पिकाच्या बागेचे नुकसान होऊ नये म्हणून १६ ठिकाणी वेदशाळा उभारण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे दिला होता काय? या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्र्यांच्या दालनात बैठक आयोजित केली होती, त्यावेळी यासाठी ६कोटी रुपये देण्यात येतील असे सांगण्यात आले होते. ते ६ कोटी रुपये द्राक्ष

४...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बागायतदारांना वेधशाळेचे काम करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत काय ? सदरहू रक्कम देण्यात आली नसल्यास ती कधीपर्यंत देण्यात येतील ? तसेच या वेदशाळांची कामे कधीपर्यंत पूर्ण करण्यात येतील ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, द्राक्ष बागायतदार संघाने ॲग्रीकल्चर प्रोडयूस एक्सपर्ट डेव्हलपमेंट एजन्सी यांच्याकडे द्राक्ष पिकावरील रोग अनुमान केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव डिसेंबर, २००६ मध्ये दाखल केलेला आहे. त्याच्यामध्ये निरक्षम दर्जाचे द्राक्ष उत्पादन, किटक नाशके, उर्वरित अंशाचे प्रमाण मर्यादेच्या आत निश्चित ठेवण्याच्या दृष्टीने, त्याच्यामध्ये प्राथमिक अवस्थेत प्रतिबंधात्मक उपाय आवश्यक यासाठी ॲटोमेटीक वेदर स्टेशन स्थापन करण्याच्या प्रस्ताव द्राक्ष बागायतदार संघाने सादर केला आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KGS/ MMP/ KTG/ 13:00

ता.प्र.क्र. 41107.....

श्री. अजित पवार...

सभापती महोदय, ॲपिडाने यासंबंधात शहानिशा केल्यानंतर या प्रश्नाबाबत प्रधान सचिव(कृषी), आयुक्त (कृषी),संचालक (फलोत्पादन), व्यवस्थापकीय संचालक (फलोत्पादन) महाराष्ट्र औषधी वनस्पती मंडळ यांच्यामध्ये सविस्तर चर्चा झाली. राज्यामध्ये फळपिके आणि इतरपिके यांच्या संदर्भात कीड प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी ॲटोमेटीक वेदर स्टेशन स्थापण्याची गरज आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. त्याची गरज आहे काय याची तपासणी करण्याकरिता कृषी विद्यापीठाकडे शास्त्रज्ञांमार्फत तपासणी करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. याबद्दलची सगळी माहिती महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांकडून गोळा केली जाणार आहे.संशोधन केल्यानंतर तपासणी अहवाल सादर झाल्यानंतर याबाबतीत पुढील निर्णय घेण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाची काय मदत घेता येईल आणि राज्य शासनाचा स्वत:चा हिस्सा किती असावा तसेच अशा प्रकारची कमीत कमी आणि कुठे किती केंद्रे उभी करता येतील याबबातचा त्यांचा अहवाल आल्यानंतर आणि तपासणी झाल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात येईल. परंतु याबाबतीत मी सांगू इच्छितो की, राज्य शासन याबाबतीत सकारात्मक भूमिका घेईल. कारण ज्यावेळी शेतकऱ्यांना अत्याधुनिक पध्दतीने शेती करण्यास सांगतो त्यावेळी हवामान ॲटोमॅटीक वेदर स्टेशनच्या माध्यमातून ज्या घटना घडत असतात त्या अगोदर शेतकऱ्यांना आपण उपलब्ध करुन देऊ शकलो तर अलिकडच्या काळात बरेच नुकसान होत आहे त्याबाबतीत शेतकरी स्वत: पहिल्यांदा काळजी घेण्यास तत्पर राहील.ज्या घटना घडतात त्याबाबतची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देऊ शकलो तर बऱ्याचअंशी शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही आणि शेतकरी स्वत: याबाबतीत तत्पर राहील.

श्री.चंद्रकांत रघुवंशी :सभापती महोदय, सर्वसाधारणपणे साधे पर्जन्यमापक यंत्र तालुका स्तरावर असल्यामुळे शहरी भागामध्ये पाऊस पडतो आणि ग्रामीण भागामध्ये पडत नाही असे तालुक्याच्या आकडेवारीवरुन गृहीत धरले जाते. बऱ्याच वर्षापासून अशी मागणी होत आहे की जिल्हा परिषद मतदारसंघ वाईज पर्जन्यमापक यंत्र बसवून माहिती घेण्यात यावी. याची किंमत 100-1500 रुपये आहे. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रावर बसविले तरी त्या गटात किती पाऊस पडला याची माहिती मिळेल. म्हणून माझा प्रश्न असा आहे की जिल्हा परिषद मतदारसंघ वाईज पर्जन्यमापक यंत्र शासन बसविणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41107

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे यांनी उपस्थित केलेला मूळ प्रश्न वेगळा आहे. ॲटोमेटीक वेदर स्टेशनच्या उभारणीचा खर्च जास्त आहे. 3 कोटी 70 लाख 12 हजार रुपये 5 वर्षासाठी खर्च येणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी वेगळा प्रश्न विचारला आहे. आज जवळपास 1557 पर्जन्यमापक यंत्रे आणि 127 हवामान केंद्रे भारतीय हवामान खाते, केंद्रीय जल आयोग, शासनाचे जलसंपदा खाते यांच्या विभागामध्ये काम करीत आहेत. एक गोष्ट खरी आहे की अतिवृष्टी होताना कधी ठराविक भागामध्ये अतिवृष्टी होते तेथे पर्जन्यमापक यंत्र नसते जेथे असते तेथे पाऊस कमी पडतो त्यामुळे तेथील शेतकऱ्यांचे नुकसान होते. म्हणून वेगवेगळया भागामध्ये सर्कलवाईज ते बसवावे अशी जी मागणी करण्यात आली आहे त्याबाबतीत शासन जरुर विचार करील. तो खर्च कमी आहे. राज्य शासन यासंदर्भातील विचार करीत आहे. नक्की कधी होईल याची खात्री देऊ शकत नाही परंतु लवकरात लवकर होईल यासाठी शासन प्रयत्न करील.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये किती हवामान केंद्रे आहेत ? त्या केंद्रामध्ये आवश्यक सुविधा आहेत काय आणि असतील तर त्या कोणत्या आहेत ?

श्री. अजित पवार :सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये भारतीय हवामान खात्याची 14 स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्रे आहेत, केंद्रीय जलआयोगाची 15 साधी पर्जन्यमापन केंद्रे आहेत, कृषी खात्याची 333 पर्जन्यमापन केंद्रे आणि जलसंपदा विभागाची 648 साधी पर्जन्यमापन व 548 स्वयंचलित पर्जन्यमापन यंत्रे आणि 113 हवामान केंद्रे अशी एकूण 1157 पर्जन्यमापन केंद्रे व 127 हवामान केंद्रे अस्तित्वात होती.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41107......... श्री.अजित पवार.....

आता या सगळ्यांचा विचार करता काही ठिकाणी 162 स्वयंचलित पर्जन्यमापन केंद्रे सध्या आहेत. साधी 277 केंद्रे आहेत. हवामान केंद्रे 67 आहेत. विशेषत: जलसंपदा विभागाची हवामान केंद्रे आहेत त्यामध्ये पाऊस किती पडला, पाणी किती वाहून गेले, बाष्पीभवन किती झाले, टेंपरेचर किती आहे याची माहिती घेतली जाते. त्यावरुन धरणामध्ये पावसाचा येवा किती आहे, धरणामध्ये पाणी किती आहे, किती पाणी वाहून गेले याची माहिती जलसंपदा विभागाकडून गोळा केली जाते.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, द्राक्ष बागायत संघाने द्राक्ष बागांचे नुकसान होऊ नये आणि आदल्या दिवशी वातावरणाची परिस्थिती कळावी म्हणून ॲपेडाकडे 5 कोटी रुपयांची योजना सादर केली. ॲपेडाने 3.5 कोटी रुपये देण्याचे मान्य केले. व्यवस्थापनासाठी 1.5 कोटी रुपये राज्य शासनाने द्यावेत असे सुचविले. राज्य शासनाने 1.5 कोटी रुपये न देता माहिती दडविली आहे असे मला वाटते. राज्य शासनाकडे द्राक्ष बागायतदार संघाचे पत्र आले हे खरे आहे काय? कृषि मंत्रालयास ते पत्र प्राप्त झाले हे खरे आहे काय? 1.5 कोटी रुपये न दिल्यामुळे ही योजना अंमलात येत नाही हेही खरे आहे काय?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, हे अजिबात खरे नाही. मी सुरुवातीला सांगितले आहे की, कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांमार्फत हे सगळे तपासण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सांगितल्याप्रमाणे प्रस्तावामध्ये 3.70 कोटी रुपयांचा प्रस्तावित खर्च आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामध्ये जो वेगवेगळा खर्च करावयाचा आहे त्यात मनुष्यबळ, इतर गोष्टीसाठी 1.23 कोटी रुपये खर्च करावे लागणार आहेत. राज्य शासनाला काही निधी उपलब्ध करुन द्यावा लागणार आहे. परंतु राज्य शासनाला पैसे द्यायचे नाहीत म्हणून माहिती दडविली वगैरे खरे नाही. राज्य शासन शेवटी शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे आहे. द्राक्ष बागायतदार किंवा इतर शेतकऱ्यांच्या फळबागांना मोठया प्रमाणावर चालना देण्याचा शासन प्रयत्न करीत असते त्यावेळी हे ऑटोमॅटिक वेदर स्टेशन उभे राहिले पाहिजे याच मताचा कृषि विभाग आहे व राज्य शासन आहे. कृषि विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांमार्फत प्रस्ताव तपासण्याच्या संदर्भात त्यात कोणतीही त्रुटी राहू नये ही या मागची भूमिका आहे. संशोधन झाल्यानंतर तपासणी अहवाल सादर झाला की ताबडतोब याबाबत पॉझिटिव्ह निर्णय घेतला जाईल.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

**निरा देवधर प्रकल्पांतर्गत कालव्याचे संरेखन करताना खंडाळा तालुक्यातील (जि.सातारा) मौजे गावडेवाडी, पळशी व सांगवी या गावातील कालवा वळविल्याबाबत**

**(८) * ४०३०७ श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निरा देवधर प्रकल्पाअंतर्गत कालव्याचे संरेखन करताना आर्थिक व तांत्रिक निकषाचा आधार घेऊन खंडाळा तालुक्यातील (जि.सातारा) मौजे गावडेवाडी, पळशी व सांगवी या गावातील ४ ठिकाणी गरज नसताना कालवा वळविला असल्याबाबत तेथिल शेतकऱ्यांनी मा.मंत्री व सचिव जलसंपदा विभाग तसेच मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांचेकडे माहे फेब्रुवारी २००५-२००७ व माहे जानेवारी, २००८ मध्ये तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(३) तद्नुसार या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री.रामराजे नाईक-निंबाळकर** : (१) होय.

(२) मौजे पळशी व सांगवी या गावांमधील उजव्या कालव्याची संरेखा ही तांत्रिक व आर्थिक निकषावर तसेच संबंधित शेतकऱ्यांच्या संमतीनुसार एकाच ठिकाणी बदलण्यात आलेली आहे. त्यामुळे या संदर्भात चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मौ.पळशी व सांगवी गावातील काही शेतकऱ्यांच्या संमतीनुसार दोन-दोन ठिकाणी कालवा विनाकारण वळविला हे खरे आहे काय? कालवा वळविला नसता तर शासनाच्या पैशाची बचत झाली असती. तसेच कालवा वळविताना आर्थिक व तांत्रिक बाबी दाखवून अधिकाऱ्यांनी काही शेतकऱ्यांच्या हितसंबंधाचा विचार करुन कालवा विनाकारण वळविला हे खरे आहे काय? त्यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. कालव्याच्या कामाची तांत्रिक व आर्थिकदृष्टया उच्चस्तरीय तपासणी करुन ज्या अधिकाऱ्यांनी शासनाचे व शेतकऱ्यांचे नुकसान केले त्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे वाचून दाखविले ते श्री.मोहिते नावाचे शेतकरी आहेत, जे पळशी येथे राहतात, त्यांची स.नं.१०५ व १०७ ही शेती पळशी गावाला लागून आहे त्या संदर्भातील आहे. कालव्याची संरेखा बदलली आहे. परंतु बदलत असताना आर्थिक आणि तांत्रिक बाबी तपासून बदलली आहे. २१ जानेवारी, २००८ रोजी पत्र पाठविले त्यावर अहवाल मागविला आहे. अहवाल आल्यानंतर उचित कारवाई करण्यात येईल.

(नंतर श्री.खर्चे.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, कालवा वळविण्याच्या अगोदरचा मूळ प्लॅन काय होता आणि तो बदलण्याचे कारण काय आहे ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, यासंबंधीच्या तपशीलात जात असताना मी असे सांगू इच्छितो की, सन 1981 मध्ये आयबीएनकडून रिपोर्ट आल्यानंतर जो सर्व्हे झाला तेव्हापासून सन 2004 पर्यंतचा कालावधी गेला. त्या काळात शेतकऱ्यांकडून विविध मागण्या करण्यात आल्या. ज्याप्रमाणे पळशी येथील श्री. मोहिते यांनी मागणी केली त्याचप्रमाणे सांगवी गावातील 39 शेतकऱ्यांनी अशी मागणी केली होती की, आमची बागायती जमीन असून ती शक्यतोवर वगळण्यात यावी. मुळच्या सन 1981 मध्ये झालेल्या सर्व्हेमध्ये त्यांची जमीन दाखविण्यात आली होती परंतु बागायती जमीन वाचविण्यासाठी 39 शेतकऱ्यांनी मागणी केल्याप्रमाणे मुख्य अभियंत्यांनी तांत्रिकदृष्ट्या हा कालवा थोडासा बदलून हा मार्ग बदलला होता.

-----------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सह्याद्रीच्या पश्चिम घाटावरुन वाहणाऱ्या पाण्यापासून जलविद्युत प्रकल्पाची उभारणी करणेबाबत**

**(9) * 39450 श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सह्याद्रीच्या पश्चिम घाटावरुन कोकणातून वाहत जाऊन समुद्रास मिळणाऱ्या पाण्यापासून छोटे-छोटे जलविद्युत प्रकल्पाची उभारणी करण्यास डॉ.स्वामीनाथन समितीने शिफारस केलेली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सन्माननीय जलसंपदा मंत्री यांनीही त्यांचे दिनांक 4 मे, 2007 च्या पत्रानुसार असे 25 मे.वॅट पर्यंतचे प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत अनुकूलता दर्शवली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, असे प्रकल्प उभे राहण्याबाबत शासनाने डॉ.स्वामीनाथन समितीच्या अहवालानुसार छाननी केली आहे काय,

(4) असल्यास, त्याबाबतचा निष्कर्ष काय आहे,

(5) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार** : (1) होय.

(2) होय.

(3) होय.

(4) व (5) डॉ.स्वामीनाथन समितीच्या अहवालानुसार जलविद्युत प्रकल्प अन्वेषण मंडळ कार्यालय उघडण्यात आले असून जलविद्युत प्रकल्पांचे बृहत आरखडे तयार करण्यात आलेले आहेत व जलसंपदा विभागाने अभ्यास केलेल्या जलविद्युत प्रकल्पातून खालील 5 जलविद्युत प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत.

1. सूर्या जलविद्युत प्रकल्प (6 मे.वॅट)
2. सूर्या कालवा प्रपात जलविद्युत प्रकल्प (0.75 मे.वॅट)
3. भातसा जलविद्युत प्रकल्प ( 15 मे.वॅट)
4. डोलवहाल जलविद्युत प्रकल्प (2 मे.वॅट)
5. वैतरणा धरण पायथा जलविद्युत प्रकल्प (1.5 मे.वॅट)

काळ (15 मे.वॅट) व कुंभे (10मे.वॅट) जलविद्युत प्रकल्प बांधकामाधीन आहेत.

लहान जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणातून विकसित करण्याच्या राज्य शासनाच्या 2005 च्या धोरणानुसार काही प्रकल्प विकसित करण्याचे विचाराधीन आहे.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

.......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 39450.......

श्री. संजय केळकर : महोदय, या ठिकाणी जलविद्युत प्रकल्पाच्या अन्वेषण मंडळांबाबतची संपूर्ण माहिती दिलेली आहे. परंतु ही कार्यालये कोठे आहेत ? कोकणात कोणत्या ठिकाणी ही विभागीय कार्यालये आहेत ? कारण या ठिकाणी जी नांवे दिली आहेत ती ठाणे जिल्ह्यातील प्रकल्पांसबंधीची आहेत. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अशा प्रकारचे किती जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहेत ? आणि स्वामीनाथन् समितीच्या अहवालानुसार खाजगीकरणातून अशा किती प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे ?

श्री. अजित पवार : महोदय, उत्तरात जे दिलेले आहे ते फक्त ठाणे जिल्ह्यातीलच प्रकल्प आहे. यापूर्वी केंद्रीय मंत्री श्री. सुरेश प्रभू असतांना त्यांनी यामध्ये लक्ष घातले होते आणि त्यांनी काही प्रकल्प देखील आयडेंटिफाय करण्यासाठी आमच्याच विभागाला सांगितले होते. त्यावेळी काही प्रकल्प आयडेंटिफाय केलेले होते. आता किती पाणी अडेल अशा सर्व ठिकाणची मंजूर केलेली जवळपास 133 प्रकल्पांची यादी होती. नंतर सन 1984 च्या बृहत आराखडयानुसार अशा प्रकारच्या जलविद्युत प्रकल्पांची संख्या सुध्दा 133 एवढीच आहे. सन 2001 नंतर ही संख्या 42 झाली, ही संख्या कमी होण्याचे कारण काही प्रकल्प निकषात बसत नव्हते. तसेच प्रकल्प कमी होण्याची इतर कारणे म्हणजे काही ठिकाणी वन जमीन आहे व इतरही वेगवेगळया प्रकारच्या अडचणी आहेत. काही ठिकाणी धरणाचे काम तलावाचे करावे लागते नंतर ते वापरावे लागते. त्यामुळे हे प्रकल्प निकषात बसत नव्हते. त्यानंतर नॅशनल हैड्रो पॉवर्स कॉर्पोरेशनकडून हस्तांतरित झालेल्या प्रकल्पांची संख्या 4 आहे, सध्या हाती घेतलेल्या प्रकल्पांची संख्या 32 आहे, बांधकामाधिन व शासनामार्फत जी कामे चालू आहेत असे तीन प्रकल्प आहेत, सविस्तर प्रकल्प अहवाल स्तरावरील दोन प्रकल्प, प्राथमिक अहवाल स्तरावरील 12 प्रकल्प, पूर्व प्राथमिक अन्वेषण अहवाल स्तरावरील 15 प्रकल्प अशा प्रकारे वेगवेगळ्या प्रकारची विभागणी झालेली आहे आणि खाजगीमध्ये जिल्हावाईज माहिती द्यावयाची झाली तर नाशिक जिल्ह्यात स्वतंत्र जलविद्युत प्रकल्प 13 आहेत, ठाणे जिल्हयात एकूण 36 प्रकल्प असून त्यातील नाशिकमधील 13 कमी होतील उर्वरित ठाणे जिल्ह्यात येतात. त्यानंतर 14 ते 36 म्हणजेच जवळपास 22 प्रकल्प रायगडमध्ये, रत्नागिरी जिल्ह्यात 37 ते 87 असे 50 प्रकल्प आणि 85 ते 121 असे वेगवेगळे प्रकल्प आहेत

-------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तापी पाटबंधारे विकास महामंडळाला निधी देण्याबाबत**

**(१०) * ४१९१९ श्री. अरविंद सावंत :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींच्या दृष्टीने प्रकल्पांचा लाभ लक्षात घेता तापी पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत १३ लघुपाटबंधारे प्रकल्पासाठी शासनाने आर्थिक तरतूद केली आहे काय,

(२) असल्यास, किती रक्कमेची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर पाटबंधारे महामंडळामधील पाटबंधाऱ्यासाठी तात्काळ तरतूद करुन तेथील पाटबंधऱ्यांची कामे मार्गी लागण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे अथवा करण्यात येत आहे ?

**श्री.अजित पवार** : (१) होय.

महामंडळाअंतर्गत सन २००७-०८ चे अर्थसंकल्पात आदिवासी क्षेत्राला लाभ होणाऱ्या नंदुरबार, नाशिक व जळगाव जिल्ह्यातील १८ ल.पा.योजनांसाठी तरतुद केली आहे.

(२) सन २००७-०८ मध्ये उपरोक्त १८ ल.पा. योजनांसाठी रु.५६.५२ कोटीची तरतूद केली आहे.

(३) वरीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी नंदुरबार, नाशिक व जळगाव जिल्हयातील १८ ल.पा. योजनांसाठी तरतूद केलेली आहे अशी माहिती या ठिकाणी दिलेली आहे. त्यामुळे १८ ल.पा. कोणते आहेत याची माहिती पटलावर ठेवली तरी चालेल. सरदार सरावराच्या प्रकल्पामुळे जे प्रकल्पबाधित झालेले आहेत अशा प्रकल्पबाधितांचे जे पुनर्वसन करण्यात आले त्या पुनर्वसित गावांना ल.पा.प्रकल्पांचा उपयोग होतो काय ? उपयोग होत नसल्यास या तरतूदीतून त्यांच्या योजना राबविल्या जातील काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या परिसरात एकूण २७ ल.पा. तलाव आहे. सन २००७-२००८ मध्ये १८ योजनांसाठी ५६.५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली होती. आतापर्यंत यासाठी ४५ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. हे प्रकल्प आदिवासी भागामधील असल्यामुळे आदिवासी विभागाकडून या प्रकल्पांसाठी निधी मिळतो त्यामुळे ही कामे करण्यासाठी निधीची कोणतीही अडचण नाही. जळगाव जिल्हयातील एकूण ८ प्रकल्प असून त्यतील बहुतेक प्रकल्पांची कामे सुरु आहेत. काही ठिकाणी एनपीव्ही मुळे अडचणी आलेल्या आहेत. एनपीव्हीमुळे जास्त रक्कम भरावी लागते. त्यामुळे ते नार्म्सच्या बाहेर जाते. परंतु या बाबतीत मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला आहे की, आदिवासी भागात प्रकल्प असतील त्यांच्यासाठी एनपीव्हीमुळे रक्कमेत वाढ झाली तरी हरकत नाही, असे प्रकल्प घेण्यात यावे. तरी अशा प्रकल्पांना स्पेशल केस म्हणून

...२

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 41919 .......

श्री. अजित पवार....

मान्यता देण्यात येत असते. नंदूरबार जिल्हयामध्ये १२ प्रकल्प असून त्यामध्ये बहुतेक प्रकल्पांची कामे झालेली आहेत. परंतु काही प्रकल्प सुरु झाले नाही. यामध्ये वन जमिनीच्या हरकतीमुळे कामे सुरु होऊ शकली नाही तसेच स्थानिक लोकांनी विरोध केल्यामुळे कामे सुरु होऊ शकलेली नाहीत. त्याच बरोबर नाशिक जिल्हयात ४ कामे सुरु असून या ठिकाणी कोणत्याही अडचणी आलेल्या नाहीत. सरदार सरोवराचा आणि संबधित प्रश्न वेगळा आहे. परंतु सरदार सरोवरामुळे जे लोक बाधित झालेले आहेत त्यांचे दुसरीकडे पुनर्वसन करण्यात आलेले आहे तरी सुध्दा त्यांच्या क्षेत्रामध्ये प्रकल्प आले तर ते प्राधान्याने घेण्याची शासनाची तयारी आहे. सन्माननीय सदस्यांनी असे प्रकल्प लक्षात आणून दिले तर त्यासंदर्भात जरुर विचार केला जाईल.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

....३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** शोक प्रस्ताव

**मु.शी.:** डॉ. सरोजिनी बाबर यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, डॉ. सरोजिनी बाबर, माजी विधान परिषद सदस्या, यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

डॉ. सरोजिनी बाबर यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

लोकसाहित्य व लोकसंस्कृतीच्या संशोधक आणि ज्येष्ठ साहित्यिक कै.डॉ.श्रीमती सरोजिनी बाबर यांचा जन्म ७ जानेवारी १९२० रोजी सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील बागणी येथे झाला. त्यांचे शिक्षण एम्.ए.,पीएच.डी. पर्यंत झाले होते.

कै. सरोजिनी बाबर यांनी स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय भाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता.

कै. सरोजिनी बाबर यांना लहानपणापासूनच लोकसाहित्याची विलक्षण आवड होती. ग्रामीण भागातील लोकगीतं, लोककथा, दंतकथा, लोकनृत्य, लोककला यांच्या रेशीमबंधांनी त्यांच्या मनाचा जणू कोशच विणला होता. लोकप्रबोधनाच्या कार्यासाठी त्यांनी अविरतपणे लेखन केले. त्यांच्या सिध्दहस्त लेखणीतून मऱ्हाठी लोकसंस्कृतीचा फार मोठा अमोल ठेवा मराठी साहित्याला लाभला आहे.

कै. सरोजिनी बाबर यांनी राजकारणापेक्षा समाजकारणात, संशोधन आणि साहित्यक्षेत्रात भरीव कार्य केले आहे. लोकसाहित्याचा गाढा व्यासंग हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ज्येष्ठ विचारवंत कृष्णराव बाबर यांनी सुरु केलेल्या समाजशिक्षणमालेचे संपादन त्यांनी ५० हून अधिक वर्षे केले. पाचशेहून अधिक ग्रंथाचे लेखन आणि सहाशेहून अधिक ग्रंथाचे संपादन करुन मराठी साहित्यात आपल्या प्रतिभेचा विलक्षण ठसा उमटविला आहे. महाराष्ट्र लोकसाहित्य संशोधन मंडळ व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले होते. त्याकाळात त्यांनी तीस खंडातील लोकसाहित्याचे संकलन केले. त्यांच्या चिकित्सक दृष्टीचा तो प्रत्यय आहे.

कै. सरोजिनी बाबर यांच्या ओव्या, लावण्या, स्त्रीगीते, लोकगीते इत्यादींचे संपादन अत्यंत साक्षेपी आहे. त्यांच्या भाषेत अस्सलपणा आहे आणि इथल्या मातीचा दरवळ आहे. मराठमोळ्या,

....४

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील....

ग्रामीण बोलीभाषेच्या सहजशैलितील लेखन अवर्णनीय आहे. त्यातून लोकसाहित्याचे बीज त्यांनी नव्याने लोकमानसात रुजविण्याचा सातत्याने प्रयत्न केला आणि लोककलांचे समृध्द दालन समाजासाठी निर्माण केले.

कै. सरोजिनी बाबर यांनी विपुल लेखन केले. "मराठीतील स्त्रीधन'' "वनिता सारस्वत'' हे प्रबंध, तसेच "कमळाचं जाळं'', "अजिता'', "तू भेटायला नको होतास'' आणि "इथे गोष्ट संपली'', "हिरवा चुडा'', "आठवतंय तेवढं सांगते'', "स्वयंवर'' इत्यादी कादंबऱ्या. "चिंचेची पत्रावळी'', "नव्याची पुनव'', "झालं गेलं सांगते'', "माहेरचा चंद्र'', "डोंगरची मैना'', "रुखवत'', "देवदर्शन'' इत्यादी कथा. तर "झोळणा'' हा काव्यसंग्रह. "बाळराज'', "जा माझ्या माहेरा'', "कुलदैवत'', "कारागिरी'', "एक होता राजा'', "लोकसाहित्यमाला'', "भाषा आणि संस्कृती'', "स्त्रीयांचे खेळ आणि गाणी'' इत्यादी संपादीत केलेली त्यांची अनेक पुस्तके प्रसिध्द आहेत.

साहित्यातील त्यांच्या या अलौकिक कामगिरीबद्दल त्यांना राहुरी कृषी विद्यापीठाची "डॉक्टरेट ऑफ सायन्स'', पुणे विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची "डी.लिट.'', पुणे विद्यापीठाचा "जीवन गौरव पुरस्कार'',
कोल्हापूरच्या ताराराणी विद्यापीठाचा "भद्रकाली ताराराणी पुरस्कार'', भारती विद्यापीठाचा "जीवन साधना गौरव पुरस्कार'', पुणे महानगरपालिकेचा "पठ्ठे बापूराव पुरस्कार'', मराठा सेवा संघाचा "विश्वभूषण पुरस्कार'', राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे "गौरववृत्ती पुरस्कार'' या सारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानीत केले होते.

कै. सरोजिनी बाबर या १९५२ मध्ये तत्कालिन मुंबई प्रांताच्या दक्षिण-सातारा जिल्ह्यातील, शिराळा-वाळवा मतदारसंघातून विधानसभेवर निर्वाचित झाल्या होत्या. तर १९६३ मध्ये राज्यपालांद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेवर नामनियुक्त झाल्या होत्या तसेच, सन १९६८ ते १९७४ या काळात त्या राज्यसभेच्याही सदस्या होत्या.

लोकसाहित्याच्या माध्यमातून मराठी समाजमनावर अधिराज्य गाजविणाऱ्या सेवाभावी ज्येष्ठ साहित्यिकेचे रविवार, दिनांक २० एप्रिल २००८ रोजी दु:खद निधन झाले.
यांच्या पवित्र स्मृतीस मी भावपूर्ण आदरांजली वाहतो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, संसदीय कार्य मंत्र्यांनी ज्येष्ठ साहित्यिक व माजी सन्माननीय सदस्या डॉ. श्रीमती सरोजिनी बाबर यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मराठी संस्कृतीतील उच्च विद्या विभूषित, समाज जीवनाला वाहून घेणा-या , जीवनाच्या विविध क्षेत्रात मुक्तपणे संचार करणा-या , ग्रामीण भागात राहून ग्रामीण भाषेची उंची वाढविणा-या , ग्रामीण भाषा सुशिक्षित लोकापर्यत जास्तीत जास्त लोकप्रिय कशी` होईल या दृष्टीकोनातून भरपूर लिखाण करणा-या, विविध विद्यापीठाच्या डॉक्टरेट पदवी प्राप्त करुन घेणा-या, अनेक ग्रंथाची, काव्य निर्मिती करणा-या , साहित्य क्षेत्रातील असे एकही क्षेत्र असे नाही की ज्या क्षेत्राला त्यांनी स्पर्श केलेला नाही अशा थोर साहित्यिक आणि . महाराष्ट्रातील मातीचा सुगंध साहित्यातून लोकपर्यत पोहोचविण्या-या डॉ. सरोजिनी बाबर यांचे दु:खद निधन झालेले आहे.त्याबद्दल येथे शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे. 1952 साली ज्यावेळी सर्व प्रथम विधानसभेच्या निवडणुका झाल्या होत्या त्यावेळी प्रथम सातारा जिल्हयातील शिराळा - वाळवा मतदारसंघातून त्या निवडून आल्या होत्या. त्याचबरोबर त्यानंतर विधान परिषदेमध्ये देखील त्या नामनियुक्त झाल्या होत्या इतकेच नव्हे तर 1968 ते 1974 या काळात राज्यसभेच्या सदस्या म्हणून देखील त्या निवडून गेल्या होत्या .अशा प्रकारे लोकशाहीची जी महत्वाची मंदिरे आहेत त्या मंदिरामध्ये त्यांनी मुक्तपणे प्रवास केलेला आहे व या मदिराची उंची वाढविण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे. ...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ....

त्यांची विद्वत्ता अफाट होती आणि त्या विद्वत्तेची छाया या सदनावरदेखील पडली आहे. त्यांच्या वाङ्.मयाने महाराष्ट्राला इतक्या उंचावर नेऊन ठेवले आहे की, अशा प्रकारच्या साहित्याची निर्मिती करणारी माणसे भविष्यकाळामध्ये निर्माण होतील की नाही अशी शंका यावी इतक्या उच्च प्रतीच्या साहित्याची निर्मिती त्यांनी केलेली आहे. त्यांनी साऱ्या महाराष्ट्राला विद्येचा सुगंध दिलेला आहे तो सतत दरवळत राहणार आहे. त्यांचे जे कार्य आहे ते महाराष्ट्रातील जनतेला, दलित जनतेला, सर्वसाधारण जनतेला एक मार्गदर्शक आहे. संसार करूनही साहित्य निर्मिती कशी करता येते याचा उत्कृष्ट नमुना त्यांनी दाखवून दिला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये जशा त्या सहभागी झाल्या तशाच त्या देशाच्या राजकारणामध्येही सहभागी झाल्या. याचा अर्थच असा होता की, एक महिला एका खेड्यातून जन्म घेतलेली, शिक्षणाची तिला आवड असल्याने आणि त्यांच्या पतीने त्यांना जो पाठिंबा दिला, त्यांच्यावर जे संस्कार केले, त्यांच्या वडिलांनीही त्यांच्यावर जे संस्कार केले आणि ज्या पद्धतीने त्यांना पाठिंबा दिला त्या सगळ्याचे त्यांनी सोने केले. मिळालेल्या संधीचे जीवनात कसे सोने करावे याचा एक उत्कृष्ट आदर्श त्यांनी निर्माण केला आणि त्या आता आपल्यातून निघून गेल्या आहेत. त्याबद्दलचा हा शोक प्रस्ताव आहे. आम्ही आमच्या पक्षातर्फे आणि सर्व विरोधी पक्षांतर्फे विनम्र श्रद्धांजली वाहतो आणि हा जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्याला पाठिंबा देतो.

***

..... ओओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी डॉ. सरोजिनी बाबर यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव येथे मांडला आहे त्याच्याशी सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, डॉ. सरोजिनी बाबर या विधानसभेच्या सदस्या होत्या, विधानपरिषदेच्या सदस्या होत्या आणि राज्य सभेच्या देखील सदस्या होत्या. या तिन्ही ठिकाणी प्रदीर्घ अशी संसदीय कारकीर्द त्यांना मिळाली होती पण त्या सर्वापेक्षाही महाराष्ट्राच्या लक्षात राहण्यासारखे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अंग जर कोणते असेल तर ते लोकसाहित्यातील त्यांची कामगिरी ही आहे. लोकांच्या भावना साहित्यातून मांडण्याची बाब ही फार कमी लोकांना जमते आणि त्यामध्ये त्यांनी अतिशय उत्तम प्रकारची कामगिरी केलेली आहे अये आपल्याला दिसून येईल. लोकगीते, लोककथा, विशेषत: दंतकथा, लोकनृत्य आणि लोककला या क्षेत्रातील त्यांचे काम आणि त्याचबरोबर लोक प्रबोधनाच्या क्षेत्रात त्यांनी बजावलेली कामगिरी ही त्यांच्या संसदीय कामगिरीपेक्षाही उजळ भासणारी, उमटून राहणारी आणि प्रदीर्घ काळ महाराष्ट्राच्या लक्षात राहणारी आहे. अशा प्रकारचा एकमुखी आवाज महराष्ट्रातील सर्व साहित्यक्षेत्रातील जाणकारांकडून आज आपणास ऐकावयास मिळतो. अशा या थोर साहित्यिक असलेल्या या सदनाच्या माजी सदस्यांना मी मनापासून श्रद्धांजली अर्पण करतो.

***

..... ओओ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, संसदीय कार्य मंत्र्यांनी जो शोकप्रस्ताव येथे मांडला आहे त्याला सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, खरे साहित्य, अभिजात साहित्य हे लोक जीवनातून वाहते. साहित्याचा हा समृद्ध ठेवा प्रकाशात आणण्याचे सर्वात मोठे काम महाराष्ट्रात कोणी केले असेल तर ते डॉ. सरोजिनी बाबर यांनी केले आहे. या सभागृहाला ज्या दिग्गजांनी उंची प्राप्त करून दिली त्या थोड्यांमध्ये त्यांचा उल्लेख या पुढील काळात महाराष्ट्राला करावा लागेल इतकी मोठी देणगी त्यांनी महाराष्ट्राला, महाराष्ट्राच्या संस्कृतीला, साहित्याला दिलेली आहे. समाजातील म्हणी, लोकगीते, लोककथा, दंतकथादेखील या काही मनोरंजनाची साधने नसतात, तरीही या समाजाचा आपला स्वत:चा इतिहास, आपली संस्कृती आणि आपली मानवी मूल्ये, त्यांचे तत्त्वज्ञान वाहून नेण्याचे, संक्रमित करण्याचे काम संस्कारित करण्याचे काम लोकसाहित्य करीत असते. म्हणूनच डॉ. सरोजिनी बाबर यांच्या कामगिरीचे महत्त्व हे अधिक आहे. दलित साहित्यापेक्षाही लोक साहित्यातून त्यांनी जो समृद्ध ठेवा आपल्याला दिलेला आहे त्यामुळे आपलाला आणि आपल्या मराठी भाषेला देखील सौंदर्य प्राप्त झालेले आहे. या राज्याची मराठी ही राजभाषा आहे परंतु राजभाषा असलेली मराठी ही लोकभाषेपासून कोसो दूर आहे. ....

( यानंतर सौ. रणदिवे ....पीपी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 13:30

श्री.कपिल पाटील . . . .

कै.श्रीमती सरोजिनी बाबर यांनी जे काम केले आहे, त्याच्या जवळ जर मराठी राजभाषा गेली तर ही राजभाषा आजही परकी वाटते. तुळमाडीयांना, तुळकोरकूंना किंवा भिल्ल यांच्या बाबतीत मी म्हणत नाही. त्यांना तर परकी वाटतेच. पण या सदनातील बसलेल्यांना सुध्दा कधी-कधी शासकीय कामकाजाची भाषा परकी वाटते. ही कुठली भाषा आहे ? ही कोणती वाक्यरचना आहे ? असा प्रश्न पडतो. ज्यावेळी कै.सरोजिनी बाबर यांनी आपल्या कामाचा मोठा डोंगर उभा केला, त्या कामाशी, त्या समृध्द ठेव्याशी मराठी राजभाषा इमान राखेल आणि खऱ्या अर्थाने लोकभाषा होईल त्याचवेळी त्यांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली अर्पण केल्यासारखे होईल. मी कै.सरोजिनी बाबर यांना लोकभारती पक्षातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

----

. . . .2 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, याठिकाणी डॉ.सरोजिनी बाबर यांच्या दु:खद निधनाबद्दल माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी शोक प्रस्ताव मांडलेला आहे. या संबंधात शिवसेना गटनेते श्री.मधुकर सरपोतदारसाहेब, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिलेले आहे.

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, पूर्वीचा दक्षिण सातारा आणि आपला तालुका शिराळा-वाळवा या मतदार संघातून 1952 मध्ये त्या निवडून आल्या. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे त्या विधानसभेच्या सदस्य झाल्या, विधान परिषदेच्या सदस्य झाल्या आणि राज्य सभेच्या देखील सदस्य झाल्या. पण त्यांचे जे काम आहे, ते मोलाचे आहे.मराठी आणि बहुजन समाजातील पहिली स्त्री जी एम.ए.,पी.एच.डी.झाली.त्यांनी एस.पी.कॉलेज मध्ये शिक्षण घेतले. पण खेडया-पाडयातील जीवन त्यांनी पाहिले. त्यांचे वडील हे प्राथमिक शिक्षक होते. त्यांनी समाज परिवर्तनासाठी खेडया-पाडयातील लोकांचे प्रबोधन व्हावे म्हणून जी शिक्षणमाला सुरु केली होती, ती त्यांनी सातत्याने पुढे 50 वर्षे चालविली. खेडयातील लोकगीते, जात्यावरील गीते, खेडयातील महिला, खेडयातील सर्व सण, संस्कृती याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे सरोजिनी अक्का. सातारा, सांगली नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्राच्या त्या अक्का होत्या. त्यांचे घर म्हणजे कै.यशवंतराव चव्हाण, कै.वसंतदादा पाटील आणि इतर लोक हे आग्रहाने जेवावयाचे असेल तर हक्काने अक्काच्या घरी गेले पाहिजे असे त्यांना वाटावयाचे. अशा प्रकारे सगळयांशी अक्का प्रेमाने वागत असत. सगळयात महत्वाचे त्या एस.पी.कॉलेजमध्ये शिकल्या, एमए.झाल्या, पी.एच.डी.झाल्या पण त्यांच्या डोक्यावरचा पदर कधी ढळला नाही. अशा प्रकारे खेडयापाडयातील संस्कृतीचे कायम जतन करुन त्यांनी फार मोठे काम केलेले आहे. अशावेळी एका समाजासाठी 50 वर्षे काम करणे, ते टिकवणे हे फार महत्वाचे आहे आणि ते काम केलेले आहे. ज्या काळामध्ये महिला, मुली शिकत नव्हत्या, त्या काळामध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी शाळा काढली, तसेच श्रीमती सावित्रीबाई पुढे या कार्यामध्ये आल्या. नंतर कर्वे यांनी शाळा काढली. परंतु खेडयातून आलेली, बहुजन समाजातील मुलगी एम.ए.,पी.एच.डी.होते. हे सर्व झाल्यानंतर सुध्दा त्यांनी आपली मूळ पायवाट कधीही सोडली नाही. त्यांनी आपली माणसे या दृष्टीकोनातून सातत्याने काम केले. वैयक्तिकरित्या माझे आणि त्यांचे अतिशय जिव्हाळयाचे संबंध होते. मी येथे अनेक प्रसंग सांगू शकेन. परंतु मला एक प्रसंग मुद्दाम सांगावयाचा आहे. कै.वसंतदादा पाटील ..

. . . .2 पी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम . . . .

यांनी काही निर्णय घेतला होता आणि ही गोष्ट कै.सरोजिनी बाबर यांना समजली की, ते राजीनामा देणार आहेत. एकदा कै.वसंतदादा पाटील त्यांच्या घरी आल्यावर अक्कांनी मला फोन केला आणि सांगितले की, तू, ताबडतोब घरी ये. काहीतरी गडबड आहे. मी विचारले की, कोणती गडबड आहे ? मग मला बाजूला नेऊन सांगितले की, दादा, आता मुंबईला गेल्यावर राजीनामा देत आहे. तेव्हा तूच त्यांच्याशी बोल. मी बोलून थकले आहे. कै.वसंतदादा पाटील यांच्याबाबतीत मला माहिती आहे, आपल्यालाही माहिती आहे. त्यांनी एका वाक्यात सांगितले की, नाही, आपले ठरलेले आहे. मी मुंबईला गेंल्यावर राजीनामा देणार. अशा पध्दतीने सगळयांच्या बाबतीत जिव्हाळयाने बोलावयाच्या. तासगाव साखर कारखान्याचा प्रसंगही मला माहिती आहे. अनेक प्रसंग सांगता येतील. परंतु दुर्दैवाने गेल्या अनेक दिवसापासून अक्का पॅरेलेसिसमुळे आजारी होत्या. मी कमीतकमी दर 15 दिवसांनी पाच-दहा मिनिटांसाठी त्यांच्याकडे जात असे. सुरवातीच्या काळामध्ये गेल्यानंतर त्या खूप रडत असत. मग मी त्यांना सांगितले की, मी आल्यानंतर जर तुम्ही रडणार असाल तर मी परत कधीच येणार नाही. अशा पध्दतीचा सर्वांविषयी जिव्हाळा असणारी, सर्वांना आपली अक्का वाटणारी, स्वत:ची सख्खी थोरली बहीण असावी अशा दृष्टीकोनातून प्रेम देणारी, अशी सरोजिनी अक्का आणि सातत्याने खेडयापाडयातील, ग्रामीण संस्कृतीचा, आपल्या लोकांचा विचार करणारी अक्का यांचे दु:खद निधन झालेले आहे. मी विनम्रपूर्वक त्यांना श्रध्दांजली वाहतो.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DVG/ KTG/ KGS/ 13:35

श्री. उल्हास पवार ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, माननीय संसदीय कामकाज मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी कै. डॉ.सरोजिनी बाबर यांना श्रध्दांजली वाहण्याकरिता जो शोक प्रस्ताव येथे मांडला आहे, त्या प्रस्तावाबाबत माझ्या भावना व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. पतंगराव कदम यांनी आता सांगितल्याप्रमाणे डॉ. सरोजिनी बाबर या सर्व महाराष्ट्राच्या अक्का होत्या. आपण सर्वजणांनी प्रदीर्घ काळ त्यांना जवळून पाहिलेले आहे. त्या आपल्या जिल्हयातील होत्या. स्वातंत्र्य चळवळीपासून, शैक्षणिक चळवळीपासून, सामाजिक चळवळीपासून ते साहित्यिक चळवळीपर्यंत प्रत्येक ठिकाणी अक्कांचे नाव गेली 6 दशके किंवा त्याहून अधिक काळ जोडले गेलेले आहे. सन 1952 सालामध्ये विधानसभेच्या सदस्या म्हणून मुंबई प्रांतामधून त्या निवडून आलेल्या होत्या. तसेच सन 1966 सालापर्यंत त्या विधानपरिषदेमध्ये होत्या. या नंतर त्यांनी राज्यसभेचे सदस्य म्हणून देखील काम केले होते.

सभापती महोदय, लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकगीत, लोकनृत्य, लोकवाङमय, तसेच अभिजनांचे व बहुजनांचे साहित्य यांची उत्तम सांगड आणि संगम त्यांनी घातला होता. त्यांनी किती ग्रंथ, किती कादंबऱ्या, किती कथा, गीते, कवने लिहिली आहेत हे मी आता सांगत बसलो तर वेळ पुरणार नाही. श्रीमती सरोजिनी बाबर यांचे वडील कै. आण्णसाहेब बाबर हे 1920 च्या अगोदरच्या काळात प्राथमिक शिक्षक होते. त्यानंतर ते शिक्षण अधिकारी झाले. त्या काळात त्यांनी शिक्षण चळवळ व प्राथमिक शिक्षकांची संमेलने घेतली. लोकशिक्षण व समाज शिक्षणाच्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांचा वारसा डॉ. सरोजिनी बाबर यांनी चालविला होता. प्रत्येक महिन्याला एक पुस्तक या प्रमाणे 550 पुस्तकांचे संपादन अक्कांनी लोक शिक्षण व समाज शिक्षणाच्या माध्यमातून केलेले आहे.

सभापती महोदय, डॉ. सरोजिनी बाबर यांच्या घरी होणाऱ्या अनेक समारंभांना मी व माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हजर राहिलो आहे. त्यांच्या निरोपावरुन त्यांच्या घरी अनेक मान्यवर व नामवंत मंडळी उपस्थित होत असत हे आम्ही पाहिलेले आहे. डॉ. पतंगराव कदम यांनी उल्लेख केल्याप्रमाणे, खेडयामधून आलेल्या एका तरुणीने पुण्यामध्ये येऊन, एम.ए. व त्या नंतर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार..

पी.एच.डी. होण्याचा बहुमान पटकाविला होता. अक्का त्यांच्या काही आठवणी सांगायच्या. आपल्या बरोबर शिकायला कोण कोण होते असे विचारले असता त्या सांगायच्या की, कै. शांता शेळके, श्री.ग.प्र. प्रधान यांच्या भगिनी या तीन, चार मैत्रिणी स.प. विद्यालयामध्ये शिकत होत्या. याबाबत त्या गौरवाने उल्लेख करायच्या. त्या विद्यार्थीनी असताना ह.भ.प. बाबासाहेब. दांडेकर, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, डॉ. वाटवे, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, श्री.म. माटे अशी नामवंत मंडळी त्यांना शिकवायला होती, या गोष्टीचा त्या गौरवाने उल्लेख करायच्या. अशा व्यक्तींचे विद्यार्थी होण्याचे भाग्य आम्हाला लाभले असे त्या सांगत असत. तो काळ त्या विसरु शकत नाही असे त्या सांगावयाच्या. महाविद्यालयामध्ये जाताना त्या व कै.शांता शेळके आणि मी नऊवारी साडी नेसून, डोक्यावर पदर घेऊन जात असत. अक्कांनी अशा काही आठवणी सांगितल्या होत्या. लोकवाङमयाचा त्यांना चांगला व्यासंग होता. या प्रसंगी कै.शांता शेळके यांचा उल्लेख केला पाहिजे. श्रीमती विमल चोरघडे, कै. शांता शेळके व डॉ. सरोजिनी बाबर म्हणजे तीन विदुषींचा एक संगम होता.

सभापती महोदय, दूरदर्शनच्या माध्यमातून कै. शांताबाई शेळके व अक्का यांनी "रानजाई" या कार्यक्रमाद्वारे महाराष्ट्रामधील लोकसंस्कृती, भारतीय सण, लोकगीते, यामधील गंमत खेडोपाडी पोहचविण्याचे महत्कार्य केले होते. अभिजन आणि बहुजन या मधील जो घटक मी म्हणतो, त्या नुसार, लावणीच्या बाबतीत समाजामध्ये काही गैरसमज होते. "राजविलासी केवडा "या माध्यमातून लावणी किती सामाजिक व अध्यात्मिक आहे हे दर्शविण्याचे काम त्यांनी केले होते. बाळराज, जनलोकांचा सामवेद अशा अनेक ग्रंथांचा उल्लेख याठिकाणी करावा लागेल. या ग्रंथांमध्ये सचित्र वर्णन देखील केलेले असायचे. जनलोकांचा सामवेद व बाळराज हे त्यांचे ग्रंथ फार मोठे आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये प्रत्येक महिन्यामध्ये येणारे सण, त्या सणांच्या संबंधी असलेली गाणी तसेच यास अनुसरुन श्री. ग. ना. जाधव यांचे उत्तम चित्र हे त्यांच्या वाङमयाचे वैशिष्टय होते.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार ......

म्हणून अशा या अक्का जशा विव्दान होत्या तशाच झोपडपट्टीतल्या किंवा खेड्यापाड्यातील अशिक्षित महिलांमध्ये समरसून याचबरोबर लोकभाषेतून समाजप्रबोधन आणि लोकजागृती अशी दोन्ही कामे अक्कांनी त्या ठिकाणी केलेली आहेत. म्हणून त्यांच्या जाण्यामुळे खरोखरच महाराष्ट्राच्या जात्यावरची ओवी थांबलेली आहे आणि लोकगीतांचा कंठ दाटून आलेला आहे. मी परवा पुणे येथे त्यांच्या अंत्ययात्रेला हजर होतो. मला सांगितले पाहिजे. मी सकाळी जेव्हा बातमी ऐकली, त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांना बातमी कळवली. माननीय मुख्यमंत्री त्यावेळी लातूरमध्ये दूरवर एका कार्यक्रमामध्ये होते. त्यांनी झटकन लगेच निर्णय घेतला की, शासनाच्यावतीने शासकीय इतमामाने अक्कांचा अंत्यविधी करावयाचा. त्याप्रमाणे शासकीय इतमामाने त्या ठिकाणी अक्कांचा अंत्यविधी झाला. त्यावेळी महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांनी त्या ठिकाणी श्रध्दांजली वाहिली. माननीय श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी श्रध्दांजली वाहात असताना अतिशय उत्तम वाक्य वापरले. ते असे म्हणाले, मला असे वाटते की, अक्कांच्या निधनामुळे महाराष्ट्राची मावळण आणि लोकवाङमयाची गवळण आज आपल्यातून निघून गेलेली आहे. असे अक्कांचे वर्णन त्या ठिकाणी माननीय श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी केले. अशा या अक्का गेल्या काही वर्षामध्ये त्या खूप आजारी होत्या. माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगरावजी कदम आणि मी सातत्याने त्यांच्या घरी भेटावयास जात होतो. त्या ठिकाणी भेटावयास गेल्यानंतर त्यांच्या डोळ्यामध्ये सातत्याने अश्रू यावयाचे आणि त्यामुळे आम्हाला त्यांना भेटणे सुध्दा अतिशय कठीण जावयाचे. परंतु अशा अक्का आपणा सर्वांच्यामधून गेलेल्या आहेत. पण त्यांचे प्रचंड वाङमय म्हणजे त्यांनी महाराष्ट्राच्या लोक संस्कृतीचे अक्षरश: खजिने आणि हंडेच्या हंडे आपल्याकडे भरुन ठेवलेले आहेत. त्याचा वापर करुन महाराष्ट्राचे लोकवाङमय आणि लोकसंस्कृती आणखी कशी उज्ज्वल करावयाची, ती आणखी कशी मंगल करावयाची, ती आणखी कशी प्रफुल्लित करावयाची हे जर आपण सर्वांनी खऱ्या अर्थाने ठरवले तर खऱ्या अर्थाने आपण आक्कांना श्रध्दांजली वाहिली असे होईल. मी या निमित्ताने अक्कांच्या निधनाबद्दल भावना व्यक्त करतो, भावपूर्ण श्रध्दांजली अपर्ण करतो आणि या ठिकाणी थांबतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या ठिकाणी सरोजिनीताईंना आदरांजली वाहात असताना एका बाबीचा मला उल्लेख करावासा वाटतो. आमच्या समाजव्यवस्थेने महिलांना कधी लोकप्रतिनिधी म्हणून स्वीकारले नाही. अशा समाजव्यवस्थेमध्ये त्या निवडून आल्या तसेच माननीय राज्यपालांव्दारे नामनियुक्त सुध्दा झाल्या आणि या सभागृहामध्ये त्या आल्या. खरे म्हणजे परिस्थिती अशी आहे की, मनी आणि मसल पॉवर, जात आणि धर्म या सगळ्यांचे वर्चस्व ज्या ठिकाणी आहे त्याही परिस्थितीमध्ये स्ट्रगल करुन त्या हे मिळवू शकल्या. याचा अर्थ त्यांनी या सगळ्या प्रवृत्तीला उत्तर दिलेले आहे की, मनी पॉवर नसेल, मसल पॉवर नसेल, गुंडागर्दी नसेल तरी सुध्दा माणूस लोकप्रतिनिधी होऊ शकतो. त्यामध्ये बाई सुध्दा लोकप्रतिनिधी होऊ शकते आणि साहित्यिक बाई सुध्दा लोकप्रतिनिधी होऊ शकते. हा फार मोठा संदेश या पुरोगामी राज्याला त्यांच्या निमित्ताने मिळाला. याबाबतीत मी अधिक काही बोलणार नाही पण एक गोष्ट निश्चितपणे सांगेन की, ज्या माणसाला समाजाचे मन कळते, समाजातील गाणी कळतात, समाजातील दुखणी कळतात आणि आताच सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी जात्यावरच्या गाण्याबाबत सांगितले पण केवळ जात्यावरचीच गाणी नाही तर फुगड्यांची गाणी, पिंग्याची गाणी, लग्नामधली गाणी या सगळ्या गाण्यांचा एक जिवंतपणा, जी संस्कृती आता खऱ्या अर्थाने लोप पावावयास लागलेली आहे, आम्ही लहानपणी ज्या फुगड्या खेळावयाचो, जो पिंगा खेळावयाचो किंवा तळ्यात मळ्यात खेळावयाचो किंवा पूर्वी ज्या बायका उखाणे घ्यावयाच्या त्यामध्ये एक बाई उखाणे घ्यावयास लागली तर पाच पाच मिनिटेपर्यंत उखाणा घ्यावयाची. हे सर्व जपण्याचे काम त्यांनी केलेले आहे. आता धावपळीचे युग झालेले आहे. ते ताईंनी पुस्तकामध्ये अधोरेखित केलेले आहे. संस्कृती जपण्याचे काम हे जसे सगळ्यांचे आहे तसे साहित्यिकांचे सुध्दा आहे. समाजाचा चेहरा हा साहित्यामध्ये दाखवणे आणि तो चेहरा फक्त दाखवणेच नाही तर त्या चेहऱ्यामध्ये स्वत: समाजाला चेहरा बघावयास लावणे आणि तो समाज घडविण्याचे काम त्यातून करणे ही फार मोठी ऐतिहासिक आणि मोलाची जबाबदारी अत्यंत सहजपणे आणि मी फार मोठी साहित्यिक आहे असा अविर्भाव न आणता पार पाडलेली आहे. जी माणसे जमिनीवरुन चालणारी असतात समाजामध्ये मिसळणारी असतात, साधारणपणे समाजामध्ये आपण सामान्य आहोत अशी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्रीमती उषा दराडे .....

भावना मनामध्ये ठेऊन जे जगतात तीच माणसे खऱ्या अर्थाने श्रेष्ठ साहित्यिक होऊ शकतात, श्रेष्ठ राजकारणी होऊ शकतात, श्रेष्ठ समाजकारणी होऊ शकतात. म्हणून ताई या जशा लोकप्रतिनिधी होत्या तशाच त्या समाजकारणीही होत्या आणि या महाराष्ट्राच्या लोकगीतांची परंपरा, साहित्याची परंपरा, 500 आणि 1000 पुस्तके हा एक अचंबा आणि आश्चर्य आहे आणि असे आश्चर्य समाजामध्ये फार कमी होत असतात. तेव्हा या आश्चर्याला वंदन करुन मी माझे दोन शब्द संपवते.

-----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय डॉ.सरोजिनी बाबर यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर मी माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, स्वांतत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात थोडया व्यक्तींनी अतिशय सर्जनशीलपणे समाजकारण, राजकारण, साहित्य, संस्कृती, भाषा अशा अनेक विषयांमध्ये स्वत:ला व्यक्त केले आहे. मला काय करावयाचे आहे याबाबत स्वत:च्या मनामध्ये एक जाणीव असली की त्या आनंदामध्ये ती व्यक्ती कशा पध्दतीने जीवन जगत असते त्याचे डॉ.सरोजिनी बाबर जीवंत उदाहरण होत्या असे निश्चितपणे म्हणावेसे वाटते. पुणे जिल्हयामध्ये एवढेच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये साहित्याबाबत असो, समाज जीवनामध्ये असो डॉ.सरोजिनी बाबर यांच्याशी परिचय झाला नाही असे म्हणणारे लोक सापडणार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पुणे जिल्हयामध्ये हडपसर येथे मी माझा स्वत:चा दवाखाना चालवित होते त्यावेळी डॉ.सरोजिनी बाबर मला भेटण्यासाठी आल्या होत्या. मी त्यांना निमंत्रित केले होते. महिलांशी बोलत असताना भाषेचा वापर कशा पध्दतीने करावयाचा, ज्यावेळी आपण समाजात बोलतो त्यावेळी एखाद्या भाषेचे अनेक अर्थ असू शकतात. समाजकारणात, राजकारणात वावरणा-या महिला कार्यकर्त्यांनी खेडयातील बाईचे मनोगत जाणत असताना छोटया छोटया शब्दाचे अर्थ आणि त्याच्या छटा कशा समजून घ्यायच्या यावर अतिशय हृद्य अशा स्वरुपाचे अभ्यासवर्ग डॉ.सरोजिनी बाबर यांनी आमच्या स्त्री आधार केंद्र आणि क्रांतिकारी महिला संघटनेमध्ये घेतले होते. रानजाई कार्यक्रम नंतर सहयाद्री वाहिनीवर सुरु झाला. डॉ.सरोजिनी बाबर यांचे महाराष्ट्राला साहित्य क्षेत्रातील व्यक्तिमत्व माहीत होते. सामान्य लोकांमध्ये त्याला आणखी एक व्यापक रुप मिळाले. शांताबाई शेळके आणि डॉ.सरोजिनी बाबर या दोघींमध्ये जो संवाद होता तो संवाद आजही पाहिला तर त्यामध्ये एक वैशिष्टय वाटते. एखादा माणूस ज्यावेळी एखाद्या विषयाचा अभ्यास करतो त्यावेळी त्याला न समजणारे, खूप अंतर आहे असे वाटायला लागते. पण या दोघींची भाषा आणि दोघींचे मनोगत आईच्या मुलाबद्दलच्या संकल्पना असतील किंवा पती-पत्नीच्या प्रेमाबद्दलच्या कल्पना असतील किंवा निसर्गाबद्दलचे वर्णन असेल याबद्दलची संवेदनशीलता या दोघींमधून दिसत होती. एक अतूट

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

स्वरुपाचे दोघींचे व्यक्तिमत्व होते असे म्हटले पाहिजे. डॉ.सरोजिनी बाबर या राजकारणातही सक्रिय होत्या. सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे म्हणाल्या की, महिला असून त्या राजकारणामध्ये आल्या. खरे सांगावयाचे म्हटले तर महिला असून राजकारणामध्ये आल्या असे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये म्हणण्याची परिस्थिती नव्हती. महिला स्वातंत्र्य लढयामध्ये होत्याच. पण नंतरच्या काळामध्ये वेगवेगळया प्रश्नांमुळे राजकारणातून हळूहळू बाजूला गेल्या. स्व.अण्णासाहेब मगर आणि पुणे जिल्हयामध्ये खास करुन कै.यशवंतराव चव्हाण यांना मानून काम करणारे जे लोक होते त्यामध्ये डॉ.सरोजिनी बाबर यांना खूप चांगल्या प्रकारचे स्थान होते. पण गेल्या 15-20 वर्षापासून सद्‌गुण, साहित्यात प्रचंड ऊर्जा असून देखील त्यांचा समाजाला जेवढा उपयोग करुन घ्यायला पाहिजे तेवढा झाला नाही की काय अशी खंत माझ्या मनाला वाटते. त्या अतिशय साध्या होत्या. मला असे नेहमी वाटते की, निर्मळ आणि साधे व्यक्तिमत्व असले तर ते सुध्दा काही वेळा इतके सहजगत्या गृहित धरले जाते आणि भाषेमध्ये, साहित्यामध्ये त्यांचे जे योगदान आहे ते योगदान आपण समजून घ्यावे लागते. आज देखील समाजशास्त्रातील अभ्यासक असतील किंवा सामान्य कार्यकर्ते किंवा विधान परिषदेतील आम्ही सदस्य असू या सगळयांना निश्चितपणे असे वाटते की, त्यांचा जो सर्जनशील वारसा आहे तो जतन झाला पाहिजे. आजकाल वाहिन्यांमध्ये किंवा इतर ठिकाणी बोलत असताना मराठीच्या साध्या साध्या शब्दांचा अर्थ कोणाला कळत नाही. अशा वेळेला त्यांच्या साहित्यातून खूप काही भावना स्पष्ट होऊ शकतात, व्यक्त होऊ शकतात. डॉ.सरोजिनी बाबर यांना शिवसेना पक्षाच्यावतीने श्रध्दांजली वाहते आणि त्यांचे जे लोक साहित्यातील साहित्याचे चांगले स्थान आहे ते मजबूत करण्याच्या दृष्टीकोनातून आपण अजून काही चांगले काम करु शकू असे सांगून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

------

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी डॉ.सरोजिनी बाबर यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव आणलेला आहे त्यासंबंधी माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, डॉ.सरोजिनी बाबर यांना मी प्रत्यक्ष पाहिलेले नसले किंवा त्यांचा सहवास मिळालेला नसला तरी त्यांच्या साहित्यातून त्यांच्याशी जवळचा परिचय झालेला आहे. एक विलक्षण संवेदनशील असे व्यक्तिमत्व त्यांच्या साहित्यातून जाणवते. त्या अष्टपैलू होत्या.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री संजय केळकर...

त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते. ज्याप्रमाणे आनंदीबाई जोशी ह्या इंग्लडला गेल्या आणि पहिल्या महिला डॉक्टर बनून आल्या त्याप्रमाणे डॉ. सरोजिनी बाबर ह्या ग्रामीण भागातील पहिल्या महिला एम.ए,पीचडी. झाल्या. त्यांनी 17 वर्षे राजकीय क्षेत्रामध्ये काम केले. स्वातंत्र्य लढ्यातही त्यांनी भाग घेतला. त्याही पलिकडे त्यांचे साहित्यातील योगदान हे प्रचंड आहे. पाचशेहून अधिक ग्रंथाचे लेखन आणि सहाशेहून अधिक ग्रंथांचे संपादन करण्याचे अवघड काम त्यांनी केलेले आहे. त्यांनी ग्रामीण संस्कृतीचे चित्रण आपल्या सहज सुंदर सोप्या भाषाशैलीमध्ये केले आहे. त्या ज्येष्ठ साहित्यिक होत्या. त्यांचे समर्थ लिखाण महाराष्ट्रामध्ये वर्षानुवर्षे वाचले जाईल, त्यांचे साहित्य वर्षानुवर्षे महाराष्ट्रामध्ये अभ्यासले जाईल अशा पध्दतीचे लिखाण आक्कांनी केले आहे. संवेदनशील स्वरुपाचे लिखाण करणारे व्यक्तिमत्व महाराष्ट्राने अक्कांच्या रुपाने पाहिले. अशा या या अष्टपैलू साहित्यिकेला मी माझ्या तर्फे आणि माझ्या पक्षा तर्फे विनम्र आदरांजली वाहतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : संसदीय कामकाज मंत्री यांनी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीमती सरोजिनी बाबर यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडला त्या शोक प्रस्तावाला सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील तसेच सदनातील दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी आपल्या भावना व्यक्त करुन पाठिंबा दिलेला आहे.

या शोक प्रस्तावावर माझे विचार मांडत असताना मी सांगेन की, 1952मध्ये ज्यावेळी मी विद्यार्थीदशेत होतो त्यावेळी त्यांनी त्यावेळच्या शिराळा-वाळवा मतदारसंघाचे, आताचा शिराळा मतदारसंघ, नेतृत्व केले होते. त्या काळात विद्यार्थीदशेत असताना ताईंना जवळून पाहाण्याचे भाग्य त्यावेळच्या तरुण पिढीला लाभले. क्रांतीकारी अशा सातारा जिल्ह्यामधील वाळवा तालुका हा अत्यंत प्रखर देशभक्तीची खाण असलेला तालुका. त्या तालुक्यामध्ये ताईंचा जन्म झाला. ख-या अर्थाने ताईंचे वडील श्री. कृष्णराव बाबर हे त्यांचे गुरु होते. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेतले. नंतरच्या काळात शिक्षण क्षेत्रामध्ये अनेक पध्दतीने चांगले काम करीत असताना अत्यंत चांगल्या पध्दतीचे संस्कार श्री. कृष्णराव बाबर यांनी अक्कांना दिले. 60-80 वर्षापूर्वीची परिस्थिती आपण बघितली तर त्यावेळी ग्रामीण भागातील मुलींना शिक्षण घेणे कठीण होते. पण त्या परिस्थितीत सुध्दा वडिलांच्या प्रोत्साहनामुळे प्रयत्नांची पराकाष्ठा करुन त्या एम.अे. पीएच.डी.पर्यन्त विद्याविभुषित झाल्या. स्वातंत्र्य लढयामध्ये सुध्दा त्यांनी कारावास भोगला आणि त्या नंतरच्या काळामध्ये राजकीय, सामाजिक आणि साहित्य क्षेत्रामध्ये महाराष्ट्राला अभिमान वाटवा असे काम केले, लिखाण केले. ख-या अर्थाने ग्रामीण भागात राहाणारा जो सर्वसामान्य समाज आहे, बंधु-भगिनी आहेत त्यांना सुसंकृत करणे तसेच त्यांना प्रेरणादायी ठरेल अशा प्रकारच्या साहित्याची निर्मिती त्यांनी केली. हे कार्य त्यांनी आपल्या आयुष्यात 50-60 वर्षे केले.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

देश पातळीवर, राज्य पातळीवर त्यांच्या साहित्यांचे कौतुक झाले. अनेक शैक्षणिक संस्थांनी त्यांचा उचित पध्दतीचा सत्कारही केला, अशा आमच्या या जुन्या सातारा जिल्हयातील ताई, आम्हा कार्यकर्त्यांच्या आक्का म्हणून त्या वावरल्या. स्व.यशवंतराव चव्हाण साहेब असतील, स्व.वसंतदादा पाटील साहेब यांना सख्ख्या बंधुचे प्रेम देणा-या, विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील, महाराष्ट्रातील जे कार्यकर्ते त्यांच्याकडे यावयाचे त्यांना अचूकपणे मार्गदर्शन करणा-या आणि प्रसंगी अतिशय परखड अशा विचाराने प्रेरित झालेल्या ताईचे दिनांक 20 एप्रिल, 2008 रोजी निधन

झाले आहे. महाराष्ट्रात त्यांनी मृत्यूपूर्वी जे साहित्य निर्माण केले आहे, त्यांचे जे विचार होते, त्या साहित्याचे आणि विचारांचे जतन केले पाहिजे. प्रखर महाराष्ट्र निर्माण करण्याची ताकद त्यांच्या साहित्यामध्ये आहे. त्यांनी निर्माण केलेल्या साहित्याचे यापुढच्या काळात जतन केले गेले पाहिजे. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाज जीवनामध्ये तेवढया प्रखरतेने तुम्ही आम्ही काम केले पाहिजे अशी भावना मी व्यक्त करतो आणि या ठिकाणी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोकप्रस्ताव संमत करावा अशी माझी विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियाकडे पाठविण्यात येईल.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.12 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 1.57 ते 2.12 मध्यंतर )

--------------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. दिलीप वळसे-पाटील( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन 2007 चा दुसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा सन 1998-99,1999-2000 व 2000-2001 चा अनुक्रमे सातवा,आठवा व नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा पंधरावा व सोळावा अहवाल सादर करतो.

**उपसभापती** : अहवाल सादर झाला आहे.

----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ SBT/ MMP/ 14:10

पृ.शी./मु.शी : विनंती अर्ज सादर करणे.

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने 'चासकमान प्रकल्पासाठी सन 1978-79 साली तळेगांव, ढमढेरे, ता.शिरुर, जि.पुणे येथील जमिनीवर (जमीन हस्तांतरीत करणे, वाटप पत्र, बक्षिस पत्र) इत्यादीसाठी बसविलेले निर्बंध पूर्ण उठविणेबाबत' या विषयावरील विनंती अर्ज सभागृहास सादर करतो.

**उपसभापती** : विनंती अर्ज सभागृहास सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात आला आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

--------

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी "शासनाने खारभूमी विकास हे स्वतंत्र खाते निर्माण करुन रायगड जिल्हयातील समुद्र किनाऱ्यावरील खार बंदिस्तीची कामे सुरु केल्याने समुद्राचे खारे पाणी शेतात जाऊन भातशेती नष्ट झाल्याने तसेच मत्स्य व्यवसायावरही परिणाम झाल्याने त्यावर उपाययोजना करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, गुरुमुख जागवानी, केशवराव मानकर यांनी "अमरावती जिल्हयातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील धारणमहू येथे दि.11.4.2008 रोजी लागलेल्या आगीत 42 घरे उद्ध्वस्त होणे, तसेच मेळघाटातील जंगलासह आदिवासींची 58 घरे भस्मसात होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "दिनांक 27 मार्च, 2008 रोजीच्या सुमारास श्रीरामपूर, जि.अहमदनगर येथील पोलिसांनी हरियाणा, दिल्ली, पंजाब आदी राज्यातून चोरलेल्या महागड्या गाड्या राज्यातील नांदेड, नाशिक आदी भागात तेथील आरटीओ कार्यालयातून बनावट कागदपत्रे तयार करुन विक्री करण्यात येत असल्याचा प्रकार उघडकीस आणला असून यात आरटीओ कार्यालयातील अनेक अधिकारी सहभागी असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 16 एप्रिल, 2008 रोजी अंबाडखिंड, ता.भोर, जि.पुणे येथील प्राजक्ता मोहन शिंदे या तरुणीवर प्रेमजीत खोपडे याने बलात्कार करण्याचा केलेला अयशस्वी प्रयत्नानंतर सदर तरुणी त्याचेविरुध्द पोलिसात तक्रार देईल या भीतीने तिची निर्घृणपणे केलेली हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**.............

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयात कृषि विभागांतर्गत सुरु असलेल्या कामासंदर्भात दि.15.4.2008 रोजी सभागृहात तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात मजूर उपलब्ध नसल्याने मशिनद्वारे काम केले असल्याचे नमूद करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे यांनी "निम्नपेढी, पंढरी व पाक नदी जि.अमरावती या प्रकल्पाकरिता परिसरातील बिगर आदिवासी शेतकऱ्यांना जमीन विक्रीची परवानगी देऊन आदिवासी शेतकऱ्यांना या प्रक्रियेपासून वंचित ठेवणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या संदर्भात निवेदन उद्या किंवा परवा केले जावे. बिगर आदिवासींच्या जमिनी खरेदी होत आहेत, मात्र आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे उद्या निवेदन करण्यास सांगावे.

**उपसभापती** : उद्या निवेदन करण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मासळीच्या दुष्काळासंबंधी आपल्या दालनामध्ये बैठक आयोजित करण्यात येणार होती, ती बैठक अद्याप झालेली नाही. लवकरात लवकर बैठकीचे आयोजन केले जावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आजच्या इतर सर्व नियम 93 अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृहराज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "भारतीय खालाशांसह काळ्या समुद्रात दिनांक 28 फेब्रुवारी, 2008 रोजी बेपत्ता झालेल्या जहाजाबाबत" या विषयावरील सर्वश्री संजय केळकर व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील चर्चेच्या वेळी दिनांक 13 मार्च, 2008 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी.)

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्यांची निवड उच्च न्यायालयाकडून रद्दबातल ठरविण्यात येणे

**मु. शी.** : नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्यांची निवड उच्च न्यायालयाकडून रद्दबातल ठरविण्यात येणे याबाबत सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी यांनी "नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्यांची निवड उच्च न्यायालयाकडून रद्दबातल ठरविण्यात येणे"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, शासनाने नामनिर्देशित सदस्यांची निवड करण्यासाठी नियम 5 अन्वये जी सुधारणा केली होती ती उच्च न्यायालयाने रद्दबातल ठरविली आहे. सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रातील नगरपरिषदांमध्ये जे नामनिर्देशित सदस्य आहेत त्यांची पोझीशन काय राहणार आहे? जर ते डिस्क्वालिफाय झाले असतील तर सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील दाखल करण्यात येणार आहे का किंवा त्यांचा कार्यकाळ पूर्ण होईपर्यंत कायद्यात योग्य ती सुधारणा करण्यात येईल काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, जवळजवळ 700 स्वीकृत सदस्य आहेत, त्यांच्या भविष्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. या संदर्भात कोर्टाने जे आदेश दिले त्या अनुषंगाने स्वीकृत सदस्य आज निश्चितप्रकारे अस्तित्वात नाहीत. या संदर्भात अपील करण्याच्या संदर्भात नगरविकास विभागामार्फत शासनाने सर्वोच्च न्यायालयात पत्र देऊन तेथील विधी व न्याय विभागाच्या गव्हर्मेंट प्लिडरना एंगेज करण्यात आले आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .......

आणि आठ दिवसाच्या आत अपिल दाखल करण्यात येईल आणि त्यासंबंधी स्टे मिळण्याबाबत प्रे करण्यात येईल. त्याचबरोबर न्याय मिळाला नाही अथवा लवकर होऊ शकले नाही तर तर राज्यशासनाच्या वतीने सुध्दा यासंदर्भातील अर्जाच्या संदर्भात रुल आणि ॲक्टसंबंधी ज्या काही चुका झालेल्या होत्या व रुल आणि ॲक्टमध्ये फरक वाटला त्या अनुषंगाने बदल करण्याच्या संदर्भात ताबडतोबीने कार्यवाही करण्यात येईल.

---------------

**उपसभापती** : नियम 93 अन्वयेचे निवेदन क्र. 2, डॉ. नीलम गोऱ्हे यांचे आहे. परंतु त्या सभागृहात उपस्थित दिसत नाहीत.....

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, निवेदन क्र. 2 बाबत माननीय मंत्री महोदयांनीच सांगितले होते की, आज हे निवेदन चर्चेला घेऊ नये, म्हणून कृपया ते लॅप्स करु नये.

..........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अन्न महामंडळाने पाठविलेल्या तांदळाची ठेकेदाराच्या बेपर्वाईमुळे झालेली नासाडी

**मु. शी.** : अन्न महामंडळाने पाठविलेल्या तांदळाची ठेकेदाराच्या बेपर्वाईमुळे झालेली नासाडी याबाबत श्री. सुरेश जेथलिया वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, श्री. सुरेश जेथलिया यांनी "अन्न महामंडळाने पाठविलेल्या तांदळाची ठेकेदाराच्या बेपर्वाईमुळे झालेली नासाडी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश जेथलिया : महोदय, हा प्रश्न केंद्रशासनाच्या अखत्यारितील असला तरी राज्यशासन डोळे असूनही आंधळे, मुके आणि बहिरे कसे राहू शकते ? एवढ्या मोठ्या प्रमाणात तांदळाची नासाडी झालेली असताना अन्न महामंडळाला शासनाने कळविले काय ? असल्यास त्यामध्ये सडका व भिजका तांदूळ किती टन सापडला ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एकंदर जो साठा होता तो जवळपास 28277 क्विंटल एवढा होता. त्यावर पत्र्याचे आच्छादन करुन ठेवण्यात आले होते. तसेच गोदाम क्र. 8 आणि 10 मध्ये हा तांदूळ साठवून ठेवला होता. या साठ्याचे पृथक्करण केले असता एकंदर 165.38 क्विंटल तांदूळ भिजला असल्याने तो खाण्यास योग्य नाही असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

-------------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पूरहानी व खड्डे भरण्यासाठी दिलेला निधी
निविदा न काढता इतरत्र खर्च करणे

**मु. शी.** : पूरहानी व खड्डे भरण्यासाठी दिलेला निधी निविदा न काढता
इतरत्र खर्च करणे याबाबत सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया,
किशनचंद तनवाणी, सुरेश जेथलिया वि.प.स. यांनी दिलेली
नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया,किशनचंद तनवाणी, सुरेश जेथलिया वि.प.स. यांनी "पूरहानी व खड्डे भरण्यासाठी दिलेला निधी निविदा न काढता इतरत्र खर्च करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------

......5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिशन बाजोरिया : महोदय, शासनाने पूर हानीसाठी भरपूर निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर सुध्दा अकोट भागात 18 आणि 34 लाख रुपये पूर हानीसाठी नियोजन केल्याचे दाखविले आहे. यातून 7 रस्त्यांसाठी आणि 13 वेगवेगळ्या कामांसाठी तसेच खड्डे भरण्यासाठी 52 लाखाचा निधी वितरित करण्यात आला आहे. ही कामे बेरोजगार अभियंत्यांना देण्यात आली आहेत. अकोट तालुक्यात नदी व नाल्यामध्ये पूर आला होता व माती जमा झाली तरी देखील यातील कोणताच निधी उपयोगात आणला नाही. खड्डे भरण्याच्याच उपयोगात हा निधी आणला गेला. म्हणून पावसाळा सुरु होण्यापूर्वी या अतिरिक्त निधीचा उपयोग करुन नदी नाल्यांची दुरुस्ती करण्यात येणार काय ?

श्री. रविशेठ पाटील : महोदय, या भागात पुरामुळे पडलेले खड्डे भरण्याच्या कार्यक्रमासाठी 18 लाखाची 7 कामे मंजूर केली होती. खड्डे भरण्यासाठी 34 लाखाची 13 कामे मंजूर केली होती. त्यानंतर ही कामे मजूर संस्थांना देण्यात आली तसेच सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना दिलेली आहेत. आणि या कामाच्या वर्क ऑर्डर्स 1 मार्चनंतर देण्यात आल्या व अद्याप पेमेंट सुध्दा झालेले नाही म्हणून सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कुठलाही भ्रष्टाचार यात झालेला नाही. या 13 कामातील 5 कामांच्या वर्क ऑर्डर्स फेब्रुवारीमध्ये देण्यात आल्या आणि 8 कामांना मार्चमध्ये वर्क ऑर्डर्स देण्यात आल्या व ही कामे सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांमार्फत करण्यात येत आहेत. त्यातून दोन कामाची 4.58 लाखाची देयके दिली आहेत. तसेच खड्डे बुजविण्याच्या कामासाठीच आपण हा खर्च केला आहे. तसेच या कामाच्या बाबतीत व्हिजिलन्सकडून चौकशी सुरु केली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सावकाराच्या जाचाला कंटाळून बीड जिल्हयातील शेतक-याने जीवन यात्रा संपवण्याचा दिलेला इशारा

**मु. शी.** : सावकाराच्या जाचाला कंटाळून बीड जिल्हयातील शेतक-याने जीवन यात्रा संपवण्याचा दिलेला इशारा याबाबत सर्वश्री पाशा पटेल, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्य मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री पाशा पटेल, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी यांनी "सावकाराच्या जाचाला कंटाळून बीड जिल्हयातील शेतक-याने जीवन यात्रा संपवण्याचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ MMP/ प्रथम श्री. खर्चे...... 14:25

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. माझ्या माहिती प्रमाणे मराठवाडयातील 80 तहसिलमध्ये अशा शेकडो केसेस आहेत. 3-4 लाख रुपये एकरी किंमत असलेल्या जमिनीची अतिशय किरकोळ दराने सावकार रजिस्ट्री करुन घेतात. सावकार या लोकांना 10 टक्के दरापर्यंत व्याज लावत असतात. या प्रकरणात श्री.अग्रसेन शंकर किर्दत यांची 2 एकर जमिनीची 42 हजार रुपयांमध्ये रजिस्ट्री करण्यात आली. सोमनाथ बोरगाव, ता. आंबेजोगाई, जि.बीड येथील दोन एकर जमिनीची 42 हजार रुपयांमध्ये रजिस्ट्री होणे शक्य नाही याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांना सुध्दा आहे. शासन एका बाजूला सावकारांच्या विरुध्द ॲक्शन घेण्याच्या घोषणा करते परंतु प्रत्यक्षात मात्र काहीच करीत नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करुन त्यावेळचे रेडीरेकनरचे रेट काय होते, जमिनीचे खरेखुरे दर काय होते, व्याज किती वसूल केले गेले आणि ज्या पध्दतीने रजिस्ट्रीचे काम झाले तसेच होणा-या रजिस्ट्री थांबविण्यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे काय? रजिस्ट्री झाली म्हणजे आमचे काम संपले आहे असे शासन मानत असेल तर ते योग्य नाही. आता रजिस्टार ऑफिस शेतक-यांचे कर्दनकाळ झालेले आहे त्यामुळे यावर नेमकी काय उपाययोजना शासनातर्फे केली जाणार आहे? तसेच सावकारांवर कारवाई करुन त्यांनी हडप केलेली जमीन मूळ मालकाला परत देण्यासाठी शासन काय करणार आहे?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, या प्रकरणात श्री. किर्दत यांनी आपली जमीन कायम खुश खरेदीने दिलेली आहे. मधील काळात नियम बदलून कलेक्टर आणि डीडीआर यांना याबाबत अधिकार दिले होते. 15/20 खरेदी खत सुध्दा रद्द केले होते. परंतु या सर्व गोष्टी उच्चन्यायालयाने थांबवल्या होत्या. आता नव्या कायद्यात सावकारी कायद्याची दुरुस्ती प्रस्तावित केलेली असून कालच मंत्रिमंडळाने या दुरुस्तीला मान्यता दिलेली असून यासंदर्भातील नवीन विधेयक सभागृहापुढे येणार आहे. या विधेयकामध्ये सर्व गोष्टींचा समावेश केला जाणार आहे. कारण कायम खुश खरेदी असल्यामुळे ती खालच्या अधिका-यांना रद्द करता येत नाही. वास्तव असून ही बाब सिध्द करणे अवघड जात असते. परंतु या जाचातून शेतक-यांना सोडवण्यासाठी नव्या कायद्यात तरतुदी केल्या जातील.

श्री. श्रीकांत जोशी : या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर केली जाईल काय?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : होय.

--------- ....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी फीमध्ये केलेली भरमसाठ वाढ

**मु. शी.** : राज्यात खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी फीमध्ये केलेली भरमसाठ वाढ याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, संजय केळकर, श्रीकांत जोशी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील : ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, संजय केळकर, श्रीकांत जोशी, यांनी राज्यात खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी फीमध्ये केलेली भरमसाठ वाढ या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या फीमध्ये साधारणत: 3 ते 3 पट वाढ शासनाने केलेली असून ही वाढ उत्तरामध्ये मान्य केलेली आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांपैकी ज्यांची उच्च शिक्षण घेण्याची आर्थिक क्षमता नाही असेच विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे वळत असतात. शासनाने गेल्या 23 वर्षामध्ये फीमध्ये कोणतीही वाढ केली नव्हती परंतु आता शासनाने अचानक जी वाढ केलेली आहे ती मोठया प्रमाणात केलेली आहे. या वाढलेल्या फीचा परिणाम औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणा-या गोरगरीब विद्यार्थ्यांवर अन्याय होणार आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणारी जी कमकुवत गटातील मुले आहेत त्यांना इतर संस्थासारखीच इबीसीची सवलत, मागासवर्गीयांना मिळणा-या सवलती या ही संस्थातील विद्यार्थ्यांसाठी लागू केल्या जाणार आहेत काय? तसेच ज्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य मिळत नाही. दुस-या बाजूला आपण त्यांना 2/3 पगार देण्याचे सुध्दा बंधन घातले आहे. या संस्थांना 100 टक्के अनुदान न देता, काही प्रमाणात का होईना या संस्थांना आपण काही आर्थिक मदत देण्याच्या संदर्भात शासन धोरणात्मक निर्णय शासन घेणार आहे काय?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 14.30

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, सुरुवातीलाच मी स्पष्ट करु इच्छितो की, जरी राज्य सरकारने खाजगी आय.टी.आय.च्या फी मध्ये वाढ केलेली असली तरी सुध्दा अद्यापपर्यंत राज्य सरकारच्या मार्फत ज्या आय.टी.आय. चालविल्या जातात त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ केलेली नाही. खाजगी आय.टी.आय. ची फी आणि शासकीय आय.टी.आय.ची फी 23 वर्षापूर्वी ठरविण्यात आली होती. सरकारी आय.टी.आय.मध्ये 15 रुपये दरमहा फी घेतो आणि खाजगी आय.टी.आय.मध्ये 1500 रुपयापर्यंत फी घेतो. डी.जी.ई.टी. नवी दिल्ली यांनी सर्व आय.टी.आय.वर असे बंधन घातले होते की,सरकारी आय.टी.आय.मधील निदेशकांना जेवढा पगार दिला जातो त्याच्या 2/3 पगार खाजगी आय.टी.आय.मधील निदेशकांना देण्यात आला पाहिजे. आपण कॉस्ट ऑफ एज्युकेशन विचारात घेतली पाहिजे. खाजगी आय.टी.आय.ना मशिनरी, इक्युपमेन्टस आणि बाकीच्या गोष्टीसाठी करावा लागणारा खर्च विचारात घेतला तर त्यांना

मिळणा-या फीच्या रकमेपेक्षा हा खर्च कितीतरी पटीने जास्त आहे. एका बाजूला कर्मचारी न्यायालयात जाऊन आम्हाला 2/3 पगार दिला पाहिजे अशी मागणी करीत आहेत तर दुस-या बाजूला फी घेण्याची परवानगी नसल्यामुळे अधिकृतपणे तेवढी फी घेऊ शकत नाहीत त्यामुळे या आय.टी.आय.च्या समोर काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्या बाबतीत न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती त्यानंतर या संबंधीचा निर्णय राज्य सरकारने विहित कालावधीमध्ये घेतला पाहिजे अशी न्यायालयाने भूमिका घेतली होती. त्यानंतर या संदर्भात शासनाने एक समिती स्थापन केली होती व या समितीला या सबंधीचा अभ्यास करावयास सांगण्यात आले होते.

या समितीने तीन प्राचार्यांची एक उप समिती नेमली होती आणि राज्यातील दहा ते बारा आय.टी.आय.बरोबर चर्चा करुन फी वाढ करण्यासबंधीची त्यांची मते जाणून घेतली होती.त्यानंतर या समितीने शासनाला एक कनसेप्ट नोट तयार करुन दिली आहे.कॉस्ट ऑफ एज्युकेशन दरवर्षी बारा हजार रुपये आहे अशा प्रकारची शिफारस त्यांनी केली असून राज्य शासनाला ही शिफारस प्राप्त झाल्यानंतर सरसकट सगळया आय.टी.आय.नी बारा हजार रुपये फी आकारण्या ऐवजी राज्यातील सगळया आय.टी.आय.चे अ,ब,क,ड असे चार गट केले होते मशिन व्यवसायासाठी "अ" दर्जासाठी 12 हजार रुपयाच्या 100 टक्के, "ब" दर्जासाठी 90 टक्के,"क" दर्जासाठी 80 टक्के "ड "दर्जासाठी 60 टक्के त्याचप्रमाणे इतर गटासाठी 70,60,50 व 40 टक्के आणि बिगर अभियांत्रिकी गटासाठी 50.40.30.20 टक्के अशा प्रकारची फी असावी असा निर्णय घेण्यात आला

2..

श्री.दिलीप वळसे पाटील ...

होता. सभापती महोदय, हा निर्णय जर शासनाने घेतला नसता तर गेल्या दोन वर्षात राज्यातील खाजगी 55 आय.टी.आय. बंद झालेले आहेत.त्यात आणखी वाढ झाली असती. एका बाजूला उद्योग वाढत आहेत त्या ठिकाणी मुलांना नोकरीची संधी उपलब्ध करुन द्यावयाची आहेत. एक आय.टी.आय. सुरु करण्यासाठी चार ते सहा कोटी रुपये संस्थेला घालावे लागतात. त्यामुळे या संस्थेच्या दैनदिन खर्चा एवढे पैसे जर निघाले नाही तर त्या संस्था बंद करण्याशिवाय त्यांच्यापुढे दुसरा पर्याय राहत नाहीत अशा प्रकारे राज्यातील जवळजवळ 55 आय.टी.आय. बंद झालेल्या आहेत यावरुन ही गोष्ट आपल्या लक्षात येते. राज्यातील गोर गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न शिल्लक राहतो. त्या बाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, सरकारी आय.टी.आय.मधील इनटेक कॅपेसिटी 70 हजाराच्या आसपास आहे. काही आय.टी.आय. दोन किंवा तीन शिफटमध्ये चालविण्यात यावीत.यासंबंधीची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.या राज्यातील सगळया आय.टी.आय.चा जर आपण विचार केला तर आपल्याला असे दिसून येईल की संपूर्ण राज्यातील 358 तालुक्यापैकी 351 तालुक्यामध्ये आय.टी.आय.आहेत. त्यामध्ये 70 हजार 476 एवढी इनटेक कॅपेसिटी आहे. ही आय.टी.आय. दोन किंवा तीन शिफटमध्ये चालविण्यास सुरुवात केली तर त्यात 40 हजार एवढया जागा वाढतील. शासकीय आय.टी.आय.मध्ये गोर गरीब विद्यार्थ्यांना आज कमी फी भरावी लागत आहे त्याचबरोबर त्यांना ई.बी.सी.ची सवलत दिली जाते त्यामुळे नील कॉस्टमध्ये या मुलांना शासकीय आय.टी.आय.मध्ये शिक्षण मिळते. या फी वाढीचा परिणाम त्याच्यावर झालेला नाही. खाजगी आय.टी.आय.मध्ये इनटेक कॅपेसिटी 27 हजार 324 असून मशिन व्यवसायाची प्रवेश क्षमता फक्त 1128 आहे. तेव्हा या 1128 विद्यार्थ्यांना बारा हजार रुपये फी भरावी लागणार आहे. बाकीच्या विद्यार्थ्यांना मी मघाशी जी टक्केवारी सांगितली आहे त्यानुसार फी भरावी लागणार आहे.सकृतदर्शनी ही फी वाढ मोठया प्रमाणावर झाल्याचे दिसून येत असले तरी मर्यादित स्वरुपामध्ये मर्यादित विद्यार्थ्यांना फी भरावी लागणार आहे. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी नाकारावयाची नाही ..........................................................

नंतर श्री.सुंबरे

अपुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ....

किंबहुना त्यांच्यासाठी या सगळ्या गोष्टी उपलब्ध करून देण्याचीच आपली भूमिका आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो विषय, इतर अभ्यासक्रमांसाठी ज्या सवलती देता वगैरेबाबत जो विषय येथे उपस्थित केला आहे त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, संबंधित विभागांशी चर्चा करून याबाबत निर्णय घ्यावा लागेल. परंतु आजच्या तारखेला या विनाअनुदान तत्त्वावरील किंवा कायम स्वरूपी विनाअनुदान तत्त्वावरील आयटीआयना अनुदान देण्याबाबतची कोणतीही योजना राज्य सरकार समोर विचाराधीन नाही आणि या संदर्भात त्या विद्यार्थ्यांना कोणत्या सवलती देता येतात किंवा काय ही बाब देखील आपण तपासून घेऊ.

***

..... 3ए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : राखीव असलेल्या उपजिल्हाधिकारी या पदावर श्री.बी.के. नाईक यांची बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे झालेली नियुक्ती.

**मु. शी**. : राखीव असलेल्या उपजिल्हाधिकारी या पदावर श्री.बी.के. नाईक यांची बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे झालेली नियुक्ती. याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, व संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "राखीव असलेल्या उपजिल्हाधिकारी या पदावर श्री.बी.के. नाईक यांची बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे झालेली नियुक्ती " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2ए 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MMP/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 14:35

( नियम 93 अन्वये मा. महसूल मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सध्या उपजिल्हाधिकारी पदावर नियुक्त असलेले श्री.बी.के.नाईक यांनी कर्नाटकातून खोटी प्रमाणपत्रे आणून राखीव असलेले पद मिळविले असल्याने पात्र असलेल्या अधिकाऱ्यांचे प्रमोशन डावलले गेले आहे. मी या ठिकाणी आपल्या माहितीसाठी काही पत्रे वगैरे वाचून दाखविणार आहे, कृपया मला त्यासाठी आपण परवानगी द्यावी. मी हे वाचून दाखवून एकच प्रश्न विचारणार आहे आणि ही सारी कागदपत्रेही माननीय मंत्र्यांकडे आपल्यामार्फत सादर करणार आहे.

सभापती महोदय, या संदर्भात श्री.लक्ष्मणराव ढोबळे यांनी 1.12.2003 ला जेव्हा ते उच्च शिक्षण मंत्री होते तेव्हा त्यांनी पत्र दिले की, ही अतिशय गंभीर गोष्ट आहे, आपण याची नोंद घ्यावी. त्यानंतर त्यांनी 18.2.2002, 14.3.2002, 24.4.2002, 26.6.2002, 29 मे,2002 या तारखांना पत्र दिलेले आहे की, आपण या संबंधात ॲक्शन घ्यावी, माझा अपमान करताहेत, मी भटक्या व विमुक्त जाती-जमातीचा असून आणि मंत्री म्हणून पत्र देऊनही माझेदेखील ऐकले जात नाही. सभापती महोदय, श्री.लक्ष्मणराव ढोबळे यांनी 1 डिसेंबरला 2003 ला पत्र लिहिले मुख्य सचिवांना. श्री.मुन्शीलाल गौतम हे त्यावेळी प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभागाला होते त्यांनाही सांगितले की, या अधिकाऱ्यावर त्वरित फौजदारी खटला भरावा त्याने खोटे सर्टिफिकेट आणून पद मिळविलेले आहे. त्यानंतर सन्माननीय श्री.सुशील कुमार शिंदे हे तत्कालीन मुख्यमंत्री असताना त्यांना श्री.हरिश्चंद्र पवार यांनी पत्र लिहिले होते. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुरेशदादा जैन यांनी 7 जून 2004 रोजी पत्र दिले की, श्री.भा.ल.राठोड, वित्तीय सल्लागार व उपसचिव यांच्यावर अन्याय होतो आहे. त्यांनी खोटे पत्र आणलेले आहे. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाच्या सचिव श्रीमती चारूशीला सोहोनी यांनी प्रधान सचिवांना पत्र लिहिले की, आपण या अधिकाऱ्यावर कारवाई का करीत नाही, त्याने खोटे सर्टिफिकेट आणले आहे. त्यांना फक्त माननीय मुख्यमंत्र्यांचे विशेष सहकारी श्री.आनंद रायते यांनी दोन महिन्यांनी उत्तर दिले.. त्यांनी प्रधान सचिवांना उत्तर दिले की, तुमच्या पत्र मिळाले आहे, योग्य ती कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, त्यानंतर श्री.सुधाकर रामचंद्र परिचारक यांनी 12.4.2007 ला पत्र दिले आहे. तेव्हा मला असे म्हणावयाचे आहे की, माननीय माजी मंत्री, सनदी अधिकारी या सगळ्यांनी पुराव्यासकट सादर केले आहे की, हा एक अधिकारी आहे की ज्याने कर्नाटकातून खोटी सर्टिफिकेट आणतो आणि त्या आधारे येथे

.....3ए 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

उच्च पद मिळवतो. प्रशासनातील उच्च अधिकारी, त्या त्या काळातील अगदी कॅबिनेट मंत्री यांनी देखील लिहून सांगितल्यानंतरही त्या अधिकाऱ्यावर आतापर्यंत कारवाई का झाली नाही ? हा एवढाच माझा प्रश्न आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून ही सारी कागदपत्रे माननीय मंत्र्यांकडे सादर करतो. (कागदपत्रे सादर करण्यात आली. )

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे त्यात आणि आताच त्यांनी काही कागदपत्रांचा आधार घेऊन जी माहिती दिली ती सांगत असताना श्री.बी.के.नाईक हे जे अधिकारी आहेत त्यांनी कर्नाटकातून बोगस प्रमाणपत्र आणून येथे नोकरी मिळविली आहे असे सांगितले आहे. त्याबाबत अनेक तक्रारी केल्यानंतरही त्यांच्याबाबत कोणतीही कारवाई का झाली नाही असाही प्रश्न त्यांनी विचारला आहे. हे खरे आहे की, याबाबत यापूर्वीही अशा प्रकारच्या अनेक तक्रारी झालेल्या होत्या आणि त्या संबंधात संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडून संपूर्ण चौकशी झाली आहे. त्यांनी जी अधिकची कागदपत्रे वा डॉक्युमेंटस् दिली होती त्यात ते सोलापूर येथील नेहरू नगर येथील रहिवासी असल्याचे व तो आपला पत्ता असल्याचे सांगितले आणि त्यासंबंधातील सगळे पुरावे देखील दिले. ते सिद्ध झाल्या मुळेच त्यांना 5 मे, 1983 च्या पत्राद्वारा श्री.बी.के.नाईक यांचे जात प्रमाणपत्र जे अवैध ठरविण्यात आले होते ते 10.7.19983 च्या पत्राद्वारे ते महाराष्ट्र राज्याचे रहिवासी नसल्याने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले होते. पण आता त्यांनी जी अतिरिक्त पत्रे सादर केल्यामुळे त्यांना 5 जुलै 1973 रोजी कळविण्यात आले की ही कागदपत्रे आपण सादर केल्यामुळे आणि ती सिद्ध झाल्यामुळे त्यांनी सादर केलेली कागदपत्रे वैध असल्याचे त्यांना कळविण्यात आले आणि त्यानंतर त्यांना नेमणूक दिलेली होती. त्यानंतरही अनेक चौकशी झ ाल्यानंतरही हायकोर्टामध्ये देखील याच विषयासंबंधात केस केलेली होती आणि हायकोर्टाने देखील ती केस फेटाळली आहे. त्याचप्रमाणे विभागीय जात पडताळणी समिती,पुणे यांच्याकडेही 15.3.2004 रोजी कळविले होते. .....

( यानंतर सौ.रणदिवे....3बी 1 ..

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 14:40

श्री.नारायण राणे.......

त्यावेळेला सर्वोच्च न्यायालयाचे रिट पिटीशन क्र.14737/93/माधुरी पाटील विरुध्द अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या निर्णयानुसार संबंधित प्रकरणामध्ये समितीस कारवाई करता येत नाही अशा स्वरुपाचा संदर्भ देऊन, त्यांनी जो जातीचा दाखला घेतला होता, तो वैध ठरविला होता. विभागीय जातपडताळणी विभागाने आणि माननीय उच्च न्यायालयानेही त्यांच्याविरुध्द केलेला दावा फेटाळला होता. त्यामुळे संबंधितांनी कर्नाटक मधून दाखला आणला आणि येथे नोकरी मिळविली आहे, या तक्रारीमध्ये तथ्य नाही. तसेच ते नेहरुनगर, सोलापूर येथे रहिवाशी म्हणून रहात असल्याचे जे पुरावे सादर केलेले आहेत, ते ग्राह्य धरुन त्यांना वैध ठरविण्यात आले आहे. सन्माननीय सदस्यांकडे यासंबंधात असलेली अधिक माहिती आता माझ्याकडे आलेली आहे. त्या अधिक माहितीच्या आधारावर मी याची चौकशी करतो.

-----

. . . .3 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या निवेदन क्रमांक 8</u>

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, यासंबंधात काल चर्चा झालेली आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

. . . .3 बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पॉईंट ऑफ इंफर्मेशनबाबत

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याठिकाणी माननीय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. त्या अनुषंगाने मला माननीय शिक्षण मंत्र्यांकडून एक माहिती घ्यावयाची आहे. आताच सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये एक मुद्दा उपस्थित केला आणि अवैध कागदपत्रांच्या माध्यमातून माणसे कसा गैरफायदा घेतात याचे एक उदाहरण आपल्या सर्वांसमोर ठेवलेले आहे. पण माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत परत चौकशी करण्याचे आश्वासन दिलेले आहे, ही चांगली गोष्ट आहे. माझ्याजवळ देखील काही कागदपत्रे आहेत. मी ती माननीय सभापतींच्या माध्यमातून माननीय शिक्षण मंत्री महोदयांकडे पाठवितो. यामध्ये असे म्हटलेले आहे की,"ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळाचे राजपत्र प्रसिध्द न करण्याबाबत तसेच शासनास खोटा दस्तवेज सादर करणाऱ्या व दिशाभूल करणाऱ्या संबंधित जबाबदार व्यक्ती व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत. ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शासन नियुक्त सदस्यांची नावे माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार कायम करण्यात आली असून संबंधित सदस्य श्री.हेमंत वाणी व श्री.राजेश जाधव यांचे चारित्र्य पडताळणी व शैक्षणिक अर्हता यांची चौकशी करण्याकरता माननीय उप सचिव श्री.नाना रौराळे यांनी चार दिवसापूर्वी ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी यांना पत्र पाठवून आदेश दिलेले होते. त्यानुसार माननीय शिक्षण अधिकारी यांनी शासनास या दोन्ही व्यक्तींचा पोलीस रिपोर्ट व शैक्षणिक अर्हता कळविली होती. त्यापैकी श्री.हेमंत वाणी हे 7 वी पास असल्याकारणाने आणि शासन नियुक्त सदस्य यांची शैक्षणिक अर्हता ही 10 वी पास असावी असे असल्याकारणाने सदर चौकशीअंती ही व्यक्ती शासन नियुक्त सदस्य पदाकरिता अपात्र ठरलेली होती. मात्र काही राजकीय पुढारी व उपसचिव श्री.रौराळे यांनी संगनमत करुन पुन्हा ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी यांच्यावर दबाव टाकून श्री.हेमंत वाणी हे लिलावती सतीश आव्हाड नावाच्या संस्थेचे गेली सहा वर्षापासून खजिनदार म्हणून कार्यरत असल्याचा खोटा दाखला तयार करुन घेतला व सदर दाखला ठाणे महानगरपालिका शिक्षण अधिकारी यांची पूरक चौकशी अहवाल म्हणून शासनाकडे घाईगर्दीने त्याच दिवशी पाठविला. प्रत्यक्षात मात्र मी स्वत: माननीय धर्मदाय आयुक्त ठाणे व शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद,ठाणे यांच्याकडून माहितीच्या अधिकारात माहिती गोळा केलेली आहे.

सदर माहितीत असे आढळून आले आहे की, धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयातील नोंदीत

. . . .3 बी-4



श्री.मधुकर सरपोतदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत वाणी हे लिलावती आव्हाड ट्रस्टशी संबंधित नाहीत. तसेच शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांनी देखील सदर लिलावती आव्हाड संस्थेच्या नावे कोणत्याही प्रकारची शैक्षणिक उपक्रम अस्तित्वात नाही असे लिहून दिलेले आहे. त्यामुळे सदर व्यक्ती श्री.हेमंत वाणी तसेच संबंधित संस्थेचे पदाधिकारी व शासनाचे उपसचिव श्री.रौराळे आणि ठाणे महानगरपालिका शिक्षण अधिकारी यांनी नियम व कायदे यांच्यातील तरतुदींचा गैरवापर करुन खोटे दस्तऐवज गोळा करुन शासनाची दिशाभूल केलेली आहे. त्यामुळे सदर सर्व व्यक्तींच्या विरोधात फसवणुकीचा तसेच खोटे दस्तवेज गोळा केल्याचा गुन्हा दाखल करुन संबंधित श्री.रौराळे यांना निलंबित करुन व इतरांवर कारवाई करुन संबंधित शिक्षण मंडळाचे राजपत्र प्रसिध्द करु नये. कारण शासन नियुक्त सदस्यांशिवाय शिक्षण मंडळाची स्थापना होऊ शकत नाही व संबंधित प्रकरणाचा मा.मुख्यमंत्र्यांकडे अहवाल पाठवून हे प्रकरण लाचलुचपत खात्याकडे चौकशी करता सोपवावे ही नम्र विनंती."

सभापती महोदय, मी यासंबंधातील कागदपत्रे माननीय सभापतींकडे सुपूर्द करीत आहे. त्यांच्याकडून माननीय शिक्षण मंत्र्यांना ती प्राप्त होतील. कृपया आपण याबाबती सर्व माहिती घेऊन योग्य ती कारवाई करावी अशी माझी विनंती आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जो मुद्दा मांडलेला आहे, तो आम्ही ऐकला आहे. याप्रमाणे या नेमणूका होत असतात. साधारणपणे ज्यांच्याकडे मिनिमम क्वॉलीफिकेशन आहे, त्यांच्यापैकी कोणालाही नेमण्याचा शासनाला अधिकार आहे. त्याविषयी कोणी बंधन घालून शकत नाही. पण सन्माननीय सदस्यांनी येथे जी माहिती दिली आहे, त्यानुसार 10 वी पास हे मिनिमम क्वॉलीफिकेशन असताना 7 वी पास असलेल्या माणसाची नेमणूक होते. इतर वेळेला अशा नेमणूका बाहेरच्या बाहेर होतात, तो भाग वेगळा. पण सन्माननीय सदस्यांनी माहितीच्या अधिकारामध्ये माहिती घेऊन ती सदनामध्ये मांडलेली आहे. अशा वेळी याबाबतीत पूर्ण व्हेरिफीकेशन होऊन त्यानुसार कार्यवाही व्हावी अशी मागणी करणे अत्यंत स्वाभाविक आहे आणि त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. जर येथे मुद्दा उपस्थित झाला नाही आणि ही गोष्ट झाली असेल तर तो भाग वेगळा आहे. पण येथे मुद्दा उपस्थित झाल्यानंतर त्याकडे दुर्लक्ष होणे ही बाब देखील या सदनाची फार मोठी अप्रतिष्ठा करणारी आहे एवढेच मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

. . . .3 बी-5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, जर कोणी खोटे दस्तऐवज सादर करुन नको असलेली शैक्षणिक पात्रता दाखविली असेल तर निश्चितपणे 15 दिवसाच्या आत याची चौकशी करु आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करु.

----

यानंतर कु.गायकवाड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 14:45

**पृ.शी.** : दि. 21/4/08 रोजी दैनिक महाराष्ट्र टाईम्स,मुंबई या वृत्तपत्रात "जितेंद्र आव्हाडांच्या हत्येचा कट नव्हता-एटीएसचा खुलासा" या मथळयाखाली प्रसिद्ध झालेल्या वृत्ताबाबत.

**मु.शी.**: दि. 21/4/08 रोजी दैनिक महाराष्ट्र टाईम्स,मुंबई या वृत्तपत्रात "जितेंद्र आव्हाडांच्या हत्येचा कट नव्हता-एटीएसचा खुलासा" या मथळयाखाली प्रसिद्ध झालेल्या वृत्ताबाबत या संबंधी माननीय गृहराज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृहराज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

-------------------

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री. गोपिकिसन बाजोरिया : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. या सभागृहामध्ये म्हाडाशी संबंधित माननीय मंत्रिमहोदय उपस्थित आहेत. आपण हिवाळी अधिवेशनामध्ये, मलकापूर येथील श्रीमती शकुंतला कोठारी यांची जागा पंधरा दिवसामध्ये परत करण्यासंबंधी स्पष्ट निदेश दिले होते. तसेच माननीय मंत्रिमहोदयांनी सुध्दा "होय" असे उत्तर दिले होते. परंतु चार महिने होऊन गेले तरी काहीही कार्यवाही झालेली नाही. यासाठी आपल्याला या पॉइन्ट ऑफ इन्फरमेशनच्या माध्यमातून मी हे कळवित आहे.

**उपसभापती** : अधिकारी माननीय मत्रिमहोदयांचे ऐकत नाहीत असे दिसते.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गृह राज्यमंत्र्यांनी नियम 46 अन्वये केलेल्या निवेदनासंबंधी**

**उपसभापती** : आताच माननीय मंत्रिमहोदयांनी जे निवेदन वाचले ते निवेदन या ठिकाणी झाले असे आपण ग्राह्य धरतो. परंतु "त्यांच्या हत्येचा कट" यासंदर्भात अशा प्रकारचे जे वृत्त प्रसिध्द झाले ते वर्तमानपत्राने कोणत्या आधारे प्रसिध्द केले ? शेवटी अशा वृत्तांमुळे फार मोठा गैरसमज पसरतो. पहिली गोष्ट अशी की, अशा प्रकारचे कपोलकल्पित वृत्त ज्यांनी छापले त्यासंदर्भात आपण काही विचारणा करणार आहात काय ? कारण त्याचे वेगळे परिणाम जनमानसावर होतात आपण निवेदन केले तेव्हाच मी आपल्याला याबाबत विचारावयास पाहिजे होते पण उशिरा का होईना मुद्दाम या गोष्टी थोड्या स्पष्ट व्हावयास पाहिजेत म्हणून मी विचारत आहे. प्रसार माध्यमे देखील अत्यंत जबाबदार असतात. ज्या वर्तमानपत्रांमध्ये बातमी आली ती महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील प्रथितयश दैनिके आहेत आणि अशा दैनिकांमध्ये अशा प्रकारचे ऐकीव वृत्त छापलेले आहे. त्यांना काही स्वप्न पडलेले नाही. अशा वृत्तपत्रांच्या प्रतिनिधीला हे कोणी सांगितले किंवा त्यांना अशा प्रकारची चुकीची माहिती कोणी दिली याचा कोठे तरी आपण तपास करणार आहात काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, याबाबत नुसता तपास करुन चालणार नाही तर संबंधित वर्तमानपत्राला आपण नोटीस पाठवावी. ऐकीव बातमीवरुन अशी बातमी देणे हे अतिशय गैर आहे. त्यांना सोर्स विचारण्याची आवश्यकता नाही. परवा रशियन अध्यक्षांनी एका मैत्रिणीशी लग्न केल्याची बातमी छापून आली होती. ते वर्तमानपत्र बंद केले. ते रशिया आहे हे ठीक आहे. आपल्याकडे आपण तसे काही करीत नाही. पण या ठिकाणी बदनामी होऊन जाते. नंतर छोटे खुलासे येतात. म्हणून त्याबद्दलचा सविस्तर खुलासा आपण स्वत: संबंधित वर्तमानपत्राला पाठवावा आणि तो छापून आला पाहिजे तरच त्याचा उपयोग होईल. नाही तर आपण नुसता तपास कराल आणि बदनामी होऊन जाईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, निवेदनाची प्रत वृत्तपत्राकडे पाठवली जाईल. आणि कोणत्या आधारावर बातमी छापली याबाबत विचारणा सुध्दा करण्यात येईल. तसेच याबाबत खुलासा करण्यास सांगण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : आपलाही खुलासा जावयास पाहिजे.

श्री. राम पंडागळे : वर्तमानपत्रात आलेली बातमी असत्य असेल तर त्या वृत्तपत्रावर गुन्हा दाखल करावा.

श्री. कपिल पाटील : त्याची आवश्यकता नाही.

श्री. राम पंडागळे : हे सन्माननीय सदस्यांचे वैयक्तिक मत झाले. ते सभागृहाचे मत होऊ शकत नाही. मी आपल्यावतीने विचारु इच्छितो की, आपण याबाबतीत कारवाई करणार काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांनी जे निवेदन केले त्या निवेदनानंतर आपण जे मत व्यक्त केलेले आहे त्याचा विचार करुन

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे....

त्या निवेदनामुळे सुस्पष्ट गोष्ट आहे ती समाजासमोर येणार आहे. याबाबतच्या बातमीमुळे बदनामी किंवा गैरसमज निर्माण होत असतील तर यासंबंधी काय कारवाई करावी यासाठी निश्चितपणे सरकार विचार करील आणि तशाप्रकारची कार्यवाही केली जाईल.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी**. : महाड तालुक्यातील माझेरी गावाजवळील वरंध घाटात जीप उंचीवरुन खाली पडून झालेला अपघात

**मु. शी**. : महाड तालुक्यातील माझेरी गावाजवळील वरंध घाटात जीप उंचीवरुन खाली पडून झालेला अपघात यासंबंधी सर्वश्री रमेश शेंडगे, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, भास्कर जाधव, रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ. वसंत पवार, श्री. राजेंद्र जैन, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा. फौजीया खान, सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाड-पंढरपूर रस्त्यावरील वरंध घाटात महाड तालुक्यातील माझेरी गावाजवळील दोन मोठी अवघड वळणे पार करुन तिसऱ्या वळणाच्या चढणीवरुन जाताना जीप वरंध घाटात 60 फूट उंचीवरुन खाली पडून झालेल्या अपघातात 10 लोक जागीच ठार होणे, तर सात लोक जखमी होणे, त्यात दोन लहान मुलांचा समावेश असणे, त्यातील दोन लोकांची प्रकृती गंभीर असणे, सदरील प्रवासी वाघोली येथे भारुडी भजनाचा कार्यक्रम आटोपून शिरगांव, ता. भोर येथे जाण्यास निघणे, सदरील घाटात व राज्यातील इतर मोठ-मोठया घाटात सतत अपघात होत असून नाहक प्रवाशांचे जीव धोक्यात येणे, सदरच्या अपघातात मृत व जखमींच्या नातेवाईकांना शासनाकडून मदत मिळणे अत्यंत गरजेचे असणे, सदर प्रकरणावर शासनाने योग्य नियोजन करुन उपाययोजना करण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



NTK/ MMP/ SBT/

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, शिरगांव, ता.भोर, जिल्हा पुणे येथे दिनांक 30 तारखेला भारुड भजनी मंडळ भारुड संपल्यानंतर जीपमधून परतीच्या प्रवासाला निघाले होते. त्या जीपमध्ये 16 कलाकार होते. मौजे वाघोली येथील पूजा आटोपून परत चालले होते. पहाटे 5 ते 5.30 च्या सुमारास अवघड वळणावर वळण घेत असताना या जीप गाडीला अपघात झाला. या अपघातामध्ये 11 प्रवासी मृत झाले, 5 जण जखमी झाले आहेत. शासनाने मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना 1 लाख रुपयांची मदत दिली आहे, गंभीर जखमींना 50 हजाराची आणि किरकोळ जखमींना 10 हजाराची मदत दिलेली आहे असे उत्तरात नमूद केले आहे. ही वस्तुस्थिती असेल तर मी शासनाला धन्यवाद देतो. पण एक गोष्ट यातून निदर्शनास आली आहे की, त्या जीपच्या टपावर 5 लोक बसले होते. सभापती महोदय, रात्रीच्या वेळी महामार्गावर पोलिसांचे पथक गस्त घालत असते. या जीपच्या टपावर 5 प्रवासी प्रवास करीत होते त्यांना पोलिसांनी अटकाव का केला नाही ? विविध महामार्गावरुन मोठी अथवा जड वाहने चुकीच्या पध्दतीने चालविल्यामुळे अनेक ठिकाणी अशाप्रकारचे अपघात होतात. काही कोटी रुपये खर्च करुन मुंबई-पुणे हायवे बांधला आहे. नुकताच दोन दिवसांपूर्वी त्या हायवेवर कंटेनरच्या चालकाने गाडी नीट न चालविल्यामुळे कंटेनर उलटा झाला. त्या कंटेनरला उचलण्यासाठी क्रेन मागविण्यात आली. पण त्या क्रेनची क्षमता न तपासता त्या कंटेनरला उचलत असताना ती क्रेन सुध्दा उलटी झाली. त्यामुळे मुंबई-पुणे हायवेवरील वाहतूक 16 तास बंद पडली होती. मी त्यादिवशी 4 तास अडकलो होतो. अशाप्रकारे बेदरकारपणे वाहने चालविणारे, नियमांचे उल्लंघन करुन हायवेवर प्रकाशझोत टाकणा-या बसेसचे चालक आहेत. त्यामुळे लहान वाहनांच्या चालकांच्या डोळयासमोर अंधारी येते त्यामुळे असे अपघात घडतात. मुंबई-गोवा महामार्गावर सुध्दा याच कारणामुळे मोठया प्रमाणावर अपघात होतात. अशाप्रकारे नियमांचे उल्लंघन करुन वाहन चालविणारे चालक आहेत त्यांच्या बाबत पोलीस खात्यातील गस्ती पथकाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई होत असल्याचे दिसत नाही. अशा चालकांविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हायवेवर चुकीच्या पध्दतीने वाहन चालविल्यामुळे कितीतरी अपघात होतात. त्याबाबत प्रत्येक प्रकरणात संबंधिताविरुध्द शासनाने कारवाई केली आहे. किती जणांवर कारवाई केली त्याची आता माझ्याजवळ आकडेवारी नाही. पोलिसांकडून

5....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे......

वेळोवेळी कारवाई केली जाते याबाबत मागील आठवडयामध्ये मी सविस्तर उत्तर दिले होते. तरी सुध्दा शासनाने किती जणांविरुध्द कारवाई केली आहे त्याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

-----

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : परीट (धोबी) समाजाच्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेला अमानुष लाठीमार

**मु. शी.** : परीट (धोबी) समाजाच्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेला अमानुष लाठीमार यासंबंधी सर्वश्री अरविंद सावंत, नितीन गडकरी, प्रकाश शेंडगे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"संभाजीनगर येथील क्रांती चौकात दिनांक 12.03.2008 रोजी वा त्यासुमारास प्रलंबित मागण्यांसाठी परीट (धोबी) समाजाच्या महिला-पुरुषांनी केलेला रास्ता रोको, शांततामय वातावरणात चालू असलेल्या या आंदोलनाच्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेला अमानुष लाठीमार, महिला पोलिसांनी महिलांचे केस धरुन त्यांना केलेली मारहाण, तसेच लहान मुलांनाही पोलिसांनी मारहाण करणे, या मारहाणीत कित्येक जणांचे मंगळसूत्र, हातातील घडयाळे चोरीला जाणे, पोलिसांच्या या मनमानी वर्तणुकीमुळे गरीब जनतेचा बळी जाणे, या घटनेची सखोल चौकशी करुन संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची त्यांनी केलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

7....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, दिनांक 12 मार्च, 2008 रोजी औरंगाबाद येथील क्रांती चौकात श्री.शिंदे यांच्या नेतृत्वाखाली धोबी समाजाचा मोर्चा काढण्यात आला होता. त्याबाबतची नोटीस त्यांनी 25 फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक आणि विभागीय आयुक्त यांना दिली होती. परंतु या संघटनेने पोलिसांची परवानगी घेतली नव्हती असे म्हटले आहे. मोर्चा काढावयाचा आहे असे त्यांनी पोलिसांना कळविले होते, पण त्यांना कोणतीही परवानगी दिली नाही असे पोलिसांनी संघटनेला कळविले होते. हा परिट समाज त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी रस्त्यावर उतरला होता. त्याचे कारण असे की, तुमच्या मागण्या मान्य करतो असे मंत्रिमहोदयांनी सांगितले होते.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:00

(श्री. प्रकाश शेंडगे ...

उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेबांनी देखील मागण्या मान्य करण्यासंदर्भात आश्वासन दिले होते. भांडे समितीच्या अहवालातील शिफारशी केन्द्राकडे पाठविण्याच्या संदर्भात तसेच या समाजाच्या आर्थिक विकासासाठी संत गाडगे महाराज आर्थिक विकास महामंडळा स्थापन करण्याच्या संदर्भात आश्वासन दिले होते. ते आश्वासन पूर्ण न केल्यामुळे या समाजाच्या लोकांनी मोर्चा काढला होता. त्या मोर्चावर पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला. त्यामध्ये पुरुष आणि महिला गंभीर जखमी झाले आहेत. एक लहान मुलगा देखील जखमी झालेला आहे. या शांततामय आंदोलनाचे नेतृत्व करणारे श्री. शिंदे यांना 25 पोलिसांनी रिंगण करुन मारले. माझा प्रश्न असा आहे की, शांततामयरित्या आंदोलन करणा-या ज्या आंदोलकांवर ज्या पोलिसांनी बेकायदेशीर लाठीहल्ला केला त्यांच्या कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? तसेच भांडे समितीचा अहवाल केन्द्राला पाठविण्यात येणार आहे काय ? या समाजाच्या विकासासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात येणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मोर्चासंबंधीचा अर्ज दिला असला तरी मोर्चाला पोलिसांनी परवानगी दिली नव्हती. 800-900 लोकांनी रस्त्याच्या मध्यभागी येऊन धरणे आंदोल केले. त्यामुळे वाहतूक खोळंबली. त्यावेळी पोलिसांनी त्यांना तेथून उठण्याची विनंती केली. त्यानंतर मोर्चेक-यांनी सरकारच्या विरोधात घोषणा देण्यास सुरुवात केली. आम्हाला जेलभरो आंदोलन करावयाचे आहे असे मोर्चेकरी सांगत होते. त्यावेळी त्यांना पोलीस व्हॅनमध्ये घालत असताना दगडफेकीला सुरुवात झाली. मागील आठवड्यामध्ये याच प्रश्नासंबंधी सविस्तर निवेदन झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मागण्यासंदर्भात केन्द्राकडे शिफारस करणार काय अशी विचारणा केली. त्यांच्या मागण्या संबंधित विभागाल कळविण्यात येतील. त्याप्रमाणे तो विभाग कारवाई करील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : आता सन्माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्याबाबत माझा एकच प्रश्न आहे की, आपणास क्रांती चौकाची परिस्थिती माहीत असेल. ज्या क्रांती चौकामध्ये मोर्चा अडवला गेला होता त्या ठिकाणी दगड आणून ठेवण्यासारखी परिस्थिती नाही. त्या ठिकाणी दगड आणून ठेवण्याचे काम पोलिसांनी केले होते की मोर्चेक-यांनी केले होते ? त्या ठिकाणी दगड एकत्र करुन ठेवण्यासारखी जागा नाही. याचा अर्थ असा होतो की, दगड खिशातून घेऊन आले होते. त्या ठिकाणी मोर्चातील लोकांनी दगडफेक केली नव्हती. मोर्चेकरी ऐकत नाहीत म्हणून पोलिसांनी बेमुर्वतपणे, निर्दयपणे मोर्चेक-यांना मारझोड केली. या मागासलेल्या समाजातील लोकांवर निर्दयपणे हल्ला करुन त्यांना जखमी करणे हे कोणत्या कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये बसते ? तेव्हा हे दगड कोठून आले त्याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : त्याठिकाणी दगडफेक झाली ही वस्तुस्थिती आहे. त्या दगडफेकीमध्ये 10 पोलीस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. आंदोलनकर्ते दगड खिशातून आणू शकतील किंवा पिशवीतून आणू शकतील. ...

श्री. मधुकर सरपोतदार : याबाबतीत आपण पोलिसांकडून माहिती घ्यावी...

श्री. प्रकाश शेंडगे : त्या समाजाच्या मागण्या मान्य करण्यास आपण सरकारला सांगावे.मागण्या मान्य होत नसतील तर मग रस्त्यावर उतरणार नाही तर काय करणार ? या समाजाच्या नेत्याला पोलिसांनी रिंगण करुन मारले....

**उपसभापती** : या लक्षवेधीवर चर्चा झालेली आहे. या संदर्भात सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन योग्य ती कारवाई करावी. आता मी पुढील लक्षवेधीकडे वळतो.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शेती महामंडळाच्या कामगारांना न्याय मिळणेबाबत

**मु. शी.** : शेती महामंडळाच्या कामगारांना न्याय मिळणेबाबत यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,प्रतापराव सोनवणे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शेती महामंडळ हे कर्ज, तोटा व इतर थकीत देणी इत्यादीमुळे 250 कोटी रुपयांच्या बोजामुळे डबघाईस येणे, बारमाही पाण्याखालच्या 70 हजार एकर जमिनीतून कोटयावधीच्या उत्पन्नाची अपेक्षा असताना सुमारे 90 कोटी रुपयांचा तोटा होणे, चुकीचे नियोजन, बेफिकीरी, मनमानी व अकार्यक्षमता व भ्रष्टाचार इत्यादी कारणांमुळे वर्षानुवर्षे तोटा व बोजा वाढत जाणार असल्याचे चित्र स्पष्ट होणे, कामगार नेत्यांनी जाहीर वक्तव्य करुन महामंडळाच्या जमिनीचा बळजबरीने कब्जा घेण्याची दिलेली धमकी, तडजोडीसाठी कामगार नेत्यांनी कामगारांच्या वेतनासह जमिनीची अवास्तव मागणी केल्यामुळे राज्य शासनाने जमीन देण्यास दिलेला नकार, सदर प्रकरणी सहानुभूतीपूर्वक विचार करुन कामगारांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. नारायण राणे ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, शेती महामंडळाचा कारभार अव्यवहार्यपणे चाललेला आहे आणि त्यामुळे हा सर्व गोंधळ व गैरकारभार मंडळात सुरु आहे. शेती महामंडळाकडे सुपूर्त केलेल्या एकूण 25637 एकर क्षेत्रापैकी माजी खंडक-यांच्या मालकीची एकूण 49727 एकर जमीन आहे. शासनाच्या धोरणानुसार माजी खंडक-यांची जमीन त्यांना परत करण्याचा निर्णय झ ालेला आहे. मात्र आजपर्यंत फक्त 14261 एकर एवढीच जमीन माजी खंडक-यांना परत करण्यात आली आहे. उर्वरित 35466 एकर जमीन माजी खंडक-यांना किती कालावधीत परत देण्याची प्रक्रिया पूर्ण होईल ? त्याचप्रमाणे दुसरा प्रश्न असा आहे कीख महामंडळाच्या ताब्यातील लागवडीस कायम स्वरुपी अयोग असलेल्या शेतजमिनीची बाजारभावाने विक्री करुन जे भांडवल उपलब्ध होईल त्या भांडवलाचा योग्य असा उपयोग केला तर महामंडळापुढील बहुतांशी प्रश्न निकाली निघू शकतील. मात्र या विषयात सकारात्मक निर्णय धडवून आणावयाचा असेल तर कामगारांनाही विश्वासात घेऊन त्यांनाही काही प्रमाणात जमीन द्यावी किंवा चांगले आर्थिक पॅकेज द्यावे व या सर्व गोंधळातून मार्ग काढावा असा प्रस्ताव शासनास कामगार संघटनेचे अध्यक्ष श्री. बी.आर.पाटील, कार्याध्यक्ष श्री. किशोर पवार, चिटणीस श्री. सुभाष कुलकर्णी यांचेमार्फत महसूल खात्याकडे दिनांक 17.7.2007 रोजी दिलेला आहे. कामगार संघटनेने दिलेला प्रस्ताव हा सकारात्मक असून हा प्रश्न सामंजस्याने सोडवावा अशी त्यांची भूमिका आहे. त्याचप्रमाणे या प्रश्नी मार्ग काढण्यासाठी, तडजोड करण्यासाठी दोन पाऊले मागे घेण्याचीही तयारी कामगार संघटनेने घेतली आहे. या सर्व परिस्थितीचा फायदा उचलून तातडीने शासन खंडकरी, भूमिहीन, शेतमजूर, गरीब शेतकरी, तसेच दलित, आदिवासी, अन्य मागासववर्गीय
कामगार व प्रामुख्याने महिला कामगार यांना न्याय देणार काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, शेती महामंडळाकडे सुरुवातीला 85637 एकर जमीन होती. या सर्व जमिनीपैकी 49727 एकर जमीन खंडक-यांच्या मालकीची होती. माजी खंडक-यांना परत केलेली जमीन 14261 एकर आहे. या ठिकाणी एकूण जमीन शिल्लक आहे त्यातील लागवडीखालील जमीन 45907 एकर आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रतापराव सोनवणे यांनी शेती महामंडळात मोठया प्रमाणात गैरव्यवहार व गैरकारभारामुळे शेती महामंडळ डबघाईस आलेले आहे अशा प्रकारचे मत व्यक्त केले. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, सदरहू शेती

3...



श्री. नारायण राणे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महामंडळ डबघाईस येण्यामागची कारणे वेगळी आहेत. पहिले कारण असे आहे की, शेती महामंडळाकडे मळे आहेत. हे सर्व मळे पाटबंधारे विभागाच्या पाण्यावर अवलंबून आहेत. पाटबंधारे विभागाकडून या मळयांसाठी लागणारे पाणी दिवसेंदिवस कमी होऊ लागल्यामुळे मळयांचे उत्पन्न देखील मोठया प्रमाणात कमी झाले आहे. या सर्व मळयातून ऊसाचे उत्पादन घेतले जाते. परंतु या मळयांना आवश्यक असणारे पाणी उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे प्रत्येक मळयाचे उत्पन्न कमी झाले आहे आणि त्यामुळे शेती महामंडळास तूट आली आहे. या ठिकाणी बरीच जमीन खंडक-यांची शिल्लक आहे. त्या जमिनीतून देखील ऊसाचे उत्पादन घेतले जाते. परंतु त्या ठिकाणचे ऊसाचे उत्पादन देखील पाण्या अभावी घटत चालले आहे आणि त्यामुळे देखील शेती महामंडळ तोटयात आहे. महामंडळातील कामगारांचा पगार, तसेच प्रशासकीय खर्च शेती महामंडळ करु शकत नाही. कामगारांच्या पगारासाठी आणि प्रशासकीय खर्चासाठी राज्य सरकार मदत करीत आहे. शेती महामंडळाला तोटा होत असल्यामुळे व महामंडळाचा कारभार व्हायबल होत नाही,असे सरकारच्या निदर्शनास आल्यानंतर खंडक-यांच्या जमिनी परत देण्याचा निर्णय घेतला. राज्य सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर या ठिकाणी जे कामगार आहेत, ते कामगार अशी मागणी करीत आहेत की, शेती महामंडळ बंद करावयाचे असेल तर आम्हाला पैसे नको. आम्हाला जमीन देण्यात यावी. यासंदर्भात ते सर्वोच्च न्यायालयात गेलेले आहेत.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु...

श्री. नारायण राणे...

2006 साली केस क्रमांक 55093 या क्रमांकानुसार सुप्रीम कोर्टामध्ये दावा दाखल केला आहे. अजून तो प्रलंबित आहे. जमीन महामंडळाकडे आहे आणि ती विक्री करु नये किंवा खंडकऱ्यांना देऊ नये अशा सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डर्स आहेत. माझ्याकडे या प्रश्नाबाबत कामगारांच्या दोन बैठका झ ााल्या. मी त्यांना सांगितले की, तुम्ही जमीन मागू नका. नियमाने कामगारांना जमीन देणे असे कधी धडत नाही आणि कायद्यात तशी तरतूद नाही. तुम्हांला मागायचे असतील तर पैसे मागा आणि 1 लाख रुपये असतील तर अधिक मागा पण पैशात मोबदला मागा. जमीन मागू नका. जर तुम्हांला समझोता करावयाचा असेल तर पैशाच्या रुपाने पॅकेज देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेला दावा मागे घ्यावा लागेल. तोपर्यंत निर्णय घेता येणार नाही.या स्टेजला कामगारांची मागणी पूर्ण करावयाला शासन तयार आहोत परंतु पैशाच्या रुपामध्ये जमिनीच्या रुपामध्ये शक्य नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शेती महामंडळाच्या कामगारांच्या पुनर्वसनासंबंधीचा प्रश्न आहे. यामध्ये 10 हजार कामगार सातत्याने काम करीत आहेत. पुर्नवसनाची योजना पैशाच्या रुपाने पूर्ण करण्याची योजना मंत्रीमहोदयांनी सांगितली. मंत्रीमहोदयांनी याठिकाणी सांगितले. ही जमीन कामगारांना न देता एसईझेड प्रकल्पासाठी देण्याचा शासनाचा विचार आहे काय ? सुप्रीम कोर्टाने जमीन हस्तांतरण करण्यास विरोध केला. जी जमीन लागवडीयोग्य आहे तिच्यावर पीक न घेण्याचे सरकारी आदेश आहेत . हे आदेश मागे घेऊन पीक लागवड करु देणार काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, ही जमीन खाजगी माणसाला देण्याचा किंवा एसईझेड करण्याचा शासनाचा निर्णय नाही. खाजगीरित्या मळे होते ते एक वर्षासाठी देत होतो. पण सुप्रीम कोर्टात कामगार गेल्यानंतर आपण आता ही जमीन काही वर्षाच्या मुदतीवर काही पिके काढायला देत होतो ते बंद केलेले आहे. महामंडळाला कामगारांची देणी खंडकऱ्यांना जमीन परत देऊन महामंडळ बंद करुन किंवा उरलेल्या जमिनीचे काही करता येईल काय याचा विचार सरकार करील. पण परत जमीन कोणाला तरी मुदतीवर देण्याचा निर्णय सरकार घेत नाही कारण सुप्रीम कोर्टाची बंधने आहेत.

======

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चंद्रपूर जिल्हयातील खाणीमधून उत्खनन केल्यानंतर जमिनींचे सपाटीकरण न करणे

**मु. शी.** : चंद्रपूर जिल्हयातील खाणीमधून उत्खनन केल्यानंतर जमिनींचे सपाटीकरण न करणे यासंबंधी सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, संजय दत्त, गोविंदराव आदिक, श्रीमती अलका देसाई, प्रा.सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा,चंद्रपूर,गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय खनिकर्ममंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चंद्रपूर जिल्ह्यात वेस्टर्न कोल फिल्डच्या अनेक खदानी असणे व सिमेंट कंपनीचे अंबुजा सिमेंट उपरवाई, अल्ट्राटेक सिमेंट आवारपूर, ए.सी.सी.सिमेंट, घुग्गुस. माणिकगढ सिमेंट गडचांदूर यांची लाईम स्टोन उत्खनन मायनीज लीज आहे. त्यामधून सदर सिमेंट कंपन्यांनी लाखो टन लाईम स्टोन काढून तसेच खाणीमधून कोळसा काढल्यामुळे या भागात मोठ मोठे खड्डे करुन ठेवलेले असणे, त्यामुळे पाण्याची पातळी कमी होणे, या भागातील अनेक लोकांचे व जनावरांचे खड्डयांत बुडून अपघाती मृत्यू होणे, सदर खाणींमधून कोळसा व लाईम स्टोन उत्खननामुळे ३०-४० वर्षापासून जमिनीचे सपाटीकरण न करणे, तसेच उत्खननास फेरपरवानगी देताना ग्रामपंचायत व या भागातील जनतेची कोणत्याही प्रकारे नाहरकत (जाहीरनामा ) न घेता परस्पर मंजूरी देणे, त्यामुळे पावसाचे पाणी व पुरामुळे शेतकऱ्यांच्या शेतात, घरांमध्ये व शहरी भागात शिरुन अनेक प्रकारचे नुकसान होणे, त्यामुळे कोटयावधी रुपयांचे नुकसान होणे, शासनाने कोळश्यासाठी तसेच लाईम स्टोन उत्खननासाठी परवानगी देताना खोदलेल्या खदानी पुर्ववत परत बुजवून टाकणे आवश्यक असणे, असे असताना व शासनाचा आदेश असतांना त्याकडे दुर्लक्ष करुन शासनाने घातलेले सर्व नियम धाब्यावर बसवून राजरोसपणे या भागात उत्खनन होणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व कारवाई."

..3.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण (खनिकर्म मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, यह विषय बहुत महत्वपूर्ण है. चंद्रपुर जिला और अन्य जिलों में यह समस्या पैदा हो रही है. सरकार अपनी जमीन खदान के लिए लीज पर देती है लेकिन लीज की अवधि समाप्त होने के बाद भी लीजधारक जमीन सरकार को वापस नहीं करता है और नूतनीकरण करने की कोशिश करता है. समस्या यह पैदा हो गई है कि उत्खनन करने के बाद, खदान से कोयला निकालने के बाद जो बड़े बडे गड्ढे हो जाते हैं उनको भरा नहीं जाता है, वैसे ही छोड़ दिया जाता है, जिसके कारण उन गड्ढों में गिरकर कई जानवर और आदमी मर रहे हैं. मैंने इस समस्या की ओर सम्माननीय मुख्यमंत्री जी एवम् सम्माननीय मंत्री श्री अशोक चव्हाण जी को पत्र लिखकर उनका ध्यान खींचा है. मैंने कई बार विभाग को पत्र लिखा है. करोड़ों रुपये का जो नुकसान हो रहा है, उसके लिए कौन जिम्मेदार है ? सरकार ने निवेदन में यह लिखा है कि,

" राज्यात भांडवली गुंतवणूक, रोजगार निर्मिती होऊन आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी उपरोक्त खनिजांचा विकास व पूरेपूर उत्खनन करणे आवश्यक आहे. परिणामी मुख्यत्वे खुल्या पध्दतीने उत्खनन करतांना विस्तृत स्वरुपात खड्डे निर्माण होणे अपरिहार्य आहे. जो पर्यंत खाणीचा व खनिजाचा पूर्ण विकास होत नाही तोपर्यंत उत्खननाचे काम करावे लागते ".

सभापति महोदय, हमारा यह कहना है कि उत्खनन का काम पूर्ण हो जाने के बाद या कोयला निकालने का काम पूर्ण हो जाने के बाद गड्ढों को भरा नहीं जाता है, वह भरना चाहिए. चंद्रपुर जिले में वेस्टर्न कोल फिल्ड की अनेक खदाने हैं तथा सीमेंट कंपनी की अंबुजा सीमेंट उपरवाई, अल्ट्राटेक सीमेंट आवारपुर, एसीसी सीमेंट, घुग्गुस, नानिकगढ़ सीमेंट गडचांदुर कंपनी की लाईम स्टोन उत्खनन मायनीज लीज है. इन कंपनियों ने बड़े बड़े गड्ढे करने के कारण जल स्तर बहुत नीचे चला गया है. बरसात के पानी तथा बाढ़ के पानी से फसल नष्ट हो रही है. जिससे करोड़ों रुपये का नुकसान हो रहा है. खाण खनिज (विकास व विनियमन) अधिनियम में यह प्रावधान है कि उत्खनन का काम पूर्ण होने के बाद गड्ढे पूर्ववत कर दिए जाए. लेकिन कंपनियां ये गड्ढे नहीं भरती है, ये गड्ढे वैसे ही छोड़ दिए जाते हैं जिससे जान-माल का नुकसान होता है. इसलिए मेरा यह प्रश्न है कि क्या सरकार इन कंपनियों को गड्ढों को भरने के लिए कहेगी, जो कंपनियाँ गड्ढों को नहीं भरेगी, नियम का पालन नहीं करेगी, क्या उनके खिलाफ कानूनी कार्रवाई की जाएगी ?

यानंतर श्री भोगले..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4.............

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी अतिशय महत्वाच्या प्रश्नावर चिंता व्यक्त केली आहे. हे स्वाभाविक आहे की, पर्यावरणाचा समतोल राखला पाहिजे. विदर्भामधील खनिज संपत्ती लक्षात घेता चंद्रपूर जिल्हयामध्ये जे माईनिंग लिज मंजूर केले त्यातून सिमेंट आणि कोळसा उत्खनन करण्याचे लिज केंद्र शासनाच्या माध्यमातून दिले आहे. विदर्भातील खनिज संपत्तीचे अधिकाधिक एक्स्प्लॉईटेशन केले पाहिजे. त्यातून उद्योग उभे राहिले पाहिजेत आणि लोकांना रोजगार मिळाला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. हा निर्णय घेत असताना खनीपट्टा मंजूर केला जातो त्यावेळी काही अटी व शर्ती घातल्या जातात. केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण मंत्रालयाची परवानगी घ्यावी लागते. एन्व्हायर्नमेंट इम्पॅक्ट असेसमेंट अँड मॅनेजमेंटच्या अटी व शर्ती पाळाव्या लागतात. माईनिंग प्लॅन मंजूर करावा लागतो. खनीपट्टा मंजूर केला जातो त्यावेळी इंडियन ब्यूरो ऑफ माईनिंग, कोल मंत्रालय यांच्याकडून मान्यता घ्यावी लागते. खाणीतून उत्खनन होते त्यावेळी स्वाभाविकपणे मातीचा ढिगारा निर्माण होतो. 2003 साली एक नवीन कायदा जो अंमलात आला तो म्हणजे सुरुवातीला असे व्हायचे की, फायनल क्लोजर व्हायचे, उत्खनन पूर्ण झाल्यानंतर ती माईन बंद करण्याची पध्दत आणि प्रोग्रेसिव्ह उत्खनन करण्याची पध्दत सुरु झाली. जसजसे काम होत जाते तसतसे मागच्या भागाचे सपाटीकरण करुन पुढे माईनिंग करीत जावे अशी अपेक्षा आहे. याबाबत शासनाला जरुर चिंता आहे. कायद्यामध्ये तरतुदी आहेत त्या तरतुदीप्रमाणे जर ही मंडळी कायद्याचे उल्लंघन करीत असतील तर त्याबाबत केंद्र शासनाच्या डायरेक्टर जनरल ऑफ माईनिंग सेफ्टी यांच्याकडून निरीक्षण केले जाते. परवानगी दिली आणि दुर्लक्ष केले असे होत नाही. डायरेक्टर जनरल ऑफ माईनिंग सेफ्टी हे निरीक्षण करतात, नोटीस बजावतात, नोटीसची अंमलबजावणी केली नाही तर दंड आकारला जातो. दंडात्मक कारवाई करतात. फौजदारी गुन्हा दाखल करता येतो.

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .......

त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे डब्ल्यूसीएलच्या बाबतीत अशा कुठल्याही प्रतिकूल तक्रारी आमच्याकडे आलेल्या नाहीत. तसेच खाजगी माईन्सला जी परवानगी देण्यात आली आहे त्यासंबंधीच्याही विशेष तक्रारी नाहीत. मुख्य विषय इतकाच आहे की, नदीच्या पात्रात मध्यंतरीच्या काळात पुर आल्यामुळे त्यासंबंधीच्या तक्रारी होत्या व त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक ती दक्षता घेऊन जो ढिगारा जमला होता तो काढून नदीच्या पात्राच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतले होते. त्यानुसार कार्यवाही झालेली आहे व यापुढेही अशी दक्षता घेतली जाईल. एकीकडे आपण माईनिंगच्या बाबतीत आपणअशा प्रकारे विचार करतो आणि दुसरीकडे मात्र विदर्भातील खनिज संपत्ती एक्सपोर्ट करावी असा विचार करतो परंतु अशा प्रकारे तक्रारी केल्या तर त्यात व्यत्यय निर्माण होईल. म्हणून सन्माननीय सदस्यांनी एखादी केस असेल तर त्याबाबत स्पेसिफिक माहिती दिल्यास त्याबाबत ताबडतोब कारवाई करण्यात येईल.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, यह समस्या आज की नहीं है, हमेशा ही यह समस्या पैदा होती है. उत्खनन के कारण पानी का स्तर 400 फुट नीचे चला गया है. आपने निवेदन में लिखा है कि नदी साफ की गई है. लेकिन चंद्रपुर मे् हर साल महापूर आ रहा है और जान -माल का नुकसान हो रहा है. फसल नष्ट हो रही है. मेरा अनुरोध है कि अधिकारियों की एक बैठक बुलाई जाए और इस समस्या को दूर करने के लिए उपाययोजना बनाई जाए.

श्री. अशोक चव्हाण : महोदय, सन्माननीय सदस्यांची अशी मागणी आहे की, यासंदर्भात एक बैठक घ्यावी. त्यानुसार मी असे सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर बैठक आयोजित करण्यात येईल व त्या बैठकीत सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या विशेष तक्रारी असतील तर त्यातूनही मार्ग काढण्यात येईल. तसेच ज्यांना लीज देण्यात आलेले आहे अशा कंपन्या जर कायद्याचे उल्लंघन करीत असतील आणि माईनिंग प्लॅनप्रमाणे त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचे सांगितले अथवा आढळून आले तर त्यात लक्ष घालून त्यांना करण्यास भाग पाडले जाईल आणि तरीही त्यांनी तसे केले नाही तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

------------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेसंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (पणन राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य हमी भाव देण्याची आवश्यकता" या विषयासंबंधी श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील वि.प.स. यांनी दिनांक 11 मार्च, 2008 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अ धि क मा हि ती**

( प्रेस : कृपया येथे सोबतची अधिक माहिती छापावी.)

-----------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "घर कामगारांसाठी घर कामगार मंडळ स्थापन करणे" या विषयासंबंधी सर्वश्री एस.क्यु.जामा व इतर वि.प.स. यांनी दिनांक 3 एप्रिल, 2007 रोजी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवर शासनातर्फे करण्यात आलेल्या निवेदनावर झ ाालेल्या प्रश्नोत्तराच्या वेळी आश्वासन दिल्याप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

**अधिक माहिती**

( प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

------------

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी.** : प्रचंड नागरिकीकरणामुळे राज्यात सेवाभावी संस्थांच्या प्रमाणात झालेली वाढ

**मु. शी.** : प्रचंड नागरिकीकरणामुळे राज्यात सेवाभावी संस्थांच्या प्रमाणात झालेली वाढ याबाबत श्री.संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"प्रचंड नागरिकरणामुळे राज्यात सेवाभावी संस्था प्रत्येक जिल्ह्याच्या धर्मादाय ट्रस्ट/ एनजीओ यांचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे त्यांचे डाक्युमेंटेशन (तपासणी) व रजिस्ट्रेशनचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परिणामी संस्थेच्या मंडळावरील पदाधिकाऱ्यांच्या तक्रारी, दैनंदिन कामकाजातील त्रुटी, हिशेब तपासणी तसेच विश्वस्तांची सुनावणी आदि कामाचा ताण वाढलेला आहे, एवढ्या मोठ्या प्रमाणात काम असणाऱ्या प्रत्येक जिल्ह्याच्या धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात कर्मचारी वर्गाची कमतरता कायमस्वरुपी जाणवते, बहुतेक ठिकाणी प्रभारी धर्मादाय आयुक्त आजही कार्यरत आहेत, त्यामुळे सहाजिकच निर्णय प्रक्रियेवर बंधने येतात, त्यामुळे प्रत्येक धर्मादाय न्यास/एनजीओ/सेवाभावी संस्था आजही मंजुरीअभावी कार्य करु शकत नाहीत, पर्यायाने समाजाचे फार मोठ्या स्वरुपात नुकसान होत आहे, सदरची बाब शासनाच्यावारंवार निदर्शनास आणूनही त्यावर कुठलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, पर्यायाने समाजाचे नुकसान तर होत आहेच, शासनासही याची झळ पोहचत आहे, तरी स्थायी स्वरुपाचा धर्मादाय आयुक्त व इतर अनुषंगिक कर्मचारी वर्ग यांची तातडीने नेमणूक व्हावी"

उपरोक्त बाब मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे, तरी कार्यवाही व्हावी.

यानंतर श्री. जुन्नरे .....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

-----------------------

**पृ. शी.** : पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांना तसेच प्रलंबित 58 पदांना मान्यता देणे

**मु. शी.** : पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांना तसेच प्रलंबित 58 पदांना मान्यता देण्याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्य शासनाने शिक्षण संस्थामध्ये मान्यता घेतल्याशिवाय अनुदान देऊ नये असा निर्णय घेतला आहे.

सन 2003-04 व 2004-05 मधील 569 पदांपैकी 511 पदांना मान्यता दिली असून या दोन वर्गातील 58 पदे अद्यापही मान्यतेसाठी प्रलंबित आहे.

सन 2005-06, 2006-07,2007-08 या तीन वर्षाचे प्रस्ताव श्ांसनास प्राप्त झाले असून अजूनही मान्यता दिली नाही. गेली 3 वर्षे हे शिक्षक विना वेतन काम करीत असून अनेक शिक्षकांचे संसार वेतनाअभावी उद्ध्वस्त झाले आहेत. अनेक शिक्षकांची लग्ने जमली आहेत परंतु शिक्षकांना पगार मिळत नसल्यामुळे त्यांची लग्ने मोडली जात आहे. ही गंभीर समस्या असल्यामुळे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास विनंती आहे की, पायाभूत पेक्षा वाढीव पदांच्या प्रलंबित मान्यता एक महिन्याच्या आत प्रदान करण्याबाबत शासनाने कार्यवाही करावी व शिक्षकांना दिलासा द्यावा ही विनंती.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : समाजसेविकांना अहिल्याबाबई पुरस्कार देण्याबाबत

**मु. शी.** : समाजसेविकांना अहिल्याबाबई पुरस्कार देण्याबाबत याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

महिला व बालविकास क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेलया समाज सेविकांच्या संस्थांची दाखल घ्यावी व इतर समासेविका, संस्थांना त्यापासून प्रेरणा मिळावी म्हणून राज्य शासनामार्फत पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार देण्यात येतात. दर वर्षी राज्यस्तरावर एका महिलेस एक लाखाची रोख रक्क्कम व स्मृतीचिन्ह देण्यात येते तसेच प्रत्येक जिल्हयात एका समाजसेविकेस एक पुरस्कार (रु. 10,000/-) असे 35 व राज्यातील 6 स्वयंसेवी संस्थांना प्रत्येकी ( रुपये 25,001/-) हे पुरस्कार गेल्या चार वर्षापासून दिले गेले नाहीत. सदर मागणीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी कबूल केले होते की, सदर त्वरीत पूर्ण केली जाईल परंतु ही मागणी पूर्ण न होता या महिलांच्या जखमेवर मीठ चोळले गेले आहे. त्यामुळे हे पुरस्कार व स्मृतीचिन्ह त्वरीत देण्याकरिता आपण शासनास निर्देश द्यावेत अशी मी विनंती करीत आहे.

-------------

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जिल्हा बीड प्रशासनाने संपादित केलेल्या जमिनींचा निधी अद्यापि शेतक-यांना न मिळणे

**मु. शी.** : जिल्हा बीड प्रशासनाने संपादित केलेल्या जमिनींचा निधी अद्यापि शेतक-यांना न मिळणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदय, शासनाकडून बीड जिल्हा प्रशासनास संपादित केलेल्या निरनिराळया प्रकरणात निधी प्राप्त झालेला असून प्रशासनाने या निधीचे वाटप शेतक-यांना केलेले नाही. 72,97,371/- रु. चा निधी शेतक-यांना अद्याप वाटप न झाल्यामुळे शेतक-यांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे.त्यासंदर्भातील माहिती पुढील प्रमाणे आहे.

| अं.क्र. | संचिका क्र | प्रयोजन | रक्कम | प्राप्त दिनांक | कोठून प्राप्त |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 24/98 | पा.त.खंडोबाचीवाडी | 2,03,557/- | 3.10.2006 | रो.ह.यो. |
| 2 | 51/98 | गा.त.तांबवा | 4,81,446/- | 3.10.2006 | रो.ह.यो. |
| 3 | 19/03 | गा.त.क्र.1चिंचपूर | 2,10,914/- | 3.10.2006 | रो.ह.यो. |
| 4 | 18/99 | गा.त.खडकी-टोकवाडी | 84,998/- | 3.10.2006 | रो.ह.यो. |
| 5 | 45/96 | गा.त.क्र.3 केज | 4,88,967/- | 3.10.2006 | रो.ह.यो. |
| 6 | 53/96 | गा.त.क्र.10 केज | 3,71,295/- | 28.9.2006 | रो.ह.यो. |

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.....

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 18/02 | पा.त.क्र.1 पिसेगाव | 9,95,335/- | 28.9.2006 | रो.ह.यो. |
| 8 | 34/96 | पा.त.क्र.3 लाडेवडगाव | 1,13,646 | 28.9.2006 | रो.ह.यो. |
| 9 | 44/96 | गा.त.4 केज | 6,23,344/- | 30.6.2006 | रो.ह.यो. |
| 10 | 48/96 | पा.पु.यो.कावळ्याचीवाडी | 1,570/- | 13.1.2006 | म.जि.प्रा.वि. अंबाजोगाई |
| 11 | 19/99 | पा.पु.यो.कान्हापूर | 372/- | 13.1.2006 | म.जि.प्रा.वि. अंबाजोगाई |
| 12 | 5/2000 | पा.पु.यो.लाडेवडगांव-जवळबंन | 3,528/- | 13.1.2006 | म.जि.प्रा.वि. अंबाजोगाई |
| 13 | 8/97 | पा.पु.यो.केज-धारुर 12 गावे अंतर्गत टाकळी, ता.केज | 2,336/- | 13.1.2006 | म.जि.प्रा.वि. अंबाजोगाई |
| 14 | 24/96 | पा.पु.यो.केज-धारुर 12 गावे शेलगांव गांजी | 2,015/- | 13.1.2006 | म.जि.प्रा.वि. अंबाजोगाई |
| 15 | 5/99 | पा.पु.यो.केज 12 गावे सुकळी केज13.1.2006 | 856/- | 13.1.2006 | म.जि.प्रा.वि. अंबाजोगाई |
| 16 | 49/96 | पा.पु.यो.नायगांव | 6,820 | 13.1.2006 | म.जि.प्रा.वि. अंबाजोगाई |
| 17 | 4/97 | पा.त.चिखली | 3,97,647/- | 3.10.2006 | रो.ह.यो. |
| 18 | 57/96 | गा.त.म्हतारगांव | 90,922/- | 28.9.2006 | रो.ह.यो. |
| 19 | 15/01 | पा.त.3 आंबेवडगांव | 55,447/- | 28.9.2006 | रो.ह.यो. |
| 20 | 55/95 | गा.त.2 रेपेवाडी | 88,783/- | 28.9.2006 | रो.ह.यो. |

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | 85/96 | गा.त.3 उमरी | 3,90,800/- | 3.7.2007 | रो.ह.यो. |
| 22 | 34/94 | पा.त.3 जिवाचीवाडी | 1,35,558/- | 3.7.2007 | रो.ह.यो. |
| 23 | 84/96 | गा.त.औरंगपूर | 4,03,403/- | 3.7.2007 | रो.ह.यो. |
| 24 | 41/96 | पा.त.3 बेंगळवाडी | 89,790/- | 3.7.2007 | रो.ह.यो. |
| 25 | 52/96 | पा.त.2 डिघोळअंबा | 8,41,952/- | 3.7.2007 | रो.ह.यो. |
| 26 | 7/97 | पा.त.2 जहांगीरमोहा | 1,30,944/- | 3.7.2007 | रो.ह.यो. |
| 27 | 73/96 | गा.त.5 एकुरका | 3,37,636/- | 3.7.2007 | रो.ह.यो. |
| 28 | 71/96 | पा.त.सावंतवाडी | 2,77,959/- | 3.7.2007 | रो.ह.यो. |
| 29 | 65/96 | पा.त.रुईधारुर | 62,575/- | 4.1.2008 | ल.पा.वि. जि.प.बीड |
| 30 | 81/96 | पा.त.रुईपिंपळा | 4,02,956/- | 4.1.2008 | ल.पा.वि. जि.प.बीड |

एकूण रक्कम= 72,97,371/-

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ..

अशा प्रकारे 2006 ते 2008 या काळापर्यंत 30 गावाचा मावेजा राज्य सरकारने जिल्हा प्रशासनाकडे दिला होता परंतु त्यांनी पैशाचे वाटप केलेले नाही त्यामुळे या रकमेवरील व्याजाची जबाबदारी नेमकी कोणावर राहणार आहे असा प्रश्न निर्माण झाला आहे. या भागातील शेतक-यांना उपासमारीला तोंड द्यावे लागत आहे अशा स्थितीत जर नोकरशाह पैशाचे वाटप करीत नसतील तर ही चुकीची गोष्ट असून तातडीने आठ दिवसात या मावेजाचे वाटप करण्याचे आदेश शासनाने सबंधित अधिका-यांना द्यावेत अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : नवी मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक श्री.अनंत काळे यांची गोळया घालून केलेली हत्या

मु.शी : नवी मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक श्री.अनंत काळे यांची गोळया घालून केलेल्या हत्येबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यानी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : यानंतर माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधान सभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"दिनांक 21.4.2008 रोजी सकाळी 9.00 वाजता नवी मुबई महानगरपालिकेचे सदस्य श्री.अनंत काळे यांची रस्त्यात गोळया घालून हत्या करण्यात येणे व श्री. अनंत काळे यांच्यावर गोळीबार करण्यात आल्यानंतर वोकहार्ट रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि तेथे उपचार होण्यापूर्वीच त्यांना मृत घोषित करणे, श्री.अनंत काळे यांचेवर उपचार होऊ न शकल्याने त्यांना मृत घोषित करण्यता येणे, ही घटना घडल्यानंतर पोलिसांनी तातडीने दखल न घेतल्यामुळे गुन्हेगारांना अटक होण्यास व श्री.काळे यांना उपचार मिळण्यात हयगय झाल्याचे स्पष्ट होणे, नवी मुंबईत या घटनेमुळे निर्माण झालेला तणाव, दहशतीचे वातावरण या संदर्भात राज्य शांसनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना "

सभापती महोदय,नवी मुंबईमध्ये अनेक प्रकल्प येत आहेत आणि त्यामुळे नव्या मुंबईची वाढ होत असून त्या ठिकाणी गुन्हेगारी वाढत आहेत. त्यामुळे ऐराली विभागात मोठया प्रमाणावर अशांतता माजलेली असून त्यातून नगरसेवकाची हत्या झालेली आहे. काल कॉग्रेसचे एक नगरसेवक श्री.अनंत काळे यांची गोळया घालून हत्या करण्यात आली होती. आज ऐरोली सारखा विभाग अतिशय सवेदनशील म्हणून ओळखला जात आहे. नवीन मुंबईमध्ये अनेक नवीन प्रकल्प येत आहेत त्यामुळे जमिनीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारातून मोठया प्रमाणावर हत्या घडत आहेत त्यामुळे या भागातील लोकांच्या मनामध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. ऐरोली विभागातील पोलीस स्टेशनमध्ये वर्षानुवर्षे अधिकारी आणि हवालदार काम करीत आहेत परंतु त्यांच्या बदल्या झालेल्या नाहीत . सभापती महोदय, मी याठिकाणी अतिशय गंभीर विषयाच्या

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संदर्भात विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे. या विभागातील काही नगरसेवकांचे संरक्षण काढून घेण्यात आलेले आहेत तेव्हा त्यांना पुन्हा संरक्षण देण्यात आले पाहिजे. नगरसेवकांचे संरक्षण काढून घेण्यात आल्यामुळे त्यांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झ्ालेले आहेत कै.अनंत काळे हे कोणाच्याही व्यवहारात लक्ष न घालणारे लहानसा इस्टेट एजन्सीचा व्यवसाय करणारे नगरसेवक होते अशा व्यक्तीची हत्या करण्यात आली असल्याने ज्यांनी त्यांची हत्या केलेली आहे त्यांना त्वरित अटक करण्यात यावी व या प्रकरणाची चौकशी सीआयडी कडे देण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करते.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





पृ.शी : इंग्रजांच्या काळातील मुंबईतील रेल्वे स्टेशनाची नावे बदलणे

मु.शी : इंग्रजाच्या काळातील मुंबईतील रेल्वे स्टेशनाची नावे बदलण्या बाबत श्री.दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.दिवाकर रावते ( विधान सभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

इंग्रजाच्या काळापासून मुंबईतील रेल्वे स्टेशनची नावे एल्फिस्टन, ग्रॅन्ट रोड आदि नावे दिलेली असून आता स्वतंत्र भारतात ही नावे बदलणे आवश्यक असल्याने एल्फिस्टनचे नाव न्यू प्रभादेवी, ग्रॅन्ट रोडचे नाव ऑगस्ट क्रांती महात्मा गांधी रेल्वे स्टेशन तसेच चर्नी रोडचे मुंबादेवी अशा प्रकारे नामांतर करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाने रेल्वे मंत्र्याकडे त्वरित पाठवावा तसेच वरील रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याचा ठराव मुंबई महानगरपालिकेने यापूर्वीच केलेला आहे वरील रेल्वे स्थानकांची नावे बदलण्याबाबत राज्य शासनाने काय उपाययोजना केली आहे याबाबत तातडीने निवेदन करावे "

सभापती महोदय, इंग्रज गेल्यानंतर इंग्रजाच्या आठवणसुध्दा पुसून टाकण्याचा या देशात स्वातंत्र्यानंतर निर्धार व्यक्त केला व निर्णय घेण्यात आला होता त्यानुसार अनेक इंग्रजी रस्त्यांची व चौक्यांची नावे बदलण्यात आलेली आहेत. इतकेच नव्हे तर इंग्रजानी उभ्या केलेल्या पुतळयांची आठवण राहता कामा नये म्हणून ते पुतळे सुध्दा काढून टाकण्यात आलेले आहेत. देशाचा स्वाभिमान व अस्मिता टिकावी म्हणून स्वातंत्र्यवीरांची आणि थोर समाज सेवकांची नावे रस्त्यांना व चौकांना देण्यास आपण सुरुवात केलेली आहे.

सभापती महोदय, एल्फिन्स्टन स्टेशनचे नाव "प्रभादेवी" करावे अशी ंसकल्पना मी महापौर असतांना मांडली होती आणि त्या संदर्भात सभागृहात एक ठराव देखील आणला होता त्यानंतर 2002 साली ममता बॅनर्जी रेल्वे मंत्री असतांना त्यांना संपूर्ण इतिहास देऊन एक पत्र लिहिले व एल्फिन्स्टन स्टेशनचे नाव प्रभादेवी करण्यात यावे असे कळविले होते.

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यानंतर त्यांचे मंत्रीपद गेले. त्यानंतर माननीय श्री.नितीशकुमार हे रेल्वेमंत्री झाले. त्यावेळी मी माननीय खासदार श्री.सुरेश प्रभू यांच्या माध्यमातून त्यांनाही पत्र पाठवून याबाबत विनंती केली होती. माननीय श्री.सुरेश प्रभू यांनी 19.2.2002 ला नामदार श्री.नितीश कुमार, तत्कालीन रेल्वे मंत्री यांना मी त्यांना पाठविलेल्या पत्राच्या प्रतीसह पत्र पाठविले त्यात त्यांनी म्हटले होते की, मुंबईतील एल्फिस्टन रोड या नावाऐवजी 'प्रभादेवी' हे नाव रेल्वे स्टेशनला देण्यात यावे. श्री.सुरेश प्रभू यांच्या पत्राला अनुसरून, त्यांनी दिलेले पत्र आणि मला पाठविलेल्या पत्राची प्रत त्याच्या पोचपावतीसह माझ्याकडे 5.2.2003 ला माझ्याकडे आलेले आहे. त्यानंतर मी सतत याची चौकशी करीत राहिलो तेव्हा माझ्या असे निदर्शनास आले की, अशा प्रकारे केंद्र सरकारकडून प्रस्तावाला मान्यता देण्याची मानसिकता असली तरी राज्य सरकारकडून असा एक प्रस्ताव जाणे आवश्यक आहे म्हणून मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून या सभागृहाचे नेते नामदार श्री.आर.आर.पाटील यांना विनंती करतो की, आपण बेळगाव-कारवार सीमा प्रश्नासंबंधात जसा ठराव येथे आणला होता आणि एकमताने पास केला होता त्याप्रमाणे या अधिवेशनामध्ये आपण एक सर्वसंमतीने ठराव करू या की, एल्फिस्टन रोड या रेल्वे स्टेशनचे नाव बदलून 'प्रभादेवी' असे द्यावे. सभापती महोदय, त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेने चर्नी रोड या स्टेशनचे नाव बदलून 'मुंबादेवी' म्हणून करण्याचाही प्रस्ताव रेल्वे मंत्रालयाकडे पाठविला आहे त्याचाही विचार आपण करावा. तसेच 'ग्रँट रोड' हे नाव मोडीत काढावे आणि तेथून जवळच असलेल्या ऑगस्ट क्रांती मैदानाची स्मृती म्हणून त्या स्थानकाला 'ऑगस्ट क्रांती' हे नाव द्यावे अशा प्रकारचा प्रस्ताव तातडीने येथे मंजूर करून केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे पाठवावा. जेणे करून या उर्वरित इंग्रजांच्या स्मृतीदेखील पुसल्या जातील आणि त्या त्या भागाला सन्मान प्राप्त होईल. धन्यवाद.

***

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 15:35

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवेळी झालेल्या पावसामुळे आंबा, काजू पिकांचे होत असलेले नुकसान.

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवेळी झालेल्या पावसामुळे आंबा, काजू पिकांचे होत असलेले नुकसान याबाबत श्री. परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.परशुराम उपरकर यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा पिकांसारखे नगदी पीक काजू हेसुद्धा असणे, अवेळी पडणारा पाऊस यामुळे आंब्याबरोबर काजूचेही तितकेच नुकसान झाले असणे., परंतु त्यांना तेवढी नुकसान भरपाई मिळत नाही. या पावसामुळे 50 टक्के काजू पीक वाया जाऊनही त्यांना नुकसान भरपाई कमी मिळते. तसेच काजूला हमी भाव मिळावा. काजू पिकाला विमा संरक्षण मिळावे, गोव्यातील काजू बोंडू खरेदी करणाऱ्यांकडून होणारी लुबाडणूक थांबवून काजू बोंडूचा भाव निश्चित करावा., आयात-निर्यात धोरण ठरविताना काजू बागायतदार संघटनेला विश्वासात घ्यावे. अशा अनेक मागण्या या काजू बागायतदार संघटनेच्या असून या न्याय्य मागण्यांना न्याय देण्याकरिता दिनांक 1 मे, 2008 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. या काजू बागायतदारांच्या रास्त मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घेण्याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे. "

सभापती महोदय, या काजू बागायतदारांना आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून यावे लागते आहे त्याबद्दल शासनाने लक्ष घालून या काजू बागायतदारांना न्याय द्यावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारा विनंती करतो.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होऊन दुपारी 4.15 वाजता पुन्हा भरेल.

( 3.38 ते 4.15 मध्यंतर )

( यानंतर सौ.रणदिवे....3एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)**

पृ.शी : राज्यातील शिक्षण क्षेत्राची विश्वसनियता संपुष्टात येऊन शिक्षण क्षेत्राची झालेली वाताहात

मु.शी : राज्यातील शिक्षण क्षेत्रातील विश्वसनियता संपुष्टात येऊन शिक्षण क्षेत्राची झालेली वाताहात या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते,नितीन गडकरी,डॉ.दीपक सावंत, सर्वश्री विनोद तावडे,अरविंद सावंत,मधुकर चव्हाण,डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री श्रीकांत जोशी,रामनाथ मोते,संजय केळकर यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु)

**तालिका सभापती** : आता "राज्यातील शिक्षण क्षेत्रातील विश्वसनियता संपुष्टात येऊन शिक्षण क्षेत्राची झालेली वाताहात" या विषयाच्या संबंधात सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्य यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे. त्यावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 15:45

श्री. सुरेश शेट्टी..

सभापती महोदय, राज्यामध्ये, प्राथमिक शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण या संबंधी काही प्रस्ताव आणले होते. त्यासंबंधी साधारण 18 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले होते. 18 सन्माननीय सदस्यांपैकी साधारणपणे 7 सन्माननीय सदस्यांनी उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण या संबंधी विचार मांडले होते. याठिकाणी सन्माननीय सदस्यांचे मी प्रथम मन:पूर्वक धन्यवाद व्यक्त करतो. या सभागृहामध्ये पहिल्यांदाच साधारणपणे सहा ते साडे सहा तास केवळ शिक्षण या विषयावर चर्चा झालेली आहे. या अगोदर शिक्षकांचे वेतन, प्रॉव्हीडंड फंड, प्रमोशन, भत्ते, ट्रान्सफर, रजा या संबंधी केवळ चर्चा करण्यात आली होती. मागील अधिवेशनामध्ये शिक्षणावर अर्धा ते एक तास चर्चा केली होती. याठिकाणी मी माननीय सभापती यांचे देखील अभिनंदन करु इच्छितो. पहिल्यांदाच शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा त्यांनी घडवून आणली.

या ठिकाणी मी सांगू इच्छितो की, आज महाराष्ट्रामध्ये 17.8 लाख विद्यार्थी उच्च व तंत्र शिक्षण घेत आहेत. राज्यामध्ये एकूण 2310 कॉलेजेस व इंस्टीटयूशन्स आहेत. गेल्या 10 वर्षामध्ये आपण पाहत आहोत की, बीए, बीकॉम, बीएससी या सारखे ट्रॅडीशनल शिक्षण घेण्यापेक्षा व्होकेशनल कोर्सेस व टेक्नीकल कोसेस शिकण्यामध्ये विद्यार्थी जास्त रुची घेत आहेत.

सभापती महोदय, सध्या देशाचा जीडीपी 9 टक्के आहे. ज्या प्रमाणात जीडीपीचा दर वाढत आहे त्या प्रमाणात इंफ्रास्ट्रक्चर इंडस्ट्री देखील वाढत आहे. त्याच प्रमाणात टेक्निकल लोकांची देखील मागणी वाढत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये 2.7 लाख विद्यार्थ्यांना टेक्निकल प्रशिक्षण दिले जात आहे हे सांगत असताना मला आनंद होत आहे. इतर राज्यांच्या तुलनेत टेक्निकल प्रशिक्षणाच्या बाबत महाराष्ट्र राज्य फार पुढे आहे. गेल्या वर्षी टेक्नो कार्यक्रमामध्ये, 17 इंजिनियरींग कॉलेजेस आयआयटीच्या दर्जापर्यंत आणण्यासाठी त्यांचे अपग्रेडेशन करण्यात आले. पुढील येणाऱ्या वर्षामध्ये, केंद्र शासनाने एकूण आयटीआयची 54 केंद्रे निवडलेली आहेत. या केंद्रांचे अपग्रेडेशन करण्याकरिता केंद्र शासनाने 250 कोटी रुपयांची ग्रँट दिलेली आहे. केंद्र शासनाने, 2.5 कोटी रुपये प्रत्येक आयटीआयला ग्रँट देण्याचे मंजूर केलेले आहे. तसेच पुढील वर्षी देखील अशाच प्रकारची ग्रँट केंद्र शासनाकडून दिली जाईल याची मी आपल्याला खात्री देतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 15:45

श्री. सुरेश शेट्टी..

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये 12 कन्व्हेन्शनल युनिव्हर्सिटी आहेत. नाशिक जिल्हयामध्ये मुक्त विद्यापीठ निर्माण करण्यात आलेले आहे तसेच एक हेल्थ युनिव्हर्सिटी तयार करण्यात आलेली आहे. राज्यातील 8 डीम्ड युनिव्हर्सिटींना युजीसीने मान्यता दिलेली असून निधी देखील दिलेला आहे. तसेच इतर 12 नॉनग्रँट युनिव्हर्सिटी आहेत. उच्च व तंत्र शिक्षणा संबंधी या ठिकाणी चर्चा करीत असताना मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्यामध्ये वैद्यकीय शिक्षणाकरीता एकूण 18 शासकीय मेडीकल कॉलेजेस आहेत. त्यांची इंटेक कॅपेसिटी 2060 विद्यार्थ्यांची आहे. राज्यामध्ये 10 प्रायव्हेट अनएडेड मेडीकल कॉलेजेस आहेत. त्यांची इंटेक कॅपेसिटी 970 विद्यार्थ्यांची आहे. तसेच 11 डिम्ड युनिव्हर्सिटी असून त्यांची इंटेक कॅपेसिटी 1340 विद्यार्थ्यांची आहे. राज्यामध्ये 4 शासकीय दंत महाविद्यालये आहेत. त्यांची इंटेक कॅपेसिटी 240 विद्यार्थ्यांची आहे व अन्य 17 कॉलेजेसची इंटेक कॅपेसिटी 1330 आहे. डिम्ड युनिव्हर्सिटी 7 आहेत त्यांची इंटेक कॅपेसिटी 560 विद्यार्थ्यांची आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ......

या ठिकाणी वैद्यकीय शिक्षणासंबंधी बोलत असताना मी फार आनंदाने सांगू इच्छितो की, आज आपण विद्यार्थ्यांना जे वैद्यकीय शिक्षण देतो त्यामध्ये जितकी फी आपण आकारतो तेवढ्या कमी फीमध्ये संपूर्ण देशात कोणत्याही राज्यामध्ये शिक्षण देत असतील असे मला वाटत नाही. 25 हजार रुपयांमध्ये एका एम.बी.बी.एस. विद्यार्थ्याला आपण शिक्षण देतो. आपला खर्च किती आहे हे सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत प्रत्येक अधिवेशनामध्ये खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये फीमध्ये वाढ होत आहे याबाबत चर्चा उपस्थित करतात. खाजगी वैद्यकीय महाविद्यालये नक्की फी वाढवतात कारण मेडिकल कॉलेजचा खर्च सुध्दा तितकाच आहे. पण महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की, या राज्यामध्ये कमीतकमी फी घेऊन आपण वैद्यकीय विद्यार्थ्यांना शिक्षण देतो. यासोबत मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासनाने जे धोरण घेतलेले आहे त्यानुसार आपण अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रोफेशनल कोर्समध्ये संपूर्ण फी एवढी स्कॉलरशीप देतो. मग कोणताही कोर्स असो. त्यामध्ये मॅनेजमेंट कोर्स असो, केटरींग असो, मेडिकल असो, इंजिनिअरींग असो त्या ठिकाणी एस.सी. एस.टी. च्या विद्यार्थ्यांना संपूर्ण स्कॉलरशीप आपण महाराष्ट्रात देतो. ओबीसींना 50 टक्के तसेच इकॉनॉमीकल बॅकवर्ड क्लासचे जे विद्यार्थी आहेत त्यांना सुध्दा आपण स्कॉलरशीप देतो. हे सर्व करीत असताना आपण हे सुध्दा मान्य करतो की, गेल्या पन्नास वर्षामध्ये शिक्षण चळवळीमध्ये जे चार प्रमुख गट आहेत त्यामध्ये सरकार, संस्था चालक, शिक्षक आणि विद्यार्थी या चारही गटामध्ये काही ना काही कमी दिसून येते. सन्माननीय सदस्य प्रा. नवले साहेबांनी अशी सूचना केली की, आपण एक कमिटी नेमावी आणि याचा एक स्टडी ग्रूप तयार करावा. केंद्र सरकारने नॅशनल नॉलेज कमिशनची स्थापना 2005 मध्ये स्थापन केले. आदरणीय प्रधानमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी त्याची सुरुवात केली. श्री. सॅम पित्रोडा जे या नॅशनल नॉलेज कमिशनचे अध्यक्ष आहेत त्यांनी 2006-07 मध्ये त्यांचा अहवाल सादर केला. केंद्र सरकारने तो अहवाल पूर्णपणे स्वीकारलेला आहे. महाराष्ट्र शासनाने आपल्या सर्व युनिव्हर्सिटीजना त्या अहवालाचे वाटप केले आणि त्यांच्या सूचना मागवून घेतल्या. मी या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. सुरेश शेट्टी ......

अहवालातील काही महत्वाचे जे मुद्दे आहेत ते आपल्याला वाचून दाखवतो. ते ऐकल्यानंतर उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण आणि वैद्यकीय शिक्षणच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्यांचे समाधान होईल असे मला वाटते. या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, "This is a landmark initiative in the history of government planning. We believe the education agenda outlined in the XIth Plan is a critical step towards realizing the objective of an equitable society. It is also fundamental to our continuing growth, employment generation, infrastructure development and other developmental priorities." त्यानंतर उच्च शिक्षण आणि तंत्रशिक्षणासंबंधी ज्या शिफारसी या आयोगाने केल्या आहेत त्या सभागृहाला वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की,

- "Expansion, inclusion and rapid movement in quality by enhancing public spending, encouraging private initiative and initiating the long overdue major institutional and policy reforms, will form the core of the XIth Plan effort."

क्वॉलिटी इंम्प्रुव्हमेंटच्या संदर्भात ॲडमिशन असो, करिक्युलम असो, असेसमेंट असो, ॲक्रेडीशन रेटींग, टिचर्स कॉम्पीटंस याबाबत यामध्ये उल्लेख केलेला आहे. यामध्ये टिचर्स कॉम्पीटन्स ॲंड टिचर्स मोटिवेशन बाबतचा महत्वाचा मुद्दा यामध्ये घातलेला आहे. जे एक्झिस्टींग ॲफिलिएटेड कॉलेजेस आहेत त्यांचे रिस्ट्रक्चर कसे करावयाचे आणि रिसर्चची पॉलिसी फॉर्म्युलेशन करण्याच्या दृष्टीकोनातून यामध्ये महत्व दिलेले आहे. रिसर्चच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत साहेब यांनी प्रश्न उपस्थित केला होता. आजकाल कोणत्याही कॉलेजमध्ये रिसर्च होत नाही असे त्यांनी सांगितले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

या अहवालामध्ये संशोधनाला जास्त महत्व दिलेले आहे. या अहवालामध्ये पुढे असे म्हटले आहे की,

- "An apex independent regulatory mechanism accompanied by greater autonomy and internal accountability; establish a high level committee to suggest specific reforms.
- Quantitative expansion through establishment of new government and private funded institutions and increased intake in existing institutions."

कारण देशातील एकूण लोकसंख्येचा विचार केला तर विद्यापीठांची संख्या कमी आहे. त्यामुळे देशात विद्यापीठांची संख्या वाढवावी लागेल. मग ती उच्च शिक्षणासंबंधी असोत किंवा वैद्यकीय शिक्षणासंबंधी असोत. अहवालात पुढे असे म्हटले आहे की,

- "Reduce disparities based on gender, caste, region etc. through differential support.
- Establish 30 new Central Universities,....."

सभापती महोदय, आताच एक तासापूर्वी मी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी मला सांगितले की, महाराष्ट्र राज्यामध्ये एक सेंट्रल युनिव्हर्सिटी मंजूर करण्यात आल्याबाबतचे केंद्र सरकारकडून एक पत्र आले आहे. त्यासाठी 700 एकर जमीन उपलब्ध करुन द्यावी, असे त्या पत्रात म्हटले आहे. संपूर्ण देशामध्ये केंद्र सरकार 30 नवीन सेंट्रल युनिव्हर्सिटीज स्थापन करणार आहेत. यासंदर्भात अहवालात असे म्हटले आहे की,

- "Establish 30 new Central Universities, 16 in States where they do not exist and 14 as World Class Universities"

मुंबई विद्यापीठाने फी वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी फीमध्ये वाढ करु नये असे चर्चेच्या वेळी सांगितले आहे. परंतु 25 वर्षापूर्वी 250 रुपये, 300 रुपये

...3Q 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

अशी फी ठरविली होती. त्यामध्ये वाढ केली नाही तर विद्यापीठ चालविणे शक्य होणार नाही. त्यासाठी स्कॉलरशिप, फेलोशिप दिली जाईल. सध्या एस.सी.एस.टीच्या विद्यार्थ्यांना लोन दिले जाते. परंतु ते किती वर्षापर्यंत देऊ शकतो ? त्याबाबत विचार करावा लागेल. एक विद्यार्थी पोस्ट ग्रॅज्यूएशनचे शिक्षण घेत असेल तर त्याला कर्ज दिले जाईल. पाच वर्षानंतर त्याने त्या कर्जाची परतफेड करावी असे बँकेमार्फत वर्क आऊट केले जात आहे. मला वाटते या योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना फायदा होईल. अहवालात पुढे असे म्हटले आहे की,

- "Establish a National Science and Engineering Research Board for rejuvenation of research in Universities"

याठिकाणी रिसर्च संदर्भात सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत मी सांगेन की, संपूर्ण राज्यातील कुलगुरुंची एक बैठक राज्यपालांनी घेतली होती. त्या बैठकीमध्ये वैद्यकीय विद्यापीठ असो की उच्च शिक्षणाचे विद्यापीठ असो, त्या विद्यापीठाकडून कोणते संशोधनाचे काम सुरु आहे याबाबतची चर्चा झाली होती. अहवालात पुढे असे म्हटले आहे की,

- "Launch a national Mission in education through ICT coverage in all the Universities and colleges;
- Revitalize and reform polytechnics through industry linkage and teacher development, establish 210 community colleges and 700 polytechnic."

सभापती महोदय, तंत्र निकेतनला उद्योग जोडण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने अगोदरच स्वीकारलेले आहे आणि त्याची अंमलबजवणी होत आहे. किती आयटीआयला उद्योगांशी जोडलेले आहेत त्याची माहिति मी देणार आहे.

सभापती महोदय, मी उच्च शिक्षणासंबंधी बोललो होतो, आता मी वैद्यकीय शिक्षणासंबंधी बोलणार आहे.

नंतर श्री.शिगम

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुरेश शेट्टी...)

या संदर्भात अहवालात असे म्हटले आहे की, "The Indian Medical Council Act should be amended such that MCI functions only as a professional association, with powers to conduct nationwide examinations, and to provide licenses for those who wish to join the profession. Similar changes are needed for all the other Councils viz. Nursing Council, Pharmacy Council, Dental Council and Rehabilitation Council". मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाची जी मनमानी चालू आहे त्याबाबतीत आपल्याकडील डॉक्टर संपावर गेले होते. महाराष्ट्रातील गव्हर्नमेंट कॉलेजेसचे पी.जी. कोर्सेना एमसीआय रेकग्निशन देत नाही. परंतु अशा किती तरी प्रायव्हेट कॉलेजेस आणि डीम्ड युनिव्हर्सिटीज्ना एमसीआयने परवानगी दिलेली आहे. तोच मुद्दा आहे की, "The Indian Medical Council Act should be amended such that MCI functions only as a professional association."

"Policies of admission and fee structure of private colleges have to be regulated..." आपण या सभागृहामध्ये फी स्ट्रक्चर आणि ॲडमिशनच्या संदर्भात चर्चा केली. फी स्ट्रक्चर आणि ॲडमिशनच्या संदर्भात महत्वपूर्ण सूचना या अहवालामध्ये करण्यात आलेल्या आहेत. त्या मी आपल्याला वाचून दाखवतो. त्यात असे म्हटले आहे की, "Policies of admission and fee structure of private colleges have to be regulated not only to stop them from becoming sources of political and financial power but also to arrest falling standards." या पुढील जे स्टेटमेंट आहे ते अगदी महत्वपुर्ण आहे. "There should be only one All India Common Entrance Test for all students who would like to get admission to Self Financing Medical Colleges. Since the CBSE conducted examination for the 15% All India quota in Government Medical Colleges is taken by a very large number of students, this would appear to be the ideal examination whose ambit can be expanded. All Self Financing Medical Colleges should announce their fees in their prospectus so that

...3R 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुरेश शेट्टी...)

students can make their choice for admission. Information Technology should be used to increase transparency and efficiency in the admission, examination, administration, teaching, content delivery and other related processes." हे रेकमेण्डेशन जर जसेच्या तसे महाराष्ट्र शासनाने आपल्या धोरणामध्ये ॲक्सेप्ट केले तर आपले ॲडमिशन आणि फी स्ट्रक्चरचे जे प्रॉब्लेम्स आणि वाद आहेत ते मिटतील. ॲआयसीटीईच्या बाबतीत तसेच रेकमेण्डेशन दिलेले आहे. ॲआयसीटीईमध्ये सुध्दा चेंजेस करायला पाहिजे. ॲआयसीटीई आणि एमसीआयच्या संदर्भात दोन महत्वपूर्ण सजेशन्स या अहवालामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

यानंतर श्री गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.शिगम 16:40

श्री. सुरेश शेट्टी....

यासंबंधीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अहवालाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना हव्या असतील तर त्या त्यांना उपलब्ध करुन देण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन साहेबांनी काल अशी सूचना केली आहे की, अधिवेशन कालावधीत एक संपूर्ण दिवस वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण या विषयावर चर्चा केली पाहिजे. सदरहू अहवाल सन्माननीय सदस्यांना प्राप्त झाल्यानंतर त्या अहवालाचा सन्माननीय सदस्यांनी अभ्यास करावा आणि त्या अहवालाच्या अनुषंगाने त्यांनी शासनास काही शिफारशी सुचवाव्यात. या विषयाच्या बाबतीत सर्व पक्षाचे आमदार, विद्यापीठाचे कुलगुरु तसेच या विषयासंबंधीचे जे तज्ज्ञ आहेत, त्यांचे ओपिनियन घेऊन उच्च व तंत्र शिक्षण तसेच वैद्यकीय शिक्षण यासंदर्भात एक नवीन धोरण तयार करु. या ठिकाणी मॉयनॉरिटीज्च्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला गेला. मॉयनॉरिटीजसाठी स्पेशल प्लॅन दिला पाहिजे. यासंदर्भात नॅशनल कमिशनने ऑलरेडी रिकमंडेशन दिलेले आहे. मैं माननीय सदस्य को बताना चाहता हूँ कि अल्पसंख्यकों के लिए स्कॉलरशिप की स्कीम भारत सरकार ने शुरु की है और यह स्कीम पूरे देश के लिए है. महाराष्ट्र में भी हम लोग इस स्कीम का फायदा ले सकते हैं और अलग से अल्पसंख्यकों के लिए स्कॉलरशिप स्कीम बनाने की जरुरत नहीं है. केन्द्रीय सरकार ने बहुत अच्छी स्कीम निकाली है और महाराष्ट्र के विद्यार्थियों को इसका फायदा होगा. आई.आई.टी के बारे में एच.आर.डी. मिनिस्ट्री की जो योजना है, महाराष्ट्र शासनाचा त्या विभागाशी तसा काहीही संबंध नाही. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या एच.आय.डी. डिपार्टमेंटकडे ते कामकाज आहे.

डॉ.दीपक सावंत : या वर्षी आय.आय.टी.च्या जागा 9 टक्क्यांपर्यंत वाढणार आहेत. आपल्याकडे यासाठी जे इन्फ्रास्ट्रक्चर पाहिजे आहे, त्यात मोठी वाढ करणे आवश्यक आहे.

श्री. सुरेश शेट्टी : आय.आय.टी.चे इन्फ्रास्ट्रक्चरची व्यवस्था एच.आय.डी. मिनिस्ट्री बघते. राज्य शासनाची त्यात काही जबाबदारी नाही.

डॉ.दीपक सावंत : राज्य शासन म्हणून आपली काही तरी जबाबदारी आहे की नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : आमच्या विभागास त्या इन्फ्रास्ट्रक्चरशी काही देणे घेणे नाही. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सी.ई.टी.च्या संबंधित मुद्दा उपस्थित केला आहे. मी मघाशी नॉलेज कमिशनचा रिपोर्टमधील काही माहिती या ठिकाणी सांगितली त्यावेळी लिमिटेड सिटस् रिझर्व्ह फॉर इन्स्टीटयूशनसंबंधीचा मुद्दा कव्हर केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नास उत्तर द्यावयाचे राहून गेले असेल तर त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यास मी तयार आहे. ...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : आपण अभिमत विद्यापीठाच्या बाबतीत आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. अभिमत विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांकडून वारेमाप फी घेतली जाते. खाजगी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांकडून फी घेण्यात येते. या विषयाच्या संदर्भात सभागृहात अर्धा तास चर्चेची सूचना चर्चेला आली होती. त्या चर्चेला उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, याबाबतीत एक कायदा करण्यात येईल. तर तो कायदा कधी येणार? नॅशनल नॉलेज कमिशनचा रिपोर्ट वाचून दाखविला. त्या रिपोर्टमध्ये आणखी काही मुद्दे आहेत. त्यात असेही म्हटले आहे की, दर तीन वर्षांनी अभ्यासक्रमात बदल करणे आवश्यक आहे. ग्रेडींगची सिस्टीम कशी आहे. 50 टक्के मार्कस् कधी द्यावयाचे ? 25 टक्के मार्काचे वेटेज कसे पकडावयाचे ? टिचींग स्कील कशी असावी हाही एक महत्वाचा मुद्दा आहे. आपल्याकडे लिमिटेड इन्फ्रास्ट्रक्चर आहे. तर ते कसे पूर्ण करणार ? या सर्व गोष्टींची माहिती कृपया माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 16:45

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी सदनामध्ये अगोदरच सांगितले आहे की, यासंबंधात आम्ही एक नवीन विधेयक आणीत आहोत. कॅबिनेटसमोर लवकरच नोट तयार करुन ...... कॅबिनेटने मंजुरी दिल्यानंतर विधेयक सादर करु. सन्माननीय सदस्यांनी जवळजवळ सर्व प्रश्न याठिकाणी मांडलेले आहेत. नॅशनल नॉलेज कमिशनने ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्या खूप व्यापक स्वरुपाच्या आहेत. त्यामध्ये ट्रेनिंग स्कीम, लायब्ररी, आय.टी., टीचर्स एम्पॉवरमेंट इ. बाबींचा समावेश आहे. या कमिशनचा अहवाल सर्व विद्यापीठांना पाठविलेला आहे. आमदारांनाही हा अहवाल द्यायला आम्ही तयार आहोत. अजून अहवाल स्वीकृत केलेला नाही. विद्यापीठाच्या सूचना आल्यानंतर आणि या अहवालामध्ये जे कोणी इंटरेस्टेड आहेत त्यांच्या सूचना आल्यानंतर त्या तपासून शासन आपले धोरण ठरवील.

( **सभापतीस्थानी माननीय उपसभापती** )

**---**

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ( शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ. दिपक सावंत, सर्वश्री. विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, डॉ. निलम गोऱ्हे, सर्वश्री. श्रीकांत जोशी, रामनाथ मोते, संजय केळकर, यांनी नियम 260 अन्वये " राज्यात शिक्षण क्षेत्रात प्राथमिक, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षणात होत असलेला अभुतपूर्व गोंधळ, सर्वसामान्यांना वाऱ्यावर सोडून शिक्षणाचे झालेले बाजारीकरण, शाळा महाविद्यालयात अशैक्षणिक तत्वांचा वाढता प्रभाव, शिशुवर्गापासून प्रवेश घेताना पालकांकडून केली जाणारी प्रचंड वसूली, परिक्षा पध्दतीत होणारे सततचे बदल, परिक्षा घेताना होणारे असंख्य घोटाळे, पेपर फुटीचे व कॉपीचे वाढते भयानक प्रकार, बोगस गुणवाढ करुन उत्तीर्ण करण्याचे वाढते प्रकार, परिक्षा व परिक्षांचे निकाल वेळेवर लागत नसल्यामुळे विद्यार्थी व पालक वर्गात वाढत जाणारा असंतोष, राष्ट्रीय चारित्र्य घडविणाऱ्या संस्कारमय शिक्षणाचा अभाव, जागतिकीकरणामुळे आलेली शिक्षणक्षेत्रातील आव्हाने पेलण्याचा अभाव, नवीन तंत्रज्ञान व संगणकाचा बंधनकारक वापर करण्यात आलेले अपयश, त्यामुळे शिक्षणक्षेत्राची विश्वसनियताच संपुष्टात येऊन शिक्षणक्षेत्राची झ ाालेली वाताहात व याप्रकरणी करावयाची उपाययोजना विचारात घे�यात यावी." या विषयावर प्रस्ताव सादर केला होता.

सभापती महोदय, या सदनामध्ये अनेक वर्षांनंतर अतिशय महत्वपूर्ण असा विषय चर्चिला गेला आहे. म्हणून सर्व सन्माननीय सदस्यांचे मी मनापासून आभार मानतो. हे सभागृह सर्वसामान्य जनतेला न्याय देणारे आहे. या सदनात वेगवेगळया विषयावर विचारांचे मंथन होत असते. सर्वसामान्य माणसाला, दुर्लक्षित माणसाला न्याय मिळण्यासाठी लाखो लोकांचे प्रतिनिधीत्व आपण करतो. अशा प्रसंगी सदनामध्ये अशा विषयावर चर्चा झाल्याचा आनंद होतो. याठिकाणी सुंदर विषयावर चर्चा झाली. सर्वसामान्य माणूस, उपेक्षित माणूस चर्चिला गेला. या चर्चेमध्ये सहभागी होणारे सदस्य सर्वश्री भाऊसाहेब फुंडकर माननीय विरोधी पक्ष नेते त्याचप्रमाणे सर्वश्री अरविंद सावंत, एस.क्यू.झामा, फौजिया खान, कपिल पाटील, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री पाशा पटेल, परशुराम उपरकर, विक्रम काळे, मुजफ्फर हुसेन, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री रामनाथ मोते, प्रकाश शेंडगे आणि संजय केळकर यांचा मी आभारी आहे. सर्वच सन्माननीय सदस्यांनी खूप सुंदर चर्चा केली. चर्चेच्या वेळी शासनावर टीका होत असेल परंतु यातील त्रुटी पूर्णपणे निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला त्यामुळे केलेली टीका ही सकारात्मक भूमिकेतूनच मी घेणार आहे.

..3..



SSK/ MMP/ SBT/ 16:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके..........

सभापती महोदय, तुकारामांचा एक अभंग आहे. ' निंदकाचे घर असावे शेजारी, निंदक कामाचा कामाचा गडी हा आत्मारामाचा, निंदक आमुचा सखा आमुची वस्त्रे भूतफुका, निंदक अमुची काशी, अवघी पातके नाशी, सभापती महोदय, यामध्ये कोण कोणत्या पक्षाचा आहे, कोणत्या धर्माचा आहे, कोणत्या विचारांचा आहे हे महत्वाचे नाही. परंतु सर्वसामान्य माणसाच्या उत्थापनासाठी ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी आपले विचार व्यक्त केले असतील हे विचार ग्राहय आहेत, स्वीकारार्ह आहेत अशा प्रकारची भूमिका कोणत्याही सरकारला घेणे गरजेचे असते. याठिकाणी पहिल्यांदा विचार व्यक्त केला गेला की, शिक्षण हे सर्वांगीण विकासाची गंगोत्री आहे. शिक्षण हेच सर्व समाजाला परिवर्तित करणारे प्रभावी साधन आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:50

प्रा.वसंत पुरके..........

इतकेच नव्हे तर नेल्सन मंडेला यांनी म्हटले आहे की, 'Education is the powerful weapon, which you can use to change the world.' अख्ख्या जगाला बदलण्याची ताकद शिक्षणामध्ये असेल तर माननीय सभागृहाचे नेते आदरणीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील याठिकाणी उपस्थित आहेत, खऱ्या अर्थाने सिंचन आणि शिक्षण ही दोन्ही क्षेत्रे या दोन देवता आहेत. योगायोगाने सिंचनाच्या गंगोत्रीचा महासागर करण्याची ताकद ज्यांच्यात आहे ते आदरणीय मंत्री श्री.अजितदादा पवार याठिकाणी उपस्थित आहेत. सन्माननीय सभापती, सभागृहाचे सन्माननीय सदस्य यांना मी धन्यवाद देणार आहे. केवळ शिक्षकांवर कोरडे ओढण्याची मला हौस नाही. खरे म्हणजे शिक्षणाच्या संदर्भात बोलत असताना संपूर्ण जगाला बदलण्याची ताकद शिक्षणामध्ये असेल, original development education असेल तर याकडे तुम्ही आम्ही सर्वांनी मन:पूर्वक बघण्याची गरज आहे. म्हणून मी स्वत: विनंती केली होती. केवळ एक-दोन मिनिटाची चर्चा करुन या विषयाला न्याय मिळू शकत नाही. म्हणून सर्वांगीण चर्चा व्हावी यासाठी मी लोटांगण घालून विनंती केली होती. या सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या प्रस्तावावर संयमीपणे आपले विचार व्यक्त केले. मी त्यांना धन्यवाद देतो. हे शिक्षण प्रचंड महत्वाचे असेल तर या राज्याचा महसूल किती जमा होतो? शिक्षणावर खर्च किती होतो? उत्पन्नाच्या प्रमाणात शिक्षणावर खर्च किती होतो हा महत्वपूर्ण सूर याठिकाणी चर्चिला गेला आहे. एका फिलॉसॉफरने म्हटले आहे की, 'Money which is spent on education, it is not wasted, it is invested' जर शिक्षणावर होणारा खर्च हा जर वाया जाणार नसेल, ही गुंतवणूक आहे, असे असेल तर कोणत्याही जबाबदार सरकारने, जबाबदार राज्याने अधिकाधिक खर्च शिक्षणावर करणे गरजेचे आहे. 1986 साली शिक्षण आयोगाने म्हटले होते की, कोणत्याही राज्याचा शिक्षणावरील खर्च स्थूल उत्पन्नाच्या किमान 6 टक्के व्हावा. ही कोणाची अपेक्षा आहे? एकूण लोकसंख्या, आवश्यक गरजा, विविध समस्या सोडवावयाच्या असतील तर यावर होणारा खर्च तितक्या अपेक्षेत झालेला नाही हे मान्य करावेच लागेल. तरीही महाराष्ट्र राज्याचा शिक्षणावरील होणारा खर्च इतर राज्यांच्या तुलनेत बऱ्यापैकी आहे. याबद्दल मी खूप समाधानी आहे असे नाही. शिक्षणावर कर्नाटक राज्याचा 18.85 टक्के, गुजराथ राज्याचा 19.48 टक्के, केरळ राज्याचा 20.96 टक्के, राजस्थान राज्याचा 21.08 टक्के, उत्तरप्रदेश राज्याचा 21.85 टक्के, महाराष्ट्र

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके............

राज्याचा 22.75 टक्के खर्च आहे. तरीही समाधानी आहे असे म्हणण्याचे कारण नाही. कारण जाहीरपूर्वक, जबाबदारीने, समजून, उमजून समाजाचा विकास करावयाचा असेल तर अधिकाधिक खर्च शिक्षणावर व्हावयास पाहिजे. शिक्षण आणि सिंचन या दोन महत्वपूर्ण बाबी आहेत. म्हणून यामध्ये सुसंवाद साधणे आवश्यक आहे. रस्ते तुमच्या आमच्या शरीरातील पेशीसारखे आहेत. म्हणून शिक्षण या विषयाकडे जबाबदारीने लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात 2005-06 मध्ये 9918 कोटी रुपये, 2006-07 या वर्षात 11249 कोटी रुपये, 2007-08 या वर्षात 12303 कोटी रुपये शिक्षणावर खर्च झाला आणि यावर्षी म्हणजे 2008-09 या वर्षात 13042 कोटी रुपये खर्च होणार आहे. चढत्या क्रमाने खर्च होत आहे. कोणत्याही प्रकारची खोटी आश्वासने देऊन टाळ्या घेण्यापेक्षा असमर्थतेची जबाबदारी घेणे योग्य असते. म्हणून यथाशक्ती राज्याची उन्नती करावयाची असेल तर आर्थिक तरतुदीकडे अधिक लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, आपल्या आई वडिलांनी अपघाताने आपले नाव ठेवले असावे असे मला वाटते किंवा समजून, उमजून ठेवले असावे. संत ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे की, वसंतू तेथे वने, वने तेथे सुमने, सुमने पासे जने सारंगाने, गुरु तेथे ज्ञान, ज्ञानी आत्मदर्शन, दर्शनी समाधान आतिकेचे. संपूर्ण जगाच्या उन्नतीचा सोर्स कोणी असेल तर या समाजातील गुरुजन आहे. शिक्षकाची जबाबदारी प्रचंड आहे. म्हणून ही विनंती करीत असताना प्राथमिक शिक्षण कसे आहे? माध्यमिक शिक्षण कसे आहे? प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी किती आहेत? राज्याची व्याप्ती, राज्याची लोकसंख्या, राज्यातील भौगोलिक परिस्थिती विचारात घेता 66625 प्राथमिक शाळा आहेत............

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ......

त्यातून 1.52 कोटी विद्यार्थी शिक्षण घेतात. माध्यमिक शळांची संख्या 1830 असून त्यातून 1.20 कोटी विद्यार्थी शिकतात. उच्च माध्यमिक शाळांची संख्या 4969 एवढी असून त्यातून जवळपास 25 लाख विद्यार्थी शिकत आहेत अशा प्रकारे जवळपास 3 करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. एवढेच नव्हे तर शिक्षण ही जरी महत्वाची बाब असली तरी माझ्या राज्यातील, यादेशातील महंत, प्रज्ञावंत ज्ञानवंतांनी चिंतन करावे, अशी परिस्थिती आहे. या राज्याला, या देशाला पहिले नोबल पारितोषिक मिळवून देणारे अलौकिक प्रतिभाप्राप्त कवी गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर यांनी म्हटले आहे की, जेथे मनाला भीती शिवत नाही, आणि मस्तक उन्नत आहे, जेथे ज्ञानमत्ता आहे व समाज दुभंगलेला नाही, संकुचितपणाच्या घरगुती भिंतींनी तेथील शब्द बाहेर पडतात, सत्याच्या खोल दरीतून उत्स्फुर्तपणे, तेथे पूर्णत्व मिळविण्यासाठी अखंड उद्यमशीलता आपले बाहू पसरवित आहे. म्हणजे रुढींचे वाळवंट, विचारांचा निर्मळ ओघ ग्रासून टाकत नाही, जिथं होते समृध्द विचार आणि आचार तुझ्या प्रेरणेने अशा शब्दांच्या स्वरलोकात हे तात माझ्या देशा जागृत होऊ दे.

महोदय, या लोकांनी काय मागणं करावं तर संत ज्ञानेश्वरांनी एक वर मागितला होता तो म्हणजे "दुरितांचे तिमीर जावो, विश्व स्वधर्म सुर्य पाहो, जो जे वांच्छिल तो ते लाहो, प्राणिजात" या राज्यात, या देशात 750 वर्षापूर्वी जन्माला आलेल्या संत ज्ञानेश्वरांनी खऱ्या अर्थाने अध्यात्मिक लोकशाहीचा पहिला डंका वाजविला. एवढेच नव्हे तर जे दुरित आहेत, जे दास्य आहेत, जे लाचार आहेत, जे गुलामगिरीमध्ये आहेत अशा प्रकारच्या उपेक्षित लोकांच्या उत्थापनासाठी तुम्ही आणि आम्ही एकत्र येणे गरजेचे आहे. या राज्यातील अनेक विचारवंत असे आहेत, त्यांच्यापैकी ज्यांच्या नावाने आपण एक महत्वपूर्ण दिवस साजरा करतो. जो शिक्षक तन्मय, एकरुप, तद्रुप, समरस होऊन शिक्षणासारखे महत्वाचे काम करतो त्या शिक्षक बांधवांच्या पाठीवर एक प्रेमाचा हात फिरवावा. त्या शिक्षकाच्या कृतीची, त्याच्या वक्तृत्वाची, त्याच्या इफिशिएन्सीची कुठेतरी बुज राखावी म्हणून ज्यांच्या नावाने आपण हा 5 सप्टेबरचा दिवस साजरा करतो त्यांनीही आपले विचार व्यक्त करतांना सांगितले होते की, विद्यार्थ्यांना जे हवे आहे ते देणे एवढेच शिक्षकाचे काम नाही तर शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण केली पाहिजे. शिक्षण हे काही पालथ्या

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ......

घागरीवर टाकलेले पाणी नव्हे तर जे सर्वसामान्य विद्यार्थी आपल्या शाळेत येतात, हे शाळेत येणारे विद्यार्थी कसे असले पाहिजेत, हे विद्यार्थी कोणाचे आहेत, 73 व्या घटना दुरुस्तीच्या निमित्ताने खऱ्या अर्थाने नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषदा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकणारी जी मुले आहेत ती कोणाची मुले आहेत ? परवा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब सभागृह बंद होताना चिडले होते व त्यांनी आपला राग व्यक्त केला होता. पण हा राग कोणावर व्यक्त केला नव्हता तर जे जे घटक या शिक्षणाला गतिमान करणारे आहेत त्यांच्याविषयीचा होता, त्यांच्या चिडण्याचा उद्देश आकस व्यक्त करण्याविषयीचा नव्हता तर जे लोक या देशाच्या गंगोत्रीमध्ये गढूळ वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतील त्यांच्याविषयी हा राग आहे. या ठिकाणी मी नम्रपणे सांगू इच्छितो की, मागासवर्गीय व ग्रामीण भागातील शिक्षण कशामुळे मागासले, ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी विचार व्यक्त केले, माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी म्हटले की, शिक्षणाला न्याय द्यावयाचा असेल तर कदाचित शिक्षणाचे दुर्देवाने दोन वर्ग करावे लागतील की काय अशीही खंत त्यांनी व्यक्त केली. माननीय गृहमंत्र्यांनी राज्यात ग्राम स्वच्छता अभियान सुरु केले. त्यानंतर अनेक चांगल्या चांगल्या लोकांमध्ये होणारी भांडणे मिटविण्यासाठी त्यांनी तंटामुक्त गाव योजना देखील सुरु केली. खऱ्या अर्थाने अशा सर्व प्रकारच्या तनाच्या, मनाच्या आणि धनाच्या बिमाऱ्या दूर करावयाच्या असतील तर मनस्वच्छतेचा कार्यक्रम या राज्यात राबविणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी ग्रामीण भागातील शिक्षण कसे आहे, त्यातील शाळांची स्थिती कशी आहे, अवस्था कशी आहे, शिक्षक येतात की नाही, लायब्ररीची व लेबोरेटरीची सुविधा आहे की नाही, शिक्षक शिकवितात की नाही, रेग्युलरली, सिरियसली, सिन्सीअरली, पंक्चुअली येतात की नाही अशा प्रकारची खंत देखील माननीय फुंडकर साहेबांनी व्यक्त केली आहे. एवढेच नव्हे तर मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे मनापासून आभार मानतो कारण शिक्षणासारख्या विषयावर चर्चा उपस्थित करुन त्यावरील चर्चेच्या निमित्ताने उपस्थित झालेले अनेक विचारवंतांचे विचार शासनाला दिशादर्शक ठरणार आहेत. राज्यात खऱ्या अर्थाने जे 12 वी झालेले, ग्रॅज्युएट झालेले, 10 वी पास झालेले शिक्षक असतील, मॅट्रिक झालेले, 7 वी झालेले

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

शिक्षक किती आहेत हा महत्वाचा प्रश्न उपस्थित केला. म्हणून "Man must be respected on account of his merit, and not on his duty, caste, community and religion" असे एम.सी. छागला यांनी सांगितले. तसेच संत कबीर म्हणले की "साधू की जात मत पुछिए, पुछिए उनका ग्यान, तलवार की कीमत न किजिए, पडा रहने दो म्यान" माणूस कोणत्या जातीचा, कोणत्या धर्माचा, कोणत्या वर्णाचा, कोणत्या लिंगाचा, कोणत्या तालुक्याचा आहे हे महत्वाचे नाही, पण गुणवत्तेला तोड नाही, गुणवत्ता ही सार्वभौम शक्ती आहे. म्हणून यासंदर्भात खंत व्यक्त करीत असताना माझ्या राज्याचा शिक्षक सुध्दा कसा आहे, त्याची अवस्था कशी आहे, राज्याचा शिक्षकाच्या अवस्थेचे परीक्षण, परिशीलन, मनन, चिंतन, पठण, पर्यवेक्षण करणारे अनेक डोळस लोक आहेत. म्हणून मी सुध्दा आपले विचार चांगले आहे की नाही हे म्हणणार नाही पण त्यांनी अतिशय काळजीपूर्वक त्यांचे मनन केले आहे आणि सांगितले की, माझ्या गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नंदुरबार हे भाग आहेत. गडचिरोली, भंडारा यातील शिक्षक सुध्दा कसे आहेत त्यांनी हे मान्य केले आहे की, माझ्या चंद्रपूर आणि गडचिरोलीतील जी मुले आहेत....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ....

त्यांना स्वत:चे नाव देखील लिहिता येत नाही. मी कोणावरही टीका टिप्पणी करीत नाही. मला या ठिकाणी कोणाचीही निंदा नालस्ती करावयाची नाही. परंतु, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची वस्तुस्थिती मला नाकारता येत नाही. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये काम करीत असताना आपल्याला केवळ गोड बोलून चालत नाही, खुष करुन चालत नाही, वस्तुस्थिती नाकारुन चालत नाही. गडचिरोली, यवतमाळ, भंडारा जिल्हयाचा शिक्षणाचा दर्जा अगदी सुमार आहे. ही वस्तुस्थिती कोणीही नाकारु शकणार नाही. दादांनी आग्रह धरला आहे की, आपण सॅट केव्हा आणणार आहात ? शाळांचे वर्गीकरण व्हावयाला पाहिजे, शाळांचे ॲनालिसिस व्हावयाला पाहिजे. ही सर्वांची इच्छा आहे. गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, औरंगाबाद या सर्व जिल्हयांचा विचार केला तर या ठिकाणी अतिशय सुमार दर्जाचे शिक्षण दिले जात आहे अशी अवस्था आहे. अशा अवस्थेत जर शिक्षणाचा दर्जा मेंटेन होत नसेल तर, 1983 मध्ये अमेरिकेने शिक्षणाच्या संदर्भात सर्वेक्षण केले होते. सर्वसामान्य माणसाच्या पाल्याला चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळते की नाही या संदर्भात सर्वेक्षण करण्यात आले. त्यावेळेस सर्वांनी मान्य केले की, सर्वसामान्यांच्या पाल्यांना अतिशय सुमार दर्जाचे शिक्षण मिळत आहे. सुमार दर्जाचे शिक्षण देणे हे शत्रू राष्ट्राने आपल्या राष्ट्रावर बॉंब वर्षाव करण्यासारखे आहे. तसे हे सुमार दर्जाचे शिक्षण देण्याचा प्रकार आहे. सुमार दर्जाचे शिक्षण असता कामा नये. शिक्षणाच्या संदर्भात कविवर्य कुसुमाग्रजांनी म्हटले आहे की " मोडून पडला संसार परंतु मोडला नाही कणा, गुरुजी, आपण फक्त पाठीवर हात ठेवून लढ म्हणा." या शब्दांमध्ये असलेली प्रेरणा, करीष्मा, प्रेरणादायी विचार आपल्याला नाकारता येत नाही. शिक्षण हे दर्जेदार असले पाहिजे. ग्रामीण भागाच्या शिक्षणाच्या संदर्भात आपल्याला डोळेझाक करुन चालणार नाही. मुले शाळेत येतात कशी ? त्यांचे एन्रॉलमेंट कसे आहे ? मुलांची रिटेंशन कसे आहे ? त्यांचे आऊटपूट कसे आहे, क्वालीटी कशी आहे हे शोधावयाचे असेल तर झेरॉक्स कॉपीसारखी माणसे जन्माला आणण्यापेक्षा मी कधी कधी गमतीने म्हणतो की, माझ्या आदिवासी भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणारी मुले एवढी हुशार आहेत, एवढी हुशार आहेत की ते कधी नववी इयत्ते पर्यंत नापास होत नाहीत आणि दहावीला कितीही नवस केले तरी पास होत नाही या संदर्भात जर

..2..

प्रा. वसंत पुरके ...

अशी स्थिती असेल तर त्याला काय म्हणायचे ? हे वास्तव आपल्याला नाकारता येणार नाही. माझे 70 ते 80 टक्के शिक्षक अत्यंत प्रामाणिकपणे काम करीत असतात.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके....

सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांनी शिक्षणाविषयी खंत व्यक्त केली असल्यामुळे मी त्याची दखल घेत आहे. त्याचबरोबर शिक्षणाच्या संदर्भात कोणते निर्णय घेणार आहे हे सुध्दा मी येथे सांगणार आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे मी आभार मानतो व त्यांना हे सांगतो की या प्रस्तावावर कालच उत्तर दिले जाणार होते परंतु जर काही निर्णायक भूमिका घेणार असू तर ती भूमिका ऐकण्यासाठी सर्व सन्माननीय सदस्य येथे उपस्थित असले पाहिजेत, लोकशाहीला न्याय देणारे चार स्तंभ असून त्यामध्ये पत्रकारिता हा एक स्तंभ आहे. त्यामुळे शिक्षणाच्या संदर्भात कोणते निर्णय घेण्यात आलेले आहेत याची जाणीव त्यांना देखील व्हावी म्हणून आज या प्रस्तावाला उत्तर देण्यात येत आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेत असताना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी असे सागितले आहे की, ग्रामीण शाळेमध्ये काही शाळा अशा आहेत की त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय नाही, विजेची व्यवस्था नाही, शिक्षकांची व्यवस्था नाही. इतर शैक्षणिक सुविधा नाहीत. तरी सुध्दा 75 टक्के शाळांमध्ये आम्ही पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की ज्या क्षणी मी या पदाचा प्रभार घेतला होता तेव्हा पासून मी या क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी अशी खंत व्यक्त केली होती एस.एस.ए.च्या माध्यमातून मोठया प्रमाणावर पैसा येत असतो त्याचप्रमाणे त्यांच्या योजना पुष्कळ आहेत. त्यांच्याकडून किती पैसे येतात हा महत्वाचा मुद्दा नाही. परंतु जो काही पैसा उपलब्ध होत असतो त्याचे प्रॉपर प्लॅनिग करण्यात आले पाहिजे आणि प्रॉपर अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे असे मला वाटते. त्यामुळे ज्या आश्रमशाळांची दुरावस्था आहे वा ज्या शाळेत सुविधा कमी आहेत त्या ठिकाणी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न सरकार निश्चितपणे करणार आहे.

सभापती महोदय, कोणावर तरी कारवाई करण्यात यावी असे या ठिकाणी सांगण्यात येत असते. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, एक शाळा अशी आहे की त्या ठिकाणी शिक्षकांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके ...

जुन्याच प्रश्नपत्रिका वापरल्या आहेत. नवीन प्रश्नपत्रिका काढण्याचा या शिक्षकांनी काहीही त्रास घेतलेला नाही. फक्त अगोदरच्या प्रश्नपत्रिकेतील साल त्यांनी बदलले होते. 2007 च्या ठिकाणी 2008 एवढाच बदल त्यांनी केलेला आहे. अशा प्रकारे मुलांच्या आयुष्याबरोबर खेळण्याचा दुर्देवी प्रकार जर महाराष्ट्रात होत असेल तर सर्व शिक्षक बांधवांना माझी अशी विनंती आहे की या संदर्भात आपण केव्हा तरी विचार करण्याची गरज आहे. त्याचबरोबर आपले आत्मपरीक्षण आणि आत्मसमीक्षण करणे गरजेचे आहे. मी तुकारामांच्या एका अंभगाचा उल्लेख करणार आहे. लोकशाहीमूल्यामध्ये फक्त मुंडकेच मोजावयाची नसतात तर मेंदूची ताकद किती आहे, मेंदुची व्याप्ती किती आहे हे देखील मोजावयाचे असते. तुकारामाच्या अंभगात असे म्हटलेले आहे की, "सत्या असत्याशी मन केले ग्वाही, मानवले नाही बहुमता " अशा प्रकारे कठोर आत्मपरीक्षण सर्वांनी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शिक्षण मागे का राहिले आहे ? ग्रामीण भागातील शिक्षण मागे का राहिले आहे ? या ठिकाणी अत्यंत जाणकार आणि संवेदनशील राज्यकर्ते बसलेले आहेत आदरणीय आबांना मला अत्यंत नम्रपणे असे सांगावयाचे आहे की, ग्रामीण भागात पूर्वी जे शिक्षक रहावयाचे त्या शिक्षक बांधवावर समाजाचा इतका विश्वास होता की , माझा मुलगा शाळेत गेल्यानंतर तो कलेक्टर होऊनच बाहेर येणार असे त्यांना वाटत होते. अशा प्रकारचा अत्यंत दुर्दम्य आशावाद सर्व सामान्य समाजाचा होता. " ओंकार स्वरुपा, सद्‌गुरु समर्था, अनाथाच्या नाथा तुज नमो." तसेच " गुरुराव स्वामी असे स्वयंप्रकाशी त्यापुढे उदास चंद्र, रवी " असे म्हटले गेलेले आहे .जगातील सर्वच घटक हे दुय्यम आहेत परंतु दीपस्तंभासारखा जर कोणी असेल तर तो शिक्षक आहे अशा प्रकारचा विश्वास सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी व्यक्त केला होता. सर्व समाज हा बेसावध राहिला होता. त्यावेळच्या समाजाला असे वाटत होते की आपल्या गावात गुरुजी आहेत तेव्हा कोणाचे लग्न होवो, लग्न तुटो वा अन्य काही घटना घडलेली असली तरी दीपस्तंभासारखा, प्रेरणादायी माणसासारखा किंवा मार्गदर्शन करणा-या माणसासारखा जर कोणी असेल तर तो शिक्षकच आहे अशा प्रकारची शिक्षकाबद्दलची प्रतिमा तुमच्या आमच्या सगळयांच्या हृदयात घर करुन बसली होती. त्यामुळे हा समाज बेसावध राहिला होता. त्यानंतर त्याला

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यवस्थित पगार मिळावयाला लागल्यामुळे तो शिक्षक बांधव ग्रामीण भागात न राहता शहरात येऊन राहू लागला. सभापती महोदय, माझ्या शिक्षक बांधवाचे काहीही आरोप असले तरी मी त्यांच्याबरोबर चर्चा करण्यास तयार आहे. त्यांनी माझ्या समोर चर्चा करण्यासाठी बसावे मी त्यांच्या बरोबर चर्चा करीन. कोणत्याही शिक्षकाबद्दल माझ्या मनात आकस नाही. सन्माननीय सदस्य श्री. मोते यांनी सागितले की जर आमचे काही चुकत असेल तर आमच्यावर चाबूक ओढा, आमच्यावर टीका टिप्पणी करा. मी त्यांना सांगू इच्छितो की आपण शिक्षक आहोत . आपल्याला कोणालाही लपविता येत नाही आणि कोणालाही अकारण झाकता येत नाही. त्यामुळे मला एकच विनंती करावयाची आहे की पूर्वी समाजाने शिक्षकांवर एक प्रकारचा विश्वास टाकला होता परंतु आता जर या विश्वासाला तडा जाणार असेल तर सर्व शिक्षक बांधवांनी याचा साकल्याने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सांगितले की शासनाने शिक्षणाचा बटयाबोळ केलेला आहे. वाटोळे केले. परंतु मी मात्र तशा प्रकारे बिलकूल म्हणणार नाही याचे कारण असे की बोटावर मोजण्या इतक्या लोकांमुळे हे शिक्षण खाते बदनाम होत आहे परंतु 80 ते 90 टक्के शिक्षक डिव्होशनने आणि डेडीकेशनने काम करीत आहेत. ग्रामीण भागातील पालक त्यावेळी बेसावध राहिला होता शिक्षक बांधवाचे नाते मात्र ग्रामीण भागा ऐवजी शहरी भागाशी जुळले गेले आहे. सन्माननीय पाटबंधारे मंत्री श्री.अजित पवार यांना मी सांगू इच्छितो की, शिक्षक बांधवाचा पगार हा या राज्यातील त्याच स्टेटसच्या माणसापेक्षा 1000 ते 1100 रुपयांनी जास्त आहे. त्यांना घरभाडे भत्ता दिला जातो, नक्षलग्रस्त एरियामध्ये प्रोत्साहन भत्ता दिला जातो, आदिवासी भागात वेगळा प्रोत्साहन भत्ता दिला जातो, प्रवास भत्ता दिला जातो, वैद्यकीय भत्ता दिला जातो. चंद्रपूर आणि गडचिरोली भागातील शिक्षक नेहमी सावंतवाडीलाच एल.टी.सी.घेऊन जात असतात. मी याचा विचार करतो की त्या भागातील शिक्षक सावंतवाडीलाच का जाऊन येतात तेव्हा मला असे कळले की दोन्ही ठिकाणचे अंतर जास्त असल्यामुळे चंद्रपूर, गडचिरोली भागातील शिक्षक सावंतवाडीला जात असतात. या शिक्षकांना वैद्यकीय बिलाची प्रतीपूर्ती दिली जाते त्यांना दोन ते तीन लाख रुपयांपर्यत बिल देण्यास शासन तयार असते. एवढेच नव्हे तर या शिक्षकांच्या

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाल्यांना मोफत शिक्षण देण्याची सवलत या राज्यात आहे त्यामुळे शिक्षकांना मिळणारा पगार आणि आपण पार पाडत असलेले कर्तव्य याचा ताळमेळ घालण्यात आला पाहिजे असे मला वाटते. सर्व शिक्षक बांधव ग्रामीण भागात न राहता शहरी भागात रहावयास लागले तर ते योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी सांगितले की, मी जेव्हा ग्रामीण भागात टवाळक्या करावयाला, खेकडे पकडावयाला, मासे पकडावयाला जेव्हा जात होतो...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

तेव्हा गुरूजींच्या घरासमोरून जात नव्हतो. कारण औपचारिक शिक्षण आणि अनौपचारिक शिक्षण या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या होत्या. फक्त औपचारिक शिक्षण शिल्लक राहिले आणि संस्कार करणारे अत्यंत महत्त्वाचे असे शिक्षण मात्र मुलांपासून दूर गेले. यामध्ये असे झाले की, माझे सारे शिक्षक बांधव हे दूर जायला लागले. त्यामुळे त्यांना यासाठी वेळ मिळेनासा झाला. म्हणून रिडींग, रायटींग, स्पिकींग, लर्निंग ही सगळी स्कील्स विकसित होणे गरजेचे आहे त्यातच व्यत्यय निर्माण होऊ लागला. डेली नोटस् कशा काढाव्यात ? साप्ताहिक प्लॅन, मंथली प्लॅन, थ्री मंथ प्लॅन, लॉगबुक मेंटेन करणे, ऑब्झर्व्हेशन करणे, इन्स्पेक्शन करणे अशा ज्या शिक्षणाला अत्यंत पूरक अशा बाबी आहेत त्याकडे मात्र दुर्लक्ष झाले. सभापती महोदय, हे दोन घटक तर जबाबदार आहेतच, कारण "Teacher is ultimate arbitrator in education and research programme but sadly however, teacher is the most weak link in education chain" हे मी म्हणतो म्हणून नाही तर श्री.शेषाद्री नावाच्या माणसाने हे म्हटलेले आहे. "Teachers are without public reason today for his poor academic profile, for his educational performance, lack of accountability and absence of commitment." अशा प्रकारे श्री.शेषाद्री सारखी माणसे बोलू लागली तर तुम्हा आम्हाला या विचारांचा गांभीर्याने विचार करावाच लागेल. म्हणून का आम्ही गुणदोष पाहून अनेकांचे. इतर लोक टीका-टीपण्णी करतात, आम्हाला छळतात, लोक चिखलफेक करतात, नागवण्याचे प्रयत्न करतात तेव्हा इतरांच्या टीका-टिपण्णीचा विचार न करता ज्या ज्या माणसांनी स्वत:ला मनापासून आणि मन:पूत हा व्यवसाय स्वीकारला असेल त्याने स्वत:च्या व्यवसायाला आपण न्याय देतो आहोत की नाही हाही मनोमन विचार करणे गरजेचे आहे. म्हणून तिसरा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. माझा शिक्षक याला जबाबदार आहे की नाही हे मी नंतर सांगेनच. पण त्यापूर्वी माझा पालक, माझा शिक्षक यामध्ये जबाबदार आहेच. पण माझ्या या राज्यातील सुपरविजन करणारी जी यंत्रणा आहे ती जागरूक राहिली असती तर ... किती तरी मोठे मोठे लोक या यंत्रणेमध्ये आहेत. आमचे एचएम आहेत, माझे केंद्र प्रमुख आहेत, माझे एडीआय आहेत, माझा बीओ आहे, माझा इओ आहे, माझा डेप्युटी डायरेक्टर आहे, डायरेक्टर आहे, सचिव आहे, ही किती मोठी पदे आहेत., तेव्हा सुपरविजन करणारी यंत्रणा जागरूक राहिली असती, ठिकठिकाणी त्यांनी भेटी देऊन तपासणी

..... 3वाय 2 ..

केली असती, ऑब्झर्वेशन केले असते, खऱ्या अर्थाने मॉडेल टिचिंग केले असते तर माझा शिक्षक देखील बेसावध राहिला नसता. म्हणून सभापती महोदय, ही पहिली घटना आहे की, केवळ आम्ही शिक्षकांवर कारवाई केलेली नाही तर एका झटक्यामध्ये आम्ही आमच्या विभागाच्या दहाच्या दहा अधिकाऱ्यांना देखील निलंबित करण्याची कारवाई एकाच वेळी आम्ही केलेली आहे. एवढा मोठा पगार आम्ही त्यांना देत असू, त्यांच्याकडे आम्ही सुपरविजनची जबाबदारी सोपविली असेल तर मग याही लोकांनी अत्यंत जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. सभापती महोदय, हे झाले तीन घटक. मी असा विचार करतो की, या शिक्षणाच्या बाबतीत कोणते चार घटक महत्त्वाचे आहेत. सत्यनारायणाच्या स्तंभाप्रमाणे चार घटक या संदर्भात महत्त्वाचे असावेत. तशाच प्रकारे तुम्ही-आम्ही हा चौथा घटक देखील महत्त्वाचा आहे. माझी आपणा सर्वांनाच विनंती आहे, आबा आणि दादांनाही विनंती आहे की, कोणत्या माणसाची मते आपल्या विषयी खराब होतील याचा विचार न करता शिक्षणासंबंधात कोठलीही तडजोड करता कामा नये. माझी चार मते वाईट होतील किंवा होणारही नाहीत पण त्याचा विचार न करता शिक्षणाच्या संदर्भात तुम्ही-आम्ही थोडेसे निर्भिड राहिलो असतो, थोडेसे बेडर राहिलो असतो, थोडेसे कॉशस राहिलो असतो, अलर्ट राहिलो असतो तर मात्र माझ्या शिक्षक बांधवांच्या ज्या संघटना आहेत त्या मोठ्या व्हाव्यात. कारण संघटना या स्वत:ला न्याय देण्यासाठी असतात. स्वत:चे न्याय्य हक्क स्वत:च्या पदरात पाडून घेण्यासाठी संघटना असतात. पण केवळ दबाव आणून, प्रेशराईज्ड करून या शिक्षणाच्या वाट्याला येणारे जे दुर्दैवी दिवस आहेत ते दूर व्हावेत एवढीच माझी अपेक्षा आहे. मी या ठिकाणी नम्रपणे सांगेन की, माझ्या महाराष्ट्रातील 60 ते 62 जी महामंडळे आहेत, ती ज्याप्रमाणे बरबाद झाली तशाच प्रकारे हे शिक्षण मंडळ देखील बरबाद होऊ नये एवढीच विनंती मी या ठिकाणी करतो आणि येथे ज्या ज्या लोकांनी या संदर्भात सूचना केल्या आहेत त्यांची निश्चितपणे थोडी दखल घेण्याचा मी प्रयत्न करीन.

सभापती महोदय, ज्या संस्था चालकांनी, खरे तर खूप चांगल्या संस्था असणे गरजेचे आहे. माझ्या सर्व शिक्षक बांधवांची अपेक्षा आहे की, आता मुलांची संख्या कमी केली पाहिजे. अनेकांनी याबाबत सूचना केली आहे की, मुलांची संख्या खूप होते आहे म्हणून. सभापती महोदय, माझी माझ्या सर्व शिक्षक बांधवांना आग्रहाची विनंती आहे, सूचनादेखील आहे की, आज आपल्याला शंभर टक्के सेक्युरिटी आहे, जेथे आपल्याला 100 टक्के अनुदान आहे, जेथे आपल्याला 100 टक्के

..... 3वाय 3 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पगार आहे, तेथे मात्र चौदा-साडेचौदा मुले आहेत. 3-3 शिक्षक आहेत. आणि ज्या शाळेतील शिक्षकांना कसातरी 2000 रूपये पगार मिळतो, ज्या शाळेला सरकारचे एक टक्का देखील अनुदान नाही त्या ठिकाणी तुमचा मुलगा, माझा मुलगा, आयएएस अधिकाऱ्याचा मुलगा असेल, आयपीएस अधिकाऱ्यांचा मुलगा असेल त्याला प्रवेशासाठी रांगेत उभे रहावे लागते तरीही त्याला प्रवेश मिळत नाही. ही गोष्ट का ? म्हणून मॅन मस्ट बी रिस्पेक्टेड ऑन अकौंट ऑफ हिज मेरिट. त्यामुळे मेरिट आपल्याला डावलताच येत नाही. तेव्हा आपण सुमार दर्जाचे शिक्षण दिले तर आपल्याच लोकांशी, आपल्याच अपत्यांशी आपण बेईमानी करतो, गद्दारी करतो, प्रतारणा करतो आहोत असे होईल आणि हे दुर्दैवी दिवस तुमच्या आमच्या वाट्याला येतील म्हणून माझी विनंती आहे की, या ठिकाणी शिक्षणाच्या बाबतीत अतिशय जागरूक रहावे. शिक्षण देणे म्हणजे ही कुंभाराने मडके बनवावे अशी भूमिका असली पाहिजे वगैरे सारे ठीक आहे. परंतु तरीही माझ्या शिक्षक बांधवांच्या वाट्याला येणारे जे मन:स्तापाचे दिवस आहेत तेही आपण दूर केले पाहिजेत. माझे शिक्षक बांधव आज खेड्यावर जातात, वीटभट्टीवर धावतात आणि तेथील लोकांना सांगतात की, तुमचा मुलगा शाळेत आला पाहिजे. मग दिवाळी असो वा पोळा असो, त्या दिवसातही माझे शिक्षक बांधव हे या लोकांच्या मागे धावत असतात की, तुझा मुलगा शाळेत आला पाहिजे. अशा प्रकारे ते मुलांना शाळेत आणण्याचा प्रयत्न करतात. पण जेव्हा पालक स्वत:च बेजबाबदारपणे वागतो आणि सांगू लागतो की, नाही, माझ ी दोन-दोन, तीन तीन मुले आहेत पण मी त्यांना शाळेत पाठविणार नाही. ..

( यानंतर सौ.रणदिवे.....3झेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके . . . .

अशा प्रकारे जेव्हा बेडरपणे, बेजबाबदारपणे बोलतात, तेव्हा माननीय गृहमंत्र्यांना माझी हात जोडून विनंती आहे की, आता आपल्याला या राज्यामध्ये राईट टू एज्युकेशन असे बिल आणल्याशिवाय पर्याय नाही. ते विधेयक आणले पाहिजे. म्हणजे ज्या बापाला चार-चार, पाच-पाच पोरे जन्माला घालताना काही वाटले नाही आणि शाळेमध्ये पाठविताना मात्र ही तुमची जबाबदारी असेल तर तुम्ही त्यांना घेऊन जा असे सांगितले जाते. मास्तर त्याचा पगार थांबेल म्हणून त्या मुलांना शाळेमध्ये घेऊन जातो. अशा प्रकारचा निर्ढावलेपणा थांबवावयाचा असेल तर आपल्याला सदनामध्ये राईट टू एज्युकेशनचे बिल आणणे गरजेचे आहे आणि मी ते आणणार आहे. जर एखादा बाप आपल्या मुलाला शाळेमध्ये पाठवत नसेल तर अनायसे माननीय गृहमंत्र्यांकडे पोलीस विभाग आहे. अशा वेळी त्याला तुरुंगामध्ये टाकण्याशिवाय पर्याय नाही. हा मॅसेज अशा प्रकारच्या लोकांपर्यंत जावयास पाहिजे. जर कोणी दारु पीत असेल किंवा कोणी एखाद्याचा खून केला किंवा एखाद्याला मारले तर त्याला तुरुंगामध्ये ठेवले जाते. जर एखाद्याने विनयभंग केला तर त्या माणसाला तुरुंगामध्ये ठेवले जाते. तशाच प्रकारे मी जन्म दिलेल्या माझ्या मुलाला शाळेमध्ये पाठवत नाही म्हणून मला तुरुंगामध्ये जावे लागले असा जर लोकांमध्ये मॅसेज गेला तर अनेक लोक आपल्या मुलांना शाळेमध्ये पाठविल्याशिवाय रहाणार नाहीत. ही काळाची गरज आहे.

(सर्व सन्माननीय सदस्य बाके वाजवितात.)

माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी बाके वाजविली आहेत, त्यामुळे मला आता हे बिल आणण्यास काही हरकत नाही.

श्री.अजित पवार (खाली बसून) : मग लगेच आबा, कोपरापासून ढोपरापर्यंत . . . .

**उपसभापती** : पण असे झाले तर फार मोठे प्रॉब्लेम निर्माण होतील. ढोपरच फुटले तर काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, याबाबतीत किमान अपेक्षा आहेत, म्हणजे ऊस तोडणी कामगार आहे, मल्लवाले आहेत, माकडवाले आहेत, डमरुवाले आहेत, नंदीवाले आहेत, असे खूप लोक आहेत. परवा माझ्या कळंब गावामध्ये असे अनेक लोक जमले होते, त्यांचे तेथे तंबू लागलेले होते. माझ्या लक्षात आले की, अरे, हे तर माझे लाभार्थी आहेत. येथील 40-50 मुले हे माझे लाभार्थी आहेत. मग मी स्वत: तेथे थांबलो. त्या मुलांना माझ्या आश्रमशाळेमध्ये घेऊन गेलो. त्यांना

. . . .3 झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके . . . .

आंघोळ करावयास लावली. त्यांना जर्सी पॅन्ट दिली. मग ती मुले ओळखता देखील येत नव्हती एवढा त्यांच्यात फरक पडला होता. तेथे ती मुले थोडावेळ थांबली आणि रात्री एक-दीड वाजता त्यांचे आई-वडील आले आणि त्या मुलांना घेऊन पळून गेले. अशा प्रकारामुळे माझे शिक्षक बांधव देखील मजबूर झालेले आहेत, हताश झालेले आहेत. परंतु यामुळे काय होणार आहे ? तर आदिवासी, कोरकू, भिल्ल, कातकरी हे जे उपेक्षित, जंगलामध्ये रहाणारे लोक आहेत तेच लोक तुरुंगामध्ये जातील. सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगेसाहेब, या मुलांना मोबाईल स्कूल देऊन चालणार नाही. त्यांना वस्ती शाळा दिली पाहिजे, त्यांना निवासी शाळा दिली पाहिजे. त्याला केवळ गाडीमधून फिरवले तर मास्तर शिकविणार नाही, घंटी वाजविल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून आपल्या लोकांना समजावून सांगावे की, त्यांना शाळेमध्ये जबरदस्तीने पाठवावे. अशा प्रकारची तुम्ही-आम्ही कठोर भूमिका घेतल्याशिवाय मुले शाळेमध्ये थांबणार नाहीत. आपण फक्त एन्रोलमेंट करतो. 100 टक्के मुले शाळेमध्ये राहिली पाहिजेत म्हणून केवळ एन्रोलमेंटचे नाटक करता कामा नये. मुलांची उपस्थिती सातत्याने असणे गरजेचे आहे. कारण गणित, मराठी, भूगोल, इंग्रजी, बिजगणित, भूमिती हे महत्वाचे विषय दररोज सिन्सिअरली, स्टेप बाय स्टेप, बाय हार्ट, सिन्सिअरली, एकाग्रपणे शिकविल्याशिवाय मुलांना समजत नाहीत. मी जेव्हा गणित शिकत होतो, तेव्हा मला असे विचारावयाचे की, अरे, तुला हे गणित समजले काय ? मी सपाटून हात वर करीत होतो. कारण गणित समजले नव्हते आणि नाही समजले असे सांगितले तर मार खावा लागत होता आणि "होय" असे म्हटले तर ते समजले नव्हते. अशा प्रकारे ना घर का, ना घाट का अशा स्थितीमध्ये मुले शाळेतून बाहेर पडणार असतील तर मग महत्वपूर्ण विषयांच्या बाबतीत विचार केला पाहिजे. म्हणून आम्ही निर्णय घेत आहोत की, जर . . . .

श्री.अजित पवार (खाली बसून) : त्यामुळेच ते मंत्री झाले.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार यांना सांगू इच्छितो की, जर त्यावेळी गणित हा कम्पलसरी विषय असता तर माझे काय चिपाड झाले असते ते काही सांगता येत नाही. याठिकाणी आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील शिक्षणामध्ये किती तफावत आहे ? यासंदर्भात मुद्दा मांडला. एक आय.ए.एस.,आय.पी.एस.चा माणूस, त्यांचा मुलगा अडीच वर्षाचा झाल्याबरोबर "Mummy, Mummy! Pappa, Pappa! How are you? .....



APR/ KGS/ KTG/ 17:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Where are you going? What are you doing? अशी सुरुवात करतो. माझ्या खेडयापाडयातील मुलगा सपाटून सहा वर्षाचा झाल्यानंतर शाळेमध्ये जातो. तत्पूर्वी काय होते ? मी आभार मानले पाहिजेत. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले आहे की, माननीय गृहमंत्री यांची स्वत:ची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत. पण कपिल पाटील आपली मुले कुठे आहेत ? तुमचा दोष नाही. कारण जागतिकीकरणाचे जग आहे, स्पर्धेचे जग आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते खाली बसून बोलतात.)

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, त्यांच्याविषयी शंका का व्यक्त करीत आहात ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, या स्पर्धेच्या जगामध्ये आपण आपल्या राज्यातील, देशातील सफरचंद खात नाही. ते पिकल्यासारखे वाटते. पण बाहेरुन जे सफरचंद आलेले आहे, ते दिसावयास खूप सुंदर आहे, ज्यूस खूप चांगला आहे, चव चांगली आहे, त्याचा रस देखील पातळ आहे. म्हणून आता "दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए" म्हणून जागतिक स्पर्धेच्या, कॉम्प्युरायझ ोशनच्या युगामध्ये, ऑटोमायझेनच्या युगामध्ये, जीवघेण्या स्पर्धेमध्ये तुमच्या आमच्या मुलांना आता सुमार दर्जाचे शिक्षण देता कामा नये. परवा माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब म्हणाले की, आम्हाला इंग्रजी येत नाही. आम्ही वेडयासारखे पहातो. पण आमचे आय.ए.एस.अधिकारी हुशार आहेत. त्यांना माहिती आहे की, हे तर आदिवासी आहेत, या लोकांना इंग्रजी काय समजते ? मग ते आम्ही दिसल्याबरोबर इंग्रजी बोलावयास सुरुवात करतात. कारण त्यांना माहिती आहे की, हे किती खोल पाण्यामध्ये आहेत. अशा प्रकारचे आमचे हयुमिलेशन थांबवावयाचे असेल तर, मी कोणाची नालस्ती करीत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.गायकवाड . . . .

प्रा. वसंत पुरके..

आमचा एक आदिवासी माणून ज्यावेळी मंत्री झाला त्यावेळी त्याला कॉंग्रॅज्युलेशनचे पत्र आले. त्याने पीए ला सांगून ठेवले होते की, कोणतेही पत्र आले तर साहेब सचिवांबरोबर चर्चा करीत आहे असे सांग असे त्यांनी आधीच सांगून ठेवले होते. हे काय चर्चा करणार आहेत ? सचिव व पीए यांच्या देखील लक्षात आलेले आहे हे की, हे किती खोल पाण्यामध्ये आहेत. एका दिवशी या सभागृहामध्ये प्रा. वसंत पुरके इंग्रजीमध्ये बोलल्याशिवाय राहणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना किंवा इतर कोणाला हे पटो अगर न पटो. परंतु मी तसा निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वात चांगले विद्यार्थी व शिक्षक माझ्या महाराष्ट्राधील आहेत. जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये, इंग्रजी माध्यमातून बारावी झालेल्या, किंवा डी.एड झालेल्या विद्यार्थ्याकरिता 20 टक्के रिझर्व्हेशन करण्यात येणार आहे. डायरेक्ट इनडायरेक्ट, ॲक्टीह व्हॉईस, पॅसीव्ह व्हॉईस, क्वेशन टॅग, प्रेपोझिशन, ॲनासिलिस हे सर्व शाळांमध्ये शिकविले जाते. हे सर्व शिकलेल्या आमच्या विद्यार्थ्याला आम्ही सांगतो की, स्टेजवर उभा राहून चांगले 10 मिनिटे बोल तर खरे. असे म्हटल्यावर त्याच्या पायामध्ये आढया पडतात. केवळ ग्रामर शिकून उपयोग नसून त्या मुलांना इंग्रजी फ्ल्युएंटली बोलता आले पाहिजे. लर्निंग स्कील, स्पिकींग स्कील शिकून त्याला एफिशियन्टली रिडींग करता आले पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, त्यांनी माझा वर्तमानपत्रामधील लेख वाचला आहे. डिपार्टमेंटमधील विचार करताना शरम वाटली हे मी मान्य केले आहे. परंतु मला शरम वाटली याचा अर्थ मी हताश झालेलो नाही. हतबल झालेलो नाही. " त्या दु:खाची नजर मिटवितांना बुबुळांमधला उडतो पारा, मनात तडकून पडतो उघडा, नक्षत्रांचा शिल्प पसारा. क्षण सांधून मी कण जुळवावे, या मातीच्या क्षितीजाच्या अंती, ओघळता लोचन हळवे शब्दांच्या आदळती भिंती " हे आपल्याला समजले नसेल तर मी आपल्याला हिंदी आणि मराठी भाषेमधून सांगतो. हे थोडेसे कठीण आहे. परंतु सोपे देखील आहे. आपण सर्व संवेदनशील आहोत. संवेदनशील माणसाने शिक्षणाकडे किती आत्मीयतेने पहाण्याची आवश्यकता आहे हे यामध्ये सांगितलेले आहे. एखाद्या गर्भार स्त्रीच्या अंगावरुन ट्रक गेला असेल, तिच्या देहाचा चिखल झाला असेल तर आपल्याला ते पहावत नाही. याचा अर्थ आपण त्याकडे पाहू नये असा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके..

नाही. उलट यामधूनआपली संवेदनशीलता जागृत होते. " है अंधेरी रात फिरभी, रोशनीकी बात कर " हे मराठीमधून मी आपणास सांगतो. दीप तेथे लावण्याला काळजाची वात कर " याचा अर्थ असा आहे की, दिवा लावण्याकरिता आपल्या काळजाची वात केली पाहिजे. रवींद्रनाथ टागोर यांनी असे म्हटले आहे की, "A lamp can never light another lamp unless it continues to burn its own flame." हजारो पणत्या आपल्यला पेटवता येतील परंतु त्यासाठी कोणत्या तरी एका पणतीने प्रथम पेटवून घेणे गरजेचे आहे. अशा प्रकारे राजश्री छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, श्री. वि.रा शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक चांगले विचार व्यक्त केलेले आहेत.

सभापती महोदय, "विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली, नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, हा सर्व अनर्थ एका अविद्येने केले" हे सर्व आपल्याला थांबवायचे असेल तर आपल्याला कठोर भूमिका घ्यावी लागणार आहे. त्यामुळे अशी कठोर भूमिका घ्यावी अशी मी येथे विनंती करतो.

सभापती महोदय, याठिकाणाी काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केली. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी केलेल्या सूचनेचा मी विचार केलाच आहे. ज्या शिक्षण संस्थांनी मनापासून अतिशय चांगले काम केलेले आहे, सुंदर फाईव्ह स्टार इमारती तयार केलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये, काही संस्था फूल एसी आहेत. 1960 पासून जन्माला आलेला हा महाराष्ट्र आहे. " मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा" असे म्हणणाऱ्या देशामध्ये देखील अशा काही संस्था आहेत की, जेथे फूल एसी आहे. गुरेढोरांनी देखील शाळेमध्ये यावे, व मुलेबाळे देखील त्या शाळेमध्ये यावे अशा शाळा सुध्दा महाराष्ट्रामध्ये आहेत हे मला नाकारता येत नाही. अशा प्रकारे मुलांच्या आयुष्याचे वाटोळे करण्याचा कोणी खेळ करीत असेल तर त्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला राईट टू एज्युकेशन आणण्याची आवश्यकता आहे. शाळा आहे, लॅबोरेटरी आहे, ग्राऊंड आहे, क्वालिफाईड स्टाफ आहे. शिक्षणासाठी चार घटकांची आवश्यकता असते. त्यापैकी एक एज्युकेशनल एटमॉसफिअर आहे, त्यामध्ये रयत शिक्षण संस्थांचा आम्ही विचार करतो. स्वामी विवेकानंदांची शिक्षण संस्था माझ्या डोळयासमोर आहे. तेथे कोणत्याही बिनडोक माणसाने गेल्यावर त्याला असे वाटते की, आपण देखील मास्तरकी करावी.

यानंतर श्री. बरवड..

अनुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ......

त्या ठिकाणी आमच्या श्री. सपाटे सरांची एक शाळा होती. ती सुंदर शाळा आहे. सुदर बोलका स्टेज आहे, छानपैकी सुंदर बोलक्या इमारती आहेत. मलाही वाटले की, नोकरी करावयाची असेल तर या ठिकाणी करावी. एखाद्या माणसाला स्वत:ची बुध्दिमत्ता असो वा नसो पण कधी कधी वातावरण देखील परिणामकारक ठरत असते. एखाद्या माणसाला कविता येत नसेल तर कधी कधी वातावरणाचा असा परिणाम होतो. म्हणून एज्युकेशनल ॲटमॉस्फिअर महत्वाचे आहे. कारण ग्राऊंड असेल, जमीन असेल, लाईन असेल, लेबॉरटरी असेल हे सर्व असणे गरजेचे आहे. दुसरी गोाष्ट अशी की, इफेक्टिव टिचिंगने शिक्षण होणे गरजेचे आहे. तिसरी गोष्ट अशी की, सुपरव्हिजन गरजेचे आहे. तसेच मॉनिटरींग आणि कंट्रोलिंग या चार गोष्टी या शिक्षण क्षेत्रासाठी आवश्यक आहेत. या चारही गोष्टी ज्या ज्या संस्था चालकांकडे नसतील त्या संस्था चालकांचा देखील मी खरपूस समाचार घेतल्याशिवाय राहणार नाही. नागपूरसारख्या शहरामध्ये 92 शाळा अशा आहेत की, ज्या बोगस आहेत पण त्यांचे अनुदान मात्र सारखे सुरु आहे. एवढेच नव्हे तर माझ्या यवतमाळ जिल्ह्यामध्ये 34 शाळा आहेत. ज्या माणसाकडे हजारो एकर जमीन आहे, त्याच्याकडे किती जमीन आहे हे मोजता येत नाही पण शाळा मात्र आशियातील जी झोपडपट्टी आहे त्यापेक्षाही जास्त बोगस शाळा अजूनही आहेत. अशा प्रकारच्या संस्था चालकांचा हिशेब गरजेचे आहे आणि तो मी केल्याशिवाय राहणार नाही. मात्र राजकीय इच्छाशक्ती अतिशय जबरदस्त असणे गरजेचे आहे. नाही तर ही शाळा आपल्या जवळची आहे, ही शाळा काकाची आहे, ही शाळा आजोबाची आहे असे होता कामा नये. Each and every person should be treated equal before Law. हे जर केले तर कोणत्याही माणसाची हिंमत होणार नाही. म्हणून माझी विनंती आहे. या ठिकाणी होणारा जो खर्च आहे त्यापेक्षा निश्चितपणे जास्त खर्च व्हावा. सर्व शिक्षा अभियानाचा जो खर्च होतो त्याचा अपव्यय होता कामा नये. म्हणून मी निर्णय घेतलेला आहे की, या सर्व शिक्षा अभियानाचा पैसा योग्य प्रकारे खर्च व्हावा, त्याचा योग्य विनियोग व्हावा. खूप चांगल्या चांगल्या योजना आहेत. प्रचंड पैसा खर्च होतो. म्हणून या खर्चावर नियंत्रण आणि संनियंत्रण असले पाहिजे. त्यावर कंट्रोलिंग असले पाहिजे, मॉनिटरींग असले पाहिजे. पैसा इकडे तिकडे जाऊ नये म्हणून या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

सभागृहाचे सदस्य आणि विधानसभा सभागृहाचे सदस्य या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांनी खऱ्या अर्थाने हा पैसा कसा खर्च होतो याकडे लक्ष द्यावे. आम्ही समिती गठीत करणार आहोत. त्यामध्ये आपला अंतर्भाव असणार आहे. खऱ्या अर्थाने शिक्षण हे एकट्यादुकट्याचे काम नाही. या शिक्षणाला खऱ्या अर्थाने गतिमान करावयाचे असेल तर जोपर्यंत शिक्षण ही लोकचळवळ बनणार नाही तोपर्यंत त्याला गती येणार नाही. म्हणून ग्राम शिक्षण समितीचे सभापती आणि पाच लोक यांना आम्ही अधिकार दिलेले आहेत. त्यानंतर तालुका शिक्षण समिती गठीत केली. जिल्हा शिक्षण समिती गठीत केली. आज माझी अशी इच्छा आहे की, किमान तीन महिन्याने, किमान सहा महिन्याने का असेना, या राज्याला मिळणारा पैसा, या पैशाचे वेगवेगळे स्त्रोत आणि त्या पैशाचे युटिलायझेशन बरोबर होते की नाही, आपली रिक्वायरमेंट किती आहे आणि ती पूर्ण होते की नाही, शिक्षक काम करतात की नाही, पर्यवेक्षण यंत्रणा गतिमान आहे की नाही हे पाहण्यासाठी दोन्ही सभागृहाची एक राज्यस्तरीय समिती गठीत व्हावी अशी माझी स्वत:ची इच्छा आहे. या ठिकाणी आमच्या अनेक सन्माननीय सदस्य मित्रांनी असे म्हटले की, आपण हतबल झाला आहात, आपण खचला आहात. मी बिलकुल खचत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय संस्थांच्या बाबतीत बोलले त्याबद्दल बरे वाटले. पण मी आपल्याला एक विषय सांगतो. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान मॅडम सुध्दा या ठिकाणी उपस्थित आहेत. मराठवाडा आणि विदर्भामध्ये असा अनुभव आहे की, एखादा अल्पअनुभवी व्यक्ती केवळ मी संस्थाचालक आहे, माझ्याकडे डिग्री आहे म्हणून अनेक शिक्षकांची सेवाज्येष्ठता डावलून मुख्याध्यापक बनतो. अशा गोष्टीवर आपले काय नियंत्रण आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, हा सुपरव्हिजनमधला भाग आहे. मी तर या विचाराचा आहे की, मुख्याध्यापकाच्या नावाने जर शाळा ओळखली जात असेल आणि ही जर आपली अपेक्षा असेल तर मेरीट कम सिनियारिटी हा भाग सुध्दा आहे. कारण केवळ सिनिअर आहे असेच जर असते तर प्रभू रामचंद्राच्या सहवासात वाढलेले दगडही सिनिअर झाले असते. असेच जर असते तर दंडकारण्यातील प्रभू रामचंद्राच्या सहवासातील दगडांना देवत्व का प्राप्त झाले नाही ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते : एकाही वर्गामध्ये पिरियड न घेतलेल्या शिक्षकाचे मेरीट असेल काय ? मी या ठिकाणी नाव घेत नाही पण आपण ते शोधून काढावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माझ्या राज्यामध्ये दोन प्रकारचे शिक्षक आहेत. एक शिक्षक घरातून शाळा पाहणारा आहे आणि दुसरा शिक्षक शाळेतून घर पाहणारा आहे. माझा मुलगा शाळेत गेला की नाही, बायको शेतावर गेली की नाही, म्हणजे शाळेतून घर पाहावयाचे असेही काही लोक आहेत. माझी अशी अपेक्षा आहे की, या व्यवसायाला आपल्याला न्याय द्यावयाचा असेल तर आपण तन्मय होऊन, एकरुप होऊन न्याय देणे गरजेचे आहे. यानंतर मात्र या शाळेच्या मुख्याध्यापकाकडे मेरीट कम सिनियारिटी असली पाहिजे अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्या प्रा. फौजीया खान यांनी सूचना केली की, आपण विदर्भाचे नाव उज्ज्वल करावे. मी निश्चितपणे तुमच्या आमच्या सहकार्याने या खात्याला न्याय दिल्याशिवाय राहणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सूचना केली की, जर आपण शिक्षण मंत्री आहात तर एक नाव का घेत नाही ? ज्या एका नेत्याच्या नावाने ते पुस्तक प्रसिध्द झाले त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी विचारले. गरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णू गुरुर्देवो महेश्वरा वगैरे आपण सांगितले. खरे म्हणजे कोणत्याही माणसाला लपविण्याचे काही कारण नाही. महाराष्ट्रामध्ये आदरणीय, अतिशय निर्भिड असे जे नेतृत्व जन्माला आलेले आहे त्यांच्या संदर्भात "धुरंधर नेता" नावाचे हे पुस्तक आहे. हे पुस्तक माननीय श्री. राणे साहेबांच्या जीवनावर आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके....

ख-या अर्थाने कोणालाही लपविण्याचे कारण नाही. अतिशय निर्भिड असे महाराष्ट्रामध्ये नेतृत्व जन्माला आलेले आहे. ते पुस्तक धुरंधर नेते माननीय श्री.नारायण राणे यांच्या जीवनावरील पुस्तके आहे. त्यांनी केलेली क्रांती, त्यांनी परिस्थितीशी दिलेला लढा, येणा-या प्रसंगाला सामोरे जाण्याचा दुर्दम्य आत्मविश्वास, हे सर्व पाहून त्या जिल्हा परिषदेने सुरु केले होते. त्यांनी आणखी ऑर्डर दिली नव्हती. परंतु असे घाबरण्याचे कारण नाही. (अडथळा) मला काही अडचण नव्हती. परंतु समोरच्या बाजूला बसलेल्या सन्माननीय सदस्यांनी त्यावेळी उठून बोलले पाहिजे होते. आपल्याला करंट लागल्यानंतर आपण जागे झालात. आपण त्यावेळी बोलला असता तर त्याच दिवशी उत्तर दिले असते. प्रश्न असा आहे की, शिक्षकांची आदरयुक्त भीती असावयास पाहिजे. (अडथळा) सन्माननीय श्री.नारायण राणे यांनी जी जी क्रांतिकारी भूमिका घेतली असेल. ते पुस्तक मी अजून वाचलेले नाही.

श्री.अरविंद सावंत : ते पुस्तक विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमासाठी ठेवले जाईल काय हे रेकॉर्डवर सांगावे.

श्री.कपिल पाटील : ठेवलेले आहे.

प्रा.वसंत पुरके : नाही. ते पुस्तक अवांतर वाचनासाठी ठेवलेले आहे. आपण असे विधान करु नये. मागील वेळी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील असे विधान केले होते की, राज्यातील 95 टक्के शिक्षक अप्रामाणिक आहेत असे या राज्याचे शिक्षण मंत्री म्हणाले आहेत. ते ऐकून संपूर्ण आग्या मोहोळ माझ्या अंगाला येऊन भिडले. माझी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना विनंती आहे की, आपण कोणतेही विधान करताना जबाबदारीने केले पाहिजे. ज्याला आपण संस्कार केंद्र म्हणतो त्या संस्कार संस्थेतील लोकांबाबत सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल असे म्हणाले होते की, तुमचे सर्व लोक परमीट रुम मध्येच दिसतात. सभापती महोदय जर अनौपचारिक शिक्षण द्यावयाचे असेल तर ते माझ्या वागण्यामधून, माझ्या बोलण्यातून दिले पाहिजे. (अडथळा) सभापती महोदय, शिक्षकांबद्दल आदरयुक्त भीती असली पाहिजे ही तुमची, आमची सगळयांची भूमिका आहे. ज्या शाळेमध्ये मी होतो त्याठिकाणच्या हेडमास्तरच्या टेबलवर शिशी फुटावी आणि मुलांनी बाहेर खंत व्यक्त करावी ? हे बिलकूल बरोबर नाही. एक तर ज्यांची

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके....

मनापासून इच्छा असेल त्यांनी हा जॉब स्वीकारावा, अन्यथा स्वीकारु नये. अमेरिका सारख्या राष्ट्रामध्ये लोकांनी असे म्हटले आहे की, देश धोक्यामध्ये आहे. अशाप्रकारे समग्र शिक्षण घेताना असे म्हटले असेल तर माझ्या सर्व शिक्षक बांधवांना विनंती आहे की, आपले पर्सनल लाईफ कसे आहे, आपण कसे जगतो हे किमान लोकांमध्ये तरी सांगू नये. म्हणून यासंबंधी आपण जागरुक राहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांची संख्या घटत आहे, गुणवत्तेचे प्रमाण घटत असल्याबाबत सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे. सन्यमाननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांना सांगू इच्छितो की त्यासाठीच गुणवत्ता विकासाचा कार्यक्रम ठेवला आहे. अनेक शाळांमध्ये यापूर्वी काय स्थिती होती ? मी अनेक शाळांना भेटी दिल्या आहेत. एका वर्गाती एका मुलाला मी सांगितले की, 16 संख्या लिहून दाखव. माझी अशी अपेक्षा होती की त्याला काही येत नसेल तर निदान तो 61 तरी लिहून दाखविल. परंतु तो मुलगा 13 संख्या लिहू लागला. मी म्हटले की, 55 संख्या लिहून दाखव. ती संख्या सुध्दा त्याला लिहिता आली नाही. जर दोन अंकी संख्या सातवीच्या मुलाला लिहिता येत नसेल तर काय आपण प्रगती केली असे मानता येईल काय ? तुम्ही आम्ही याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांची मुलगी 150 पैकी 150 गुण मिळविते. अशा शेकडो शाळा आहेत की, ज्या शाळांमध्ये शिक्षक तन्मयतेने काम करतात. पुण्याच्या एका शाळेमध्ये गेलो असताना 25 मुलींनी 30-30 प्रश्न मला अतिशय फ्ल्यूएन्टली विचारले होते. ते ऐकून माझे मन आनंदाने मन भरुन आले. आता मात्र महाराष्ट्र राज्य क्रमांक एक वर गेल्याशिवाय राहणार नाही असे वाटले. तेव्हा अशाप्रकारची क्वालिटी मेंटेन केल्याशिवाय आपल्यासमोर पर्याय नाही. ज्यावेळी अप्रगत मुलांचा मला शोध लागला त्यावेळी मी असे ठरविले की, लेखन, वाचन, हमी कार्यक्रम या महाराष्ट्रात सुरु केला पाहिजे. मुकुंद नावाचा एक पारधी पेढा आहे. त्या पारधी पेढयावर गेलो असताना ओंकार नावाचा मुलगा किती जबरदस्त मेहनत घेतो. त्या पारध्यांच्या मुलींची आंघोळ करुन घेतो आणि त्यांच्या डोक्यातील कृमी बाहेर काढतो. ती मुलगी 52,53,64,797 ही संख्या वाचू लागली. ज्या मुलीचे वडील 15-20 मिनिटांपूर्वी मरण पावले होते, त्यांचा दफनविधी झाला होता. पण त्यांच्या दोन्ही मुलांच्या डोळयात अश्रू नव्हते. दोन्ही

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पारध्यांची मुले दत्तक घेतलेली होती. ही सर्व किमया कोणाची आहे ? शिक्षकांची आहे. एक ओंकार नावाचा शिक्षक खेडयामध्ये जाऊन शिकवितो. त्याच वेळी 52,53,64, 797 ही संख्या वाचते तेव्हा मी माझ्या ओरिजनल गेमचा आधार घेतला. अरे मला तर 53 सुध्दा जमत नव्हते असे वाटले. पण एक माझी मुलगी 52 कोटी वाचू शिकते आणि त्याचवेळी एक शिक्षक काय करु शकतो आणि काय करु शकत नाही, हे दिसून आले. सभापती महोदय, मी कोलुरा नावाच्या गावातील शाळेमध्ये गेलो होतो त्यावेळी एक शिक्षक भगिनी गणितच शिकवित होती, त्यांना मी विचारले की, तुम्ही केव्हापासून शिकवित आहात. त्यांनी मला म्हटले की, मी 17 वर्षे शिकवित आहे. हे ऐकून मला खूप आनंद झाला, त्यांना मी सांगितले की, 52,53,64,797 ही संख्या लिहून दाखविण्यास जमेल काय ? हे ऐकून त्या बाईची हिम्मतच निघून गेली. मी त्यांना म्हटले की, मी तुमच्या बरोबर आहे, तुम्ही लिहा तरी. सगळयात मोठी ताकद लावून त्या बाईंनी 52 चा आकडा लिहिला. त्यांना मी म्हटले की, मॅडम आप आगे बढो. त्यानंतर त्यांनी 52 च्या पुढे 0 लिहिला. माझ्यासोबत हेड मास्तर होते. मला थोडा वेळ असे वाटले की, शिक्षिकेला मुलांसमोर हे विचारावयास नको होते, कारण ती बाई मुलांसमोर एक्सपोझ होत होती. त्या बाईंना जमो की न जमो, त्या असिस्टंट टिचर आहेत. पण हेड मास्तरला येण्यास काहीच हरकत नाही. पण त्या बाईंकडे पाहता पाहता ते हेड मास्तर वर्गातून बाहेर कधी निघून गेले ते मला दिसलेच नाही. मी कोणाचीही नालस्ती करणार नाही, मी आपल्याला त्या शाळेचे नाव दिले असते, मी त्या शिक्षकाचे नाव दिले असते, पण मी ते देणार नाही. कारण ते माझे बांधव आहेत. सभापती महोदय, सांगण्याचा हेतू हा आहे की, येथे कोणीही परफेक्ट नाही. पण किमान वर्गात जाताना मला जो चॅप्टर शिकवावयाचा आहे, जे युनिट मला शिकवावयाचे आहे त्यासाठी तरी तयारी करुन गेले पाहिजे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जो चॅप्टर मला शिकवायचा आहे, युनिट मला शिकवायचे आहे त्याची तयारी करुन जायला पाहिजे. मी सुध्दा जिओग्राफी विषय शिकवित होतो. दोन-दोन तीन-तीन वेळा मी धडा वाचत होतो. कारण फिझिकल जिओग्रॉफी ही स्वत:ला समजल्या शिवाय दुस-याला सांगता येत नाही. म्हणून अशा प्रकारच्या माझ्या स्वत:च्या बेसिक कन्सेप्ट स्पष्ट झाल्या पाहिजेत. एक सुंदर कोटेशन आहे. Nothing is taught unless it is learnt म्हणून माझी अध्ययनाची प्रक्रिया ही मनापासून शंभर टक्के राबविल्या शिवाय मला वर्गात जाता येत नाही. मी 10वी, 12वी, बी.ए., एम.ए. ला शिकवित होतो. पण कधी कधी वर्गातून मी नाराज होऊन बाहेर पडत असे आणि कधी कधी मी राजा सारखा बाहेर पडत असे. ज्या दिवशी माझ्या कुसुमाग्रजांचा, फुल्यांचा, तांब्यांचा तास खूप सुंदर व्हायचा त्या दिवशी मी अभिमानाने घरी जात होतो. परंतु एखाद्या वेळेस माझीच बेसिक आयडिया जर क्लिअर झाली नसेल तर मला चुकल्या चुकल्या सारखे वाटायचे. म्हणून माझी शिक्षकांना विनंती आहे की, वर्गावर जाताना त्यांनी वाचून गेले पाहिजे. कारण तुम्ही एकदा शिकविलेले वाक्य मुलाच्या मन:पटलावर आयुष्यभर कोरले जाते. मला कुणावर टीकाटिपणी करावयाची नाही. परंतु वर्गात जाताना असे केले पाहिजे अशी माझी विनंती आहे. दुसरे काय सांगावे, माझ्या गावी झरीझामणीला मी गेलो, त्या ठिकाणी फक्त मी एक शिक्षक होतो. मी आदिवासी माणूस, मला वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव होता. कुठला देव, दैव, प्रारब्ध, प्राक्तन, जन्म, पुनर्जन्म, पाप, पुण्य, वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ, ध्यानस्त बसणे, तपश्चर्या करणे यामध्ये माझे अर्धे आयुष्य बरबाद झाले. सभापती महोदय, मी पहिल्यांदा मोठ्या मुश्किलिने निवडून येऊन आमदार झालो. त्यानंतर दादांचे आणि इतर सर्वांचे फोन आले आणि त्यांनी सांगितले की लवकर येऊ जा. लोकांनी प्लेनचे तिकिट काढायला सांगितले. मला विमानाने यायचे नव्हते., लोक सांगायचे की तसे विमान खूप चांगले आहे. परंतु समजा तसे काही झाले तर माणसाचे काहीच दिसत नाही. मी म्हटले अरे यार, मी मोठ्या मुश्किलिने निवडून आलो तर मग विमानातून कशाला जायचे ? ही भीती कशा मुळे निर्माण झाली ? मी मोठ्या मुश्किलिने विमानात बसलो. विमानात इंग्रजीमधील मुलगी आणि मी मराठी माणूस, आणि भलत्याच ठिकाणी येस म्हणणे बरोबर नव्हते.

..2..


(प्रा. वसंत पुरके....)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तिचे शब्द अपरिचित नव्हते. परंतु उच्चार मात्र वेगळेच होते. शब्द समजत नव्हते. परंतु माझ्याकडे व्होक्याबुलरी होती. आपले अज्ञान कसे व्यक्त करायचे म्हणून मी चूप बसलो. बसल्यानंतर पट्टा लावता येत नव्हता. पट्टा आडवा उभा करुन तो मोठ्या मुश्किलिने लावला. अज्ञान प्रकट होईल म्हणून पट्टा कसा लावायचा हेही समोरच्याला विचारता येत नव्हते. ते म्हणतील याला कुठून धरुन आणले ? म्हणून त्यांना मी सांगितले नाही. समोरचा माणूस देखील चूपचाप बसलेला होता आणि तोही काही सांगत नव्हता. त्यानंतर मुंबई जवळ येताना मी पट्टा सोडू शकलो. परंतु माझ्या जवळचे उठत होते आणि गप्पकन खाली बसत होते. कारण त्यांचा पट्टा सुटत नव्हता. मी त्यांना विचारले तर ते म्हणाले की माझा पट्टा सुटत नाही. मी मनात म्हटले की हे आदिवासी असू शकतील. मी त्यांना आडनाव विचारल्या नंतर त्यांनी त्यांचे नाव रामकृष्ण मडावी असल्याचे सांगितले. दुस-याने सांगितले की मी गेडाम आहे. अरे, ही तर आपलीच माणसे आहेत. सभापती महोदय, मी हे गमतीसाठी सांगत नाही. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा अभाव ज्या ज्या माणसांच्या मनामध्ये घर करुन बसला असेल त्याला स्वत:ला आयुष्यांचे भले करता येत नाही. म्हणून मर्ढेकर म्हणाले की, "विज्ञानाच्या वैभवाला द्यावे शीर्षक उत्तम, रुग्ण मणी तुरटीचे पाणी शिंपावे परम". सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना मी सांगू इच्छितो की, इतराना वैज्ञानिक दृष्टीकोनाची गरज आहे की नाही हे मला माहीत नाही. परंतु तुमच्या आमच्यासाठी विज्ञानाची फारच गरज आहे. म्हणून संत कबीर म्हणाले की, मुल्ला होकर बाग देता साहीब का ही बैरा है, चींटियों के पैर में घुंगरु बांधे तो अल्ला भी सुनता है. तुम्हा आम्हाला याचा विचार करण्याची गरज आहे. नाना वर्ण की गाय एक ही रंग है दूध, तुम कैसे बंबर, हम कैसे है सूद. या प्रश्नाचे उत्तर देऊ शकलो. सायंटिफिक व्हिजन तुम्हा आम्हाला प्राप्त झाल्या शिवाय पर्याय नाही. एक सुंदर कोटेशन आपल्यासाठी आहे. If the political leaders of the nation empower the people through visionary policies, the prosperity of the nation is certain जर राज्यकर्ते डोळस असतील, जागरुक असतील, सकारात्मक भूमिकेचे असतील, तन्मय होऊन, तद्रुप होऊन संवेदनशीलतेने काम करणारे असतील तर माझा महाराष्ट्र हा नंबर वनचा राहिल्या शिवाय

..2..



(प्रा. वसंत पुरके...)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राहाणार नाही. कारण ज्ञानेदव, नामदेव, तुकाराम, गोरा कुंभार, बंका महार, सावता माळी तुम्हाला आवडणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,... समाज शिक्षण घ्यावयास्तव बुध्दी येऊ दे पुढे, काढ हे अज्ञानाचे मढे .त्यांचे म्हणणे काय होते ? तर अज्ञान हे एक प्रकारचे मढे आहे. ते हाकलल्या शिवाय, दूर केल्या शिवाय तुमचा आमचा विकास होणार नाही. ग्राम हेची पवित्र मंदिर, मानव मूर्ती अतिसुंदर, त्याचीच सेवा समप्रकारे हेची पूजा मज. हे करायचे असेल तर ग्रामीण भागातील माणसाला तुम्हाला आम्हाला नंबर वनची प्रायॉरिटी देण्याची गरज आहे. If the lower classes are not given preferential treatment they will not rise in the scale of life म्हणून अशा प्रकारच्या सर्वसामान्य माणसाला पददलित माणसाला उपेक्षित माणसाला टॉप प्रायॉरिटी दिली गेली पाहिजे.

...नंतर श्री. गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पूरके...

माझी आपणास विनंती आहे की, या राज्यामध्ये अडीच, तीन वर्षापासून जे शिक्षण सुरु होते, त्या शिक्षणाचे नवीन प्रारुप ठरविताना मला खूप अडचणी आल्या. प्रारुप ठरविण्यासाठी पुणे येथे बैठक घेतली होती. त्या बैठकीत पुणे, नागपूर, सोलापूर इत्यादी ठिकाणचे लोक आले होते. ते मला म्हणाले की, रिडींग, रायटींग, लिसनींग, स्पीकींग हे चार स्कील देऊ नका. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अवयव बरोबर वाढणार नाहीत. त्यावेळी माझ्या समोर प्रश्न निर्माण झाला आणि त्या अनुषंगाने मी त्या लोकांना विचारले की, अडीच वर्षापासून शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे कोणकोणते अवयक कमी झाले आहेत ? तीन वर्षाच्या मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण, पूर्व प्राथमिक आनंददायी शिक्षण दिल्याशिवाय आपल्याला दुसरा पर्याय नाही. या गोष्टीकडे लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. आमचा सहा वर्षाचा मुलगा कसा बरबाद होतो. तो आई सोबत, वडिलांसोबत पाणवठयावर जातो, शेतावर जातो. काका, आजोबा, यांच्या समवेत तळयावर जाणे, मासे पकडणे, शेतावर जाऊन निंदणीचे काम करणे, अशा प्रकारच्या सगळया नैसर्गिक वातावरणामध्ये तो मुलगा सहा वर्षात 100 टक्के बिघडतो. आमचे शिक्षक त्यांच्या घरी जाऊन सांगतात की, तुमच्या मुलांना शाळेत पाठवा. त्यावेळी त्यांना त्यांचे पालक शाळेत पाठवित नाहीत. तो मुलगा चुन्याच्या भट्टीवर, वीट भट्टीवर काम करण्यासाठी जातो. एवढा तो मुलगा सहा वर्षात बरबाद होतो. अशा प्रकारची कामे करीत असताना त्या मुलांची नॉलेज संपादन करण्याची क्षमता 50 टक्क्यांनी कमी होते. म्हणून शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नीड बेज्ड् व्हॅल्यू एज्युकेशन देणे महत्वाचे आहे. म्हणजे नैतिक मुल्ल्यांची पेरणी, नैतिक मुल्ल्यांचा प्रचार आणि प्रसार करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य, समता,बंधुता, मानवता,लळा,जिव्हाळा, प्रेम, राष्ट्रीयत्व, सगळया प्रकारचे लोकशाही मुल्ल्ये आणि बंधु भावाची भावना ही तुमच्या आमच्यात निर्माण करावयाची असेल तर नीड बेज्ड व्हॅल्यू एज्युकेशन निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी अप्रितम भाषण या ठिकाणी केले. सगळया संप्रदायाचा, सगळया विचारांचा, नको असलेले विचार बाजूला सारुन, राजकीय विचार न करता या ठिकाणी अतिशय निर्भिडपणे विचार व्यक्त केले. जे विषय कोणाला जमत नाही. ज्या विषयामुळे माणूस आयुष्यभर वेठबिगार बनत असेल तर या विषयांच्या आवडीच्या बाहेर जाऊन दुस-या विषयांची आवड निर्माण केली पाहिजे. स्वामी विवेकानंदांनी विचार व्यक्त केला आहे की, ज्या मुलाला जो विषय आवडत नसेल तर तो विषय

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके...

त्याच्या डोक्यात कोंबता कशाला ? ज्याला इंजिनिअर व्हावयाचे असेल तर त्याच्यासाठी स्टॅटेस्टीक आणि मॅथेमॅटीक. ज्यांना ॲप्लाईड मॅथेमॅटीक म्हणजे बी.एससी. बॉयालॉजी, मेडीकल, बी.ए., बी.कॉम. या लोकांसाठी मात्र व्दिस्तरीय गणीत पध्दत महाराष्ट्रात सुरु केल्याशिवाय राहणार नाही असा आम्ही पूर्णपणे विचार केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी आपापली मते वेळोवेळी व्यक्त करावीत अशी माझी विनंती आहे. अप्लाईड मॅथेमॅटीक आणि फक्त इंजिनिअरिंगचे मॅथेमॅटीक्स अशाप्रकारे निश्चितच आम्ही यात दखल घेणार आहोत. महाराष्ट्रामध्ये हे निश्चित सुरु होईल. सगळयात जास्त निकाल पडतो कुठे? एक पेपर मात्र टयूशनमध्ये शिकवायचा. एक पेपर मात्र वर्गामध्ये शिकवायचा. आर्थिक शोषण करायचे. जवळच्या असलेल्या शिक्षकांना शिकवायला भाग पाडायचे. अशाप्रकारे मुलांचे शोषण होऊ नये म्हणून आम्ही निश्चितपणे विचार करणार आहोत. एकीकडे शायनिंग इंडिया आणि दुसरीकडे पूअरेस्ट माणसे. ही दरी, हा अंतरा, ही तफावत विचार करता योग्य पध्दतीने निर्णय घेणे आवश्यक आहे. राईट टू एज्युकेशन करताना एज्युकेशनल ऑडिट होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत खर्च किती झाला? 12 ते 14 हजार कोटी रुपये खर्च होत असेल याची फलश्रुती काय?प्राप्त झाले काय? तेव्हा अशाप्रकारे ऑडिट करणारी या राज्याची समिती असावी आणि या संदर्भात तुमचे सर्वांचे सहकार्य मिळावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. 3 ते 6 वीपर्यतच्या पूर्व प्राथमिक शिक्षण गरजेचे असेल आनंददायी शिक्षण असेल, मनोरंजन शिक्षण असले ते करण्याशिवाय पर्याय नाही. सगळे होऊ शकते. जगाच्या पाठिवरचे हे ओझे दूर करावयाचे असेल तर माझ्या शिक्षक बांधवांना एक भूमिका घेणे गरजेचे आहे. "Life can be very meaningful and enjoyable for both the teacher and student, if the teachers love their children, if the teachers love the youth, if the teachers love teaching the students and if the teachers love to dance with the students." अशा प्रकारचे मनापासून शिक्षण देणारे असतील तर खरोखरच शिक्षणाचे महत्व निश्चितपणे वाढेल.

डॉ.दीपक सावंत : सी.बी.एस.सी. शाळांचे काय झाले, त्यासंबंधीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी.

यानंतर श्री. कानडे..





प्रा. वसंत पुरके ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सीबीएससी दर्जाच्या शाळा आहेत त्याबाबतीत थोडा वेळ लागेल. सगळया मुद्यांचा समाचार घेण्यास थोडा वेळ लागेल. सीबीएससी आणि आयसीएसीच्या शाळा या कितीली स्वत:ला सुपर समजत असतील तरी राष्ट्रीयत्वाची भावना लोप पावण्याची भूमिका त्यांनी घेतली असेल तर यानंतर मात्र त्यांना एनओसी देताना त्यांचे प्रतिज्ञापत्र घेणार आहोत आणि अशा प्रकारे ना हरकत प्रमाणपत्र देतानाच आचार संहिता तयार करुन देणार आहोत आणि त्या आचार संहितेचे त्यांनी उल्लंघन केले तर त्यांची मान्यता काढून घेण्याचे प्रकार देखील सुरु केले जातील. याबाबतीत अशा प्रकारची दखल शासन घेणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी खूप चांगल्या सूचना केलेल्या आहेत. राईटस् आणि डयूटीजबद्दल सांगण्यात आले. माझ्या शिक्षणाचे हक्क खूप आहेत पण त्याच वेळेस माझ्या शिक्षक बांधवांची पुरेशी सेवा हा आमचा हक्क आहे. तो मला प्राप्त व्हावा याची देखील दखल घेणे गरजेचे आहे. अभ्यास मंडळात चांगली चांगली माणसे नेमलेली आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी याबाबतीत खूप समजून सांगितले. या तज्ज्ञ मंडळावर खूप चांगले लोक आहेत. मराठीच्या 400-500 चुका आहेत यामध्ये देखील पी.एच.डी. झालेले 4/5 लोक मंडळावर आहेत. मंडळावर एवढया चांगल्या दर्जाचे सदस्य असतील आणि तेच जर अशा प्रकारे डोळेझाक करीत असतील तर याबाबतीत देखील गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी देखील काही सूचना केलेल्या आहेत. अपयश का आले याचा शोध घेणे गरजेचे आहे. म्हणून आमच्या वाटयाला चांगले दिवस आले त्याचे कौतुक करुच पण त्याहीपेक्षा माझ्या या राज्यातील अप्रगत मुले किती आहेत याचा विचार केला तर 22.75 टक्के मुले राज्यामध्ये अप्रगत आहेत. शिक्षक बांधवांनी दिलेले आकडे आहेत. सर्वात जास्त औरंगाबाद एरियातील मुले अप्रगत आहेत. 38 टक्के मुले अप्रगत आहेत. हे देखील मॅनेज केलेले आकडे आहेत. शिक्षकांनी विश्वासार्हतेने दिलेली आकडेवारी मी सांगत आहे. त्यानंतर मात्र 35 टक्के मुले नागपूर एरियातील आणि 39 टक्के अमरावती विभागातील अप्रगत आहेत. अशा प्रकारची संख्या असेल तर एक दिवस तुमच्या-आमच्या मनामध्ये दुर्देवाने हा विचार आल्याशिवाय राहणार नाही की 100 टक्के खर्च करुन आऊटपुट मिळत नसेल तर मुलांच्या उपस्थितीवर आणि गुणवत्तेवरच पगार द्यावयाचा काय याचा विचार करावा लागेल. नो सर्व्हीस नो पे, नो डयूटी नो पे तसे करता येणार नाही तरी सुध्दा यासंदर्भात गांभीर्याने विचार करु. बोलण्यासारखे खूप आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील

.....2



प्रा. वसंत पुरके

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांनी एक सूचना केली की, शिक्षकांना छळू नका. शिक्षकांना बिलकूल छळणार नाही. त्यांनी सांगितले की बोर्डाचा दर्जा सुधारा दर्जा सुधारण्यासाठी वाट्टेल ते करा. शिक्षकांना छळू नका. काही जे केले त्यात नवीन काय केले ? शाळेत वेळेवर गेले पाहिजे हे काय नवीन आहे ? डेली नोटस काढल्या पाहिजेत हे काय नवीन आहे ? शाळेच्या वेळेआधी अर्धातास गेले पाहिजे आणि शाळेनंतर अर्धातास थांबले पाहिजे हे काय नवीन आहे ? मुख्यालयी राहिले पाहिजे आणि मुलांचे सुपरव्हीजन केले पाहिजे हे काय नवीन आहे ? गायन,वादन,नृत्य,नाटय,कबड्डी,कुस्ती व्हॉलीबॉल,लांबउडी,उंचउडी,बेसबॉल,क्रिकेट हे सगळे खेळ त्याला आले पाहिजे हे काही नवीन नाही. नवीन काहीच नाही जुनी कार्यप्रणाली पुन्हा नव्याने सुरु करण्यात आली. ही माझी अपेक्षा आहे. म्हणून शासनाने गुणोत्तर विकास कार्यक्रम सुरु केला. मी जे निर्णय घेतलेले आहेत ते फक्त सांगतो आणि माझे उत्तर संपवितो. एकदेखील विद्यार्थी पटसंख्येपासून वंचित राहता कामा नये म्हणून पटनोंदणी पंधरवडा याच्यानंतर कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. दरवर्षी पहिले 15 दिवस 100 टक्के ही योजना राबविणार आहोत. मग तो भिल्ल असेल,कातकरी असेल ,नंदीवाला असेल या सगळया लोकांची मुले आम्ही पटावर आणू. पूर्व प्राथमिक शिक्षण आनंददायी सुरु होणारआहे. त्यानंतर संयुक्तपणे म्हणजे महिला आणि बालविकास विभाग आणि शिक्षण विभाग यांनी संयुक्तपणे अभ्यासक्रम सुरु केलेला आहे. त्याची अंमलबजावणी करु. कायम स्वरुपी लेखनवाचन कार्यक्रम 60 दिवस हमखास महाराष्ट्रात राबविल्याशिवाय राहणार नाही. लेखन, वाचन, रीडींग, रायटींग, स्पीकींग हे सगळे चारही विषय 60 दिवसामध्ये धडक मोहीम म्हणून राबविणार आहोत. त्यानंतर मात्र अतिशय महत्वाचा विषय म्हणजे मी जगतो कसा, मी वागतो कसा, माझी शारीरिक डेफिशिअन्सी काय आहे माझे होणारे रोग कोणते आहेत याचा साकल्याने विचार करता यावा म्हणून सुंदर सुटसुटीत मुलांच्या मनावर वाईट परिणाम होणार नाही, त्यांच्या भावनांना खूप प्रक्षोभित करता येणार नाही म्हणून यावर्षापासून लैंगिक शिक्षण सुरु करणार आहोत. ही काळाची गरज आहे. अल्पवयात लग्न का होते याचा विचार करुन लैंगिक शिक्षण सुरु करणार आहोत. त्यानंतर वस्तीशाळा शिक्षकांना सामावून घेतलेले आहे त्यांना कोणीही हात लावणार नाही. त्यानंतर 3500 शाळा नियमित करणार आहोत त्यांना याठिकाणी सामावून घेणार आहोत.

यानंतर श्री. भोगले



प्रा.वसंत पुरके..........

आंतरवासिता मुलांसाठी 1500 रुपये अनुदान दिले आहे, त्यांना प्रोटेक्शन मिळेल. डी.एड मुलांसाठी गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळावे म्हणून निवडपूर्व चाचणी होणार आहे. 20 टक्के आरक्षण हिंदी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षकांसाठी असणार आहे. संगणक शिक्षण महत्वाचे आहे. जवळजवळ 2 हजार शाळांना दरवर्षी संगणक देऊ. प्रत्येक शाळेला दहा संच दिले जातील. संगणकाशिवाय पर्याय नाही म्हणून देशाचे राष्ट्रपती म्हणाले होते की, "Creativity and imagination will be of superiority." या राज्यात बोगस पट असता कामा नये. 12-15 मुले या शाळेत आणि ती मुले त्या शाळेतही असता कामा नयेत म्हणून युनिक कार्ड सुरु केले आहे. शिक्षणासाठी सुधारित आचारसंहिता लागू करु. त्यानंतर राईट टू एज्युकेशन हे बिल सादर करु. सॅट ही संकल्पना सुरु केली आहे. सातवीची बोर्डाची परीक्षा सुरु करु एवढीच ग्वाही देतो आणि कृषि विज्ञान, सायन्स आणि ॲग्रीकल्चर सायन्स महाराष्ट्रात सुरु करु एवढे बोलून माझे विचार थांबवितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांनी आमुलाग्र विचार मांडले, धोरण मांडले त्याबद्दल धन्यवाद देतो. सन्माननीय उच्चशिक्षण मंत्री याठिकाणी बसले आहेत. एका प्रश्नाचे उत्तर आम्हाला मिळाले नाही. 'शिका आणि संघर्ष करा' हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले सूत्र आहे ते मंत्रीमहोदयांच्या भाषणात होते, त्याबद्दल धन्यवाद देतो. परंतु माझ्या दरवाजाबाहेर असलेल्या शिपायाच्या मुलाला डॉक्टर, इंजिनिअर व्हायचे असेल तर कोणत्या ऐपतीत तो हे शिक्षण घेऊ शकेल याचे उत्तर मिळाले नाही. मंत्रीमहोदयांनी प्राथमिक शिक्षणापासून इंग्रजी सुभाषिते आम्हाला ऐकवली. परंतु सामान्य माणसाची मुले कुठून इंजिनिअर आणि डॉक्टर होणार हा मुलभूत प्रश्न आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी केलेले भाषण धोरणात्मक होते. त्यातील निम्मी धोरणे मंत्रीमहोदयांनी कबूल केली. परंतु जो सामान्य माणूस आहे, ज्याच्याकडे टॅलेंट आहे त्याला उच्चशिक्षण कसे मिळणार याचे धोरण याठिकाणी जाहीर केले पाहिजे, याचे उत्तर मिळावे अशी अपेक्षा आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.दिलीप वळसे पाटील (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, या राज्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागामध्ये गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात इनटेक तयार केले आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला त्याबद्दल सांगू इच्छितो की, या राज्यामध्ये शासकीय संस्था आणि अशासकीय संस्थांमध्ये ज्यावेळेला मोठया प्रमाणात संधी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत

त्यावेळी टॅलेंट असेल, त्यावेळी केवळ टॅलेंटच्या आधारे एखाद्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळाला तरी खाजगी शिक्षण संस्थेमध्ये त्याला फी भरता येत नाही म्हणून त्याचे शिक्षण थांबते अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी या राज्यातील लोकशाही आघाडी सरकारने जे शेड्यूल कास्ट आणि शेड्यूल ट्राईब विद्यार्थी आहेत त्या विद्यार्थ्यांच्या प्रोफेशनल कोर्सची, ज्यामध्ये एमबीबीएस, इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट अशा कोर्सची 100 टक्के फी राज्याच्या तिजोरीतून भरण्याचा निर्णय दोन वर्षापूर्वी घेतला असून तो निर्णय यावर्षी देखील लागू आहे. त्याचबरोबर ओबीसी विद्यार्थ्यांची 50 टक्के फी भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आर्थिकदृष्टया मागास असलेल्या म्हणजे ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयाच्या आत आहे त्या कुटुंबामधील, मग ते कुटुंब कोणत्याही समाजातील असो, अशा कुटुंबातील विद्यार्थ्याची 50 टक्के फी भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आताची जी योजना आहे ती योजना या वर्षाकरिता लागू आहे. यावर्षी वित्तमंत्र्यांचे भाषण ऐकले असेल तर त्यांनी भाषणात स्पष्टपणे विशद केले आहे. या राज्यातील प्रोफेशनल कोर्सेससाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची फी भरण्याची ऐपत नाही.........

(नंतर श्री.खर्चे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.......

म्हणून त्यांचे शिक्षण थांबू नये यासाठी आणि राज्यशासनावर वाढत चाललेला बोजा लक्षात घेऊन शासन एक नवीन स्कीम आणण्याच्या विचारात आहे. त्या अनुषंगाने अनेक बँकांशी बोलणी करुन ही नवीन योजना आपण आणत आहोत. तसेच यापूर्वी या विद्यार्थ्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करुन देत होत्या. त्याचे व्याज हे विद्यार्थी भरत होते पण आता नवीन योजनेप्रमाणे हे विद्यार्थी शिक्षण पूर्ण करेपर्यंत त्याचे व्याज शासन भरणार अशी ही योजना आहे.

डॉ. दीपक सावंत : महोदय, यापूर्वी राज्यशासनाने अशा प्रकारची घोषणा केली होती परंतु बँकांनी अशा प्रकारे कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी नकार दिला.

श्री. दिलीप वळसे-पाटील : यासंदर्भात शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली असून आपण कन्सॉर्शन करीत आहोत व त्यानुसार प्रत्येक बँकेकडे विद्यार्थ्याने जाण्याची गरज नाही, ज्या संस्था नॅशनल पॉलिसीअंतर्गत देशातील अनेक बँका विद्यार्थ्यांना 6 लाखापासून 12 लाखापर्यंतचे कर्ज देण्याबाबतची जाहिरात सध्या देत आहेत पण त्याचे व्याज या विद्यार्थ्यांना स्वत: भरावे लागते. आता या वर्गातील पात्र विद्यार्थ्यांना अशा प्रकारे सबसिडी देण्याच्या संदर्भात आणि त्यांचे शिक्षण थांबू नये म्हणून ही स्कीम आणण्याचा आपण विचार करीत आहोत आणि त्या कर्जाचे संपूर्ण व्याज राज्यशासनाच्या वतीने भरण्याच्या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल असे सुतोवाच माननीय अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणातून झालेले आहे आणि ही बाब सध्या शासनाच्या विचाराधिन आहे व लवकरच तसा निर्णय घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, शासन यासंदर्भात कन्सल्टन्सी करणार आणि निधी उभा करणार परंतु माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे 20 टक्के मुलांना कंपल्सरी 12 वी नंतर तसेच मेरिटमध्ये असलेल्या आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी जे पैसे लागतील आणि त्यासाठी कर्ज उभे करावे लागणार आहे त्या कर्जाच्या व्याजाची हमी ज्याप्रमाणे साखर कारखान्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाची हमी शासन घेते त्याप्रमाणे ही हमी देखील शासनाने घ्यावी अन्यथा डॉ. दीपक सावंत यांनी उपस्थित केलेला प्रश्न पुन्हा नव्याने निर्माण होणार आहे. म्हणून या विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शिक्षणासाठी त्यांच्या कर्जाची हमी शासन घेणार आहे काय ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, यासंदर्भात मी अगोदरच सांगितले की, अशी स्कीम आणण्याचा शासनाचा विचार असून या राज्यातील कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून पैशाअभावी वंचित राहणार नाही यासाठी शासनाला जे जे करावे लागणार ते सर्व करण्याची शासनाची मानसिकता आहे आणि हे कर्ज उपलब्ध होण्यासाठी सर्व संबंधित बँकांबरोबर बोलणी करुन एक स्कीम आपण तयार करीत आहोत व त्याला लवकरत लवकर अधिकृतरित्या मंत्रिमंडळाची मान्यता मिळेल व त्यानंतर ती योजना अंमलात आणली जाईल. बँकांनी जर अशा प्रकारे गॅरंटी मागितली तरच राज्यशासनाने गॅरंटी देण्याचा प्रश्न निर्माण होईल. बँकांनी देखील आर.बी.आय. ने दिलेल्या सूचनांप्रमाणे तसेच नॅशनल नॉलेज कॉर्पोरेशनच्या शिफारशीनुसार केंद्रशासनाला जो अहवाल सादर झाला आहे त्यानंतर राष्ट्रीय पातळीवर सुध्दा उच्च शिक्षणासाठी तरतूद वाढविण्यासंबंधीचा निर्णय केंद्राने घेतलेला आहे. त्याचबरोबर बँकांना सुध्दा डायरेक्शन्स जातात आणि देश पातळीवरही अशा प्रकारच्या वित्तीय संस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने केंद्रशासन विचार करीत आहे. परंतु अशा प्रकारचा विचार राज्यामध्ये गेल्या दोन तीन वर्षापासून आपण करीत होतो, त्याला आता मूर्त स्वरुप प्राप्त झाले आहे. एका बाजूला भारत सरकारची अशा प्रकारची स्कीम उपलब्ध असेल तर दुसऱ्या बाजूला राज्यशासनाची सुध्दा स्कीम उपलब्ध असेल आणि ती लागू करण्याच्या संदर्भात शासन प्रयत्नशील आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, जब शिक्षण के ऊपर चर्चा होती है तो उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण और शालेय शिक्षण के मंत्री यहां पर उपस्थित रहते हैं, लेकिन एग्रीकल्चर एज्यूकेशन के मंत्री कभी भी उपस्थित नहीं रहते हैं. हमारे राज्य में 4 कृषि विद्यापीठ हैं. इसलिए एग्रीकल्चर एज्यूकेशन के मंत्री महोदय भी यहां पर उपस्थित रहने चाहिए. इस विभाग के जी.आर. संबंधित लोगों तक नहीं पहुंचते हैं. आप "राइट टू एज्यूकेशन" बिल लेकर आने वाले हैं तो वह 1 से 14 साल तक के बच्चों के लिए रहेगा या 6 से 14 साल तक के बच्चों के लिए रहेगा ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, यासंदर्भातील प्रारुप प्राथमिक स्वरुपात तयार असून सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावर चर्चा होत नाही. या प्रस्तावावर 500 मिनिटांपेक्षा जास्त चर्चा झालेली आहे. शिक्षणाच्या संदर्भात गेली 3-4 दिवस चर्चा झालेली आहे. शिक्षणाचा महत्वाचा विषय असल्यामुळे अधिवेशनातच यावर चर्चा झाली पाहिजे असे काही नाही. सन्माननीय सदस्यांनी जर इच्छा व्यक्त केली तर राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राशी संबंधित असलेल्या सर्व विधानसभा आणि विधानपरिषद सदस्यांचे एक-दीवसाची कॉन्फरन्स बोलावू आणि आणि कॉन्फरन्समध्ये ॲग्रीकल्चर, इंजिनिअरींग, मेडीकल, स्कुल एज्येकेशन या बाबत चर्चा करु, या कॉन्फरन्समध्ये तज्ज्ञांना बोलावू. यासाठी राज्याची स्टेट एज्यूकेशन कौन्सीलचे रीकास्टींग करण्यात आले असून यासंदर्भातील एक बैठक लवकरच माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत होणार आहे. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, आज आपल्याला दोन-तीन बीले मंजूर करुन घ्यावयाची आहेत त्यामुळे आता आपण बिलावर चर्चा करु या.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली होती मी जो विषय मांडला होता त्यामध्ये पंचनाम्यासकट आव्हान केले होते तसेच प्रचार साहित्य देखील होते त्यामुळे त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात? यासंदर्भात आम्ही आपल्याला पुरावे सुध्दा दिलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या बाबीचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे त्याबाबत ज्यांनी कोणी असा प्रकार केला असेल तर संबंधितांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केलेला आहे. यानंतर शासकीय विधेयके घेण्यात येतील.

-----------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. : विजेच्या विक्रीवरील कर (सुधारणा) विधेयक.**

L.A. BILL NO. XXIV OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA TAX ON SALE OF ELECTRICITY ACT, 1963.)

श्री. दिलीप वळसे-पाटील (उर्जा मंत्री ): सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 24 महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 24 महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या ठिकाणी आणलेले विधेयक महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम 1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी येथे आणले गेले आहे. अधिनियम 1963 च्या कलम 5 मध्ये पोट कलम (1) मधील खंड "क" मध्ये 4 पैसे या मजकुराऐवजी 8 पैसे हा मजकूर दाखल करण्याच्या संदर्भात सुधारणा करण्यात आलेली आहे. आपल्या राज्यामध्ये असलेली विजेची टंचाई लक्षात घेऊन ऊर्जा क्षेत्राच्या संदर्भात आपण गेल्या काही वर्षापासून वेगवेगळे प्रयोग करीत आहोत. आपण वीज निर्मिती क्षेत्रात पारपांरीक विजेच्या संदर्भात प्रयत्न करीत आहोत तसेच अपांरपांरीक वीज क्षेत्रामध्ये सुध्दा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. म्हणून राज्य सरकारला असलेल्या अधिकाराप्रमाणे या राज्यामध्ये निर्माण होणा-या आणि विकल्या जाणा-या विजेवर वेगवेगळे कर बसवण्याचा अधिकार राज्यसरकारला आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे - पाटील ................

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगतो की, ज्यावेळी आपल्या पक्षाचे सरकार सत्तेवर होते त्यावेळी अपारंपारिक उर्जा निर्मितीसाठी विशेषत: पवन उर्जेसाठी 12 मार्च 1998 रोजी प्रोत्सहन देणारी एक योजना जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त गुंतवणुकीवर 100 टक्के विक्रीकराची सवलत दिली गेली होती. आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर सुध्दा काही काळ ही सवलत चालू ठेवण्यात आली होती. त्यानंतर 31 मार्च 2002 ला ही सवलत मागे घेण्यात आली होती. जे औद्योगिक आणि कमर्शिअल ग्राहक आहेत त्यांना ग्रीन सेसच्या रुपाने प्रती युनिट चार पैसे या दराने कर लावण्यास सुरुवात केली होती. संपूर्ण जगामध्ये अशी संकल्पना आहे की पोल्युशन निर्माण करणा-या ज्या इन्डस्ट्रीज आहेत त्यांनी कार्बन क्रेडिटस विकत घ्यावयाचे असून सरकार त्यांच्यावर कर लावणार आहेत . कार्बन क्रेडिटसमधून मिळणारे पैसे नॉन कनव्हेन्शनल एनर्जीकरिता खर्च केले जातात. नॉन कनव्हेन्शनल एनर्जीचे सोर्सेस हे अत्यंत महागडे असतात. मी आपल्याला त्या संदर्भात एक उदाहरण देतो. आपण 100 मेगॅवॅटस वीज निर्मिती करण्यासाठी कोळशावर आधारित एक प्रकल्प सुरु केला तर त्यासाठी 400 कोटी रुपये खर्च होतात परंतु 100 मेगॅवॅटस वीज निर्मिती करण्यासाठी पवन उर्जाचा प्रकल्प सुरु केला तर त्यासाठी देखील 400 कोटी रुपये खर्च होत असतो परंतु 100 मेगॅवॅटसच्या प्रकल्पामधून 15 ते 18 टक्यापेक्षा जास्त वीज मिळत नाही. म्हणजे 100 मेगॅवॅटससाठी वीज निर्मिती प्रकल्प सुरु केल्यानंतर 15 ते 18 मेगॅवॅटस वीज मिळते त्यावरुन नॉन कनव्हेन्शनल एनर्जी थोडीशी महागच पडते असे दिसून येते. या क्षेत्राला मदत करण्याची आवश्यकता आहे.आता 4 पैसे कर लावण्यात येत होता तो कर 8 पैसे करण्याच्या संदर्भात प्रस्ताव आणलेला आहे. आपल्यावर हा कर वाढविण्याची वेळ का आली आहे ? आपल्या राज्यामध्ये गेल्या अनेक वर्षापासून यासबंधी चर्चा करीत आहोत की, सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून या राज्यात वीज निर्मिती करता आली पाहिजे. त्यासाठी यापूर्वी अनेकदा प्रयत्न करण्यात आले होते. परंतु या राज्यात कधी ऊसाचे कमी उत्पादन व्हावयाचे तर कधी साखरेचे भाव पडलेले असावयाचे त्यामुळे साखर कारखान्याचे बॅलन्सशीट बिघडले होते आणि एखाद्या कारखान्याने वीज प्रकल्प उभा करण्याचे ठरविल्यावर कोणत्याही बॅन्कांनी या कारखान्यांना कर्ज न देण्याची भूमिका स्वीकारली होती.एका बाजूला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्याकडे वीज निर्मिती करण्याची क्षमता आहे परंतु ही क्षमता वापरली न गेल्यामुळे या राज्यात विजेच्या संदर्भात आपल्याला काही मर्यादा जरुर आल्या होत्या.

**तालिका सभापती (श्री उल्हास पवार)** : सभागृहाची वेळ 6.00 वाजेपर्यंत होती परंतु आता कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.दिलीप वळसे- पाटील : सभापती महोदय, साखर कारखान्यांमध्ये वीज निर्मितीची क्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून राज्य सरकारने एक निर्णय घेतला होता आणि ग्रीन सेसच्या माध्यमातून आपल्याला चार पैसे कर मिळत होता ते पैसे अपारंपारिक उर्जा निमितीसाठी मेडाकडे देत होतो. मेडाने हे पैसे विंड मिल किंवा बायोमास किंवा स्मॉल हायड्रो प्रकल्पाकरिता हा पैसा खर्च केला पाहिजे अशी शासनाची अपेक्षा होती. सन्माननीय सदस्यांना आठवत असेल की अपारंपारिक उर्जा मंत्री श्री.विनय कोरे यांनी या सभागृहात उर्जांकूर निधीच्या संदर्भात चर्चा केली होती परंतु उर्जांकूर निधी उभा केल्यानंतरसुध्दा या राज्यामध्ये को जनरेशनमध्ये फार मोठया प्रमाणावर प्रोजेक्ट आपण मार्गी लावू शकलो नाही. त्याच बरोबर हे प्रोजेक्ट बी.ओ.टी.च्या माध्यमातून घेण्याचा जेव्हा आपण विचार केला होता तेव्हा गुंतवणूक करणारे काही साखर कारखानदार होते त्यामध्ये दर पाच वर्षानी सत्ता बदल होत असावयाचा पोलिटीकल इन्स्टॅबिलीटीमुळे अगोदरच्या संचालकांनी केलेला करार पुढचे संचालक मंडळ मान्य करीलच असे नाही. म्हणून माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांच्या उपस्थितीमध्ये व्ही.एस.आय.ला बैठक घेतली होती व देशातील सर्व मोठया इनव्हेस्टर्सना त्या बैठकीसाठी बोलाविण्यात आले होते.परंतु त्यामध्ये फारशी प्रगती करता आली नाही. त्यामुळे राज्य सरकारने यासंबंधी असा निर्णय घेतला आहे की, उद्याच्या काही दिवसामध्ये सह वीज निर्मितीमधून एक हजार मेगॅवॅटस वीज निर्मिती आपल्याला करावयाची आहे. एक हजार मेगॅवॅटस वीज निर्मिती करीत असतांना अपारंपारिक उर्जा विभागाच्या मार्फत उर्जांकूरची जी योजना आहे ती चालूच राहणार आहे त्यामध्ये सात आठ कारखान्यांनी आतापर्यंत आपले प्रकल्प मार्गी लावलेले आहेत. या सदनातील सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांचा कारखाना असेल वा नगर जिल्हयातील श्री.मारुतराव घुले पाटील यांचा सहकारी साखर कारखाना असेल वा खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 18.05

श्री.दिलीप वळसे पाटील ...

परिचारक यांचा पंढरपूर येथील सहकारी साखर कारखाना असेल वा सन्माननीय सदस्य श्री.बबनराव शिंदे यांचा कारखाना असेल, वा माझा स्वत:चा कारखाना असेल या कारखान्यानी सरकारची कोणतीही योजना नसतांना स्वत:च्या हिंमतीवर कर्ज उभे करुन, कॅपिटल गोळा करुन उर्जा निर्मिती करण्याचे प्रकल्प सुरु केलेले आहेत परतु बाकीच्या सहकारी साखर कारखान्यांना यामध्ये सहभागी करुन घेण्यासाठी राज्य सरकारने एक नवीन योजना आणली असून येत्या तीन वर्षात सहवीज निर्मितीच्या माध्यमातून एक हजार मेगॅवॅटस वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ठ ठरविण्यात आलेले आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील ......

आणि हे उद्दिष्ट ठेवत असताना त्या साखर कारखान्यांनी स्वत:चे 10 टक्के भागभांडवल गोळा करावे आणि बाकीचे भाग-भांडवल केंद्र सरकारच्या शुगर डेव्हलपमेंट निधीतून त्यांना प्राप्त व्हावे आणि ते भाग-भांडवल त्यांना कमी पडले, म्हणजे आधी साखर कारखान्यांनी 5 टक्के गोळा करावे असे अभिप्रेत आहे पण त्यात आणखी कमी पडले तर 5 टक्के राज्य सरकारने द्यायचे आहेत आणि या करातून जे पैसे येतील ते पैसे आपण पुन्हा अपारंपारिक ऊर्जा विभागासाठी वर्ग करणार आहोत. त्यातून हे कॅपिटल उभे करण्यासाठी निधी सहकारी साखर कारखान्यांना देण्यात येईल आणि त्यातून 60 टक्के कर्ज त्यांनी बाजारातून उभे करायचे आणि आपले प्रकल्प मार्गी लावावयाचे आहेत, अशी आपली यातून अपेक्षा आहे. सभापती महोदय, हा कर लावताना सर्वसामान्य माणसाला, ग्राहकाला लावला जाणार नाही तर औद्योगिक आणि व्यावसायिक वीज ग्राहक आहेत त्यांनाच हा 4 पैसे कर लावला जाणार आहे. आपण 2004-05 मध्ये या 4 पैसे कराच्या माध्यमातून 100 कोटीचे उत्पन्न गोळा केले आहे, 2005-06 मध्ये 112 कोटीचे उत्पन्न गोळा केले आहे, 2006-07 मध्ये 119 कोटी, 2007-08 मध्ये 125 कोटीचे उत्पन्न गोळा केले आहे. हे उत्पन्न गोळा करून ते नॉन कन्व्हेंशनलला जेव्हा आपण दिले त्यात काही उत्पन्न हे विंड मिलसाठी आपण दिलेले आहे. त्यातच मग पॉवर इव्हॅकेशनच्या व्यवस्थेसाठी, रस्त्यांसाठी, बाकीच्या गोष्टींसाठी आणि काही कर्ज आता ऊर्जांकुर योजनेच्या माध्यमातून हा निधी खर्च करण्यासाठी प्लॅनिंग आपण केलेले आहे. सभापती महोदय, मी या निमित्ताने आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, हा 4 पैशांचा कर लावल्यानंतर, या संबंधात खालच्या सभागृहामध्ये जेव्हा चर्चा झाली त्यावेळेस अशीही चर्चा झाली की, यामध्ये किती पोटेंशिअल आहे ? आज आपण पाहिले तर आपल्या राज्यात 189 कारखाने आहेत आणि त्या कारखान्यांतून 800 लाख मे.टन ऊस गाळपाची क्षमता आहे. कारखान्यासाठी वापरला जाणारा जो बगॅस आहे तो तेथे जाळल्यानंतर साधारणत: 50 लाख टन बगॅस हा तेथे शिल्लक राहतो. हा शिल्लक राहिलेला बगॅस अन्य कारणांसाठी तेथे वापरला जात होता. म्हणून हा सगळा बगॅस वापरून, कारण कारखान्यांतून दोन प्रकारे आपल्याला वीज निर्मिती करता येते. एक म्हणजे जो बॅक प्रेशर रूट असतो त्यातून आपण कारखाना चालू असताना वीज निर्मिती करू शकतो आणि दुसरा जो कंडेंसिंग रूट आहे त्याद्वारा कारखाना चालू नसला, क्रशिंग सीझन संपला असला तरी देखील तेथील बॉयलर चालू ठेवून त्यातून बारमाही वीज निर्मिती करू

...... 4के 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील .....

शकता. बाकीचे वीज निर्मिती प्रकल्प उभे राहण्यासाठी 4-5 वर्षांचा कालावधी लागत असला तरी हे प्रकल्प उभे राहण्यासाठी दीड ते दोन वर्षांचा कालावधी पुरेसा होतो, तेवढ्या कालावधीत हे प्रकल्प उभे राहू शकतात. जगातील क्युटो प्रोटोकोल प्रमाणे कार्बन क्रेडिटच्या संदर्भात ज्या काही सुविधा यामध्ये उपलब्ध आहेत यातून यासाठी पैसे मिळतात. केंद्र सरकारनेदेखील प्रति मे.वॅ. 40 ते 60 लाख रूपये सबसिडी देण्याचे धोरण घेतलेले आहे. त्याचा लाभ या राज्यातील काही साखर कारखान्यांना ऑलरेडी झालेला आहे. म्हणून एमइआरसीनेदेखील या संदर्भातील जो वीजेचा दर आहे तो निश्चित केला आहे. 3 रूपये 5 पैसे दर अधिक 2 टक्क्यांची वाढ आणि वीज मंडळाने देखील पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट साईन करण्याच्या संदर्भात आधीच्या कारखान्यांच्या बाबतीत भूमिका घेतलेली आहे. आता प्रश्न असा आहे की, हे पैसे तुम्ही कोठल्या कारखान्यांना देणार ? तोंड पाहून कारखान्यांना देणार का ? आणखी कोठल्या कारखान्यांना देणार ? त्यामध्ये राज्य सरकारच्या माध्यमातून जे काही ॲनलेसिस करण्यात आलेले आहे, यासाठी साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. त्यांनी या राज्यातील कारखान्यांचे जे ॲनालेसिस केले आहे त्यात ए कॅटेगरीमध्ये 55 कारखाने आहेत आणि त्या 55 कारखान्यांपैकी 10 कारखान्यांनी ऑलरेडी स्वत:चे प्रकल्प उभे केले आहेत. 45 कारखान्यांच्या माध्यमातून 675 मे.वॅ. आणि बी कॅटेगरीमध्ये 11 कारखाने आहेत आणि त्या कारखान्यांतून 165 मे.वॅ. अशा प्रकारे एकूण 840 मे.वॅ. वीज निर्मिती होऊ शकते. तेव्हा हे सगळे पात्र असणाऱ्या कारखान्यांनाच पहिल्या टप्प्यामध्ये सहकार विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून द्यायचे ठरले आहे. त्यासाठी जवळपास 1008 कोटीच्या आसपास ही रक्कम आपल्याला द्यावी लागणार आहे. बाकीच्या कराच्या माध्यमातून, राज्य सरकारच्या ॲलोकेशन मधून आणि त्याच बरोबरीने या ग्रीन सेस द्वारा मिळणाऱ्या पैशाच्या माध्यमातून देखील आपल्याला हा निधी तेथे उपलब्ध करून द्यायचा आहे. सभापती महोदय, या राज्यातील एकंदर पोटेंशिअल आपण पाहिलेख, कारण या नॉन कन्व्हेंशनलकडे आपण यापूर्वीच्या काळात फारसे लक्ष दिलेले नाही. म्हणून केवळ विंडचे देश पातळीवरील पोटेंशिअल पाहिले तर 45 हजार मे.वॅ. इतके आहे आणि त्यापैकी 4584 चे पोटेंशिअल आपल्या राज्यात आहे. पैकी आपण 1680 मे.वॅ.चे प्रकल्प ऑलरेडी या राज्यात उभे केलेले आहेत. स्मॉल हैड्रोच्या संदर्भात देशपातळीवर 10324 चे पोटेंशिअल आहे ते आपल्या

..... 4के 3 ...



KBS/SBT/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 18:10

श्री. वळसे-पाटील .....

राज्यात 600 मे.वॅ. आहे पैकी 211 मे.वॅ.चे प्रकल्प आपण आपल्या राज्यात उभे केलेले आहेत. ...

( यानंतर सौ.रणदिवे .... 4एल 1 ..

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 18:15

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

बायो मास म्हणजे जंगलातील जो कुडा-कचरा मिळतो त्यातून देश पातळीवर मिळणारे पोटेन्शिअल हे 16 हजार इतके आहे आणि आपल्या राज्यामध्ये ते 781 इतके आहे. त्यातून आपण 18 मे.वॅ.इतकी वीज निर्माण करतो. म्हणजे यामध्ये आपण काही फार काम करु शकलो आहोत असे नाही. आपण बगॅसच्या बाबतीत पाहिले तर देश पातळीवर साडेतीन हजार मे.वॅ.इतके पोटेन्शिअल आहे आणि आपल्या राज्यामध्ये 1250 मे.वॅ.इतके पोटेन्शिअल आहे. त्यामधून आपल्या राज्यामध्ये आजच्या तारखेपर्यंत ऑलरेडी 170 मे.वॅ.चे प्रकल्प उभे राहिलेले आहेत. अर्बन वेस्टच्या संदर्भात आपल्या राज्यात 287 मे.वॅ.इतके पोटेन्शिअल आहे. इंडस्ट्रीअल वेस्टच्या बाबतीत आपल्या राज्यामध्ये सुध्दा 3050 मे.वॅ.इतके पोटेन्शिअल आहे. म्हणजे 7852 मे.वॅ.पोटेन्शिअलपैकी आजच्या तारखेला निरनिराळया सोर्सेसच्या माध्यमातून 2085 मे.वॅ.इतकी वीज निर्मिती करीत आहोत. उद्या आपल्या राज्यामध्ये या वेगवेगळया सोर्सेच्या माध्यमातून हजार मे.वॅ.इतकी वीज निर्मिती करावयाची आहे. अशावेळी जरी राज्य शासनाचे यावर्षीचे बजेट चांगले असले तरी सुध्दा जेव्हा लॉंग टर्म मध्ये विचार करतो, तेव्हा मी मुद्दाम या सदनामध्ये ही बाब रेकॉर्डवर आणू इच्छितो की, आपली आजची थर्मलची कपॅसिटी 6300 मे.वॅ.याच्या आसपास आहे. पुढच्या पाच वर्षामध्ये आपण या राज्यामध्ये 6500 मे.वॅ.वीज निर्मिती करीत आहोत. आधीची जी 6300 मे.वॅ.ची कपॅसिटी आहे, ती मागच्या 50 वर्षामध्ये बिल्टअप झालेली आहे आणि पुढच्या पाच वर्षामध्ये आपण या राज्यामध्ये थर्मल पॉवर प्रोजेक्टच्या माध्यमातून 6500 मे.वॅ.वीज निर्माण करीत आहोत आणि प्रत्यक्षात त्या संदर्भातील काही कामे सुरु आहेत. अशा वेळेला नॉन कन्वेन्शलच्या उर्जा निर्मितीसाठी आपल्याला निधी उभा करणे आवश्यक होते आणि त्यासाठी जो चार पैशाचा निधी लागणार आहे, हा जो कर आहे, तर आधीचे चार पैसे + आताचे चार पैसे असे आठ पैसे कर्मशिअल आणि इंडस्ट्रीअल ग्राहकांकडून घेताना, त्याचा डायरेक्ट सामान्य ग्राहकांवर परिणाम होणार नसला तरी ज्याप्रमाणे पेट्रोलचे भाव वाढले की वाहतुकीचे भाव वाढतात, वाहतुकीचे भाव वाढले की धान्याचे भाव वाढतात आणि धान्याचे भाव वाढले की सामान्य माणसाच्या जीवनावर त्याचा परिणाम होतच असतो. ज्याप्रमाणे जसा बाकीच्या गोष्टींमुळे इनडायरेक्ट परिणाम होतो, त्याप्रमाणे या गोष्टीचा सुध्दा इनडायरेक्ट परिणाम थोडया प्रमाणात जरुर होणार आहे. तेव्हा या बिलामध्ये दुसऱ्या काही विशेष गुंतागुंत नाही. फक्त चार पैशाचा कर आठ पैसे करावयाचा आहे आणि आम्ही हा निधी नॉन कन्व्हीशनलच्या

. . . .4 एल-2

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

ऊर्जा निर्मितीच्या कामासाठी अपारंपारिक ऊर्जा विभागाकडे देणार आहोत. सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाला संमती द्यावी अशी माझी प्रार्थना आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

. . . .4 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी हे विधेयक मांडण्याच्या संदर्भातील सर्व उद्देश सविस्तरपणे विशद केलेला आहे. वीज निर्मितीसाठी जे प्रयत्न केले जात आहेत, त्याचे आम्ही स्वागत करु, त्यासाठी सहकार्य देखील करु.

सभापती महोदय, माझे मुलभूत दोन प्रश्न आहेत. याठिकाणी आपण कमर्शिअल आणि इंडस्ट्रीअल युजरवर टॅक्सेशन करीत आहोत. आज महाराष्ट्रामध्ये अगोदरच वीज महाग झालेली आहे आणि त्यामुळे बऱ्याच इंडस्ट्रीजनां वीज परवडत नाही. यामध्ये व्यावसायिक वापरासाठी लागणारी जी वीज आहे, यामध्ये छोटे-छोटे व्यवसाय करणारे जे आहेत, मग ते झेरॉक्सचा व्यवसाय करणारे, पिठाची गिरणी चालविणारे, टायपिंग इन्स्टीट्युट, छोटया-छोटया एज्युकेशन इन्स्टीट्युट चालविणारे जे लोक आहेत, ते यामुळे भरडले जाण्याची शक्यता आहे. आपण वीज निर्मितीसाठी यांच्यावर कर लावत आहोत. तेव्हा माझ्या यासंबंधात लहान-लहान सूचना आहेत आणि त्या माननीय मंत्री महोदय समजून घेतली असे मला वाटते. वीज निर्मितीसाठी दोन महत्वाचे कॉम्पोनंट लागतात. एक म्हणजे टर्बाईन आणि दुसरे म्हणजे बॉयलर. मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण कोणत्याही थरमॅक्स किंवा बॉयलर मॅन्युफॅक्चररकडे गेलात आणि तुम्ही त्याला वीज निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या बॉलयरसाठी टॅक्सेशनमध्ये एक्झमशन दिले तर जवळपास निश्चितणे 15 ते 20 टक्के बचत होऊ शकते. आज टर्बाइन मिळत नाही. त्यासाठी तीन-तीन, चार-चार वर्षापासून वेटींग लिस्ट आहे हे आपल्याला सगळयांना माहिती आहे. सध्या आपण टर्बाईन आणि बॉयलर मॅन्युफॅक्चरींगच्या बाबतीत कोणतेही कन्सेशन देत नाही. वीज निर्मिती करीत असताना तेथून टॅक्स वसूल करण्याच्या बाबतीत सरकार अतिशय एफीशिअन्ट आहे. त्याबाबतीत कोणताही अर्थमंत्री आपल्याला मदत करण्यास तयार नाही किंवा त्यांच्यापर्यंत हा विषय पोहोचला आहे की नाही याची मला कल्पना नाही. पण वीज निर्मितीसाठी लागणाऱ्या इक्वीपमेंटस्वर सातत्याने कर लादले जातात. मग तो ऑक्ट्रॉय कर असेल, एक्साईज ड्युटी असेल, सेल्स टॅक्स असेल किंवा त्याच्यावरील ॲडीशनल टॅक्स असेल हे सगळे टॅक्स लावण्यात येत आहेत. पण वीज निर्मितीमध्ये ज्यांचा संबंध नाही, अशा छोट्या-मोठया ग्राहकांवर मात्र चार टक्क्यावरुन आठ टक्क्यापर्यंत इलेक्ट्रीसिटी ड्युटी म्हणून टॅक्स वाढवित आहोत. ही मला वाटते की, मुळामध्ये या संपूर्ण प्रोजेक्टकडे पहाण्याची शासनाची जी मानसिकता आहे, त्याबाबतीत विचार केला पाहिजे. या विधेयकाच्या संदर्भात माननीय ऊर्जा मंत्र्यांनी माननीय वित्त मंत्र्यांबरोबर चर्चा करावयास हवी होती.

. . . . 4 एल-4

22-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4L-4

APR/ MMP/ SBT/ 18:15

श्री.श्रीकांत जोशी . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना असे सांगावयास हवे होते की, आम्हाला वीज निर्मितीसाठी हजार कोटी रुपयांचे कॅपिटल पाहिजे आणि ते कोणकोणत्या मार्गाने उपलब्ध होऊ शकते ? तर पहिला मार्ग असा होता की, वीज निर्मिती करणाऱ्या उपकरणांवर टॅक्समध्ये सूट देणे हा सरळ साधा मार्ग होता. कारण सर्वसामान्य ग्राहकांचा खिसा कापावयाचा, त्यांच्या खिशावर भूर्दंड टाकावयाचा आणि सहकारी कारखान्यांना पैसे द्यावयाचे. हे पैसे विजेसाठी द्यावयाचे आहेत हे याचे गोंडस कारण आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ SBT/ MMP/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 18:20

श्री. श्रीकांत जोशी..

वीज निर्मितीसाठी हजार कोटी रुपयांचे कॅपिटलची आवश्यकता आहे. खरे म्हणजे उपकरामधून एक्झमशन देणे हा यामधील सरळ मार्ग होता. सर्वसामान्य माणसांचा खिसा कापायचा व सहकारी कारनाव खान्यांना पैसा द्यावयाचा. हे पैसे वीजेसाठी द्यायचे आहेत असे गोंडस नाव दिले जात आहे. आपल्या सारख्या एफिशियन्ट माणसाने कोणतीही मदत न घेता कारखाना उभारला, मग इतर कोणी तसे का करु शकत नाही ? खरे तर या मधून नको ते प्रयोग होण्याची शक्यता आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे या मधील तज्ज्ञ आहेत ते यातील मुद्दे शोधून काढतील. ए कॅटॅगिरीमध्ये एफिशियन्सीबेस काही तरी करायचा आपला विचार आहे असे आपण एका वाक्यात सांगितले होते. त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे पाटील हे वीज खात्याचे मंत्री आहेत. ते काही कोऑपरेटीव्ह मिनिस्टर नाहीत. त्यामुळे त्यांच्या डोळयासमोर वीज असेल अशी आमची प्राथमिक अपेक्षा आहे. एखादी व्यक्ती कागदापासून, कापासच्या पराटयापासून किंवा कडधान्यापासून एफिशियन्ट कारखाना चालवित असेल, किंवा खाजगी साखर कारखाना असेल तर त्यांना आपण कॅपिटल का देत नाहीत ? वीजेचे संकट सोडविण्याची जबाबदारी फक्त कोऑपरेटीव्हची आहे काय ? वीजेचे जे संकट आज महाराष्ट्र राज्यामध्ये निर्माण झालेले आहे ते दूर करण्यापेक्षा आपल्या कारखान्याला काही फायदा मिळवून देण्याचा विचार हे विधेयक आणण्याच्या मागे आहे काय हा मुद्दा मला येथे सर्वात महत्वाचा तांत्रिक मुद्दा आहे असे वाटते. असा आपण विचार केला तर महाराष्ट्रावर आज ओढवलेले वीजेचे संकट मिटणार नाही. वर्षानुवर्षे गैरव्यवहार करणाऱ्या संस्थांचे जे चेअरमन गब्बर झालेले आहेत त्यांना याचा फायदा होण्याची मात्र शक्यता आहे. आमच्या मराठवाडयामध्ये याची संख्या जरा अधिक आहे.

सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, हा पैसा महाराष्ट्रातील जनतेचा आहे. राज्याचे ट्रस्टी म्हणून पैसा राज्यातील एकत्रित निधीमध्ये किंवा मेडा मध्ये जात असेल तर वीज मंत्री म्हणून आमची आपल्याकडून काही अपेक्षा आहे. हे बिल आता पास करुन दोन टक्के ॲडिशनल वाढ करण्यात येणार आहे. साधारण अडीच रुपये प्रत्येक युनीटची मॅन्युफॅक्च्युरींग कॉस्ट असावी अशी आमची अपेक्षा आहे. यामधील ॲडिशनल चार पैशांचा उपयोग 100 टक्के

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी..

वीज निर्मिती करण्यासाठी झालाच पाहिजे. आपल्याला माहीत आहे या संदर्भात मी अनेक उदाहरण या ठिकाणी सांगू शकतो. याबाबत एक उदाहरण मी आपणास सांगतो की, एका व्यक्तीने टर्बाईनची ऑर्डर दिली परंतु बॅकेची एलसी काढली नाही. त्यामुळे त्या टर्बाइनची किंमत वाढली. मग ते टर्बाईनही आले नाही व त्याने दिलेले पैसेही बुडाले. असे अनेक किस्से आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी केवळ सहकारी कारखान्यालाच मदत देणे हा शासनाचा उद्देश आहे असे मला वाटते. सहकारी चळवळीवर मला टीका करावयाची नाही. परंतु वीज मिळण्याचा जो मूळ मुद्दा आहे त्याबाबत आपण कितपत गंभीर आहोत हा महत्वाचा मुद्दा आहे. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, वीज निर्मितीसाठी शासन जे जे काही करु शकते त्या सर्व गोष्टींचा एका पॅकेजमध्ये अंतर्भाव करण्याची आवश्यकता आहे. एक्झमशन इन टॅक्सेस हा एक मुद्दा आहे. जो वीज देतो त्याला हे पैसे स्क्रोल अकाऊंटमधून देण्याची व्यवस्था केली पाहिजे. आमचा कारखाना वीज निर्मिती करण्याकरिता पूर्णपणे तयार होईल त्यासाठी आवश्यक असणारे टर्बाईन, ब्रॉयलर आम्ही आणू. परंतु त्यासाठी लागणारे कॅपिटल आम्हाला आपण दिले पाहिजे. आता शासनाकडे उपलब्ध होणाऱ्या निधीमधून हा पैसा दिला तरच हे होणे शक्य आहे. आपल्याकडे आलेले विधेयक सहकार खात्याकडून फिरत फिरत येईल व त्यानंतर जमा झालेले 100 कोटी रुपये खिरापतीसारखे वाटले जातील. यामधून वीजही मिळणार नाही व जमा झालेल्या पैशाचेही तीनतेरा होतील. त्यामुळे वीज मिळाल्यावर पैसे दिले जातील अशी व्यवस्था केली तरच या विधेयकाचा काही तरी उपयोग होऊ शकेल असे मला वाटते. अन्यथा यामधून लोकांना भूर्दंड बसेल परंतु राज्यामध्ये वीज मिळणार नाही.

सभापती महोदय, माझी चिंता आपल्याला कळली असेल असे मला वाटते. मी पुन्हा एकदा थोडक्यात आपणास सांगू इच्छितो की, ही सिस्टिम आपण अधिक एफिशियन्ट केली पाहिजे तसेच आता जमा होणाऱ्या निधीचे एक वेगळे खाते असावे. हा पैसा एकत्रित खात्यामध्ये जमा होऊ नये. तसेच ही वीज देत असताना, ज्या दिवसापासून वीज मिळेल, त्याच दिवसापासून इक्वीटी दिली जाईल अशा पद्धतीची व्यवस्था केली पाहिजे. ही जबाबदारी केवळ वाणिज्य व इंडस्ट्रीमधील लोकांची नाही. वित्त विभागाने वीज निर्मितीकरिता एक्साईज डयूटीमध्ये एक्झमशन

..3..



श्री. श्रीकांत जोशी..

दिलेले आहे तसेच लोकल टॅक्सही माफ केलेला आहे व इतरही सुविधा प्राप्त करुन दिलेल्या आहेत. अशी व्यवस्था शासन करणार आहे काय ?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील ( उर्जामंत्री ) : सभापती महोदय, आपण ज्यावेळी कोठल्याही प्रकारचा टॅक्स लावतो त्यावेळी टॅक्सची रक्कम राज्याच्या सेंट्रल कीटीमध्ये जमा केली जाते. टॅक्स डायव्हर्ट करण्याचा कोणताही अधिकार आपल्याला नाही. राज्याच्या सेंट्रल किटीमध्ये निधी जमा इ ााल्यानंतर, त्याबाबत सभागृहामध्ये विनियोजन केल्यानंतर, हा निधी अपारंपारिक उर्जा विभागाकडे वर्ग केला जातो.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

आता अपारंपारिक ऊर्जा विभागाने सुध्दा या पूर्वीच्या काळामध्ये विंडमिलसाठी केवळ सहकारी संस्थांनाच नाही तर खाजगी संस्थांना सुध्दा फार मोठ्या प्रमाणावर मदत करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांच्या डेव्हलपमेंटमध्ये, यामध्ये फक्त सहकारी साखर कारखाने हाच फक्त भाग राहात नाही तर यासंदर्भात जो निर्णय आहे तो अपारंपारिक ऊर्जा विभागाला घ्यावा लागेल. आपल्या बिझनेस रुल्समध्ये लेव्ही ऑफ टॅक्सेस याच्या संदर्भातील हा विषय या विभागाच्या अंतर्गत असल्यामुळे मी हे बिल सभागृहामध्ये मूव्ह केलेले आहे. त्यातून गोळा होणारा पैसा ज्यावेळी राज्याच्या किटीमध्ये जाईल आणि विधानसभेसमोर ॲप्रोप्रिएशन झाल्यानंतर हा पैसा तिकडे जाईल, त्यावेळेला ऊर्जा अंकुर निधीच्या माध्यमातून सुध्दा त्यांनी जे आय.एल.एफ.एस आणि बाकीच्या संस्थांकडून, त्यामध्ये जो ट्रस्ट केलेला आहे त्या ट्रस्टमध्ये काही किटी बाहेरुन आलेली आहे. तसे यामध्ये सुध्दा केंद्र सरकारचा शुगर डेव्हपमेंट फंड आणि ग्रीन सेस यामधून कॅपिटल उभे राहावे, ज्या कारखान्यांची स्वत:चे 10 टक्के कॅपिटल उभे करण्याची क्षमता नाही त्यांना मदत देण्याच्या ऐवजी सरकारची 5 टक्के किंवा 10 टक्के इक्विटी घालावी, त्यातून पॉवर प्रोजेक्ट उभे राहावेत आणि आपण जे म्हटले की असे होऊ नये त्यासाठीच माननीय साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन झालेली आहे. या सगळ्यांचे जे मॉनिटरींग होईल ते सहकार विभागाच्या माध्यमातून होईल. ते ऊर्जा विभागाच्या माध्यमातून होणार नाही. म्हणूनच साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या कमिटीमधून राज्यामध्ये जरी 189 कारखाने असले तरी सगळ्यांना खिरापत वाटावयास नको. म्हणून ज्या कारखान्याचे नेटवर्क प्लस आहे, ज्यांची आर्थिक क्षमता आहे, ज्यांनी गेली तीन वर्षे सिझन चालविलेला आहे, ज्यांनी तीन वर्षे क्रशींग केलेले आहे अशा सगळ्या कारखान्यांचा विचार करुन हे 55 आणि 11 कारखाने काढलेले आहेत. मग त्यांच्या टेंडरींगची आणि बाकी सगळी प्रोसेस साखर आयुक्तांच्या नेतृत्वाखालीच होईल. त्यामुळे साखर कारखान्याच्या संचालक मंडळाला किंवा आणखी कोणाला त्यामध्ये काही वेगळा निर्णय घेण्यासारखी परिस्थिती नाही. हे साखर कारखान्यांना मदत करण्याचे पॅकेज नाही तर या राज्यामध्ये जी आयडल असलेली कॅपॅसिटी आहे ती वापरण्याच्या संदर्भामध्ये साखर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

कारखान्यांना वन टाईम सर्पोट देऊन त्यामधून वीज निर्मिती करण्याच्या संदर्भातील हा प्रस्ताव आहे. म्हणून आपल्या मनामध्ये ज्या काही शंका कुशंका आहेत त्या असण्याचे कारण नाही. अपारंपारिक ऊर्जा विभागाकडे पैसे गेल्यानंतर आपल्याला पाहिजे तर यासंदर्भात एक स्वतंत्र चर्चा अपारंपारिक ऊर्जा विभागाच्या बरोबर करु. त्यामधून ते स्मॉल हायड्रोसाठी किती पैसे वापरणार, विंडसाठी किती पैसे वापरणार ? ज्यावेळी साखर कारखान्यांना मदत करण्याचा विषय मंत्रिमंडळासमोर आला तेव्हा यासाठी लागणारा निधी हा उभा केला पाहिजे आणि त्याच्यासाठी आवश्यक असला तर ग्रीन सेस लावावा. मघाशी सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा सांगितला, मग कॉपियर तसेच बाकीच्या वेगवेगळ्या कॅटेगरीजचा आपण विचार केला तर याच्या संदर्भातील जे ग्रेडींग आहे ते एम.ई.आर.सी. ठरवत असते. कमर्शियल कोण, इंडस्ट्रीयल कोण, त्यांनी लोड किती घेतलेला आहे अशा टेक्निकल गोष्टी त्यामध्ये आहेत. त्यामुळे त्या कॅटेगरीमध्ये जो बसेल त्यांना हा कर द्यावा लागेल. कारण तो ज्यावेळी इंडस्ट्रीयल किंवा कमर्शियल कॅटेगरीतून कनेक्शन घेतो त्यावेळेला त्याचे उत्पन्नाचे साधन सुध्दा तितकेच त्याच्याकडे असते आणि त्यामुळे तो ते कनेक्शन घेतो. म्हणून सगळ्या वर्गावर हा सारखा कर लावण्याच्या ऐवजी आज आपण जर पाहिले तर ग्रामीण भागामध्ये 4 पैसे कर लावला. यापूर्वी मुंबईमध्ये आणि मुंबईच्या सभोवताली ज्या परिसरामध्ये टाटा आणि बेस्ट कंपनी वीज वितरण करते त्या परिसरामध्ये हा कर जवळपास 15 पैशाच्या आसपास आहे. त्यामध्ये आणखी चार पैशाची वाढ होईल. बाकीच्या भागामध्ये मात्र चार पैशाची वाढ होईल. कर लावण्याचा अधिकार हा सरकारचा सार्वभौम अधिकार आहे आणि त्यामुळे हा निधी उभा करण्यासाठी आपण कर लावलेला आहे. बाकीच्या प्रकल्पांना सुध्दा पोटॅन्शियल प्रमाणे आपल्याला जसजसे प्रोत्साहन द्यावयाचे आहे तसतसे निधी उभारणीच्या संदर्भात आपण विचार करु. मला असे वाटते की, हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. उल्हास पवार ) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यानी मांडाव्यात.

( खंड 2 व खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**तालिका सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-----

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

### सभागृहाच्या कामकाजासंबंधी

**तालिका सभापती** : यानंतर सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 25 घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो. आपल्याला शासकीय कामकाज करावयाचे असेल तर दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक दहा (क) वरील जे विधेयक आहे ते घ्यावे. ते विधेयक लगेच मंजूर होईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

सभापती महोदय, स्टॅम्प डयूटीच्या संदर्भातील वि.स.वि.क्रमांक 25 हे उद्या घेण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. कारण सन्माननीय विरोधी पक्ष नेते सभागृहात नाहीत. त्यांना तसेच अनेक सन्माननीय सदस्यांना स्टॅम्प डयूटीच्या या विधेयकावर बोलावयाचे आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर जरुर सूचना कराव्यात. सन्माननीय वित्त मंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये याबाबतचे सुतोवाच केले होते.....

श्री.दिवाकर रावते : मला माहीत आहे की, सन्माननीय वित्त मंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये स्टॅम्प डयूटीसंबंधीचा उल्लेख केला होता. तथापि, हे करासंबंधीचे विधेयक आहे. या सदनातील सन्माननीय सदस्यांना करासंबंधीच्या विधेयकावर बोलण्याची संधी मिळत नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, या विधेयकाऐवजी वि.प.वि.क्रमांक 11 घेण्यात यावे. स्टॅम्प डयूटीसंबंधीचे विधेयक उद्या घेण्यात यावे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माझी काही हरकत नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ.शी.**: उच्च न्यायालय ( खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पध्दती रद्द करणे ) (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XI OF 2008.

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA HIGH COURT (HEARING OF WRIT PETITIONS BY DIVISION BENCH AND ABOLITION OF LETTERS PATENT APPEALS) ACT, 1986.)

श्री.हसन मुश्रीफ ( विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 11, महाराष्ट्र उच्च न्यायालय ( खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र ( लेटर्स पेटेन्ट ) अपिलांची पध्दती रद्द करणे ) अधिनियम, 1986 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती ( श्री.उल्हास पवार )** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 11, महाराष्ट्र उच्च न्यायालय ( खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र ( लेटर्स पेटेन्ट ) अपिलांची पध्दती रद्द करणे ) अधिनियम, 1986 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** :: विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 11 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 11 संमत झाले आहे.

------

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेला ग्लोबल वॉर्मिंगसंबंधीचा प्रस्ताव उद्याच्या विशेष बैठकीमध्ये घेण्यात यावा अशी मी विनंती करतो.

**तालिका सभापती** : उद्या विशेष बैठक होणार आहेच, त्या बैठकीत मुंबईच्या प्रस्तावावर चर्चा होणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय विरोधी पक्ष नेते उपस्थित नाहीत. तसेच अनेक सन्माननीय सदस्यांना या प्रस्तावावर बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सभापतींनी उद्याच्या कामकाजाबाबतची घोषणा अगोदरच केलेली आहे. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगसंबंधीचा प्रस्ताव आज होणे आवश्यक आहे. उद्या सकाळी 10 ते 12.30 वाजता सभागृहाची विशेष बैठक होईल हे सन्माननीय सभापतींनी अगोदरच घोषित केलेले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणा-या हवामानातील बदलाचा मुंबई शहरावर होणारा परिणाम

**मु.शी.**: लोबल वॉर्मिंगमुळे होणा-या हवामानातील बदलाचा मुंबई शहरावर होणारा परिणाम या विषयावर डॉ. दीपक सावंत, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, भास्कर जाधव, ॲड.अनिल परब, सर्वश्री. सय्यद मुझफ्फर हुसेन, मधुकर चव्हाण, गुरुनाथ कुलकर्णी, अरविंद सावंत, श्रीमती अलका देसाई, श्री. विनोद तावडे, प्रा. फौजीया खान, श्री. परशुराम उपरकर, श्रीमती उषा दराडे, सर्वश्री कपिल पाटील, उल्हास पवार, प्रा. सुरेश नवले व श्री. राजन तेली,वि.प.स. यांचा प्रस्ताव.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"इंडियन इन्स्टिटय़ुट ऑफ चेन्नई येथील संशोधक श्री. सुधीर राजन यांनी दिनांक 25 मार्च 2008 रोजी मुंबईहून प्रसिध्द केलेल्या ग्लोबल वॉर्मिंग अहवालानुसार जागतिक हवामानात होणा-या बदलाचा परिणाम मुंबई शहरावर होणार असून मुंबई शहराच्या हवामानात 4 ते 5 सेल्सियस वाढ होऊन मुंबईतील मरिन ड्राईव्ह, रेस कोर्स, मुंबई सेंट्रल स्टेशन, ससून डॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, जुनी जे.व्ही.पी.डी. स्कीम, विमानतळ आदी भागात समुद्र किना-यावर लाटांची उंची 5-6 मीटर वाढून मुंबई जलमय होण्याचा असलेला गंभीर धोका, निसर्गाच्या या संभाव्य कोपामुळे उद्‌भवणा-या आपत्कालिन संकटांना सामोरे जाऊन मुंबईतील सुमारे दीड कोटी जनतेचे जीवित व वित्त रक्षण करण्याकरिता शासनाकडे आपत्कालिन दक्षता योजना नसणे, पारिणामी नागरिकांत निर्माण झालेली भीतीची तसेच चिंतेची भावना, या संभाव्य आपत्तीपासून मुंबई शहराला वाचविण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

जगाला चिंता वाटणा-या अशा ग्लोबल वॉर्मिंगच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित करण्याची मला संधी दिली त्याबद्दल मी व्यक्तिश: आदरणीय सभापती महोदयांचे आणि आपणा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्वांचे आभार मानतो. आज केवळ मुंबई किंवा महाराष्ट्राच्या चिंतेचा हा विषय नाही तर जगातील प्रत्येक देश हा ग्लोबल वॉर्मिंगच्या चिंतेच्या सावटाखाली आहे. या प्रस्तावामध्ये जरी मुंबईचा उल्लेख असला तरी हा प्रस्ताव ख-या अर्थाने ग्लोबल आहे. कारण या ग्लोबल वॉर्मिंगची संपूर्ण जगाला चिंता लागून राहिली आहे. दुदैवाने महाराष्ट्र हे प्रगत राज्य असून देखील या महत्वाच्या विषयावर विशेष चर्चा झालेली नाही. कधी तरी फुटकळ स्वरुपाची चर्चा झाली. आजचा हा दिवस या चर्चेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे याचे कारण आज वसुंधरा दिन आहे. या धरणीमातेला या वसुंधरेला या ग्लोबल वॉर्मिंग पासून वाचवायचे असेल तर ख-या अर्थाने आपल्याला या विषयावर विचारमंथन करायला पाहिजे. या ग्लोबल वॉर्मिंगमुळे 2010 ते 2020 मध्ये येणा-यासंकटांची चाहूल आपल्याला लागलेली आहे. हा विषय केन्द्र सरकारच्या अख्यत्यारितील आहे असे माननीय मंत्री महोदय सांगतील. परंतु राज्य सरकार म्हणून आपलीही काही जबाबदारी आहे. राज्यावर येणा-या संकटांचा सामना शेवटी राज्यकर्त्यांना करावा लागतो, राज्यावर ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणारे दुष्परिणाम हे राज्यकर्त्यांना आणि राज्यातील जनतेला भागावे लागतात, मग ते राज्य कोणत्याही पक्षाचे असो. महाराष्ट्र राज्याची राजधानी असलेले मुंबई शहर हे देशाची आर्थिक राजधानी आहे. जगाच्या नकाशावर मुंबईला एक आगळेवेगळे स्थान आहे. ही मुंबई उद्या जलमय होणार असेल तर ती खरोखरच चिंतेची बाब आहे. पुढे येणा-या सर्व धोक्यांची चाहून निर्सगाने आपल्याला काही दिवसापूर्वी दिली. दोन वर्षापूर्वी कोसळलेला 26 जुलैचा पाऊस हे या इशाऱ्याचे द्योतक आहे. त्या दिवशी मुंबईमध्ये आणि संपूर्ण राज्यामध्ये आभाळ फाटल्याप्रमाणे पाऊस पडला आणि काही क्षणामध्ये मुंबई जलमय झाली. संपूर्ण महाराष्ट्रभर पूर आले. ही निर्माण झालेली परिस्थिती कशाचे द्योतक आहे ? तर वातावरणामध्ये होत असलेल्या बदलाचे हे द्योतक आहे. आता यावर्षी मध्येच पडलेला अवकाळी पाऊस आणि त्यामुळे पिकांचे झालेले नुकसान याची आपणा सर्वांना कल्पना आहे. एका बाजूला घामाच्या धारा वहात आहेत आणि दुस-या बाजूला गारा पडत आहेत. अशा प्रकारे निसर्गाच्या बदलणा-या या ऋतूचक्राबाबत आपण सर्वांनी अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज आहे. आपल्या पैकी कोणी या विषयातील तज्ज्ञ नाही. परंतु या वरिष्ठ सभागृहामध्ये चर्चा

..2..



MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत....)

घडवून आणली तर बाहेर लोकांना एक वेगळा संदेश जाईल की, लोकप्रतिनिधींना या प्रश्नाची जाणीव असून राज्य शासन या प्रश्नावर काम करीत आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे)**

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 18:40

डॉ.दीपक सावंत...

आणि राज्य शासन या विषयावर काही तरी काम करीत आहे असे दिसून येईल. सूर्याचा प्रकाश पृथ्वीवर येतो, त्याच्याबरोबर उष्णता देखील येते. या छोटया छोटया उष्णतेच्या लाटा वातावरणाला भेदून पृथ्वीवर येतात. पृथ्वीला आणि समुद्राला त्या तप्त करतात. उष्ण कटीबंधाच्या जवळ आपण आहोत. ज्यावेळी सूर्य डोक्यावर येतो त्यावेळी माणसाच्या अंगाची लाही लाही होते. आपल्या खालचा खडक तापतो आणि ती उष्णता पुन्हा परावर्तीत होऊन वातावरणामध्ये फेकली जाते. जी उष्णता खडकातून आणि समुद्रातून फेकली जाते. ती उष्णता बाहेर पडून वातावरणातील जे थर आहेत, ज्याला आपण ग्रीन हाऊस म्हणतो. त्याला आपण हरीत गृह असे म्हणू शकतो. त्यात वेगवेगळे गॅसेस असतात. वेगवेगळे वायू असतात. त्यात कार्बन डाय-ऑक्साईड असतो, मिथेन असतो, क्लोरोफ्यूरो कार्बन असतो. ओझोन वायू असतो आणि नायट्रो ऑक्साईड असतो. अशा वायूचा थर असतो तो वातावरणाचे संतुलन सांभाळण्याचे काम करीत असतो. पण आज वाढत्या औद्योगिकरणामुळे, वाढत्या विजेच्या वापरामुळे, कार्बन डाय-ऑक्साईड बाहेर फेकला जातो, ते वायू बाहेर पडून वरती बसतात. त्यामुळे वातावरणातील जे समतोलत्व रहावयास पाहिजे, ते समतोलत्व बिघडते. बाष्प याच्या बरोबर असते. समुद्राचे पाणी तापते, त्यामुळे बाष्प जमा होते. ढग तयार होतात. ते एकत्र जमतात आणि मग कुठे तरी एकाच ठिकाणी भरपूर पाऊस पडतो. आकाश फाटल्यासारखा पाऊस पडतो. सर्वसाधारणपणे पृथ्वीचे तापमान हे 33 डिग्री सेल्सीयस इतके असणे आवश्यक आहे. पण आज असे दिसून आले आहे की, पृथ्वीचे तापमान हळूहळू वाढते आहे. पृथ्वीचे तापमान 0.74 इतक्या डिग्रीने 2008 या वर्षापर्यंत वाढलेले आहे. हे तापमान वाढत जाऊन 1.05 डिग्रीने वा 2 डिग्रीने जर वाढले तर येणा-या दहा वर्षामध्ये ग्लोबल वॉर्मिंगचे खरे चटके आपल्याला बसावयास लागतील. वास्तविक ही प्रक्रिया गेल्या 100 वर्षापासून सुरु आहे आणि गेल्या 50 वर्षापासून या प्रक्रियेने वेग घेतलेला आहे. ही गोष्ट जगातील पर्यावरण तज्ञांना 1974 या वर्षी समजली आहे. यावर खरे काम 1995 च्या आसपास सुरु झाले आहे. कार्बन डाय-ऑक्साईडचा जो स्त्रोत आहे तो कोठून आहे याचा विचार केला पाहिजे. कार्बन डाय-ऑक्साईडचा स्त्रोत आापण स्वत: आहोत. आपण प्राणवायू घेतो आणि कार्बन डाय-ऑक्साईड बाहेर सोडतो. आपल्याकडे अनेक फ्यूएल्सचे कारखाने आहेत. त्यातून मोठया प्रमाणात कार्बन डाय-ऑक्साईड बाहेर पडतो. विजेवर चालणारे अनेक कारखाने आहेत. या ठिकाणी मघाशी बायोमास्कचा उल्लेख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

डॉ.दीपक सावंत...

केला गेला. बायोमास्कच्या माध्यमातून प्रचंड मोठया प्रमाणात कार्बन डाय-ऑक्साईड बाहेर फेकला जातो. त्यामुळे बॅलन्सीग मेकॅनीझम सिस्टीम बिघडते. मिथेन जातो, नायट्रो ऑक्सॉईड जातो आणि क्लोरोफ्यूरो कार्बन जातो. ही बाब कशी लक्षात आली त्या विषयी मी थोडक्यात माहिती सांगतो. युनायटेड स्टेटमध्ये मिसिसिपी डेल्टा हा भूभाग पाण्यातून अचानकपणे नाहीसा झाला. तेथील समुद्रातील पाण्याची पातळी वाढली आणि तो भूभाग पाण्याखाली गेला. त्यामुळे या गोष्टी आपल्या लक्षात आल्या आहेत. तसेच बांगला देशात आलेल्या महापुरामुळे देखील ही बाब लक्षात आली. ज्यावेळी मालदीव बेटे जलमय झाली त्यावेळी ही गोष्ट लक्षात आली. पुराणातील उदाहरण देताना म्हणतो की, व्दारका बुडाली. जगबुडी आली. पुराणात म्हटले आहे की, व्दारका येथे प्रलय आला व्दारका बुडाली. हा सत्ययुगातील प्रलय पुन्हा काही वर्षानंतर आला तर तो ग्लोबल वॉर्मिंगमुळे येईल असे मला वाटते. महाराष्ट्र या बाबतीत सेन्सेटीव्ह का आहे ? महाराष्ट्रातील समुद्राची पातळी वाढत असल्यामुळे 1 मीटरपर्यंत समुद्राच्या लाटा वरती येत आहेत..

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 18:45

डॉ. दीपक सावंत....

आज आपण जर मालवणच्या जवळचा देवबाग किनारा पाहिला तर समुद्राच्या आतमध्ये हा किनारा येऊन भूभाग पाण्याखाली जात आहे. प्रचंड प्रमाणावर धूप होत आहे. 120 कि.मी.लांबीचा सुंदर किनारा कोकणाला लाभला आहे. गेल्या तीन दशकात जेवढा पाऊस झाला नाही तेवढा पाऊस गेल्या तीन दिवसात काश्मीरमध्ये पडला. त्याचप्रमाणे गेल्या 40 वर्षात पडली नाही इतकी थंडी मुंबईमध्ये यावर्षी पडली याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. मुंबईने तापमानाचा नीचांक गाठला होता. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, आयआयटीचा एक अभ्यासगट नेमला होता त्यांनी मुंबईला ग्लोबल वॉर्मिंगचा फटका कसा बसू शकतो यावर भाष्य केले आहे. वाढत्या तापमानाची झड देशातील 33 शहरांना बसणार आहे. त्याच्यामध्ये महाराष्ट्रातील प्रमुख शहरे आहेत त्यामध्ये मुंबईचे तापमान .06 डिग्रीने वाढणार आहे. पुण्याचे .03 टक्क्यांनी, रत्नागिरीचे .04 टक्क्याने, कोल्हापूरचे .05 टक्क्यांनी वाढणार आहे त्याचप्रमाणे अमरावतीचे .07 आणि सर्वात जास्त चंद्रपूरचे तापमान 1.10 टक्क्यांनी वाढणार आहे. अशा प्रकारे जर तापमान वाढत राहिले तर आपल्या दृष्टीने ती खरोखरच चिंतेची बाब आहे. यातून जो परिणाम होणार आहे तो पाहता यामुळे वनस्पतींचा ऱ्हास होणार आहे. यामुळे पाण्याचे तापमान वाढणार आहे. क्षाराचे प्रमाण वाढणार आहे. खारे पाणी होणार असल्यामुळे पर्यायाने झाडांचे नुकसान होणार आहे. ॲमेझॉन नदीच्या पात्रातील रेन फॉरेस्टचे प्रमाण कमी झालेले आहे. संपूर्ण जंगल नष्ट होईल अशा प्रकारची भीती वैज्ञानिकांनी व्यक्त केली आहे. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील 40 टक्के शेतीचे उत्पादन 50 वर्षानंतर कमी होईल. 15 टक्के गव्हाचे उत्पादन कमी होईल . संपूर्ण देशात भूकबळी होतील. 50 वर्षानंतर काय होईल हे सांगता येणार नाही. आज जन्मलेल्या मुलाला त्याची झड 50 वर्षानंतर जाणवू लागेल. त्यावेळी ही मुले आपल्याला दोष देतील. आपल्या दृष्टीने हा चिंतेचा विषय आहे. कारण आपण मुंबईवर, महाराष्ट्रावर आणि देशावर प्रेम करणारे लोक आहोत. पुन्हा एकदा शेतीचे उत्पादन 25 टक्क्यांनी कमी होईल आणि 50 वर्षानंतर पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु होतील. हा जो वायू आहे म्हणजे कार्बनडायॉक्साईड आणि मिथेन तो कोणकोणत्या प्रोसेसमधून तयार होतो हे पाहिले तर इंस्ट्रीयल प्रोसेसमधून 16.8 टक्के, ट्रान्सपोर्टेशनमधून 14 टक्के, फर्टिलायझरमधून 12.50 टक्के, निवासी वापर आणि कमर्शिअल वापर यामधून वीज जाळली जाते तसेच होर्डिंग लावतो त्यामधून जी वीज जळते त्यापासून जो कार्बन तयार होतो त्याचे प्रमाण 10.3 टक्के आहे.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 18:45

डॉ. दीपक सावंत ....

म्हणून आम्ही सूचना केली होती की रात्री 10.00 ते सकाळी 6.00 वाजेपर्यंत होर्डिंगवरील लाईट बंद करा. आज वीज गरजेची आहे. आम्ही सरकारकडे लोडशेडींग नको म्हणून भांडतो. परंतु वीजनिर्मिती केंद्रातून जी वीज निर्माण होणार आहे त्यामुळे 21.3 टक्के कार्बनडायॉक्साईड बाहेर हवेत मिसळणार आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 18:50

डॉ.दीपक सावंत..........

वर्क प्राडक्टिव्ह ट्रिटमेंटमुळे 3.10 टक्के वाढ होणार आहे. आपण जो जैविक कचरा जाळतो त्यामुळे साधारणपणे 3.4 टक्के वाढ होणार आहे. यामुळे वातावरणामध्ये ओझोनचा लेअर जी बॅलेन्सिगची भूमिका बजावतो त्या लेअरला हानी पोहोचणार आहे. मध्यंतरी जी-8 युरोपियन राष्ट्रांची संयुक्त बैठक झाली. मी ज्या अहवालाचा उल्लेख करीत आहे तो अहवाल माझा नाही, महाराष्ट्रातील कोणत्याही व्यक्तीने तयार केलेला अहवाल नाही तर विविध देशातील 630 वैज्ञानिकांनी मिळून हा अहवाल तयार केला आहे. कार्बन डाय ऑक्सॉईड, मिथेन या हरितगृहाचे वातावरणातील प्रमाण सर्वसाधारण पातळीपेक्षा अधिक होणार आहे. यामुळे पृथ्वीवरील माणसांच्या हालचालीमध्ये फरक पडणार आहे. कार्बनचे प्रमाण वाढल्यामुळे पृथ्वीभोवती वायूचा पातळ थर तयार होईल. सूर्य किरणांपासून निघणाऱ्या इन्फ्रारेड किरणांना पृथ्वीवर पोहोचण्यात हा थर अटकाव निर्माण करील. इन्फ्रारेड किरण आपल्याला पृथ्वीवर राहण्यासाठी, ऊब देण्यासाठी आवश्यक असतात. ते इन्फ्रारेड किरण आपल्याला न मिळाल्यास अनेक आजार होऊ शकतील. गेल्या 50 वर्षात विविध औद्योगिक कारणांनी पृथ्वीच्या वातावरणात 0.84 टक्के वाढ झाली आहे असे अहवालात म्हटले आहे. या गोष्टींचा विचार केला तर याचे परिणाम फक्त शेतीवर होणार नसून जमिनींवर देखील परिणाम होणार आहे. जमिनीला मोठमोठ्या भेगा पडतील. जमिनींचा कस कमी होईल. समुद्राच्या पातळीत वाढ झाल्यामुळे समुद्रातील मासे मरतील, समुद्रातील विविध जीवसृष्टी नष्ट होईल. वेगवेगळ्या प्रकारचे इन्सेक्ट, बॅक्टेरिया, माशा निर्माण होतील आणि त्यामुळे पृथ्वीवर रोगांचा प्रादुर्भाव वाढेल. रेन फॉरेस्ट संपल्यामुळे पृथ्वीवर वातावरणाचा असमतोल वाढेल आणि त्यामुळे वातावरणातील वेगवेगळे बदल आपल्यासमोर येतील. मनुष्यप्राण्याला याचा फार मोठा परिणाम सहन करावा लागणार आहे. आपल्या राज्यातील कुपोषणाच्या प्रमाणामध्ये भयानक वाढ होईल. आपण जे अन्नपदार्थ शिजवू त्या अन्नपदार्थातील प्रोटीन्स, सत्व निघून जाईल आणि अप्रोटीनयुक्त अन्न मिळाल्याने मुलांच्या कुपोषणामध्ये वाढ होईल. वातावरणातील बदलांचा डायरेक्ट इफेक्ट होईल. सनस्ट्रोकमुळे माणसे मरतील. जगबुडी आल्यामुळे माणसे मरतील. आजारांमध्ये वाढ होईल. ब्रिटनमध्ये दिवसेंदिवस माशा, उंदीर, झुरळ, डास यांची मोठया प्रमाणावर उत्पत्ती वाढत आहे. आज मुंबईतील डासांचे प्रमाण पाहिले तर प्रचंड वाढलेले दिसते. कितीही किटकनाशकांची फवारणी केली तरी डास मरत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 18:50

डॉ.दीपक सावंत...........

नाहीत. गेल्या काही वर्षात डेंग्यू, मलेरिया या आजाराचे प्रमाण मुंबईमध्ये वाढले आहे. मलेरिया, सेरेब्रल मलेरिया या आजाराचे प्रमाण वाढत आहे. याला व्हेक्टर बॉण्ड डिसीज म्हणतात. या मलेरिया आजाराचे प्रमाण जगात मोठया प्रमाणात वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार 300 ते 500 लोक जगामध्ये दररोज मलेरिया या रोगाने आजारी पडत आहेत. यामध्ये प्रचंड वाढ होत आहे. मी भीती निर्माण करीत नाही. परंतु Prevention is better than cure. भारतापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या चीन या देशाने 1985 सालीच यासंदर्भात पावले उचलण्यास सुरुवात केली. आपण मात्र अद्याप ABCD देखील सुरु केलेली नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मध्यंतरी केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांनी पर्यावरण तज्ञ डॉ.पचौरी यांचा सन्मान केला. परंतु सन्मान झाल्यानंतर त्यांनी देशाला गाईडलाईन्स देणे अपेक्षित होते. त्यांच्या ज्ञानाचा गौरव झ ाला याबद्दल आमच्या मनात कोणताही किंतू नाही. परंतु त्यांनी जे कॉन्ट्रिब्यूशन देणे आवश्यक होते ते दिले नाही हे दुर्दैव आहे. एआयसीटी आणि आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी या विषयावर गांभीर्याने विचार करुन हा अहवाल तयार केला.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ......

आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी हा अहवाल दिला आहे. त्यानुसार पृथ्वीवरील तापमान 3 ते 5 सेंटिग्रेडने वाढेल आणि डासांचा प्रादुर्भाव व डेंग्युचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढेल. डेंग्युमुळे शरीरातील रक्ताचे पाणी कमी होऊन हिमोरेजीक डेंग्यु असेल तर माणूस तात्काळ मरतो. मुंबईत समुद्र किनारा हा प्रभावी ठरणार आहे. तसेच त्यांनी या अहवालात असेही म्हटले आहे की, "The low elevation coastal zone (LECZ), which comprises the coastal regi0n that is less than 10 metres above average sea level, is obviously at direct risk. Even prime commercial properties like the Backbay complex and the Bandra-Kurla complex fall into this category. This means that it's not just the average Koli who will be affected but even Mannat (superstar Shah Rukh Khan's Bandra Bandstand bungalow) would be on the wrong side of the coastline once the sea level rises," "No flights will take off from Chhatrapati Shivaji airport. No couple will canoodle at the Marine Drive promenade and even heirs to the bungalow of Bollywood superstar Shah Rukh Khan will not be able to resist being evicted from their home." अशा प्रकारे समुद्रकिनाऱ्यावर जे बंगले आहेत ते पाण्याखाली जातील. त्यांनी पुढे एक वाक्य असे म्हटले आहे की, "The Gateway of India will be wiped off the Mumbai skyline." आणि तेथे मोठया प्रमाणावर पाणी भरुन जाईल असेही यात म्हटले आहे. हा अहवाल श्री. सुधीर चेला राजन नावाचे शास्त्रज्ञ आहेत त्यांनी आणि आयआयटीच्या विद्यार्थ्यांनी हा अहवाल काढलेलाआहे. समुद्रकिनाऱ्यावर ज्या बिल्डींग रेज आहेत त्यांच्याजवळ एक मीटरपर्यंत समुद्राच्या लाटा वाढल्यामुळे पाणी आत येणार आणि त्या बिल्डिंग्ज सडून जातील व कोलॅप्स होण्याची देखील शक्यता आहे. टायफाईडचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होणार आहे. आज प्लेग रशियात प्रिव्हिलंट झाला आहे व भविष्यात त्याच्या प्रमाणात खूप वाढणार आहे. आज प्लेग जगात सुध्दा फार कमी प्रमाणात दिसत आहे तो देखील फक्त रशियामध्येच परंतु भविष्यात मोठ्या प्रमाणात पिसवा, उंदीर यांची संख्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

वाढणार आहे. त्यामुळे अनेक आजार येऊ घातलेले आहेत. ते म्हणजे लेस्मीनायसिस हा रोग प्रोटोझुमामुळे होतो तो अतिशय वाढणार आहे, त्यावर ट्रिटमेंट फार कमी आहे. हा आजार सध्या फक्त साऊथ आफ्रिकेसारख्या ठिकाणी आढळतो पण जगभरात त्याचे प्रमाण वाढण्याचे चान्सेस आहेत. त्याचबरोबर माशांचाही प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर होणार असून त्यामुळे विविध प्रकारचे आजार होऊन लोकांची बौध्दिक क्षमता कमी होणार आहे. यासंदर्भात आपण काय करायला पाहिजे, कारण हे सर्व होणार हे ठीक आहे पण याला काही तरी उत्तर वैज्ञानिकांनी दिलेले असणारच. मग प्रथम आपण आपल्या घरापासून सुरुवात केली पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे कारचा वापर कमी करायला पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

त्यांनी असे म्हटले आहे की, जो कोणी नवीन कार विकत घेईल त्यावेळेस त्याने ती कार जास्त ॲव्हरेज देणारी आहे काय हे पाहिले पाहिजे. थोडक्यात म्हणजे जास्तीत जास्त ॲव्हरेज देणारी कार घेणे चांगले राहील. जास्त ॲव्हरेज देणारी कार घेतल्यामुळे कार्बनडाय ऑक्साईड तसेच इतर गॅसेसचे प्रमाण कमी होईल. ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात पॉवर प्लँट बंद करण्यास सुध्दा सांगितले आहे. फ्रिजर आणि रेफ्रिजरेटरची जेव्हा गरज असेल तेव्हाच वापरला गेला पाहिजे. ज्यावेळेस फ्रिजर आणि रेफ्रिजरेटरची आवश्यकता नसेल त्यावेळेस तो अनप्लग केला गेला पाहिजे. खरे म्हणजे आपल्याला खरोखरच जग वाचवायचे असेल, मुंबई वाचवायची असेल तर चॅरीटी बिगीन होम पासून सुरुवात करण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळेस ब्रिटनमध्ये ॲसीडचा पाऊस पडला होता तेव्हा ब्रिटनच्या पंतप्रधान श्रीमती मार्गारेट थेचर यांनी यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी समिती नेमली होती. त्यामुळे आपल्यावर तशा प्रकारचा प्रसंग येणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. आता आपल्याकडे ॲसीडचा नाही परंतु गारांचा पाऊस पडतो आहे. तसेच आता आपल्याला ज्या बल्बमध्ये फिलॅमेंट वारले जाते अशा प्रकारचे बल्ब न वापरता सीएफएलचे बल्ब वापरले पाहिजे. जास्तीत जास्त वीज कशी वाचवली जाईल हे पाहिले पाहिजे. तसेच लाकडी सामान घेतांना ते कोणत्या प्रकारचे आहे म्हणजे टर्माईटच्या प्रमाणाचे लेबल बघूनच लाकडाची खरेदी करावी लागणार आहे. जास्तीत जास्त ऑक्सीजनचा पुरवठा व्हावा, ग्लोबल वॉर्मिंगचा धोका नाहीसा व्हावा यासाठी प्रत्येक व्यक्तीने एक तरी झाड लावण्याची आवश्यकता आहे. झाडे लावल्यामुळे ऑक्सीजन आणि कार्बनडाय ऑक्साईडचे प्रमाण समपातळीत राहू शकेल. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका काय राहणार आहे हा महत्वाचा भाग आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात प्रबंधात्मक उपाययोजना आखल्या जाण्याची गरज आहे. ग्लोबल वॉर्मिंगचे परिणाम आपण बंद करु शकणार नाही परंतु ग्लोबल वॉर्मिंगचे धोके आपण काळजी घेतली तर निश्चित प्रकारे कमी करु शकतो. खरे म्हणजे ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात म्हणजे वातावरणात जे बदल होत आहेत, बदलत्या वातावरणामुळे ॲसीडचा जो पाऊस पडतो त्यासाठी राज्य शासनाने तज्ञांची समिती नेमली पाहिजे. आज पर्जन्यमापनाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदय श्री. अजित पवार बोलत आहेत. परंतु आपल्या ज्या वेधशाळा आहेत त्यांनी जर आज

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

पाऊस पडेल असे सांगितले तर दोन-तीन दिवस तर नक्की पाऊस पडत नाही आणि पाऊस पडणार नाही असे सांगितले तर धो-धो पाऊस पडत असतो त्यामुळे आपल्याला ख-या अर्थाने चांगल्या वेधशाळा तयार करण्याची आवश्यकता आहे. हवामानामध्ये जे बदल होतात त्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमली गेली पाहिजे. आज पॉलिटीशिअन ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात जागृत झालेले दिसतात. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे त्यामुळे आपल्या राज्यकर्त्यांनी अधिक जागरुक राहून ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात काम केले पाहिजे. काल राज्यसभेमध्ये ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात चर्चा होती ही चर्चा रात्रीच्या एक वाजेपर्यंत सुरु होती. या चर्चेला राज्यमंत्री श्री. राजा यांनी अतिशय चांगल्या प्रकारचे उत्तर दिलेले आहेत. केंद्रीय राज्यमंत्र्यांचे उत्तर हे सगळयांनी ऐकण्यासारखे आहे. त्यांनी यावर काय नियंत्रण केले पाहिजे याची माहिती दिलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने सुध्दा केंद्रसरकारची वाट न बघता स्तः पुढाकार घेऊन ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात आम्ही हे हे करणार आहोत असे सांगितले पाहिजे. आता समुद्राची पातळी सारखी वाढते आहे. त्यामुळे येणा-या 20 वर्षात काय परिणामांना तोंड द्यावे लागेल याचा अभ्यास करण्याची गरज आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे कुपोषणाच्या संख्येत सुध्दा मोठया प्रमाणात भर पडणार आहे. ग्लोबल वॉर्मिंगला रोखण्यासाठी रेती काढणे, खाण उत्खननचे काम बंद करण्याची आवश्यकता आहे. सिंधुदुर्ग, अलिबाग या ठिकाणी मोठया प्रमाणात रेती उपसली जाते तसेच उत्खनन केले जात आहे त्यामुळे अलिबाग, सिंधुदर्ग जिल्हयाचे किनारे स्पेशल झोन म्हणून ट्रिट करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

त्याचबरोबर रेती काढण्याच्या व खाण उत्खननाच्या ॲक्टीव्हीटीज जवळजवळ बंद करावयास पाहिजेत. आता हे सर्व किनारे इको सेन्सेटीव्ह झोनमध्ये येणार आहेत.. देव करो आणि ग्लोबल वार्मिगचा फटका आपल्याला न बसो. परंतु भविष्य काळात ग्लोबल वार्मिगचा त्रास वाढणार आहे त्याकरिता आता पासून आपण योग्य ती तयारी करावयास पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना एवढेच सांगतो की, Pull up your socks and be ready for your fight with Global Warming. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ( नामनियुक्त ): सभापति महोदया, जिस घर में हम रहते हैं, उसकी सुरक्षा और हित की हमें बहुत चिंता होती है और इसके लिए हम जीवन भर आवश्यक कदम उठाते रहते हैं. मगर हम यह नहीं सोचते हैं कि जिस घर में हम रहते हैं, वह घर किसी गांव में है या किसी शहर में है और उसकी भी सुरक्षा और हित उतना ही आवश्यक है. उसी तरह हम जिस शहर और गांव में रहते हैं वह किसी राज्य में और वह राज्य किसी देश में है और वह देश इस दुनिया में है. यह सोच आज हमारे पास नहीं है. यह इंसान की फितरत है, यही थी, यही है और यही रहेगी. हम हमारा घर और उसकी सुरक्षा, हमारा गांव और उसकी सुरक्षा, ज्यादा से ज्यादा इसके आगे हम सोचते नहीं है. मगर आज दुनिया के 206 वैज्ञानिकों ने अपनी अपनी रिपोर्ट में यह कहा है कि हमें अब जागना होगा, समय पर जागना होगा, समय होते हुए जागना होगा. वरना आने वाली पीढ़ी के हम कातिल ठहराए जाएंगे. ग्लोबल वॉर्मिंग और उसके खतरनाक परिणामों की घंटी दुनिया के हर कोने में गूंज रही है. यह मसला पूरे मानव समूह के सामने चुनौती है और सारी दुनिया को मिलकर इसका मुकाबला करना है. सम्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत ने यह कहा है कि यह बात हमें अपने घर से शुरु करके राज्य, देश और फिर उसके आगे हर तरह की पॉलिसी के अन्दर इनकर्पोरेट होनी जरुरी है. कहा जा रहा है कि पिछले 125 वर्षों में पिछले 11 साल से ग्लोबल वॉर्मिंग में सबसे तेज बढ़ोत्तरी हुई है. बढ़ता हुआ औद्योगिकीकरण, बढ़ती लोकसंख्या, बढ़ता ट्रांसपोर्टेशन, जंगल की कटाई और बदलती लाईफ स्टाईल ये सब हमारी धरती के लंग्स पर प्रहार कर रहे है. इंटर गवर्नमेंट पॅनल आन क्लाईमेटिक चेंजस (आयपीसीसी) ने फरवरी, 2007 में रिपोर्ट दी है. इस रिपोर्ट के अनुसार दुनिया में पिछले 10 वर्षों में कार्बनडाय ऑक्साईड का प्रमाण ड्रॅस्टिकली बढ़ा है और सबसे ज्यादा चिंता की बात है यह है कि पिछले 6 लाख सालों में जितना कार्बनडाय ऑक्साईड वातावरण में नहीं था, वह 1960 के बाद उससे ज्यादा कार्बनडाय ऑक्साईड वातावरण में निकल कर गया है. 1990 के दशक में हर साल एवरेज 6.4 अब्ज टन कार्बन वातावरण में एमिट हो रहा है और 2000 से 2005 तक 7.02 अब्ज टन तक यह बढ़ा है. यह बढ़ता प्रमाण असल चिंता का विषय है, ऐसा आयपीसीसी ने अपनी रिपोर्ट में कहा है,

इसके बाद श्री शर्मा ...

अप्रकाशित प्रति/प्रामाणिक नहीं

. . . . श्रीमती फौजिया खान

खतरा तो हम सब के सिर पर मंडरा रहा है. सवाल यह है कि क्या हम खतरों से मुकाबला करने के लिए सक्षम हैं ? अगर हम सक्षम नहीं हैं तो हम सक्षम होने की दिशा में कौन से कदम उठा रहे हैं ? क्या हमारे पास ऐसी मानसिकता है या फिर देखा जाएगा, ऐसी हमारी सोच है. यह सब से बड़ा सवाल आने वाले 15 सालों में हमारे सामने है. जिस ओजोन लेयर का जिक्र किया गया, उसमें छेद बढ़ने पर धरती के तापमान में 2 से 3 डिग्री सेन्टीग्रेड की बढ़ोतरी हो सकती है, ऐसी जानकारों की राय है. मगर इस प्रक्रिया के प्रभाव क्या हो सकते हैं. माननीय सदस्य ने यहां पर जो विश्लेषण किया है तो उसका असर सिर्फ मुंबई पर ही नहीं होगा. मुंबई के सागर की सतह 6.27 से.मी. आज भी बढ़ गई है और वर्ष 2020 तक यह 15 से 38 से.मी. तक बढ़ सकती है, ऐसा स्टडी रिपोर्ट में कहा गया है. मुंबई भूकंपग्रस्त जोन में है और अगर छोटा सा भी झटका मुंबई को लगता है तो मुंबई शहर समुद्र में बदल सकता है, ऐसा हम समझकर चलते हैं. इसका असर कहां कहां पर होगा, इसकी कल्पना भी करना मुश्किल है. माननीय सदस्य श्री. सावंत ने बहुत सारे प्रभावों का जिक्र किया है, लेकिन वह पूरा नहीं है. उसके आगे बहुत कुछ हो सकता है. केवल समुद्र का स्तर बढ़ जाएगा, इतनी सी बात नहीं है. समुद्र का स्तर बढ़ने से नदियों का पानी बॅक वाटर्स में चला जाएगा और नदियों में बाढ़ आ जाएगी, गंगा नदी में बाढ़ आज जाएगी. ईको सिस्टम प्रभावित होगा और पशुओं, प्राणियों और पक्षियों के ऊपर गंभीर खतरा पैदा हो जाएगा और वे दुनिया से खत्म होने शुरु हो जाएंगे. हमें प्रॉन्स खाने को नहीं मिलेगी. खार जमीन बढ़ जाने की वजह से क्रॉप खत्म हो जाएगी, पीने का पानी कम हो जाएगा और शेती की पैदावार 40 प्रतिशत तक कम हो जाएगी. ओजोन लेयर में छेद होने से अल्ट्रा वायलट रेज धरती पर आएंगी और फिर अलग अलग प्रकार की बीमारियां मानव जाति के लिए शुरु हो जाएंगी और जानवरों के लिए भी बीमारियां शुरु हो जाएंगी. हमें विभिन्न प्रकार की परेशानियों का सामना करना पड़ेगा. यह किसी की कल्पना नहीं है, किसी ज्योतिषी की भविष्यवाणी नहीं है, बल्कि वैज्ञानिकों द्वारा पेश की गई वस्तुस्थिति है. यह बात हमें ध्यान में रखनी होगी. माननीय सदस्य श्री. सावंत ने कहा कि राज्य शासन की ओर से यह जबाब आएगा कि यह विषय राज्य शासन का नहीं है, बल्कि यह विषय केन्द्र शासन का है. लेकिन जब तक हम अपने घर से ग्लोबली सोच शुरु नहीं करते हैं और अपने राज्य की ग्लोबल पॉलिसी के

. . . 4W 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान

बारे में कोई न कोई विचार शुरु नहीं करते हैं, तब तक इसका हल नहीं हो सकता है, क्योंकि इसका हल हमारे घर में है, हमारे राज्य में है, हमारे देश में है और पूरे विश्व की इन्टरनेशनल पॉलिसी में इसका हल है. इस विषय के बारे में हम सब को गंभीरता से सोचना ही होगा. मुझे ऐसा लगता है कि पॉलिटिकल पार्टीज इस विषय को कितना महत्व देते हैं, सभागृह में हमारी उपस्थिति यह बात बता रही है कि हम इस विषय को कितनी गंभीरता से देखते हैं.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ..

हमें पर्यावरण, प्रदूषण, वन सम्पत्ति ये मुद्दे कभी भी इतने गंभीर नहीं लगते है जितने दूसरे मुद्दे लगते हैं. लेकिन आस्ट्रेलिया में जो हाल में चुनाव हुए है, वहां के चुनाव में सबसे बड़ा इशू पर्यावरण था. आज युनाइटेड स्टेट जैसे देश में इस विषय पर खुल कर चर्चा होती है, वाद-विवाद होता है. जॉर्ज बुश जो कि बहुत हट्टी इंसान है, आज उन्होंने पर्यावरण के बारे में अपने विचार बदलने के संकेत दिए हैं. जिस बात का जिक्र डॉ. दीपक सावंत ने किया है कि हमारी संसद में भी इस विषय पर चर्चा हुई है. यह अच्छी बात है कि संसद में इस विषय पर डिबेट हुई है. आयआयटी, दिल्ली के स्टडी ग्रुप ने भी चेतावनी दी है. सम्माननीय केन्द्रीय मंत्री श्री कपिल सिब्बल ने संसद में ग्लोबल वॉर्मिंग के बारे में स्टेटमेंट भी दिया है. यह अच्छा संकेत है. आज हमारे लिए यह समाधानकारक बात है कि आने वाले संकट को हम कबूल कर रहे हैं. जब हम यह कबूल करते हैं तभी तो हम निवारण के बारे में सोचेंगे. मैं यहाँ पर सोलूशन की बात करना चाहती हूं. सोलूशन में सबसे बड़ी चीज़ यह है कि लोक शिक्षण की जरुरत है. हमको पता चलना चाहिए कि ग्रीन हाउस गॅसेंस ओजन लेअर को डिस्टर्ब करती है. छोटी-छोटी बातों से फर्क पड़ सकता है, जिसका जिक्र अभी सम्माननीय सदस्य डॉ. सावंत जी ने किया है. लेकिन उससे भी ज्यादा जरुरी है कि हमारे स्कूल और कॉलेज एज्युकेशन में इस विषय को सिलेबस में इनकार्पोरेट करके उस पर जोर देने की आवश्यकता है. क्योंकि कारणों की जानकारी होगी तभी तो जाकर हम उपायों की बात सोच सकते हैं. फासेस फ्यूल्स, पेट्रोल, गॅस, क्रूड आईल, कोयला, व्हीकल्स, पावर हाउस, इंडीस्ट्रीज, एनर्जी से एमीशन होता है, प्रदूषण होता है. एडवांसमेंट को तो हम रोक नहीं सकते हैं और न ही हम लोगों की लाईफ स्टाईल पर ज्यादा असर कर सकते हैं. चाहे हम कितना भी बोले कि प्लग ऑफ कर दो, फ्रीज का प्लग निकाल करक सो जाओ, लेकिन मुझे नहीं लगता कि यह कोई कर सकता है. लेकिन इन्टरनेशनल लेवल पर कार्बन क्रेडिट का जो कन्सेप्ट लाया गया है, कि जितना कार्बन हम उपयोग कर रहे हैं, एमिट कर रहे हैं उतना ही कार्बन परचेस करते है तो साथ ही साथ आप सोलूशन भी दे रहे है. इसलिए इस कार्बन क्रेडिट के बारे में हमारी सरकार को उपाय करने चाहिए. यह इन्टरनेशनली स्वीकार कर लिया गया है. इस संबंध में गंभीरता से कदम उठाते है तो मैं यह कहना चाहती हूं कि जब सरकार किसी उद्योग को लाईसेंस देती है और उस उद्योग में कार्बन एमिट होता होगा तो उस उद्योग के

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान...

लिए कार्बन क्रेडिट मेन्डेटरी करना चाहिए. यह राज्य सरकार कर सकती है. इसके अलावा अगर हम अपने राज्य में स्टेट कार्बन क्रेडिट बॉडी बनाते हैं, एनर्जी विभाग के अन्दर यह बात हो सकती है, आप स्टेट कार्बन क्रेडिट बॉडी बना लीजिए. इसको हम अपने देश से शुरु करें. यह जरुरी नहीं है कि ग्लोबल वॉर्मिंग से हमारे देश को ही नुकसान होगा, वैसे अमेरिका नंबर वन पर है और भारत तीसरे नंबर पर है. लेकिन फिर भी हम सब को मिलकर इस पर विचार करना होगा तभी सोलूशन होगा. क्योंकि असर भी तो हम सब पर होगा. मैंने कुछ दिन पहले कार्बन क्रेडिट के संबंध में एक प्रस्ताव महसूल एवम् वन विभाग को भेजा था, शायद हमारे अधिकारियों को वह समझ में नहीं आया हो कि कार्बन क्रेडिट क्या होता है और इसलिए उन्होंने वह प्रस्ताव उठा कर बाजू में रख दिया और इतने सालों बाद भी उसके संबंध में कुछ भी नहीं हुआ. लेकिन इस संबंध में कई एक्सपर्ट सलाह देने के लिए तैयार है. जरुरत इस बात की है कि सरकार इसके महत्व को समझ ाकर कदम उठाए. युनाइटेड स्टेट यह कार्बन क्रेडिट के एग्रीमेंट से पीछे हटने के बारे में सोच रहा है. अगर यह सही है तो हमारे देश की ओर से ऐसे विड्रा होने वाले देशों पर दबाव बनाना चाहिए.

इसके बाद श्री शर्मा..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान (पूर्वी तालेवार)

सभापति महोदय, ग्लोबल वार्मिंग के विषय में सभागृह में चर्चा हो रही है. मैंने 2 मंत्रियों के बीच की बातें सुनी. वे आपस में कह रहे थे कि यह मेरा विषय नहीं है, मुझे यहां क्यों बुलाया गया है. मेरा यह कहना है कि यह विषय हर डिपार्टमेंट से संबंधित है. कोई डिपार्टमेंट ऐसा नहीं है, जिसका संबंध ग्लोबल वार्मिंग से नहीं आ सकता. हर डिपार्टमेंट की पॉलिसी में इस विषय को शामिल करके प्रॉयरिटी से इसके ऊपर अमल करने की आवश्यकता है, चाहे वह फोरेस्ट डिपार्टमेंट हो, चाहे इरीगेशन डिपार्टमेंट हो, चाहे इनर्जी डिपार्टमेंट हो, चाहे एज्यूकेशन डिपार्टमेंट हो, चाहे फूड एंड सिविल सप्लाय डिपार्टमेंट हो, चाहे हॅल्थ डिपार्टमेंट हो, चाहे रेवेन्यू डिपार्टमेंट हो, सभी डिपार्टमेंट के साथ ग्लोबल वार्मिंग का संबंध आता है. मैं एक सुझाव देना चाहती हूँ कि ग्लोबल वार्मिंग के बारे में पॉलिसी बनाने के लिए हर डिपार्टमेंट से एक अधिकारी लेकर स्टडी ग्रुप तैयार करना चाहिए. यह ग्रुप राज्य सरकार की पॉलिसी के बारे में तय करे. ग्लोबल वार्मिंग का विषय कितना महत्वपूर्ण है, यह इस बात से सिद्ध होता है कि वर्ष 2007 का नोबल प्राइज श्री. अल्गोरे को इस बात के लिए दिया गया है कि उन्होंने ग्लोबल वार्मिंग पर लोक शिक्षण का काम किया है. ग्लोबली यह विषय बहुत महत्वपूर्ण है. इस विषय के बारे में अगर हम सब से ज्यादा निर्भर अगर किसी डिपार्टमेंट पर है तो वह फोरेस्ट डिपार्टमेंट है, क्योंकि यह डिपार्टमेंट "फाइट बॅक" कर सकता है और इसका इलाज काफी हद तक हो सकता है. इतना होने के बावजूद फोरेस्ट डिपार्टमेंट का हमारे प्रदेश में क्या हाल है. यह बात हमारी सोच के बाहर है. हमारे आदरणीय नेता श्री. शरद पवार ने एक बार कहा था कि महाराष्ट्र में हर डिपार्टमेंट की नस-नस के बारे में मैं जानता हूँ, लेकिन फोरेस्ट डिपार्टमेंट की नस को आज तक नहीं समझ पाया हूँ. हमारे राज्य में 33 प्रतिशत फोरेस्ट होना जरुरी है, लेकिन यह 33 प्रतिशत की बजाय हमारे पास केवल 21 प्रतिशत फोरेस्ट "ऑन रिकॉर्ड" है. हम बोरीवली की वन जमीन का उदाहरण देखें या फिर परभणी और नांदेड का उदाहरण देखें तो रिकॉर्ड पर तो यह फोरेस्ट है, लेकिन सचमुच वहां पर पेड़ पौधे नहीं है, वहां पर फोरेस्ट नहीं है. मैं फोरेस्ट डिपार्टमेंट से यह प्रश्न करना चाहती हूँ कि हमारे रिकॉर्ड में कितना फोरेस्ट है और सचमुच में कितनी जमीन पर फोरेस्ट है. हमारे फोरेस्ट डिपार्टमेंट ने फोरेस्ट बढ़ाने की दिशा में कितना काम किया है? फोरेस्ट डिर्पाटमेंट द्वारा जो पेड़ लगाए जाते हैं, उनके बारे में जानकारी रखने के लिए फोरेस्ट

. . . 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान

डिपार्टमेंट के अधिकारियों की सेन्ट्रल इवेल्यूएशन यूनिट होती है जो यह मालूम करती है कि जो पेड़ लगाए गए हैं, उनकी सर्वाइव रेट क्या है. 4-5 वर्ष तक तो ये प्लान्ट गार्डेड रहते हैं, इसलिए 98 प्रतिशत तक सर्वाइव रेट रहती है. लेकिन अगर सेन्ट्रल इवेल्यूएशन यूनिट 10 साल के बाद देखती है तो सर्वाइव रेट 5 प्रतिशत तक रहती है. क्या सेन्ट्रल इवेल्यूएशन यूनिट की रिपोर्ट को कभी सभागृह में सब्मिट किया गया है ? क्या इस बात की जिम्मेदारी किसी अधिकारी पर तय की गई है, क्या किसी अधिकारी के ऊपर एक्शन लिया गया है ? फोरेस्ट डिपार्टमेंट के ऊपर काम करने की जिम्मेदारी तो है, लेकिन उसका रिजल्ट बहुत कम है और करोड़ो रुपए का प्लांटेशन होने के बाद भी उसका रिजल्ट हमारे सामने नहीं है. यह एक बहुत बड़ा प्रश्न है. इस पर शासन को गंभीरता से सोचना चाहिए.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ......

क्योंकि अगर अनकंट्रोल्ड ग्रेसिंग रही तो फॉरेस्ट खुद-ब-खुद उग जाते हैं. कम से कम इतना भी होने दिया जाए तो ग्लोबल वॉर्मिंग के लिए बहुत बड़ी समाधानकारक बात हो सकती है. वन विभाग की बात आई तो मैं एक बात बताना चाहती हूं कि पुलिस विभाग में स्ट्रक्चरल मशीनरी ऐसी है कि ऊपर के अधिकारियों से नीचे के अधिकारियों तक अधिकार बेलेन्स है लेकिन वन विभाग में सिर्फ ऊपर का सर्कल बड़ा है, नीचे के अधिकारी इनवर्टेड पिरामिड है, उनको कोई अधिकार नहीं है. इसी लिए उनके द्वारा सेफ्टी, गार्डिंग ऐसा कुछ भी नहीं हो सकता है. हमारा फॉरेस्ट कटता जा रहा है और ऐसा होता रहा तो ग्लोबल वॉर्मिंग के लिए जो सबसे बड़ा सही दिशा में कदम हो सकता है वह नहीं हो पाएगा. इसलिए इन्व्हारनमेंट ऑडिट की बात कम्पलसरी होनी चाहिए. कोई भी एक्टीविटीज जो इन्व्हारनमेंट को डिस्टर्ब करने वाली है उसका ऑडिट होना चाहिए.

सभापति महोदया, अंत में मैं यह कहना चाहूंगी कि इन्व्हारनमेंट और फॉरेस्ट एक ही मिनिस्ट्री के पास होने चाहिए जैसे गवर्नमेंट ऑफ इंडिया में है. मैंने एक सुझाव दिया था और मुझे मंत्री जी से आश्वासन भी मिला था, मैंने यह सुझाव रखा था कि वन विभाग के अधिकारी पर्यावरण विभाग में पोस्ट किए जाएं. लेकिन ऐसा कुछ नहीं हुआ. इसका मतलब यह है कि हम इस बारे में बिल्कुल गंभीर नहीं है. ऊर्जा मंत्री इस सदन में मौजूद है. मैं यह बताना चाहती हूं कि नान कन्वेंशनल एनर्जी पर फोकस करना इस समस्या से निपटने के लिए बहुत बड़ा सोलूशन हो सकता है. क्योंकि सोलर एनर्जी हमारे पास भरपूर मौजूद है, उसकी कोई कमी नहीं होने वाली है, सोलर एनर्जी हमेशा ही रहेगी. इसलिए सोलर एनर्जी के इस्तेमाल के लिए संशोधन होना चाहिए. पवन ऊर्जा भी हमारे यहां मौजूद है. नान कन्वेंशनल एनर्जी ज्यादा से ज्यादा इस्तेमाल होनी चाहिए.

सभापति महोदय, ग्लोबल वॉर्मिंग बहुत गंभीर विषय है. इसलिए अंत में मैं इतना ही कहना चाहूंगी कि शासन को इसमें इच्छा शक्ति दिखानी चाहिए. इच्छा शक्ति दिखाने के बाद ही आने वाले संकट के लिए हम तैयार हो सकते हैं. मैं अपना भाषण दो लाईन सुनाकर समाप्त करना चाहूंगी.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ....

पत्थर के जिगर वालो, है इच्छा में रवानी
खुद राह बना लेता है, बहता हुआ पानी.

सभापति महोदय, इच्छा शक्ति होगी तो राहे खुद बन जाएंगी. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं. धन्यवाद.

......

इसके बाद श्री पाशा पटेल का भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. पाशा पटेल ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, निसर्ग लहरी, सरकार बेफिकीर आणि शेतकरी बेजार असा हा सगळा पसारा आहे. जगात वातावरणामध्ये जो बदल होऊ लागलेला आहे त्या बदलांचे परिणाम माझ्या गावामध्ये काय होणार आहेत याचा विचार केला तर पूर्वी 7 जूनला पेरणी व्हावयाची. आता जून महिना जाऊन जुलैच्या 20 तारखेनंतर पेरणीची सुरुवात व्हावयास लागली आहे. पावसाळा पुढे गेला आहे. त्याचा परिणाम असा झाला की, जून महिन्यामध्ये राळ्यासारख्या पिकाची पेरणी व्हावयाची. ते पीक आता संपलेले आहे. आता पाऊसमान बदललेले आहे. पाऊस एवढा लहरी झाला आहे की, तो आला तर येतोच येतो आणि गेला तर जातोच जातो. कधी पाऊस आला तर असा येतो की, एका वर्षाचा पाऊस दोन तासामध्ये पडून जातो. अवकाळी पाऊस कधी येईल याची गॅरंटी राहिलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर महत्वाचा विषय असा तयार झालेला आहे की,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

असे जर वातावरण अस्थिर झाले असेल तर आता आमच्या पिकांचे काय करावयाचे ? एकदा पाऊस पडल्यानंतर पेरणी केल्यावर एक दीड महिना पाऊस आला नाही तरी ते पीक तग धरेल अशा पिकांचे बियाणे शोधून काढावे लागणार आहे. त्याशिवाय पर्याय नाही. परवाच अवकाळी पाऊस पडला आहे. हा पाऊस अचानक पडलेला नाही. पाऊस पडण्यासाठी कोठून तरी ढग जमा झाले असतील, त्यासाठी दोन दिवस लागले असतील. दोन दिवस हवामान खात्याला शेतक-यांना सांगता आले असते. त्या ढगांना अडविता येणार नाही, पण निदान दोन दिवसांनी पाऊस पडणार आहे हे तरी सांगता आले असते. एखाद्याला काढून ठेवलेल्या ज्वारीवर ताडपत्री तरी टाकता आली असती, त्याची रास करुन ठेवता आली असती. पण असे झाले नाही. हवामान खात्याकडून टी.व्ही.वरुन दररोज हवामानाची माहिती दिली जाते. परंतु ती बातमी लोक ऐकतच नाहीत. कारण लोकांना या हवामान खात्यावर भरवसा राहिलेला नाही. या पुढील काळामध्ये किती दिवसामध्ये किती पाऊस पडणार आहे हे आगाऊ सांगण्याची यंत्रणा विकसित करणार आहे काय ? या सर्व गोष्टी हवामान खाते सांगणार आहे की नाही ? राजस्थान सारख्या भागामध्ये 100-200 वर्षे पूर आला नव्हता. पण तेथे महापूर आला. माझ्या निलंगा तालुक्यामध्ये मदनसुरी नावाचे गाव आहे. तेथे 200 वर्षामध्ये कधी पाऊस पडला नव्हता इतका पाऊस पडला, ओढयाला पूर आल्यामुळे गु-हाळ सुध्दा वाहून गेले आहे. ढग फुटी झाली आहे असे लोक म्हणू लागले. आता पहिल्यापेक्षा वीज पडण्याचे प्रकार वाढू लागले आहेत. ग्लोबल वॉर्मिंगचा हा परिणाम आहे असे सांगितले जाते. माझ्यासमोर एक निष्कर्ष आहे, त्यातील काही भाग मी वाचून दाखवितो. "जागतिक तापमानामध्ये वाढ आणि वातावरणात प्रदूषित घटकाचे प्रमाण वाढल्यामुळे विजा चमकण्याचा आणि त्या कोसळण्याचा धोका वाढण्याची शक्यता आहे. उष्णतेमुळे हवा तापते आणि ती वेगाने वर जाते त्याच वेळी हवेत मोठया प्रमाणात बाष्प असल्यास विजा कोसळण्याची संख्या वाढते. हे कशामुळे धोका आहे, हा सुध्दा ग्लोबल वॉर्मिगचा परिणाम आहे. म्हणजे आता वीज पडणार आहे, रोग येणार आहे, चारा संपणार आहे, समुद्र जमिनीत शिरणार आहे, अन्न मिळणार नाही, पिण्यासाठी पाणी मिळणार नाही. एवढया सगळया गोष्टी होणार आहेत. म्हणजे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.पाशा पटेल....

आमच्यासमोर मरण येऊन थांबले आहे. कोणीतरी सांगितले आहे की, हे भयानक आहे. हे सत्य आहे. हे विज्ञान सांगत आहे. हे सत्य असताना आपल्या सारखे सभागृहात जागरुक लोकप्रतिनिधी किती आहेत ? समोरच्या बाजूला नवीन आमदार आहेत, आम्ही दोघे आहोत. हे मी यासाठी सांगत आहे की, आपण कार्यकर्ते असताना ही परिस्थिती आहे, तर सामान्य लोकांमध्ये किती अनभिज्ञता असू शकते ? लोकांसंबंधी बोलावयाचे झाले तर बीबीसीने लाईव्ह टेलिकास्टद्वारे मुंबईतील रहिवाशांबाबतची चर्चा केली होती. मुंबईतील पाण्याची पातळी वाढणार आहे असा प्रश्न विचारल्यावर 20 पैकी 2 जणांनी होय असे उत्तर दिले. ग्लोबल वॉर्मिंगचे काय परिणाम होणार आहेत हे संपूर्ण देशामध्ये 25 टक्के लोकांनाही माहीत नाही. या सर्व परिणामांपासून वाचावयाचे असेल तर हे बदल कशामुळे होत आहेत त्याचे कारण शोधले पाहिजे. संयुक्त राष्ट्र संघाने काही महिन्यापूर्वी जाहीर केलेल्या अहवालात असे नमूद केले आहे की, दरवर्षी 45 हजार चौरस मैल क्षेत्रावरील जंगल नष्ट होत आहे.

नंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...

जंगल, जमीन आणि पाणी या तीन गोष्टींवर माणसाचे जीवन अवलंबून आहे. मला शासना समोर एक महत्वाचा प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. 33 टक्के झाडे असल्या शिवाय पर्यावरण समतोल राहणार नाही. आपल्याकडील वनक्षेत्र 33 टक्क्यावरुन 11 टक्क्यावर आले आहे. त्यामुळे आपल्या देशातील वातावरण आपण योग्य प्रकारे टिकवू शकणार नाही. हा केवळ आपलाच नाही तर संपूर्ण जगाचा प्रश्न आहे. 1991मध्ये अमेरिकेने इराकवर बॉम्ब टाकला आणि नेपाळमध्ये काळा पाऊस पडला. सभापती महोदय, कोण करेल आणि कोण भरेल याचा नेम नाही. म्हणून आपण याकडे जागरुकतेने लक्ष देण्याची गरज आहे. माणूस जातीला जिवंत ठेवायचे असेल तर वन खात्याने महत्वाची भूमिका घेणे आवश्यक आहे. आपल्या वन खात्याच्या संदर्भात काय सांगायचे ? आपल्या वन खात्याने गेल्या 40-50 वर्षात वेगवेगळया योजनेतून लावलेल्या झाडांची आकडेवारी पाहिली तर आपणास आश्चर्य वाटेल. ती लावलेली झाडे जर जिवंत असती तर पृथ्वीवर पाऊल ठेवायला जागा राहिली नसती एवढी झाडे झाली असती. ही सगळी झाडे कागदावरच राहीली. मानव जात पृथ्वीवरुन नष्ट होणार असेल तर तिला वाचविण्यासाठी काय काय करता येईल हे पाहणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावण्यास सांगितले जाते. माझ्या गावी 90 एकराचा माळ आहे. आतापर्यन्त वेगवेगळया योजनेंतर्गत असंख्य झाडे तेथे लावण्यात आली. परंतु आता तेथे एकही झाड नाही. झाड कसे असते हे दाखविण्यासाठी झाडाचे चित्र काढावे लागेल. सगळा माळ कोरडा आहे. या ग्लोबल वॉर्मिंच्या संदर्भात एक वेगळी यंत्रणा नव्याने उभी करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी अशा प्रकारचा प्रस्ताव चर्चेला आणून एक चांगले काम केलेले आहे. माननीय मंत्री महोदय मुद्दे लिहून घेण्याचे काम करीत आहेत. सभागृहामध्ये म्हणावी तितकी उपस्थिती दिसत नाही. मला या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, या विषयाकडे संपूर्ण जगाने गांभीर्याने बघितले तरच माणूस ही जात अस्तित्वात राहू शकेल.

या निमित्ताने मी काही सूचना करणार आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. गिते...

ABG/ KGS/ KTG/ 19:40

श्री.पाशा पटेल...

महाराष्ट्रातील कोणत्याही शहरात ॲटोरिक्षाने फिरा. त्यावेळी प्रदूषण काय असते हे सर्वांना कळून येईल. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांकडे चारचाकी वाहन असल्यामुळे त्यांना ॲटो रिक्षाने येण्याची गरज भासत नाही. ॲटोरिक्षामध्ये वाहन चालक पेट्रोल टाकत नाहीत. ॲटोरिक्षात सर्रासपणे रॉकेल टाकले जाते आणि त्या ॲटोरिक्षातून प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय शहरी तसेच ग्रामीण भागात मोठया प्रमाणात होत आहे. अशा ॲटोरिक्षात बसल्यानंतर त्या ॲटोरिक्षाच्या सायलेंन्सरमधून जो धूर बाहेर पडतो, त्यामुळे डोळयांची जळजळ होते. तसेच त्या ॲटोरिक्षातून प्रवास करुन आल्यानंतर आपण रुमालाने तोंड पुसले अथवा नाक पुसले तर तो संपूर्ण रुमाल काळा पडतो. काही देशामध्ये प्रदूषण होऊ नये म्हणून वाहनांसाठी फक्त पेट्रोलचाच वापर केला जातो. प्रदूषण होऊ नये म्हणून वाहनांसाठी डिझेलचा वापर जास्त केला जात नाही. परंतु आपल्याकडे मात्र प्रदूषणाची चिंता न करता वाहनांसाठी सर्रास डिझेल आणि रॉकेलचा वापर करण्यात येतो आहे. रॉकेलचा वापर केल्यामुळे फारच मोठया प्रमाणात कॉर्बनडॉय ऑक्साईड बाहेर पडतो, पर्यायाने प्रदूषणात मोठया प्रमाणात वाढ होते. पेट्रोल, डिझेल या ऐवजी इथेनॉलचा वापर केला तर प्रदुषण निश्चितपणे कमी होते. इथेनॉलचा वापर केला तर प्रदूषण कमी होईल तसेच राज्यातील शेतक-यांना दोन पैसे मिळतील. आपल्या देशात इथेनॉलचा प्रयोग यशस्वी झाला असतानाही गेल्या चार, पाच वर्षापासून इथेनॉलच्या प्रयोगाचा बट्टयाबोळ केला गेला आहे. याबाबतीत शासन गंभीर नाही असे माझे ठाम मत आहे. आज देशात विमान कंपन्यांची संख्या वाढली आहे. पर्यायाने विमान वाहतूक मोठया प्रमाणात सुरु झाली आहे. विमानातून निघणा-या कॉर्बन डाय-ऑक्साईडमुळे आकाशात प्रदूषण होते. परंतु या प्रदूषणावर नियंत्रण आणावयाचे असेल तर इथेनॉलचा वापर करुन विमान चालविण्याचा प्रयोग केला गेला पाहिजे. तो प्रयोग यशस्वी झाला तर मोठया प्रमाणात देशाला आर्थिक फायदा होईल व प्रदूषण कमी होईल. म्हणून या गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. थर्मल मधून धूर बाहेर पडतो, त्यामुळे प्रदूषणात वाढ होते. त्यावर देखील नियंत्रण आणण्याची आवश्यकता आहे. या पर्यावरणामुळे शेती उत्पादनावर देखील परिणाम होतो आहे. शेतीचे उत्पादन वाढवावयाचे असेल तर प्रदुषण कमी करणे आवश्यक आहे. शेती उत्पादनाच्या बाबतीत चीनने एक मॉडेल तयार केलेले आहे. त्या मॉडेलनुसार शेतीचे उत्पादन मोठया प्रमाणात घेण्यात त्या देशाला यश आलेले आहे. भारतात बी.टी.कापसाचा शोध

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ KTG/ 19:40

श्री. पाशा पटेल....

घेतला, बी.टी.कापसाचे उत्पादन या राज्यात, या देशात मोठया प्रमाणात होऊ लागले आहे. आज देशात महाराष्ट्र राज्य हे बी.टी.कापूस पिकविणारे दोन नंबरचे राज्य झाले आहे. ज्या प्रमाणे बी.टी.कापसाच्या बियाण्याच्या शोध घेतला गेला. त्याप्रमाणे बाजरी, ज्वारी, फळगार्ग या पिकांचे उत्पादन कसे वाढेल याबाबतीत सुध्दा आपल्याला विचार करावा लागणार आहे. माणूस जातीला वाचववायाचे असेल तर भविष्यात प्रदूषणावर नियंत्रण आणण्याची निंतांत आवश्यकता आहे. पिकांवर फवारणी करतो,त्यातून देखील मोठया प्रमाणात प्रदूषण होते, या गोष्टीकडे देखील लक्ष देण्याची गरज आहृ लातूर येथील तूर कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात जाते. परंतु या तुर धान्याबरोबर इंडो सल्फेन आणि डी.डी.टी. जाते. या मानव जातीला वाचववायाचे असेल प्रदूषणाच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे. दिवसें दिवस अशाच प्रकारे प्रदूषण वाढत गेले तर भविष्यात त्याचे दुष्परिणाम खूप मोठे होतील. म्हणून या गंभीर गोष्टीची दखल शासनाने तातडीने घेतली पाहिजे. पर्यावरणाच्या बाबतीत शासनाने गंभीर होण्याची आवश्यकता आहे. मानव जातीला वाचववायाचे असतील तर हे राज्य, हा देश प्रदूषण मुक्त होणे गरजेचे आहे. आज ग्रामीण आणि शहरी भागात उष्णतेचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे. जर प्रदूषण खरोखरच कमी करावयाचे असेल तर झ ाडांची मोठया प्रमाणात लावगड केली पाहिजे. तसे केले तर निसर्गाचा समतोल योग्यपणे राखला जाईल असे माझे मत आहे. राज्यात वाढत असलेले प्रदूषण रोखण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत. पर्यावरणाचा समतोल कसा राखला जाईल या गंभीर गोष्टीकडे शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी शासनास विनंती आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक नवीन व अतिशय चांगला आणि महत्वाचा विषय सभागृहात उपस्थित केला, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. प्रदुषण कशा पध्दतीने नियंत्रणात आणता येईल याबाबतीत शासनाने गंभीर व्हावे अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. कानडे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी सदनासमोर सध्या जगासमोर असलेले आव्हान आणि त्या आव्हानासंबंधी जनमानसामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी एक चांगला विषय मांडला आहे. त्यांनी मुंबई शहराचा प्रामुख्याने उल्लेख केला. पर्यावरणाचा धोका मुंबई शहराला आहेच परंतु विशेषत: महाराष्ट्रातील ज्या अर्बन सिटीज् आहेत म्हणजे ज्याठिकाणी मोठया प्रमाणावर नागरिकरण होत आहे त्या शहरांना सुध्दा ग्लोबल वॉर्मिंगचा धोका आहे. केवळ पर्यावरणासंबंधी विचार करुन चालणार नाही. केवळ पर्यावरणाशी संबंधित हा विषय नसून या विषयाशी नगरविकास मंत्रालय, वन मंत्रालय आणि अपारंपारिक ऊर्जा मंत्रालयांचा देखील जवळचा संबंध आहे. या चर्चेच्या निमित्ताने माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनी केलेल्या मुद्यांचा ऊहापोह न करता काही नवीन मुद्दे थोडक्यात मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. कार्बनडायॉक्सॉईड आणि मिथेन गॅसचा उल्लेख करण्यात आला. हे दोन वायू हवेत सोडल्यामुळे प्रदुषणाचा धोका निर्माण होत आहे. आपण पाहिले तर दिवसेंदिवस नवीन चार चाकी वाहने रस्त्यावर मोठया प्रमाणात वाढत आहेत. त्यामुळ प्रदुषणाच्या पातळीत फार मोठी वाढ होत आहे. म्हणून सर्वात आधी या गोष्टीला पायबंद घालण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. केंद्र शासनाकडून याबाबतीत नॅशनल पॉलिसी फॉर अर्बन पार्किंग तयार झ ाालेली आहे. रस्त्यावरुन धावणाऱ्या जादा गाडयांना अधिक टॅक्स लावण्याचे निश्चित केलेले आहे. हा कायदा महाराष्ट्रामध्ये सुध्दा लवकरात लवकर लागू करावा अशी मी शासनाला विनंती करतो. यातून मिळणाऱ्या पैशाचा वापर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी करण्यात यावा अशी विनंती करतो. श्रीमंत लोकांच्या चैनीमुळे या राज्यातील गरीब आणि लहान मुलांच्या आरोग्याला फार मोठा धोका निर्माण झालेला आहे. या प्रदुषणामुळे अस्थमा, डेंग्यू, चिकुन गुनिया यासारखे रोग फैलावू लागले आहेत. गेल्या काही वर्षातील आकडेवारी पाहिली तर चिकनगुनियाच्या रोग्यांची संख्या झ ापाटयाने वाढत आहे. महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य संचालनालयाने या रोगाची टक्केवारी वाढत असल्याने जाहीर केलेले आहे.

सभापती महोदया, दुसरा मुद्दा ऊर्जा मंत्रालयाशी संबंधित आहे. माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील सदनामध्ये उपस्थित आहेत. आज राज्यामध्ये विजेची गरज आहे. लोडशेडींग होत आहे. परंतु जास्त विजेची गरज असताना देखील 77 टक्के वीज निर्मिती ही थर्मल पॉवरमार्फत केली जाते. याला पर्याय म्हणून सौर ऊर्जेचा वापर अधिकाधिक होणे आवश्यक आहे. अपारंपारिक

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ....

ऊर्जा मंत्रालयाने यासाठी पर्याय देणे गरजेचे आहे. घरगुती वीज वापराचा उल्लेख करण्यात आला. गिझरमुळे सर्वात जास्त पॉवर वापरली जाते. म्हणून याला सौरऊर्जेचा पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे. सौरऊर्जा निर्माण करण्यासाठी जी सबसिडी दिली जाते त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सबसिडी वाढविल्यामुळे लोकांमध्ये फार मोठा प्रसार होईल आणि डिझेलऐवजी सौरऊर्जेचा वापर होईल. म्हणून मी मंत्रीमहोदयांना विनंती करतो की सौर ऊर्जेच्या वापरासाठी जास्त सबसिडी जाहीर करण्याबाबतचे धोरण ठरवावे. भविष्यकाळाच्या दृष्टीने ही अतिशय चांगली गोष्ट होईल. बल्बऐवजी सीएफएल बल्ब वापराची राज्यभर सर्वच ठिकाणी अंमलबजावणी करण्यात यावी. ओसराम कंपनीला हे बल्ब तयार करण्यासाठी वर्ल्ड बँकेकडून फार मोठया प्रमाणावर निधी अनुदान स्वरुपात मिळतो. हे बल्ब फुकट द्यायला कंपनी तयार आहे. परंतु केंद्र शासनाने परवानगी न दिल्यामुळे अल्प दराने हे बल्ब बाजारामध्ये मिळतात. याबाबत सुध्दा शासनाने त्वरित निर्णय घ्यावा आणि त्यादृष्टीने पावले उचलावीत. हवेतील कार्बनडाय ऑक्सॉईड झाडे शोषून घेतात. सध्या सर्वच ठिकाणी नागरिकरण वाढत आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यात 33 टक्के वनक्षेत्र आवश्यक असताना केवळ 11 टक्के वनक्षेत्र सध्या अस्तित्वात आहे. शहरातील हिरवीगार झाडे निर्दयपणे तोडली जात आहेत. मोकळया जागा, आरक्षित जागांचा नागरिकरणासाठी होणारा वापर थांबविला पाहिजे. झाडे कापली जातात परंतु नवीन झाडे लावली जात नाहीत याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री. भोगले

श्री.मोहन जोशी..........

आपल्या शेजारी असलेल्या चीन या देशाने हा धोका ओळखून मोठया प्रमाणावर वृक्षारोपणाची मोहीम हाती घेतली आहे. सामाजिक वनीकरणाचा त्यांचा वेग पाहिला तर मोठया प्रमाणात ही मोहीम सुरु केली आहे. पुणे शहरात डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये डोंगर उतारावर बीडीपी म्हणजे बायो डायव्हर्सिटी पार्कसाठी आरक्षण टाकण्यात आली आहेत. राज्यामध्ये पुणे महापालिका आणि पुणे शहराने प्रथमच बीडीपीसाठी आरक्षण टाकली आहेत. राज्य शासनाने पूर्ण राज्यामध्ये याची अंमलबजावणी कशी करता येईल यादृष्टीने पावले उचलली पाहिजेत. दुसरी महत्वाची गोष्ट मिथेन गॅसच्या संदर्भातील आहे. आशिया खंडात गोळा होणाऱ्या कचऱ्यामुळे हा धोका वाढत आहे. कोर्टाचे आदेश असताना सुध्दा कचऱ्याचे विभाजन केले जात नाही. यामुळे निर्माण होणारा गॅस 20 पटीने अधिक धोकादायक आहे. कचरा कुजवण्यापेक्षा व्हरांड्यामध्ये किंवा गच्चीवर कुंडीमध्ये, खड्डा खणून कुजवायचा आणि त्यापासून कंपोस्ट खत निर्माण करण्यासाठी जनजागृती करणे महत्वाचे आहे. यासाठी स्वयंसेवी संस्थांनी पुढे येणे आवश्यक आहे. पुणे शहरामध्ये दैनिक सकाळ या मराठी वृत्तपत्राने या संदर्भात मोठया प्रमाणावर कार्य सुरु केले आहे. या गोष्टीला लोकांचा पाठिंबा मिळत आहे. ग्रामीण भागाने सुध्दा या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ऊस कापल्यानंतर जमीन जाळली जाते. त्यातून मोठया प्रमाणात वायू तयार होतो. त्यासाठी इतर प्रयत्न होणे आवश्यक आहे. भातशेतीसाठी रोपे तयार करताना पाणी कुजविले जाते याचा देखील विचार होणे आवश्यक आहे. उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या शेणाचा वापर करुन गोबर गॅसची निर्मिती होणे आवश्यक आहे. आगामी काळात आपण शहाणे झालो नाही तर सर्वात जास्त धोका आशिया खंडाला निर्माण होणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जो अहवाल नुकताच जाहीर केला त्या अहवालामध्ये आशिया खंडातील भारत आणि बांगलादेश या दोन देशांना प्रामुख्याने ग्लोबल वॉर्मिंगचा फटका बसणार आहे असे त्यांनी जाहीर केले आहे. मघाशी जो उल्लेख झाला त्या नोबेल पारितोषिक विजेते अल गौर यांनी जो अहवाल तयार केला, त्यांनी ग्लोबल वॉर्मिंगवर जी फिल्म तयार केली आहे ती फिल्म सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना दाखविली गेली तर निर्माण झ ालेला हा धोका आणि निर्माण होणारी परिस्थिती याची जाणीव सर्वांना होईल. भारत हा विकसनशील देश आहे. प्रत्येक वर्षी 47.7 टक्के या प्रमाणात हा धोका वाढत आहे. अमेरिकेत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 19:50

श्री.मोहन जोशी...........

9.9 टक्के धोका वाढत आहे. यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक कार्यक्षम करणे आवश्यक आहे. नॉन मोटार ट्रान्सपोर्ट झोन तयार केले पाहिजेत. सायकलने प्रवास करण्यासाठी जास्तीत जास्त नागरिक कसे तयार होतील यादृष्टीने प्रयत्न व्हावेत. यासाठी रस्त्यावर वेगळे सायकल ट्रॅक बनविण्याची आवश्यकता आहे. जास्तीत जास्त लोक पायी चालतील यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. आज लोकांना रस्त्यावरुन पायी चालायचे असेल तर फुटपाथ उपलब्ध नाही. रस्ता रुंदीकरण करीत असताना प्रामुख्याने जे फुटपाथ आहेत ते छोटे करण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे लोकांना फुटपाथवरुन चालणे अवघड होत आहे. रस्ते रुंदीकरण करताना फुटपाथची रुंदी वाढविणे आवश्यक आहे. याची प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थांवर जबाबदारी असून जनतेमध्ये जनजागृती निर्माण करणे, चळवळ उभी करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर फक्त जनतेमध्ये जनजागृती करणे उपयोगाचे नसून मिडियाने देखील या चळवळीमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. मला याठिकाणी अभिमान वाटतो की, ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात देशामध्ये जो अहवाल तयार करण्यात आला त्या संदर्भात मी ज्या पुणे शहराचे प्रतिनिधीत्व करतो त्या पुणे शहराचा जनजागृती करण्यामध्ये देशात प्रथम क्रमांक आहे. या संदर्भात मोठया प्रमाणात जनजागृती कशी करता येईल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या सर्व गोष्टींचा आपण विचार केला तर मला वाटते अलिकडे या संदर्भातील पावले उचलण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

--------

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी ग्लोबल वॉर्मिंगसारख्या महत्वाच्या व नाविण्यपूर्ण विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित केली त्याबद्दल त्यांचे मनापासून, अगदी मनापासून अभिनंदन करतो. एक अत्यंत जिव्हाळ्याचा पण दुर्लक्षित असा विषय सर्वसाधारणपणे ज्याची झळ तातडीने लागत नाही परंतु त्याचे दुरगामी परिणाम लक्षात येत नाहीत तोपर्यंत लोक आनंदात असतात. "जात्यामधले दाणे रडती, सुपातले हसती" तशी आमची अवस्था आहे. त्सुनामी लाट आली त्यावेळी ओरिसातील गांवेच्या गावे वाहून गेली, पांडेचरीला गांवे वाहून गेली, त्या भागातील लोक भरडले गेले, आम्हाला मात्र त्याची झळ पोहचली नाही परंतु निदान त्यापूर्वी सन्माननीय सदस्यांनी ही चर्चा तरी घडवून आणली म्हणून त्यांचे खास अभिनंदन मी करीत आहे. या चर्चेमुळे निदान उद्या तरी जाग येईल अशी अपेक्षा आहे. अशा प्रकारे सर्व ठिकाणी हवामानात व वातावरणात जो बदल होत चालला आहे आणि आपणही तेच अनुभवतो आहोत. सुंदरबनमधील एक बेट जागच्या जागी स्वाहा होऊन गेले. आमच्या कोकणात स्व. दादा सामंत यांचे गाव देवबाग, या गावाच्या दोन्ही बाजूला समुद्र आहे आणि मध्येच आयलँडसारखी पट्टी असल्यासारखे ते गाव आहे. जराही सुरुवात झाली तरी हे गाव गिळंकृत व्हायला वेळ लागणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सुध्दा अत्यंत महत्वाचे मुद्दे उपस्थित केले परंतु त्या तांत्रिक मुद्यांमध्ये मी जाणार नाही. परंतु पाणी किती आणि तापमान किती वाढत चालले हे पाहिले तर सर्वात जास्त धोका कशामुळे निर्माण होतो तर कार्बन डाय ऑक्सॉईडचे प्रमाण हवेत वाढत आहे आणि ते प्रमाण वाढण्याची जी जी कारणे आहेत त्यात मिथेलचे प्रमाण असेल अथवा अन्य घटकांचे प्रमाण असेल, याचा विचार करणे आवश्यक आहे. मधल्या काळात सातत्याने टी.व्ही. वर हवेतील प्रदूषण किती आहे हे दाखविले जात होते. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सहज उल्लेख केला की, रॉकेलचा वापर रिक्षा व टॅक्सीमध्ये केल्यामुळे प्रचंड धूर होतो व ते सुध्दा खूपच धोक्याचे असून अलिकडेच आपण सर्वांनी ते अनुभवले आहे. या उलट मी जुन्या काळात गोवऱ्या जाळून जो धूर केला जात होता तो अगदी शांत व प्रदूषण कमी करणारा असायचा. तसेच शात्रीयदृष्ट्या हा धूर उपयोगी होता. कारण गोवऱ्या जाळल्यानंतर, त्यांनी पेट घेतल्यानंतर शांतपणे त्या जळतात व

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

बाहेरुन दिसत नाहीत परंतु आतून तप्त असतात हे त्या गोवऱ्यांचे वैशिष्ट्य होते आणि कमीत कमी प्रदूषण त्यातून होत होते. त्याचप्रमाणे जुन्या पध्दती व सणांना देखील एक प्रकारचा अर्थ होत. तसेच संक्रांतीला तीळ-गुळाचे लाडू वाटत होते त्याचे कारण म्हणजे थंडीच्या मोसमात संक्रांतीचा सण येतो व त्यावेळेस उष्णतेची गरज असते म्हणून तीळाला गुळाची साथ दिल्यानंतर आरोग्याला ते लाभदायकच होते म्हणून तीळ-गूळ दिला जातो अशा प्रकारे सणांना विशिष्ट अर्थ होता. तसेच त्या काळात पर्यावरणाचे देखील मोठ्या प्रमाणात जतन केले. त्या काळात लाकडासाठी झाडे जरी तोडली तरी मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याचे काम सुध्दा होत होते ....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

काल परवा वर्तमानपत्रात बातमी आली की, मुंबई जवळील बेलापूर येथील गार्डन चांगले करीत असतांना तेथील झाडांची मोठया प्रमाणात तोड करण्यात आली. बेलापूर येथील पारसीक हिलमध्ये देऊन बांधळण्यासाठी सुध्दा मोठया प्रमाणात झाडे तोडली जात आहे. लोणावळा येथे सिंहगड इंस्टिटयूट वन खात्याच्या जमिनीत उभी करण्यात आली. ही इंस्टिटयूट जंगलाची तोड करुन बांधण्यात आलेली आहे. एवढया मोठया प्रमाणात वनाची तोड झाली असतांना सुध्दा वन खाते झोपी गेले होते परंतु अधिकारी कोर्टात गेले तरी वन मंत्री त्यास संरक्षण करीत आहेत. हे प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत गेले. राजकीय लागेबांधे असल्यामुळे हा प्रकार घडला आहे. एवढे सर्व झ ाल्यानंतर सुध्दा त्या ठिकाणी झाडे काही लावण्यात आली नाहीत. या ठिकाणी त्यांनी एक सुध्दा झ ाड लावलेले नाही. परंतु आमची नवलाई असल्यामुळे नवलाईला सांभाळले. यासंदर्भात मी अनेक वेळा विचारले परंतु वनमंत्री उत्तर देऊ शकले नाही. खरे म्हणजे आम्हीच आमच्या -हासाला कारणीभूत आहोत. दक्षिणेकडून जेव्हा इस्टर्ली वेव्ह येते त्याचा परिणाम आपल्या भागाला होत असतो. परंतु इस्टर्ली वेव्हमुळे तपमान झटकन खाली गेले. आमच्या बालपणी मुंबईत आम्ही कुडकुडायचो. दिवाळी असली म्हणजे पहिल्या दिवशी अंघोळ, त्यामुळे सकाळी लवकर उठा असे होत होते. परंतु आता तसे राहीले नाही. परंतु यावर्षी कित्येक वर्षानंतर मुंबईत थंडी पडली होती त्यामुळे नेपाळी माणसांचे स्वेटर मोठया प्रमाणात विकले गेले. इस्टर्ली वेव्हमुळे पाऊस पडला, महाबळेश्वर येथे हिम वर्षाव झाला, गारा पडल्या त्यामुळे अशा प्रकारचा वातावरणातील बदल चिंताजनक आहे. या प्रस्तावातून जी चिंता व्यक्त होत आहे ती केवळ चिंता व्यक्त करण्यासाठी नाही तर ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात आपण काय करणार हा महत्वाचा प्रश्न आहे. कॅलिफोर्निया येथे जो 20 टक्के विजेची बचत करेल त्याला वीज बिलात 20 टक्के सूट देण्यात आलेली आहे. या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी अलगोअरचा उल्लेख केलेला आहे. अलगोअरची ही फिल्म मी सुध्दा बघितली आहे. या फिल्मसाठी पारितोषिक अलगोअर आणि पचूरीला मिळाले परंतु त्यात खरे कष्ट करणारी व्यक्ती ही जयंत साठे असून ही व्यक्ती मराठी आहे. या टीम मध्ये डॉ. जयंत साठे हे त्या टीमचे गट नेते होते. या टीममध्ये बरेच लोक होते त्यामुळे चिठ्ठया टाकून दोन नावे काढण्यात आली. सांठेचे नाव आले नाही, नोबल पारितोषिक मला मिळाले नाही म्हणून त्यांनी

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

त्यांनी दुःख व्यक्त केले नाही. यासाठी डॉ.जयंत साठे यांनी प्रचंड कष्ट घेतले होते. आज आपल्याकडे मोठया प्रमाणात नद्यांमधून रेती उपसली जात आहे. आपल्याकडे आता अनेक वाळू सम्राट तयार झालेले आहेत. या वाळू सम्राटांना क्ष ब्रास वाळू उपसण्याची परवानगी असेल तर त्यापेक्षा ते किती तरी जास्त प्रमाणात वाळू उपसत असतात. परवा माननीय मंत्रीमहोदयांनी चांगले उत्तर दिलेले आहे. गावाने जर ठरवले की, आमच्या नदीतून रेती उपसू दिली जाणार नाही तर आम्ही रेती उपसण्याचे काम थांबवू असे त्यांनी सांगितलेले आहे. त्यामुळे हा निर्णय लवकर थांबवा. हा निर्णय केवळ कागदावरच राहता कामा नये. नदीतील वाळू मध्ये पाणी स्थिरावून ठेवण्याची क्षमता असते. परंतु वाळू उपसल्यानंतर पाणी स्थिरावले जाणार नाही, सगळे पाणी जमिनीत झिरपून जाईल व त्यामुळे उष्णता वाढेल. जायकवाडीचे धरण प्रचंड मोठे आहे सागर असावे असे जायकवाडीचे धरण आहे. जायकवाडी धरणात मोठया प्रमाणात गाळ साठलेला आहे. या धरणाचे क्षेत्रफळ गाळ साचल्यामुळे वाढलेले आहे. गाळ वाढल्यामुळे पाण्याची खोली कमी झाली. पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे, धरणाचा विस्तार वाढल्यामुळे सूर्याच्या किरणामुळे त्या ठिकाणचे तापमान वाढले. गाळ साचल्यामुळे धरण उथळ असल्यामुळे अधिक प्रमाणात बाष्पीभवन वाढले गेले. पाण्याची खोली जेवढी अधिक असेल तेवढे पाण्याचे बाष्पीभवन कमी होते व पाण्याची खोली जेवढी कमी असेल, क्षेत्र वाढलेले असेल तर पाण्याचे बाष्पीभवन अधिक प्रमाणात होत असते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...

धरणाचा भाग जर उथळ असेल तर बाष्पीभवन लवकर होईल. बशीमध्ये जर चहा ओतून प्यायलो तर तो लवकर गार होतो यावरुन ही बाब आपल्या लक्षात येईल. जितक्या लवकर बाषीभवन होईल तितके तापमान वाढणार आहे.धरणात गाळ साठलेला आहे तो काढणे कठीण होऊन बसलेले आहे. त्याचबरोबर एका धरणाच्या खाली आणखी धरणे बांधण्याचे काम देखील सुरु आहे.नद्यांतील व धरणातील गाळ तसेच त्यांचा पसरट पृष्ठभाग व त्यामुळे होणारे बाष्पीभवन, नद्यातील वाळू मोठया प्रमाणावर काढणे, जंगलाची तोड करणे हे मुद्दे अतिशय महत्वाचे आहेत.

सभापती महोदया,सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांना मी सांगू इच्छितो की आपण ताडोबाला जाऊन पहा.माननीय वन मंत्र्यांवर माझा व्यक्तिगत राग नाही. परंतु वनाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची त्यांची इच्छा नाही. मी तोरणमाळचे उदाहरण आपल्याला देतो. महाबळेश्वर नंतर या राज्यातील सर्वात उंच ठिकाण तोरणमाळ आहे.त्याबाबतीत अनेकांना माहिती नसेल. तोरणमाळ हे ठिकाण नंदूरबार जिल्हयात आहे. तोरणमाळ येथे गेल्यानंतर आपल्याला असे दिसून येईल की, त्या ठिकाणचे सर्व डोंगर सपाट करण्यात आलेले आहेत त्या ठिकाणची सर्व झाडी तोडून टाकण्यात आलेली आहेत.ताडोबाला गेल्यानंतर तेथे सागाचे फक्त खूंट असल्याचे दिसून येईल. परंतु त्याबाबतीत माननीय वनमंत्र्यांना मात्र काहीही वाटत नाही. हे पाप आहे. ते पंढरीचे वारकरी आहेत, "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी," "ज्ञानोबा- माऊली -तुकाराम " असे म्हणून ते टाळ कुटतात . वारक-यांबरोबर ते जातात, त्यांच्या बरोबर नाचतात. अशा प्रकारे ते ढोंगबाजी कशाला करतात ? ज्ञानेश्वराला काय वाटते ते त्यांनी करावे, विठ्ठलाला काय वाटते ते त्यांनी करावे.संत गाडगे महाराजांना जे वाटत होते ते त्यांनी करावे. केवळ वारक-यांमध्ये जाऊन काहीही होणार नाही. त्यामुळे वृक्षांची तोड प्रथम थांबविण्यात आली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, तिवाराच्या झाडांची देखील मोठया प्रमाणावर कत्तल केली जात आहे.त्या संदर्भात आम्ही वारंवार मुद्दे मांडत आहोत. माननीय उपसभापतींनी परवा पुन्हा या बाबतीत निदेश दिले होते. ठाणे , भिवंडी परिसरातील खाडीतील तिवरांच्या झाडाची कत्तल केली जात आहे त्याचप्रमाणे नवीन मुबईतील खाडीमधील तिवरांच्या झाडाची कत्तल केली जात आहे. तेथे चाणक्यच्या बाजूला पाम बीच रोड तयार झाला आहे त्याच्या पलीकडे तिवाराच्या झाडाची कत्तल

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत

करुन त्या ठिकाणी मातीचे ढिगारे आणून टाकले जात आहेत व त्या ठिकाणी बांधकाम केले जात आहे. मी आता ज्या चार पाच गोष्टी सांगितल्या आहेत त्यांचे संरक्षण आपण करु शकतो की नाही जर आपण करु शकतो तर त्याप्रमाणे केले पाहिजे. असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.लहानपणी शाळेत आपल्याला झाडांचे वैशिष्ट शिकवले होते. झाडे हवेतील कार्बन डॉय ऑक्साईड वायू शोषून घेतात व प्राणवायू सोडतात . हवेतील कार्बन डॉय ऑक्साईड वायू शोषून घेण्याकरिता व प्राणवायू सोडण्याकरिता झाडे तर असली पाहिजेत. आज शहरातील झाडांची मोठया प्रमाणावर कत्तल करण्यात आलेली आहे इतकेच नव्हे तर गावातील झाडांचीसुध्दा कत्तल केली जात आहे. मध्यंतरी आमच्या कोकणामध्ये कोळशाचा रोग लागला होता. प्रत्येकजण कोळशासाठी गावातील झाडे तोडावयाचा. गावात कोणी तरी ट्रक घेऊन यावयाचा संबंधित व्यक्तीला पैसे द्यावयाचा आणि रातोरात झाड तोडावयाचा व शेतात जाळून सकाळी ट्रकमधून कोळसा घेऊन जावयाचा. हा प्रकार गावात मोठया प्रमाणावर सुरु झाला होता. त्याकडे शासनाचे खरोखर लक्ष आहे काय ?' पुढच्या पिढीची शासनाला काही काळजी आहे काय, चिंता आहे काय? आमचा कालावधी आता संपत आला आहे आमची काळजी करण्याचे सोडा परंतु पुढच्या पिढीसाठी आपण काय वाढून ठेवत आहोत याची चिंता शासन करणार आहे किंवा नाही ? आमच्या कोकणात माईनिंग आहे. हे दोन्ही विषय एकमेकाशी विसंगत आहेत. एका बाजूला पर्यावरणाचा प्रंचड धोका निर्माण झालेला आहे. एका बाजूला हिमालय वितळत असल्यामुळे नद्यांना पूर येत आहे, नद्या आक्रसत आहेत, त्यांची पात्रे अरुंद होत आहेत, नद्यांची खोली कमी होत आहे त्याचबरोबर नद्यातील वाळू काढून टाकल्यामुळे सर्व पाणी वाहून जाते. कॉन्झरव्हेशन ऑफ वॉटरच्या दृष्टीने विचार केला जात नाही. कै. वसंत दादा पाटील यांनी " पाणी अडवा, पाणी जिरवा" असे सांगितले होते. परंतु हे पाणी अडविण्यासाठी वेळ नाही. आम्ही एकमेकांची जिरवण्यासाठी वेळ घालवत आहोत. पाणी अडविण्या ऐवजी एकमेकांची अडवा आणि एकमेकांची जिरवा असे नवीन वाक्य आता तयार झालेले आहे. म्हणून तिवराच्या झाडाची मोठया प्रमाणावर कत्तल केली जात आहे ही थांबविण्यात आली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी पुण्याच्या संदर्भात मघाशी एक उल्लेख केला होता पुणे महानगरपालिकेतील आमच्या लोकांनी टेकडया राखल्या आहेत अन्यथा या टेकडया केव्हाच सपाट झाल्या असत्या. त्या ठिकाणी

श्री.अरविंद सावंत

आज ज्या टेकडया शिल्लक आहेत त्या बोडक्या झालेला आहेत त्या ठिकाणी झाडे लावावयास पाहिजे. परवा औरंगाबाद जवळील जंगलामध्ये वणवा पेटला होता परंतु त्याबाबतीत त्यांना काही वाटले काय ? त्यांची उत्तर देण्याची पध्दत आपण पाहिली तर आपल्या ही गोष्ट लक्षात येईल. त्यांना काहीही वाटले नाही. वणवा पेटला, झाडे जळाली, माणसे मेली तरी त्यांना काहीही वाटले नाही. एक झाड जर जळाले तर आपला पुत्र गेला असे समजले पाहिजे व त्या झाडावर प्रेम केले पाहिजे. मी पवई येथे राहतो आणि त्या ठिकाणी हिरानंदानी व रहेजा या सारखे मोठे बिल्डर्स तयार झालेले आहेत. त्यांना हा संपूर्ण भाग आंदणच दिला आहे.

नंतर श्री.सुंबरे

अस्ुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

सभापती महोदया, मी गेल्या आठवड्यामध्ये नशीबाने घरीच होतो. आमच्या शेजारच्याच इमारतीत एक बैठक होती. तेथे जाण्यासाठी मी खाली उतरलो तर तेथे काही लोक रस्ता खोदत होते. मी महापालिकेत फोन करून विचारले की, तुम्ही या या ठिकाणी रस्ता खोदण्याची परवानगी दिली आहे काय ? त्यावर त्यांनी 'नाही' असे उत्तर दिले तेव्हा त्यांना तेथे समक्ष बोलावून घेतले आणि रस्ता खोदकाम होत असल्याचे दाखविले. म्हणजे हे लोक कोणालाही न जुमानता, न विचारता काहीही करीत असतात. खरे तर असे काही काम करावयाचे असेल तर महापालिकेची परवानगी लागते, तसेच त्यासाठीचे पैसे महापालिकेच्या तिजोरीत जमा व्हायला लागतात. पण तसे काहीही होत नाही. ते करताना सारी झाडे मूळापासून उपटली जातात, तसेच तेथेही होत होते. पण आम्ही शिवसैनिक असल्याने त्यांना तेथे समजावण्याच्या जास्त भानगडीत न पडता दोन कानाखाली लगावल्या आणि मग तेथे ते काम थांबले गेले. अर्थात तसे करण्याशिवाय पर्यायही नव्हता. आता तेथील सगळी झाडे सुरक्षित केली. पण त्या साऱ्या मोठ्या लोकांना काही कायदाच नाही. गोरेगावच्या रॉयल पाम भागाचा मी येथे या संदर्भात पन्नास वेळा उल्लेख केला आहे. पण काहीही परिणाम नाही. आम्ही ती जागा गोल्फ खेळायला दिली होती म्हणून सांगितले गेले. पण गोरेगावचा जो आमचा सारा हरितपट्टा होता तो गिळंकृत करण्याचे काम तेथे केले गेले. रॉयल पाम असे त्या भागाला म्हणतात पण प्रत्यक्षात तेथे 'नो पाम' झालेले आहे. Now, there is no Turf, only Royal buildings are coming, Royal Apartments are coming. द्या पैसे आणि काहीही करा. काही माणसे अशा व्यवहारातून इतके पैसे कमावित आहेत की उद्या ते निजधामास गेले तर त्यांना नोटांमध्येच जाळावे लागेल. हे इतके सामाजिक आणि नैतिक अध:पतन झालेले आहे. सभापती महोदय, जी जंगलतोड होते याबाबत मी सांगितलेच आहे. पण सौर ऊर्जेच्या अधिकाधिक वापराबाबतीत देखील आपण विचार केला पाहिजे. मी एकदा मुद्दाम येथील दिवे मोजले. 1996 सालापासून मी या संबंधात बोलतो आहे. पण आमचे ऊर्जा मंत्री सांगतात की, ते खूप महागडे आहे. आपल्याला सर्वांना माहिती आहे की, "Energy Save is Energy Earn" पण आपण ऊर्जा का वाचवित नाही ? आपल्याकडे ऊर्जा आपल्याला वाचवायची आहे ना ? मग सौर ऊर्जेचा वापर आपण का करीत नाही ? आपले हे विधानमंडळ एवढे काही दळभद्री नाही, एवढे तरी आपण निश्चित करू शकू. मुंबईची सर्व मोठ्या हॉटेल्समध्ये 24 तास लाईटस् चालू असतात. अगदी हॉस्पिटलमध्ये देखील तीच परिस्थिती असते. अशा ठिकाणी सौर ऊर्जेवरील दिवे का लावले जात

..... 5आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

नाही, त्यासाठी सक्ती का केली जात नाही ? महाग असले तरी हा एकदा करावयाचा खर्च आहे. सौर ऊर्जेद्वारा आपल्याला गावच नाही तर वाड्या वाड्या देखील घेता येतील. अशा प्रकारे जेवढ्या अपारंपारिक मार्गाने आपल्याला मिळविता येईल तेवढे आपण मिळविले पाहिजे. अमेरिकेने ॲमॅझोन पट्ट्यामध्ये एक मोठ्ठे धरण केले आहे, ज्याला द्रष्टेपणा म्हणतात तो आपल्याला तेथे पहायला मिळतो. किती विचार करून त्यांनी तेथे धरण बांधले आहे. सभापती महोदय, काही जुनी माणसे अजूनही म्हणतात की, तुमच्यापेक्षा इंग्रज बरे होते. त्यांनी कोठून पाणी या मुंबईसाठी आणले आहे ते पहा. आपण त्यांच्यापासून काही शिकलो आहोत की नाही ? सभापती महोदय, हा सगळा चांगला विषय आहे आणि तो या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मांडला आहे. या निमित्ताने मी एवढेच सांगेन की, ही चर्चा चर्चेसाठीच केवळ राहू नये. झाडे, तिवर यांच्याबाबतीत शासन काय करणार आहे ? त्याबाबतीत आपण काही कडक धोरण आखणार आहात की नाही ? तिवरांची झाडे तोडणारा जो कोणी असेल त्याला केवळ यापुढे पैशाचा दंड करू नका, तर त्याला कोठडीत टाका. हा चेष्टेचा विषय नाही. मी आपाल्याला सांगेन की, उद्या एखादी लाट आली तर जेवढी माणसे मरतील तेवढ्यांची हत्या करणारा तो असेल हे आपण लक्षात घ्या. तेवढे सोपे नाही. म्हणून हा विषय येथे आणल्याबद्दल मी मनापासून सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांचे आभार मानतो. सभापती महोदया, मी या ठिकाणी 3-4 मुद्दे विशेषत्त्वाने मांडले आहेत. नद्या, तिवरांची झाडे, नदीतील भराव यांच्याबाबतीत शासन काय करणार आहे हे येथे सांगितले पाहिजे. सभापती महोदय, वाहनांसाठी जो रॉकेलचा वापर होतो आहे त्याबद्दल आपण काय करणार आहात ? खरे तर चटकन कारवाई करता येण्यासारखा हा विषय आहे, ही गोष्ट आहे. गाड्यांद्वारा होणारे प्रदूषण रोखण्यासाठी आपण उपाय केला, त्या संदर्भात रस्त्यांवर पीयूसी तपासणाऱ्या गाड्या उभ्या असतात. आपल्याला या संदर्भात तातडीने एक गोष्ट करता येईल. प्रदूषण करणाऱ्या अशी जी वाहने असतील, आढळतील मग ती रिक्शॉ असो, ट्रक असेल वा कोणतेही वाहन असेल ते सापडले तर त्यांना पकडून त्यांचा परवाना रद्द करावयाचा. असे काही केले तरच धाक राहील. आपण सिमल्याला फिरायला जातो, तेथे वाहनही येऊ देत नाहीत. ...

( यानंतर सौ. रणदिवे ..... 5जे 1 ..)

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सुंबरे . . . . 20:15

श्री.अरविंद सावंत . . . .

नैनीताल मध्ये देखील वाहने आणू देत नाहीत.तेथे माननीय राज्यपाल जरी गेले तरी त्यांना गाडीतून उतरुन चालत जावे लागते. 2 कि.मी.अंतर चालतच जावे लागते. माथेरान देखील तशीच परिस्थिती आहे. तेथेही चालतच फिरावे लागते. येथेही तशाच प्रकारचा धाक निर्माण झाला पाहिजे.

सभापती महोदया, आता आम्ही प्लॅस्टीकच्या पिशव्यांबाबत बोलून-बोलून थकलो आहोत. आपण जर कोणत्याही गडावर गेलो, भूशी डॅमला गेलो तर त्या ठिकाणी बाटल्याच बाटल्या, प्लॅस्टीकच्या पिशव्या पडल्याचे दिसून येईल. त्याबाबतीत कार्यवाही करावयास पाहिजे. तसेच झाडे लावण्याच्या बाबतीत सांगावयाचे तर दरवर्षी शाळेतील प्रत्येक मुलाकडून एक झाड लावले पाहिजे आणि ही बाब त्या-त्या शाळांमध्ये सक्तीची करावी. मात्र झाडे लावणे सोपे आहे, पण त्याची जोपासना करणे कठीण आहे. त्यासाठी शाळेतील प्रत्येक वर्गाकडे याची जबाबदारी दिली पाहिजे तरच झाडे वाढतील असे मला वाटते. सभापती महोदया, आपण मला भाषण करण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हा जो महत्वाचा प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

. . . .5 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद जामा (विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दीपक सावंत ने बहुत अच्छा विषय सभागृह के सामने पेश किया है. उन्होंने वैज्ञानिक तरीके से बताया है कि ग्लोबल वार्मिंग क्या है, ग्रीन हाउस क्या है और उसके प्रभाव क्या क्या हो सकते है. उन्होंने यह भी बताया है कि ग्लोबल वार्मिंग के दुष्परिणाम क्या हैं और उसके क्या क्या उपाय हो सकते हैं. मैं उनकी सारी बातों का अनुमोदन करता हूँ. हमारी माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान एवं अन्य माननीय सदस्यों ने भी इस विषय को विस्तार से और बहुत अच्छी तरह से पेश किया है. मैं उन बातों को दोहराना नहीं चाहता.

सभापति महोदय, ग्लोबल वार्मिंग का विषय केवल महाराष्ट्र तक ही सीमित नहीं है, ग्लोबल स्तर पर यह बात चल रही है. बहुत सारे विकसित देशों ने कार्बन डाय ऑक्साइड और अन्य गैसें वातावरण में फैलाई हैं, जिसकी वजह से ओजोन लेयर प्रभावित हुई है. इसलिए आज ग्लोबल वार्मिंग का विषय वार्निंग के रुप में हमारे सामने आया है. माननीय सदस्य दीपक सावंत ने महाराष्ट्र के स्तर पर कई बातों का उल्लेख किया, भारत सरकार भी इस बारे में चिन्तित है. ग्लोबल वार्मिंग का विषय सार्क देशों के लिए भी चिन्ता की बात है और यू.एन.ओ. में भी चिन्ता हो रही है. ग्लोबल वार्मिंग के दुष्परिणामों को रोकने के लिए ग्लोबली एक्शन होना चाहिए, लेकिन हमें महाराष्ट्र में भी इसको रोकने के लिए कार्य करने चाहिए. हमें अपने घर से चॅरिटी शुरु करनी चाहिए. इसके लिए हमें कॉंप्रेहेंसिव साइंटीफिक स्टडी करके सारी इन्फॉर्मेशन लेकर कदम उठाने चाहिए. हमारे माननीय सदस्यों ने इस बारे में बहुत डिटेल्स सभागृह के सामने पेश किए हैं. मैं केवल 2-3 बातें आपके सामने रखना चाहता हूँ.

सभापति महोदय, सब से पहली बात तो यह है कि इस बारे में पब्लिक में अवेयरनेस होनी चाहिए. जब हम इस कार्य की शुरुआत करते हैं तो कुछ समय के बाद इसका प्रभाव हमें दिखाई देता है. हमने एच.आई.वी. और एड्स के बारे में समाज को बताया तो आज स्थिति यह है कि शादी के पहले लोग एच.आई.वी. टॅस्ट करवाते हैं. इस बारे में लोगों में जागृति आई है. मेरा सुझाव है कि ग्लोबल वार्मिंग क्या है, इसके कारण क्या हैं और इसको दूर करने के क्या क्या तरीके हो सकते हैं, इस बारे में एक छोटा सा चॅप्टर सेकेंडरी एज्यूकेशन में शामिल करना चाहिए. इससे बच्चों में ग्लोबल वार्मिंग के बारे में जागरुकता पैदा होगी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . 5J 3

. . . श्री. सय्यद जामा

सभापति महोदय, हमारे देश में लोग 2 तरीके से अच्छा काम करते हैं. एक तो डर की वजह से या फिर लालच की वजह से, चाहे वह पैसे का लालच हो या अन्य किसी चीज का लालच हो तो लोग अच्छा काम करते हैं. हमारे देश में अगर धर्मगुरु किसी बात को कहते हैं तो जनता उसका स्वीकार बहुत जल्दी करती है. ग्लोबल वार्मिंग के बारे में धार्मिक प्रवचनों के द्वारा समाज में जागरुकता लाने का काम किया जा सकता है. रामदेव बाबा ने कहा कि नाखून रगड़ने से सिर के बाल नहीं गिरते हैं तो मैने देखा कि एयरपोर्ट पर लोग नाखून रगड़ रहे थे. "आर्ट ऑफ लिविंग" के लोग धार्मिक प्रवचन करते हैं, उनको सुझाव दिया जाए, उनसे ग्लोबल वार्मिंग के बारे में कहने के लिए रिक्वेस्ट की जाए और अगर धर्मगुरु इस बारे में कहेंगे तो लोगों के दिमाग में यह बात जल्दी आएगी.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ SBT/ प्रथम श्री शर्मा 20:20

श्री. सय्यद जामा...

तीसरी बात यह है कि हमारे देश में वन की सुरक्षा के लिए वन संरक्षण कानून बनाया गया है. सभापति महोदया मैं भी उद्योग क्षेत्र से जुड़ा हूं. माईनिंग उद्योग से जुड़ा हूं. अगर वन में 27 प्रतिशत ग्रोथ है तो यह स्पष्ट है कि वन की रक्षा करना जरुरी है. जंगल को कटने से बचाना चाहिए. आज हम देखते है कि रोज जंगल कट रहे हैं, कोई रुकावट नहीं है. रोज वृक्ष काटे जा रहे हैं. फॉरेस्ट में भी माफिया पैदा हो गए हैं. सभापति महोदय, एक बात और बताना चाहूंगा कि मध्यप्रदेश में पन्ना (डायमंड) की फेक्टरी है-नेशनल मिनरल्स डेवेलपमेंट कार्पोरेशन. लेकिन वह दो साल से बंद है क्योंकि वहाँ का कुछ क्षेत्र टायगर प्रोजेक्ट क्षेत्र के अन्तर्गत आता है. अब टायगर जरुरी है या मिनरल जरुरी है ? वहाँ उसकी भी चोरी हो रही है. इसलिए इस बारे में भी सोचना चाहिए.

सभापति महोदय, सरकार ने इस संबंध में अलग अलग विभागों के अलग अलग एक्ट बनाए हैं, जैसे पर्यावरण के संतुलन के लिए एक्ट बनाया गया है, फॉरेस्ट की सुरक्षा के लिए एक्ट बनाया गया है, प्रदूषण रोकने संबंधी एक्ट बनाया गया है, वाटर पोलूशन एक्ट बनाया गया है. मेरा यह सुझाव है कि इन सब का एक इंटीग्रेटेड एक्ट बनाया जाए और सिंगल विंडो स्कीम के अन्तर्गत काम होना चाहिए. अगर हम इस प्रकार के उपाय नहीं करेंगे तो समस्या दूर करने में मुश्किल हो जाएगी. सभी सम्माननीय सदस्यों ने ग्लोबल वॉर्मिंग के बारे में चिंता व्यक्त की है. इस संबंध में सारी जानकारी उपलब्ध है. इसलिए एक्शन प्रोग्राम बनाने के लिए अविलंब कदम उठाए जाने चाहिए. इन शब्दों के साथ मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सावंत )

.............

यानंतर श्रीमती नीलम गोऱ्हे यांचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभी आहे.

सभापती महोदय, या विषयासदर्भात आता बरीच चर्चा झालेली आहे. त्यामुळे पुन्हा तेच मुद्दे मी या ठिकाणी मांडू इच्छित नाही. गरीबी, दारिद्रय, शेतीची दुरावस्था असे अनेक प्रश्न भारताबरोबरच दक्षिण आफ्रिका या देशामध्येही निर्माण झालेले आहेत. जागतिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या वाईट परिणामांना विकसनशील देशानांही सध्या सामोरे जावे लागत आहे. समुद्राची पातळी उंचावणार आहे व नदीची खोली अधिक खोल होणार आहे असे सांगण्यात येते. ब्रम्हपुत्रा, सिंधू या नदयांची पातळी खोल होणार आहे. अशा गोष्टी इतिहासामध्ये यापूर्वी वारंवार घडलेल्या आहेत. किल्लारी येथे झालेला भूकंपाचा इतिहास आपण पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, तेथे भूकंप होण्याआधी 50 ते 60 वर्षापूर्वी,पाच ते सहा वेळा भूकंप झाला होता.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

आणि एका किल्लारी शहराच्या खाली पाच ते सहा किल्लारी शहरे गाडली गेलेली आहेत असा अनेक वर्षापासूनचा इतिहास दिसला. म्हणून लोक मग असा विचार करतात की, स्थलांतर करावयाचे काय ? अशा वेळेला जनसमुहाने स्थलांतर करुन पूर्वीची जी पध्दत होती की, नदीच्या काठावर राहावयाचे, अमूकच गावांमध्ये राहावयाचे त्यामध्ये बदल करण्याची गरज पडणार की काय यासंदर्भात देखील चर्चा झाली पाहिजे. या गोष्टी शासनाच्या विचाराधीन आहेत. मी या ठिकाणी आपल्याला आणखी एक उदाहरण देईन. सांगली जिल्ह्यामध्ये ज्यावेळी श्री. नितीन करीर जिल्हाधिकारी म्हणून काम करीत होते त्यावेळेला त्यांना काही गावांच्यामध्ये असे निदर्शनास आले की, ती इतकी ओसाड गावे आहेत आणि लोक डोंगरांवर राहतात आणि त्या ठिकाणी पाणी पोहोचवावयाचे म्हटले तर लक्षावधी रुपयांचा खर्च होईल. त्या ठिकाणी लोकांचे कोणतेही आंदोलन न होता त्यांनी लोकांना कन्व्हींस करुन, त्यांच्याशी बोलून, त्यांना पर्यायी जमिनी देऊन 100 टक्के लोकांचे पुनर्वसन करुन दाखवले. अशी देखील उदाहरणे आपल्याच शासनामध्ये आहेत. म्हणून मला या ठिकाणी मुद्दाम नमूद करावयास पाहिजे की, ग्लोबल वार्मिंन्गाच्या संदर्भात आपण बोलत आहोत परंतु यामध्ये निश्चितपणे थोडेसे राजकारण सुध्दा आहे. विकसनशील देश आणि विकसित देश यामधील चित्र जर आपण पाहिले तर मी 1995 पासून आपर्यंत स्वत: संयुक्त राष्ट्र संघाच्या 9 परिषदांसाठी न्युयॉर्कला जाऊन आले आहे. या 9 परिषदांमध्ये आम्ही ज्यावेळेला महिला विषयक किंवा मानवाधिकार विषय काम करतो त्यावेळी त्याबाबत सगळ्या 189 देशाचे गव्हर्नमेंट्स कोणत्या भाषेत बोलतात आणि एन.जी.ओ. काय विचार करतात हे मी स्वत: डोळ्याने पाहिलेले आहे. हे पाहात असताना माझ्या निदर्शनास दोन गोष्टी अशा आल्या की, विकसित देशांकडे जे आहे, उदा. अणुबॉम्ब आहे, मोठी शस्त्रे आहेत, ती विकसनशील देशांना मिळू नयेत अशा पध्दतीने त्यांच्याच समाजातील सिव्हिल सोसायटी किंवा शास्त्रज्ञ भूमिका मांडत असतात. मानव विकासाच्या संदर्भात ज्या मोठ्या परिषदा होतात त्या ठिकाणी दक्षिण आशियातील संस्था आणि संघटनांना मोठ्या प्रमाणावर बोलविले जाते. त्याचा परिणाम असा होतो की, आपल्याकडे लोकशाही आहे आणि लोकशाही असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ......

मांडणी केल्याप्रमाणे आपण आपल्या सरकारवर भरपूर टिकास्त्र सोडतो. आपल्या सरकारचे काय काय चुकलेले आहे याचा विचार न करता आपण ते करतो. कारण आपण असा विचार करतो की, आपल्या सरकारमध्ये सुधारणा झाली पाहिजे. त्याचा फायदा धेऊन या सगळ्या जागतिक शक्ती सातत्याने हे दाखवत असतात की, तुमच्या देशातील सरकारे रानटी आहेत. तुम्हाला स्वत:चा विकास करता येत नाही. तुमच्या हिताची काळजी घेणारे ग्रुप्स युरोप आणि अमेरिकेमध्ये आहेत की जे ह्युमन राईट्स ग्रुप आहेत. मग या भाषेत बोलल्यानंतर तिथून दुसरीकडे संयुक्त राष्ट्र संघासारख्या व्यासपीठांमध्ये विकसनशील देशांना सांगितले जाते की, अरे तुम्हाला तंत्रज्ञान कशाला पाहिजे, तुम्हाला मोठे इन्फ्रास्ट्रक्चर कशाला पाहिजे ? ज्या प्लांट्समुळे तुमच्या देशाच्या पर्यावरणावर परिणाम होईल असे मोठे प्लांट्स तुम्हाला कशाला पाहिजेत ? हे देखील एक राजकारण आहे. श्री. अल गोर यांनी त्याची मांडणी प्रामाणिकपणे त्यांच्या पध्दतीने केलेली आहे. पण माझ्याकडे टाईम्समधील एक कात्रण आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांच्या कर्टसीमुळे मी पूर्वी एकदा ते वाचले होते. त्याचा मला परत उपयोग होईल. त्यामध्ये त्यांनी उदाहरण दिले आहे. ते मी पटलावर ठेऊ इच्छिते. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, ग्रीन पीस मूव्हमेंट किंवा ही माणसे चांगली नियत असणारी माणसे आहेत. परंतु असे आहे की, विज्ञान आणि तंत्रज्ञानाने पुढच्या 100 वर्षात काय होणार आहे हे संपूर्णत: आज सांगणे यामध्ये अनिश्चितता आहे. उदाहरण म्हणून त्यांनी ॲन्टी बायोटिक्सचे काय शोध लागतील हे सांगितले आहे. गेल्या 100 वर्षापूर्वीच नव्हे तर गेल्या 50 वर्षापूर्वी सुध्दा कोणी मायक्रोवेव्ह ओव्हन सारख्या गोष्टीचा शोध लागेल याचा विचार केला नव्हता. म्हणून या प्रत्येक गोष्टीवर विज्ञान आणि तंत्रज्ञानातून उलटी उत्तरे म्हणजे काऊंटर इफेक्टिव होतील अशी उत्तरे मिळणे शक्य आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, ग्लोबल वार्मिन्गमुळे सगळीकडे मास हिस्टेरिया तयार झालेला आहे आणि लोकांच्या मनामध्ये प्रचंड भीती तयार झालेली आहे की, आता काय परिणाम होईल की ज्या परिणामांमुळे लोकांच्या मास हिस्टेरियामुळे आपण नक्की काय करावयास पाहिजे याबद्दल लोकांची अजूनही गोंधळल्यासारखी परिस्थिती होते. विजेची बचत केली पाहिजे, गाड्यांचा वापर कमी केला पाहिजे,

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे ......

खाणींचे उत्खनन करीत असताना पर्यावरणाचा नाश होणार नाही हे पाहिले पाहिजे, वाळूचा उपसा कमी प्रमाणात केला पाहिजे किंवा शक्यतो करता कामा नये, झाडांची तोड करता कामा नये, हे सगळे मुद्दे मला मान्य आहेत, मी त्या मुद्यांच्या विरोधात अजिबात नाही. परंतु मला असे वाटते की, ज्यावेळी आपण शासन म्हणून विचार करतो त्यावेळी आपण जर का आकडेवारी पाहिली तर हा ग्रीन हाऊस इफेक्ट, पर्यावरणमध्ये प्रदुषित वायू अमेरिका किती सोडते आणि दक्षिण आशिया किती सोडतो याची जर का आपण तुलना केली तर कित्येक पटीने विकसित देश प्रदुषण करीत आहेत. अशा वेळी त्यांना खरा प्रश्न विचारावयास पाहिजे की, हे गाड्यांचे नियंत्रण किंवा एअर कंडिशनींग असो किंवा रात्रभर दिवे जाळणे असो हे जेवढे आपल्याला गरजेचे आहे तेवढेच विकसित देशांना सुध्दा गरजेचे आहे. असे नाही की, अमेरिकेतून श्री. अल गोर यांनी हे मांडले म्हणजे ते सगळे पर्यावरणाचे प्रेमी झालेले आहेत आणि आपल्याकडे आपण सगळे पर्यावरणाचे राक्षस बसलेलो आहोत. अशी कोठे तरी काही वेळा मानसिकता तयार होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

कोकाकोलापासून प्रदूषण निर्माण होत असताना त्याबाबत अमेरिकेच्या शासनाला प्रश्न विचारणार आहे ? अमेरिकेची दुसरी एक नीती सांगते. सिडो नावाचा करार आहे, त्या करारावर जगातील 189 देशांपैकी फक्त 100 देशांनी सहया केल्या आहेत. तो करार काय सांगतो की, आमच्या देशातील मानवी हिताचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची आहे. अमेरिकेने अजूनही त्या करारावर सही केलेली नाही. अमेरिकेतील सिव्हिल सोसायटी ग्रूपस् 50 वर्षे लढा देत आहेत. पण सिडो करारावर अमेरिका का सही करणार नाही याचा ठराव सुध्दा युनोमध्ये येऊ शकत नाही. इतके संयुक्त राष्ट्र संघ देखील या सगळयांच्या दबावाखाली आहे. म्हणून मला आपल्यासमोर मांडावयाचे आहे की, ग्लोबल वॉर्मिंगची भीती निश्चितपणे आहे. पण आमच्या देशाच्या हिताच्या चौकटीमध्ये त्याचा ॲक्शन प्लॅन काय असणार आहे, असे पाच स्तरावर ॲक्शन प्लॅनचा विचार करावा लागेल. ग्लोबल रिजनल बरोबरच नॅशनल ॲक्शन प्लॅन, स्टेट ॲक्शन प्लॅन, स्थानिक पातळीवर महानगरपालिका, नगरपालिका आणि वैयक्तिक स्वरुपातील ॲक्शन प्लॅन असे पाचही स्तरावर ॲक्शन प्लॅन केले पाहिजेत असे मला सांगावेसे वाटते. माध्यमांबाबत त्यांनी म्हटले आहे की, "When there is a disaster, there is news", ज्या क्षणी कोणतेही संकट उभे राहते त्यावेळी ती न्यूज होते. पण "When there is no disaster, there is no news." म्हणून जोपर्यंत आपत्ती उभी रहात नाही तोपर्यंत माध्यमांचे सुध्दा लक्ष जात नाही. या पार्श्वभूमीवर दक्षिण आफ्रिकेतील डॉ.वांगार मथाई नोबल लॉरेट आहेत. त्यांनी त्या परिषदेत 3 आर बद्दलचे विचार सांगितले होते. पहिला आर म्हणजे रिपेअर. सायकल तुटली तर ती दुरुस्त करावी, घरातील गॅझेट तुटले तर ते दुरुस्त करा, गेल्या काही वर्षात आपण पाहतो आहोत की, दुरुस्ती हा प्रकारच संपलेला आहे. आले की थ्रो केले जाते. म्हणून प्रत्येक गोष्ट रिपेअर केली पाहिजे. त्यामुळे कोप-यावर चप्पल दुरुस्त करणा-याला सुध्दा रोजगार मिळतो, सायकल रिपेअर करणा-याला सुध्दा रोजगार मिळतो. परंतु बाकीच्या गोष्टी यूज ॲण्ड थ्रो असल्यामुळे आपण बाजारामध्ये पाहतो की गॅझेट रिपेअरिंग करणारी दुकाने संपुष्टात येत चालली आहेत. दुसरा आर रिसायकलचा आहे. प्रत्येक गोष्ट रिसायकल कशी करता येईल ते पाहिले पाहिजे आणि तिसरा आर रिजनरेशनचा आहे. हे तीन आर महत्वाचे आहेत. हया तीन आरचा एका विभागाशी संबंध नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

डॉ.नीलम गोऱ्हे.....

प्रत्येक विभागाने तीन आर कसे अंमलात आणायचे हे पाहिले पाहिजे. ही इंटर डिसिप्लीनरी आहे. सर्व विभागांना असा विचार करावा लागेल हे मला सांगावेसे वाटते. ग्लोबल वॉर्मिंग हा इशारा आहे, पण त्यामुळे लोकांनी घाबरुन जाऊन अजून अफवांचे पीक वाढवू नये. या टाईम्सच्या कात्रणामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अनप्रेडिक्टेबल चेन्जेस नक्की होत आहेत. त्यासाठी बर्फाचे थर कोसळण्याची उदाहरणे दिली आहेत. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, काही वेळेला लोकल कारणांमुळे परिणाम दिसून येतात. स्थानिक चुकांमुळे किती परिणाम आहेत आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे किती परिणाम होत आहेत याबद्दल सुध्दा विश्लेषण करण्याची समज आपण दाखविली पाहिजे. म्हणून मला म्हणावयाचे आहे की जे जे परदेशातून येते ते सर्व आपल्यासाठी योग्य आहे की नाही यासंदर्भात आपण विचार केला पाहिजे, एवढे बोलून मी माझे विचार येथे थांबविते. धन्यवाद.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य आपण पोटॅन्शिअल असा शब्द उच्चारला होता, त्याऐवजी लॅटेन डिड असे म्हटले पाहिजे.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, ग्लोबल वॉर्मिंगसंबंधी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जो ठराव आणला आहे त्याबद्दल मीही आपले अभिनंदन करते.

जगाच्या अजेंडयावरील ऐरणीवर असलेल्या विषयाला आापण हात घातलेला आहे. या विषयावर सगळयांच्या भाषणातून असे आले आहे की, मागील 100 वर्षामध्ये ग्लोबल वॉर्मिंगचा धोका वाढला आहे, उष्णता वाढत चालली आहे. या ग्लोबल वॉर्मिंगच्या धोक्याची अनेक कारणे येथे चर्चिली गेली. सर्वात मोठे कोणते कारण कोणते असेल तर जगामध्ये झालेले पहिले आणि दुसरे महायुध्द हे होय. याकडे डोळेझाक करता येणार नाही आणि तिसरे महायुध्द होणार नाही यासाठी अग्रेसर राहिले पाहिजे. जगामध्ये शांततेसाठी पुढाकार घेणे हे किती गरजेचे आहे याचा उहापोह आपण नाही केला तर ग्लोबल वॉर्मिंगवरील ही चर्चा अधुरी राहील असे माझे मत आहे. अणुभट्टया, अणु चाचण्या केल्या जातात. सत्तेची स्पर्धा सुरु आहे. रशिया एकेकाळी महासत्ता होते. आज त्या देशांची अनेक देशांमध्ये विभागणी झाली असली तरी लेफ्ट ओरिएन्टेड विचार आणि जागतिक शांततेचा पुरस्कार करणारा देश म्हणून रशियाकडे बघितले जात आहे. चायना आज महासत्ता होत आहे. आपण महासत्ता होण्याचे स्वप्न बघत आहोत आणि त्या दिशेने वाटचाल करीत आहोत. फान्स, जपान, इंग्लंड, अमेरिका हे देश आहेत. पण जगात श्रेष्ठ कोण आणि जगाला कोण लीड करणार ही स्पर्धा असते तेव्हा भांडवलदारी आणि मक्तेदारीमध्ये अंतर्विरोध हा असतोच. यासाठी वेगळे ज्ञान देण्याची गरज नाही, वेगळे सायन्स सांगण्याची गरज नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 20:35

(श्रीमती उषा दराडे...)

हा आंतरविरोध जेव्हा असतो तेव्हा कुठल्या राष्ट्राने कुठल्या राष्ट्राला कुठल्या पध्दतीने सप्रेस करावे असे इथे आम्ही कोणी कितीही म्हटले तरी गांधीवाद आणि उपोषण करुन संपूर्ण पृथ्वीवरती अमेरिका राज्य करील अशी परिस्थिती नाही. स्वातंत्र्य मिळविण्यामध्ये गांधीवाद श्रेष्ठ ठरला. परंतु दुर्दैवाने जगाने हे मानले नाही. म्हणून हा आंतरविरोध जोपर्यन्त संपत नाही तोपर्यन्त ग्लोबल वॉर्मिंगच्या गप्पा मारणे आणि तेही अमेरिका आणि इंग्लंड सारख्या देशानी गप्पा मारणे हा एक विनोद आहे. ही त्यांची भूमिका जगाच्या पातळीवर पुढे आणून स्पष्ट करणे गरजेचे आहे. कमीत कमी आशिया खंडातील राष्ट्रांना याबाबतीत सावधानतेचा इशारा देणे ही भारताची जबाबदारी आहे. महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगत राज्य आहे. या प्रगत राज्याची मुंबई ही राजधानी आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो ठराव या ठिकाणी आणलेला आहे त्यामध्ये मुंबईवरचे परिणाम हा मुद्दा केन्द्रबिंदू आहे. म्हणून मुंबईनेच ग्लोबल वॉर्मिंगचा विषय घेऊन जागतिक शांततेच्या परिषदा मुंबईमध्ये घडवून आणाव्यात. माननीय मंत्री महोदय या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांनी याबाबतीत पुढाकार घ्यावा. आशिया खंडातील राष्ट्रांच्या प्रमुखांना महाराष्ट्राच्या या मुंबईमध्ये बोलवावे आणि ग्लोबल वॉर्मिंगचे संपूर्ण धोके, अणुभट्टयांचे धोके अणुचाचण्यांचे धोके, ज्याची भिती वाटते त्या तिस-या महायुध्दाचे धोके यावर चर्चा घडवून आणावी. पहिल्या आणि दुस-या महायुध्दामुळे, अणुचाचण्यांमुळे, अणुभट्टयांमुळे वातावरण किती गरम झालेले आहे, दोन्ही ध्रुवावरचा बर्फ कसा वितळत आहे आणि जगाचा नाश कसा जवळ आलेला आहे याची चर्चा घडविणा-या परिषदा मुंबईमध्ये झाल्या तर त्याचे सर्व श्रेय तुम्हाला मिळेल. इतका मोठा जागतिक पातळीवरील महत्वाचा विषय या ठिकाणी चर्चेला आणल्या बद्दल मी सनमाननीय सदस्य डॉ. दीपक सांवत यांचे अभिनंदन करते. आपण ज्या ज्या गोष्टींचा येथे उल्लेख केला त्या गोष्टी खूप महत्वाच्या आहेत. परंतु एका ऑटोरिक्षामधून निघालेल्या धुराडयामध्ये किवा थर्मल पॉवर स्टेशनच्या चिमणीतून निघालेल्या धुराड्यामुळे प्रदुषण होत आहे, परंतु या अणुभट्टया आणि अणुचाचण्यांमुळे सुध्दा प्रदुषण होत आहे. तुलनेने ते कमी आहे हे मी समजू शकते. परंतु मोठा धोका यापासून आहे. यामध्ये दुसरी एक बाब अशी की, आपण विज्ञानाचा दुधारी वापर करीत आहोत. अणुशक्ती हे दुधारी शस्त्र आहे. ते मानवाला जगवेल आणि मानवाला संपवेल. म्हणून ते

..२..

वापरत असताना आपला दृष्टीकोन सकारात्मक असला पाहिजे. आपला देश अमेरिकेबरोबर अणू करार करावा असे म्हणतो. याचे कारण आता आपल्याला पारंपरिक पध्दतीने ऊर्जा निर्माण करणे महाग होऊ लागलेले आहे. अणुशक्ती पासून ऊर्जा निर्मिती करण्यासाठी हा करार केला जात असून त्या कराराचे आपण स्वागत केले पाहिजे आणि तो करार झाला पाहिजे. तो चर्चेचा वेगळा विषय होईल. परंतु अणुशक्तीचा वापर आपण ऊर्जा निर्मितीसाठी करणार आहोत. या अणुशक्तीचा वापर आपण मानवाला जगण्यासाठी करणार की मानवाचा विध्वंस करण्यासाठी करणार यासंबंधीचा जगाचा हेतू स्पष्ट झाला पाहिजे आणि त्यादृष्टीने चर्चा करण्यामध्ये महाराष्ट्र आणि आपला देश हा अग्रेसर राहिला पाहिजे अशा प्रकारची भावना मी व्यक्त करते.

सभापती महोदय, या ठिकाणी मुंबईचा उल्लेख करण्यात आला. मुंबई विषयी उद्या या सभागृहामध्ये चर्चा होणार आहे म्हणून त्या विषयावर मी अधिक वेळ घेणार नाही. परंतु ख-या अर्थाने जर त्सुनामीचा धक्का बसला तर मुंबईचे काय होईल ? संपूर्ण मुंबई पाण्याखाली जाईल. ती जात असताना अगोदर कोण जाईल ? तर आधी धारावीची झोपडपट्टी जाईल. जी समुद्रापासून कमी अंतरावर आहे. तिथे कोणतीही व्यवस्था नाही. मुंबई जलमय झाली त्यावेळी मुंबईतील गरीब माणसाचे जनजीवन कोलमडले, ज्यांच्या घरामध्ये साठा आहे त्यांचे जनजीवन कोलमडले नाही. या मुंबईच्या संदर्भात विचार करीत असताना या ठिकाणची उपनगरे, मुंबईच्या पायाभूत सुविधांवर पडणारा ताण, १९६१ला 41 लाख 42 हजार लोकसंख्या असलेले हे मुंबई शहर आता सव्वाकोटीपेक्षा जास्त लोकसंख्येचे झालेले आहे. येथील जागेची टंचाई, पाण्याची टंचाई, ई-कचरा, डिजिटल कचरा, प्लास्टिक कचरा यावर या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. ही सर्व आपल्या समोरची आव्हाने आहेत, धोके आहेत. 23 लाख झोपड्यांचे अतिक्रमण झालेले आहे. आता 1995 पर्यन्तच्या की 2000 पर्यन्तच्या झोपडया अधिकृत समजायच्या की आणखी कोणते साल त्यासाठी घोषित करायचे यासंबंधी याठिकाणी चर्चा केल्या जातात. परंतु त्याबाबतीत मार्ग निश्चितच काढावा लागेल. मिठी नदीमधील 3600 अतिक्रमित झोपड्या पैकी 2700 झोपड्या पुनर्वसनास प्राप्त आहेत असे आपण गृहीत धरले. एकटया धारावीचे क्षेत्र 213 हेक्टर आहे आणि

..3..


MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 20:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती उषा दराडे....)

तेथे 70 हजार कुटुंबे आहेत. हा कागदावरचा आकडा आहे. प्रत्यक्षात हे आकडे जास्तही असू शकतील. हे सर्व आपण धोक्यामध्ये घालणार आहोत काय ? आज मुंबईमध्ये संपूर्ण जगाचा फ्लो येत आहे. मुंबई हा आपल्या देशाचा चेहरा आहे. म्हणून मुंबईला धोका पोहोचेल हे निश्चितच पण तो जर पोहोचला तर तो केवळ मुंबईलाच पोहोचणार नाही. म्हणून ग्लोबल वॉर्मिंगमुळे फक्त मुंबईच धोक्यात नाही.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 20:40

श्रीमती उषा दराडे...

फक्त आपला देश धोक्यात नाही तर संपूर्ण जग धोक्यात आलेले आहे. या विषयाच्या बाबतीत सर्वंकष चर्चा करणे आवश्यक आहे. जागतिक बँकेचे मुख्य अर्थतज्ञ सर निकोलेस यांनी जगातील अर्थव्यवस्था कोलमडून पडेल अशी भीती व्यक्त केली आहे. अर्थव्यवस्थेवर किती ताण पडेल, आपल्या भारताची आणि आपल्या राज्याची अर्थव्यवस्था पाहिली तर आपण एका ऑक्सीजनवर जगत आहोत. आपण गेल्या तीन, चार वर्षापासून स्टेबल झालो आहोत असे म्हणतो आहोत. पण असा एक त्सुनामीचा तडाखा आला तर जगातील अर्थव्यवस्था कोलमडून पडण्यास वेळ लागणार नाही. अशा भयानक परिस्थितीमुळे जगाची अर्थव्यवस्था कोलमडून पडेल असे सर निकोलेस यांनी भाकीत केले आहे. हवामानातील सततचे बदल, गरमीचे काहूर, अनियमित पाऊस पडणे, एकाच भागात पाऊस पडणे, बाजूच्या दुस-या भागात पाऊस न पडणे, गरम वादळ येणे, 2005 मध्ये आलेली त्सुनामीची लाट, अमेरिकेतील कॅटरिना वादळ, भूकंपाचे वाढते प्रमाण, पक्षांचे घटते प्रमाण, पिकपाण्याची अनियमिता हे सगळे सिम्पटम्स आहेत. पिकपाणी अनियमितपणे येत आहे हे त्याचे सिम्पटम्स आहेत. त्या विषयी या ठिकाणी बरीच चर्चा झाली. अमेरिकेचे माजी उप राष्ट्रपती यांनी पर्यावरणावर खूप अभ्यास केला. त्यांनी याबाबतीत खूप चांगले मार्गदर्शन केले. चांगल्या सूचना केल्या म्हणून त्यांना नोबेल पारितोषिक दिले गेले. याच्यामागे वर्डपीसची कल्पना आहे. या अर्थाने या गोष्टीकडे पाहिले पाहिजे. इंटर गव्हर्नमेंटरी पॅनल फॉर क्लायमेटींक चेंज यांचे काही ओपिनियन मी या ठिकाणी देणार आहे. ही आंतरराष्ट्रीय संस्था आहे. या संस्थेची स्थापना 1988 या वर्षी झालेली असून त्या संस्थेने पर्यावरणाच्या संदर्भात अहवाल सादर केलेला आहे.दर तीन वर्षांनी अद्यायावत निरीक्षणे व अभ्यासक्रमाव्दारे सा-या जगाला संभाव्य धोक्याच्या सूचना या संस्थेने केलेल्या आहेत. अलिकडेच या संस्थेने चौथा अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये नजीकच्या काळात पृथ्वीवर ध्रुवीय तपमानामुळे जगावर फार मोठे संकट येण्याची शक्यता आहे. त्यात वित्त हानी आणि मनुष्यहानी मोठया प्रमाणात होण्याची शक्यता वर्तविली आहे. त्याचे कारण त्यांनी सांगितले आहे की, प्रदुषण वाढीस निसर्ग कारणीभूत नसून त्यास मनुष्यप्राणी जबाबदार आहे. हे सगळे काही आपण करतो आहोत, त्याच्या मुळाशी मनुष्य आहे जो वैज्ञानीक दृष्टीने प्रगती करतो आहे, तो शनी, सूर्य, मंगळ यांना जिंकण्याची भाषा करतो आहे. पण स्वत: मात्र एका ग्लोबल वार्मिंगमुळे संपविण्याचा खड्डा स्वत:च्या हाताने खोदतो आहे. या मानवी कृतीमुळे तापमान वाढत

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

असून दोन्ही धृवावरील दक्षिण आणि उत्तर गोलार्धात प्रदीर्घकाळ साठलेला घट्ट बर्फ वितळत जाऊन त्याची परिणिती अखेर समुद्राच्या पातळीमध्ये वाढ होईल असे त्यांनी म्हटले आहे. तशी परिस्थिती झ ालेली आहे आणि त्या दिशेने पाऊले टाकण्यास सुरुवात केली आहे. 28 ते 43 से.मी. पेक्षा जास्त म्हणजे दीड फुटापेक्षा जास्त पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता आहे. यात अजून वाढ होऊ शकते. वेळ कमी देण्यात आला आहे याची मला कल्पना आहे. परंतु हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. यातील काही महत्वाचे मुद्दे मांडले नाहीत तर मला खूप गिल्टी होईल.

**तालिका सभापती** ( श्री. अरविंद सावंत ) : आज एच.बी.ओ.चॅनेलवर वर अलगोरची फिल्म रात्री 9.00 वाजता दाखविली जाणार आहे. मला असे वाटते की, या सदनातील सर्व सदस्यांनी ती फिल्म पहावी.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, 2050 या वर्षाच्या दरम्यान ध्रवीय प्रदेशातील बर्फ उन्हाळयात दिसणार नाही. ध्रुव प्रदेशावर उन्हाळयात कोणी गेले तर तेथे पूर्वी बर्फ होता असे सांगितले तर तो इतिहास होता असे सांगितले जाईल. त्या ठिकाणी असलेल्या जमिनी नांगरुन तेथे शेती करण्यास सुरुवात सुध्दा होऊ शकेल असे वैज्ञानिकांचे भाकीत आहे. उष्णतेमुळे ज्या व्हूज येतील, त्यामुळे संपूर्ण पृथ्वीची सुरक्षितता धोक्यात येणार आहे, निसर्गाचे संपूर्ण चक्र बदलते आहे असे सर निकोलेस यांनी भाकीत केले आहे. वेगवेगळया रोगाच्या साथी पसरण्याची शक्यता आहे. ज्याचा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी छान उल्लेख केला आहे. ध्रुवीय प्रदेशातील बर्फ वितळून पाण्याची पातळी वाढेल, गरम वादळे सुरु होतील, त्यामुळे समुद्रात मोठया प्रमाणात लाटा उसळतील, त्यामुळे समुद्र किना-याचे भवितव्य धोक्यात येणार आहे. आपल्याला समुद्र किनारा लाभलेला आहे. लहान बेटे समुद्राच्या लाटेमुळे गिळंकृत होण्याची शक्यता आहे. ध्रुवीय प्रदेशात बर्फ वितळून तेथील जमीन वळीत करता येईल अशी परिस्थिती निर्माण होईल. स्थित्यंतरामुळे कित्येक भूजलचर प्राणी नष्ट होतील, मानवीकृतीमुळे वाढलेल्या उष्णतेमुळे ओझोन वायूच्या पट्टयामध्ये छीद्र पडेल. ओझोन वायूच्या पट्टयात छिद्रे पडली तर पुढे काय धोका होऊ शकतो...

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MMP/ 20:45

श्रीमती उषा दराडे...

पाण्याच्या बाबतीत चर्चा केलेली आहे. नागरी विकासाच्या बाबतीत आपण चर्चा केलेली आहे आणि नागरिकरणाच्या विस्तारामुळे प्रदुषणाबाबत किती धोका निर्माण झालेला आहे ते आपण सांगितलेले आहे. एक उल्लेख महायुध्दाच्या बाबतीत करावयाचा राहू गेला आहे. 1945 मध्ये हिरोशिमा आणि नागासकी या शहरावर अणुबॉम्ब टाकण्यात आले. त्या बॉम्बचा काय परिणाम झाला ? या बॉम्बमुळे त्यावेळी जे प्रदुषण झाले ते या ग्लोबल वॉर्मिंगला पूरक नाही काय ? वेगवेगळया प्रकारची रोगराई पसरण्यासाठी पूरक नाही काय ? कुठलेही राष्ट्र अशा घटनांच्या बाबतीत तटस्थ राहू शकत नाही. तिकडे काही घडले त्याचा परिणाम माझ्या भारताला काय असा विचार करुन चालणार नाही. खरे म्हणजे मी बरीच कोटेशन्स देणार होते. परंतु वेळ कमी असल्यामुळे मी माझे भाषण थोडक्यात आटोपते घेणार आहे. मला एक विनंती करावयाची आहे की आम्ही काय करु शकतो यासाठी ज्या सजेशन आल्या आहेत त्यामध्ये मुंबईमध्ये वर्ल्ड कॉन्फरन्स शासन घेऊ शकते. ग्लोबल वॉर्मिंगबाबत चर्चा करु शकता. महाराष्ट्राने काय करावयाचे आहे यासंदर्भात सूचना आल्या त्यामध्ये एक महत्वाची सूचना करावयाची आहे की, हा विषय सुध्दा अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करावा, माझ्या लहानपणी महात्मा गांधींनी हिशोब नावाचा धडा लिहिला होता. अर्धा ग्लास पाणी प्यायल्यानंतर ते शिल्लक होते ते त्यांनी झाडाच्या बुंध्यात टाकले होते. हा माणसांना हिशोब शिकविण्याचा विषय आहे. म्हणून लहान मुलांना पर्यावरणाविषयी जबाबदारीची जाणीव दिली तर अधिक सोईचे होईल. दुसरा मुद्दा असा की, अवैज्ञानिक पध्दतीने रासायनिक खतांचा वापर केल्यामुळे जसा जंगल तोडीमुळे त्रास होतो आहे, वनराई संपते आहे. अनेक कारणे आहेत. अवैज्ञानिक पध्दतीमुळे रासायनिक खतांचा वापर केल्यामुळे, चुकीच्या खतांचा वापर केल्यामुळे, मृदसंधारणाचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना कमी प्रमाणात असल्यामुळे जमिनी राठ झालेल्या आहेत. जमिनीचे पाणी पूर्णपणे वाहून जाते. तळात गाळ साठल्यामुळे पाणी वाहून जाते आहे. त्यामुळे जमिनीची साय ज्याला आपण जमिनीचा पोत म्हणतो तो पूर्णपणे वाहून जात आहे. या राठ झालेल्या जमिनीमध्ये पाणी शोषून घेण्याची क्षमता कमी झालेली आहे. माझे आजोबा, माझी आजी माझे वडील ज्यावेळी शेणखताने शेती करावयाचे त्यावेळी निसर्गत: त्याच्यामध्ये गांडूळ तयार व्हायचे. पण आज आपल्याला कंपोस्ट खताचे प्रशिक्षण द्यावे लागते. ऊसाचे पाचड जाळू नका, गव्हाचे काड जाळू नका, बाजरीचे ताट जाळू नका, बेशरमाचे शरमट जाळू नका, कापसाच्या पऱ्हाटया जाळू नका किंवा उडदाचे भुसकट

...2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

सुध्दा जाळू नका हे खताला कामी येत आहे असे शिकविण्याची पाळी आलेली आहे. हा विषय अभ्यासक्रमात घ्यावा किंवा किमान विद्यापीठाला सक्तीचा करावा असे मला स्वत:ला वाटते. गाईच्या शेणाबद्दल याठिकाणी सांगण्यात आले. गाईच्या शेणापासून तयारी होणारी गोवरी जाळली किंवा त्याही पेक्षा गाई रानात शेण टाकते तेथे ते सौर ऊर्जेवर वाळते ही गोवरी जर घरात डास टिकत नाहीत. लिंबाचा पाला जाळला तर डास घरात टिकत नाहीत. ती फार उपयुक्त आहे. तिची राख दातांना जंतूनाशक म्हणून काम करते. ही साधनसंपत्ती आमच्याकडे आहे. आम्ही वाळू उपसतो आहोत, झाडे तोडतो आहोत, रस्ते करीत आहोत. वनीकरण सक्तीचे करणे आवश्यक आहे. झाडे जेवढी तोडली जातील त्याच्या दुप्पट लावली पाहिजेत असे कार्यकारी अभियंत्यांना सक्तीचे करा. आपण देणे लागत नाही घेणेच लागतो. सेंद्रीय खतांचा वापर करणे, शेतीमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवणे, रासायनिक खतांचे प्रशिक्षण देणे आणि त्यांचे प्रमाण शिकविणे या सगळया गोष्टी जर ग्लोबल वॉर्मिंगला रोखण्यासाठी उपयोगात आणल्या तर त्याचा निश्चितच परिणाम होईल. खूप चांगल्या सूचना आलेल्या आहेत त्याचे मंत्रीमहोदय स्वागत करतील अशी मी अपेक्षा बाळगते आणि पुन्हा एकदा माझा देश आणि माझा महाराष्ट्र आणि मुंबईसह आम्ही सर्व या जगाचा अंतर्विरोध संपविण्याआधी जागतिक शांतता प्रस्थापित करण्यामध्ये आणि ग्लोबल वॉर्मिंग रोखण्यामध्ये जीव-जंतू सांभाळण्यामध्ये आणि पूर्ण मानवसृष्टी सांभाळण्यामध्ये पुढाकार घेईल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करते आणि माझे भाषण संपविते.

धन्यवाद.

------

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : या प्रस्तावावरील चर्चा आता स्थगित करण्यात येत आहे. माननीय मंत्रीमहोदयांचे या प्रस्तावावरील उत्तर उद्या नियमित बैठकीत ठेवण्यात येईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार, दिनांक 23 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 1.00 वाजता होणाऱ्या विशेष बैठकीमध्ये मुंबईच्या समस्या या प्रस्तावावर एकत्रितपणे चर्चा होईल व त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 50 मिनिटांनी बुधवार, दिनांक 23 एप्रिल, 2008 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही